आहेत, व ज्या ठिकाणीं जाण्याचें मनांत आणणें सुद्धां अशक्य असा एक पर्वत कश्यप ऋषींनीं त्यास सांगून दिला. तेव्हां प्रचंड गुहा असलेल्या त्या पर्वताकडे जाण्याच्या उद्देशानें तो पक्षिराज तो हत्ती व कासव ह्यांसहवर्तमान मोठ्या वेगानें निघाला. तो पक्षी जी प्रचंड शाखा घेऊन आला, ती शाखा कांहीं सामान्य नव्हती. शंभर बैलांच्या कातड्याची केलेली तात त्या शाखेच्या भोंवतीं एक वेढा देण्यास सुद्धां पुरली नसती. असो. नंतर तो पक्षिराज गरुड थोड्याच वेळांत एक लक्ष योजनें निघून गेला; पुढें तो पित्याच्या आज्ञेप्रमाणें त्या पर्वतावर जाऊन पोहोंचला, आणि मोठ्यानें गर्जना करीत करीत त्यानें ती शाखा तेथें फेकून दिली. परंतु त्या गरुडाच्या पंखांच्या वाऱ्याचा तडाका लागल्यामुळें तो विशाल पर्वतही डळमळं लागला, आणि त्याच्यावरील वृक्षांचीं पुष्पें गळून पडूं लागल्यामुळें, तो गरुडावर पुष्पवृष्टिच करीत आहे असें वाटलें. त्या पर्वताचीं रत्नखचित चित्रविचित्र शोभा देणारीं शिखरें इतस्ततः मोडून पडलीं. विद्युत्प्रभेनें ज्याप्रमाणें मेघ हे शोभिवंत दिसतात, त्याप्रमाणें सुवर्णपुष्पांनीं लकलकणाऱ्या अनेक शाखा असलेले दुसरेही अनेक वृक्ष, त्या विशाल शाखेचा धक्का लागल्यामुळें उन्मळून पडले! आणि पर्वतावरील धातु त्यांत मिश्र झाल्या असल्यामुळें, व सुवर्णाप्रमाणें देदीप्यमान दिसणाऱ्या त्या वृक्षावर आणखी सूर्याचे किरण पडल्यामुळें ते फारच खुलूं लागले. तेव्हां त्या पक्षिराज गरुडानें त्या पर्वताच्या शिखरावर बसून तो हत्ती व कासव ह्या दोघांसही भक्षण केलें. ह्याप्रमाणें त्या हत्तीला व कासवाला भक्षण केल्यानंतर तो महान वेगवान गरुड त्या पर्वतशिखरावरून उडाला.

स्वर्गांतील उत्पात.

त्या पक्षिराज गरुडाने जेव्हां उड्डाण केलें, तेव्हां देवांना अरिष्टसूचक असे उत्पात होऊं लागले. स्वर्गाधिपति इंद्राचें आवडतें शस्त्र जे वज्र, तेंही त्या वेळीं प्रज्वलित झालें. ज्वाला व धूर ह्यांसहवर्तमान दिवसा ढवळ्या उल्कापात होऊं लागले. त्याप्रमाणेंच अष्टवसु, एकादशरुद्र, द्वादशादित्य, साध्य, मरुद्गण, आणि इतरही झाडून साऱ्या देवतागणांचीं अस्त्रें एकमेकांकडे धावूं लागलीं. देवांचा व दैत्यांचा पूर्वी एवढा मोठा घनघोर संग्राम झाला खरा; पण त्या वेळेसही अनुभवास आलेले नाहींत असे सोसाट्याचे वारे वाहूं लागले, आणि उल्कांचा तर काय केवळ सडा झाला! आकाशांत एकही ढग नसतां मेघांच्या गडगडानें तें सारें दणाणून गेलें. पर्जन्याधिपति हा रक्ताचा वर्षाव करूं लागला! देवांच्या पुष्पमाळा कोमेजून जाऊन तेही स्वतः निस्तेज पडले. प्रलयकालचे भयंकर मेघ रक्ताच्या मुसळधारा सोडूं लागले. धूळ तर इतकी उडत होती कीं, तिचे देवांच्या मुकुटांवर थरचे थर बसले! असे भयंकर उत्पात होऊं लागल्यामुळें सर्व देवांसहवर्तमान इंद्राची अगदी पांचावर धारण बसली; आणि तो बृहस्पतीला म्हणाला, "हे भगवन्! युद्धामध्यें आमचा पराभव करणारा शत्रु तर कोठें दिसत नाहीं, असें असतां एकाएकीं हे भयंकर उत्पात कां बरें होत आहेत?"

बृहस्पतींनीं उत्तर दिलें:—देवेन्द्रा! तुझे अपराध व प्रमाद ह्यांमुळें, आणि महात्मे ऋषिश्रेष्ठ वालखिल्य ह्यांच्या तपःप्रभावामुळें, कश्यप ऋषींचा विनतेच्या ठिकाणीं झालेला पक्षिरूप महाबलाढ्य व इच्छित रूपें धारण करणारा पुत्र गरुड अमृत नेण्याकरितां इकडे येत आहे. तो पक्षी सर्व बलवंतांमध्यें श्रेष्ठ असून अमृत घेऊन जाण्याला समर्थ आहे. तो पाहिजे ती गोष्ट साध्य करील;—त्याला अशक्य असें त्रैलोक्यामध्यें सुद्धां कांहीं नाहीं.

देवांनीं केलेली युद्धाची तयारी.

सौति म्हणाला:—हें बृहस्पतीचें वाक्य श्रवण

करून अमृताचें रक्षण करणाऱ्या देवांस इंद्र म्हणाला, "मोठा बलाढ्य व शूर असा एक पक्षी अमृत घेऊन जाण्याच्या खटपटींत आहे, तर त्याला तें बलात्कारानें नेतां येऊं नये म्हणून आधींच मी तुम्हांस सावध करून ठेवतों. बृहस्पति म्हणतात कीं, त्याचें बळ केवळ अप्रतिम आहे."

हें इंद्राचें भाषण श्रवण करून देवांनाही मोठें आश्चर्य वाटलें, व ते त्या अमृताभोंवतीं वेढा देऊन बसले. महाप्रतापी इंद्रही आपलें वज्र घेऊन तयार झाला. त्या विचारवान देवांनीं वैडूर्य रत्नें बसविलेलीं अत्यंत मौल्यवान सुवर्णाचीं चित्रविचित्र कवचें धारण केलीं. हातांमध्यें बळकट व लकलकीत ढाली अडकविल्या आणि तशींच अनेक प्रकारचीं शस्त्रें हातांत घेतलीं. मुख्य मुख्य देव, ज्यांच्यांतून चोहोंकडे ठिणग्या व धूर पसरत आहे अशीं, व पाजळ्यामुळें ज्यांच्या धारा व टोंकें तीक्ष्ण झालीं आहेत अशीं शस्त्रें उगारून बसले. चक्रें, परिघ, त्रिशूळ, परशु, अनेक प्रकारच्या तीक्ष्ण शक्ति, चकचकीत तरवारी, दिसण्यांतही भयंकर अशा गदा इत्यादि आयुधें आपआपल्या शरिरांस शोभतील तसतशीं घेऊन सारे देव सज्ज झाले. देवगण हे मूळचेच निष्पाप असल्यामुळें स्वयंसिद्धच देदीप्यमान, त्यांत त्यांनीं आणखी दिव्य अलंकार धारण केलेले, आणि लकलकीत शस्त्रें परजलेलीं, ह्यामुळें ते फारच सुप्रभ दिसूं लागले. अमृताचें संरक्षण करण्याविषयीं त्यांनीं दृढ निश्चय केला होता; व जे राक्षसांचीं ठाणीं विध्वंस करून टाकणारे, त्या देवांचें बल, वीर्य व तेज केवळ अनुपमेय होतें, त्यामुळें त्यांचीं शरिरें अग्नीप्रमाणें तेजःपुंज दिसूं लागलीं. ह्याप्रमाणें ते देव कडेकोट तयारीनें उभे राहिले असतां, हजारों परिघांनीं व्याप्त झालेलें तें भव्य समरांगण, सूर्यकिरणांनीं सुप्रकाशित झालेलें दुसरें आकाशच एकदम पसरलें कीं काय, असें भासूं लागलें !

~~~~~~~

अध्याय एकतिसावा.

—:०:—

गरुडाची उत्पत्ति.

शौनकांनीं प्रश्न केला:—हें सूतपुत्रा ! महेंद्राचा अपराध कसला होता ? व प्रमाद तरी काय ? आणि वालखिल्यांच्या तपानें गरुड तरी कसा उत्पन्न झाला ? कश्यप ऋषि हे जातीचे ब्राह्मण होते; असें असतां त्यांस हा पक्षिराज पुत्र कसा झाला ? आणि तो सर्व प्राण्यांना अजिंक्य व अवध्य तरी कसा झाला ? तसेंच, तो पक्षी वाटेल तिकडे संचार करणारा व अतुलपराक्रमी कशानें झाला ? सौते, हें जर पुराणांत सांगितलेलें असेल, तर तें आम्हांस ऐकण्याची इच्छा आहे.

सौति म्हणाला:—शौनकादि मुनिश्रेष्ठहो, आपण विचारीत आहां, तो विषय पुराणांतीलच आहे. तो मी सारा संक्षेपानें सांगतों, श्रवण करा. पूर्वीं पुत्रप्राप्तीची इच्छा धरून कश्यप प्रजापति यज्ञ करूं लागले, त्या वेळीं त्यांस यज्ञाला ऋषींनीं, देवांनीं व गंधर्वांनीही साह्य केल्याचें प्रसिद्ध आहे. त्या यज्ञामध्यें कश्यपानीं इंद्र, वालखिल्य मुनि, व इतर देवगण यांजकडे समिधा आणण्याचें काम सोंपविलें होतें. त्या वेळीं इंद्रानें आपल्या सामर्थ्याप्रमाणें पर्वतासारखा एक समिधांचा भारा सहज उचलून आणला. तो आणीत असतां मार्गामध्यें अगदीं ठेंगणे—केवळ आंगठ्याच्या पेरायेवढे—वालखिल्य ऋषि, एका जुटीनें पळसाची एक कांब काढी मोठ्या प्रयासानें आणीत असलेले त्याच्या दृष्टीस पडले. ते ऋषि मोठे तपस्वी असून त्यांनीं आहार वर्ज्य केला असल्यामुळें ते अत्यंत कृश झाले होते; आणि गाईच्या उमटलेल्या पाऊलभर पाण्यामध्येंच गटकळ्या खात होते ! परंतु इंद्राला आपल्या बळाचा गर्व असल्यामुळें, त्यांना पाहून इंद्राला मोठा चमत्कार वाटून तो हसूं
~~~~~~~

लागला; आणि त्या कुचमत असलेल्या वालखिल्य ऋषींचा अपमान करून तो लवकर लवकर पुढें चालता झाला. तेव्हां ते वालखिल्य ऋषि रागानें संतप्त झाले, आणि अत्यंत व्याकूळ होऊन, इंद्रावर मोठें संकट गुदरेल अशा महत्कर्मास त्यांनीं प्रारंभ केला. आतां, हे विप्रहो! त्या महान तपस्वी वालखिल्य ऋषींनीं कोणती मनीषा धारण करून लहानमोठया मंत्रांनीं अग्नींत विधिपूर्वक हवन केलें तें श्रवण करा. पाहिजे तितकें वीर्य व हवें तिकडे जाण्याचें सामर्थ्य ज्याच्या अंगीं आहे, व जो ह्या प्रांतांत असलेल्या इंद्राला केवळ 'दे माय धरणी ठाय' करून सोडील, असा एखादा नवाच इंद्र ह्या सर्व देवांना उत्पन्न करून द्यावा असा त्यांचा कृतनिश्चय होता. शौर्यामध्यें व वीर्यामध्यें ह्या सांप्रतच्या इंद्रापेक्षां शतपटीनें श्रेष्ठ, आणि मनाप्रमाणें वेगवान असा भयंकर दुसराच इंद्र आपल्या तपश्चर्येच्या फलानें उत्पन्न व्हावा असा त्यांचा मनोदय होता. तो त्यांचा उद्देश ऐकून देवांचा राजा इंद्रही रागानें संतप्त झाला, आणि त्या वेळी तो उत्तम तपश्चर्या करणाऱ्या कश्यप ऋषींला शरण गेला. तेव्हां कश्यप प्रजापतींनीं इंद्राचा सर्व वृत्तांत ऐकून घेतला, आणि तसेंच वालखिल्य ऋषींकडे जाऊन 'आमचें एक काम होईल काय?' असा त्यांनीं त्यांस प्रश्न केला. वालखिल्य ऋषिही परमसत्यवादीच होते. त्यांनीं "होय, होईल." असेंच त्यांस उत्तर दिलें. तेव्हां ते कश्यप प्रजापति, त्यांच्या क्रोधाचें सांत्वन होईल अशा रीतीनें बोलूं लागले कीं, "हा त्रिभुवनावर सत्ता करणारा इंद्र ब्रह्मदेवाच्या आज्ञेवरूनच झालेला आहे; आणि, हे तपोधनहो! आपणही पुनः नवा इंद्र होण्याची खटपट करीत आहां; परंतु, हे सज्जनश्रेष्ठहो! त्या ब्रह्मदेवाचें वाक्यही मिथ्या करणें आपणांस योग्य नाहीं; व आपण मनांत योजिलेला बेतही मिथ्या होणार नाहीं. ह्याकरितां, आपला हा अत्यंत बलाढ्य व पराक्रमी इंद्र पक्ष्यांचा व्हावा, आणि हा देवांचा राजा इंद्र याचना करीत आहे, ह्यावर कृपा करावी."

सौति सांगतो:–हे शौनकादिक मुनिवर्यहो, ह्याप्रमाणें कश्यपांनीं त्या तपोधन वालखिल्य ऋषींना सांगितलें, तेव्हां त्या मुनिश्रेष्ठ कश्यप प्रजापतींना अत्यंत सन्मानपूर्वक व पूज्य बुद्धीनें त्यांनीं उत्तर दिलें कीं, "हे प्रजापते! आमचा हा सारा खटाटोप केवळ इंद्राकरितांच आहे; व आपणही पुत्राकरितांच हा उद्योग आरंभिलेला आहे. तर आमचें हें कर्माचें प्राप्त झालेलें फळ आपणच ग्रहण करावें, आणि सर्वांस कल्याणकारक काय तीं आपणच योजना करावी."

सौति म्हणाले:—ऋषीहो, ह्याच वेळीं शुभ, कल्याणी, यशस्विनी, मनांत पुत्रप्राप्तीची लालसा धरणारी व निरंतर नियमधर्मांविषयीं तत्पर अशी दक्षकन्या विनता देवी ऋतुस्नात होऊन शुचिर्भूत झालेली असून, अपत्याच्या प्राप्तीकरितां आपला भर्ता जो कश्यप, त्याच्या जवळ आली असतां तो तिला म्हणाला, "हे देवी! तूं ज्या व्रताचा आरंभ केला होतास, त्याची सफलता होऊन तुझे मनोरथ पूर्ण झाले. तुझ्या उदरीं त्रैलोक्याधिपति असे दोन वीर पुत्र जन्मास येतील; आणि ते दोन्ही वालखिल्य ऋषींच्या तपोबलेंकरून माझ्या मनोरथाप्रमाणें महान भाग्यवान होऊन त्रैलोक्यालाही पूज्य असे निपजतील." इतकें सांगून भगवान कश्यप ऋषि पुनः म्हणाले, "हे पुत्र परमभाग्यास चढणारे आहेत. ह्याकरितां त्यांचें गर्भामध्यें सुद्धां तूं फार काळजीनें संरक्षण कर. ते दोघेही सर्व पक्ष्यांचे राजे होऊन त्यांच्यावर स्वामित्व चालवितील; आणि ते दोघेही पक्षी इच्छित रूप धारण करणारे व शूर असल्यानें सर्व लोकांस पूज्य होतील. ह्याप्रमाणें पत्नीला सांगितल्यानंतर ते कश्यप प्रजापति मोठ्या

आनंदानें इंद्राला म्हणाले कीं, " ते तुला साह्य करणारे महापराक्रमी असे बंधुच होतील. ह्याकरितां, हे इंद्रा ! तुझ्याकडून त्यांना कधीही अपाय घडूं नये. आतां, इंद्रा, ह्या इंद्रपदावर तूंच कायम राहशील. ह्याकरितां, मनांतील राग आतां सोडून दे; आणि ह्यापुढें ब्रह्मवेत्त्यांचा कधींही उपहास करीत जाऊं नको. जे अतिशय रागीट असून शापवाणीरूप वज्र ज्यांच्या हातांत असतें, त्यांचा गर्वानें अपमान करणें तुला योग्य नाहीं."

ह्याप्रमाणें कश्यपांनीं भाषण केल्यावर तो इंद्र निर्धास्त होऊन स्वर्गाला निघून गेला, व विनताही आपले मनोरथ सिद्धीस गेले म्हणून आनंदित झाली. नंतर तिला अरुण व गरुड असे दोन पुत्र झाले. त्यांपैकीं, शरिरानें व्यंग असलेला अरुण हा सूर्याचा सारथि झाला; आणि दुसऱ्या–गरुडाला ब्रह्मदेवानें पक्ष्यांच्या प्रभुत्वाचा अभिषेक केला. हे भृगुनंदना ! असा जो महापराक्रमी गरुड, त्यानें केलेलें महत्कृत्य आतां तूं श्रवण कर.

अध्याय बत्तिसावा.

—:०:—

गरुडाचें व देवांचें युद्ध.

सौति म्हणालाः—हे विप्रवर्य हो ! अशा प्रकारें देवसेना संग्रामाला सिद्ध झाली असतां, पक्षिराज गरुडही तत्काल देवांपुढें जाऊन उभा राहिला. त्या महाबलाढ्य गरुडाला पहातांच देवांची अगदीं गाळण झाली. ते भयानें अगदीं थरथर कांपूं लागले. त्यामुळें त्यांच्या हातांत असलेलीं शस्त्रें एकमेकांवर आदळूं लागलीं ! त्यांत, केवळ अलोट बुद्धीचा, अग्नि किंवा विद्युल्लता ह्यांच्यासारखा तेजःपुंज, आणि अत्यंत पराक्रमी असा 'विश्वकर्मा' ह्या नांवांचा एक अमृताचा संरक्षक होता, त्याचें आणि पक्षिराज गरुडाचें एक मुहूर्तभर तुमुल युद्ध झालें. त्यामध्यें त्याला गरुडाच्या चोंचीच्या, नखांच्या व पंखांच्या जखमा लागून त्या युद्धामध्यें तो विव्हळ होऊन पडला. नंतर त्या गरुडानें आपल्या पंखांच्या वायूनें इतका कांहीं धुरळा उडवून दिला कीं, सर्व लोक निखालस आंधळे होऊन गेले, आणि देवांच्या तर नाकातोंडांतून धुरळाच भरून राहिला. अशा प्रकारें देवांना त्या धुळीनें अगदीं घाबरें केल्यामुळें ते भांबावले; आणि त्यांच्या सभोंवार जिकडे तिकडे धूळच धूळ भरून राहिल्यामुळें, अमृताचे रक्षक होते तेही त्यांस दिसतनासे झाले. अशा प्रकार त्या गरुडानें स्वर्गामध्यें धुळीचा अगदीं कहर करून सोडला, आणि पंखांनीं व चोंचीनें बोचून बोचून देवांना अगदीं फाडफाडून घातलें. तेव्हां इंद्रानें लवकर वायूला हाक मारून आज्ञा केली कीं, 'हे वायो, हा धुळीचा वर्षाव बंद करून टाक. कारण तें काम तुझें आहे.'

इंद्रानें ह्या प्रमाणें सांगितल्यानंतर त्या बलशाली वायूनें तो सर्व धुरळा नाहीसा करून टाकला. धुरळा नाहीसा होतांच अंधारही नाहींसा झाला. तेव्हां देवांनीही गरुडावर हल्ला करण्यास सुरवात केली. जगद्व्याळ मेघ आकाशामध्यें ज्याप्रमाणें गर्जना करतो, त्याप्रमाणें त्या बलवान गरुडानें मोठी गर्जना केली; आणि देव ज्याच्यावर मारा करीत आहेत असा सर्व प्राणिमात्रास गर्भगलित करून टाकणारा तो महापराक्रमी पक्षिराज गरुड आकाशामध्यें उडाला, तेव्हां आकाशांत देवांच्यावर असलेल्या त्या गरुडावर कवचें धारण केलेल्या इंद्रासहवर्तमान सर्व देवांनीं मिळून एकदम पट्टे, परिघ, शूल, गदा, अर्धचंद्र बाण, सूर्यासारखीं जळजळीत असणारीं चक्रें इत्यादि नानाप्रकारचीं शस्त्रें सोडून त्याला अगदीं घेरून टाकलें. आपल्या सभोंवार अशा प्रकारच्या असंख्य घातक शस्त्रांचा सारखा वर्षाव होत असतांही, घनघोर युद्ध करणारा तो गरुड यत्किंचितही डगमगला नाहीं. आकाशाला केवळ जा-

ळीत असणारा महापराक्रमी जो गरुड, त्यानें आपल्या पंखांनीं व छातीनें धक्के देऊन देवांचो अगदीं दाणादाण करून दिली. गरुडाच्या नखांनीं व पंखांनीं झालेल्या जखमांतून भळभळां रक्त वाहत असलेले ते देव गरुडाच्या मारानें जर्जर होऊन दाही दिशांनीं पळत सुटले! पक्षिराजानें पराजित केलेले साध्य नामक देव गंधर्वांसहवर्तमान पूर्वेकडे पळूं लागले; रुद्रासहवर्तमान अष्टवसूंनीं दक्षिणेचा मार्ग धरला; वारंवार गरुडाशीं सामना देऊन नेटानें लढणाऱ्या महाबलाढ्य अशा द्वादशादित्यांनीं पश्चिम दिशा सुधारली; आणि अश्विनीकुमारांनीं उत्तर दिशेला आश्रय दिला! ह्यानंतर वीर अश्वक्रंद, रेणुक, शूरकथन, तपन, उलुक, श्वसन, निमेष, प्ररुज आणि पुलीन ह्या नऊ यक्षांशींही त्या आकाशगामी पक्षिराजानें रणसंग्राम केला. प्रळयकाळच्या वेळीं खवळलेल्या रुद्राप्रमाणें त्या शत्रुतापन गरुडानें त्यांनाही नखांच्या व चोंचीच्या टोंकानें जखमी केलें. मोठे बलशाली व धैर्यशाली असे जे यक्ष, त्यांच्या आंगाला चाळणीप्रमाणें भोंकें पडून जेव्हां सारखें रक्त वाहूं लागलें, तेव्हां ते रक्ताचा वर्षाव करणारे मेघच आहेत कीं काय असें वाटूं लागलें! ह्याप्रमाणें तो पक्षिराज गरुड सर्वांचा वध करून अमृत आणण्याकरितां निघाला, तों जिकडे तिकडे त्याला अग्निच दिसूं लागला. त्रैलोक्यास दग्ध करणाऱ्या सूर्याप्रमाणें त्याच्या प्रज्वलित झालेल्या ज्वाला प्रचंड वायूनें भडकल्या होत्या; आणि त्यांच्या योगेंकरून चहूंकडून आकाश भरून गेलें होतें. तें पाहून महात्म्या तपस्वी गरुडानें शेंकडों मुखें धारण करून, शेंकडों मुखांनीं शेंकडों नद्या प्राशन करून टाकल्या; आणि फिरून लागलाच तो त्या ठिकाणीं आला, व त्या प्रज्वलित झालेल्या अग्नीवर त्या नद्यांचें दडपण घालून त्याला अगदीं होता कीं नव्हता असें करून टाकलें; आणि तो सर्व अग्नि विझल्यावर त्या अमृताजवळ जाण्याकरितां त्यानें फिरून लहानसें स्वरूप धारण केलें.

अध्याय तेहतिसावा

—:०:—

गरुडाचें अमृतासह उड्डाण.

सौति म्हणाला:—त्या पक्ष्यानें सुवर्णमय सूर्यकिरणांप्रमाणें देदीप्यमान समुद्रांत घुसणाऱ्या लोंढ्याप्रमाणें अमृताजवळ मुसंडी दिली. परंतु त्या अमृताच्या भोंवतीं एक तीक्ष्ण धारेचें चक्रासारखें लोखंडाचें यंत्र असलेलें त्याच्या दृष्टीस पडलें. त्या यंत्राला तीक्ष्ण धारेचे हजारों वस्तरे लावलेले असून तें वेगानें एकसारखें फिरत होतें. तें सूर्य किंवा अग्नि ह्यांसारखें धगधगत असून, कोणी अमृत नेऊं लागला तर त्याचे तुकडे तुकडेच व्हावयाचे. इतकें तें भयंकर होतें. देवांनींही तेवढ्या कामाकरितांच महत्प्रयासानें तें घातक यंत्र तयार करून ठेविलें होतें. त्या पक्ष्यानें बराच वेळ त्या यंत्राभोंवतीं घिरट्या घालून त्या यंत्राच्या आंत काय आहे तें नीट न्याहाळून पाहिलें, आणि मग एकाएकीं अत्यंत सूक्ष्म रूप धारण करून त्याच्या आरांतूनच हां हां म्हणतां तो आंत शिरला. त्या चक्राच्या खालीं गरुड जातो न जातो तों, तेथें अमृताच्या संरक्षणाकरितां मुद्दाम ठेवलेले दोन मोठमोठाले भुजंग त्याच्या दृष्टीस पडले. ते पेटलेल्या अग्नीप्रमाणें जाज्वल्य होते. त्यांच्या जिव्हा विजेसारख्या चपळ व तेजस्वी असून मुखें व नेत्र हीं देदीप्यमान दिसत होतीं. त्यांच्या डोळ्यांत विष भरलेलें असून ते मोठे भयंकर व सदासर्वदा क्रुद्ध झालेले असून मोठे चपळ होते. त्यांचे नेत्र सदासर्वदा लालबुंद असून डोळ्यांची पापणीही लवत नसे. त्या दोघांपैकीं एका सर्पानें जरी कोणाकडे पाहिलें, तरी त्याचें तत्काळ भस्म होऊन जात असे! त्यांना पहातांच गरुडानें एकाएकीं

धूळ उडविली, आणि तिनें त्यांचे डोळे अगदीं भरून टाकले; व आपण त्यांस दिसेनासा झाल्यावर त्यांच्यावर चहूंकडून एकसारखा मारा चालू केला; आणि त्या आकाशांत संचार करणाऱ्या गरुडानें त्यांच्या अंगावर झडप घालून त्यांचे तुकडे तुकडे केले; आणि मोठ्या वेगानें तो मध्यभागीं असलेल्या अमृताच्या जवळ गेला! नंतर त्या बलाढ्य व पराक्रमी गरुडानें तें यंत्र मोडून टाकलें, आणि अमृताचा घट उपटून काढून तो झटकर उडून गेला. सारें अमृत हस्तगत झालें तरी सुद्धां त्यांतील एक बिंदुही प्राशन न करतां तें घेऊन गरुड झटकर बाहेर निघाला, आणि इतकें करण्यांत त्याला यत्किंचितही श्रम पडले नाहींत. हें सारें कृत्य त्यानें केवळ लीलेनेंच केलें, आणि सूर्याच्या प्रभेलाही आपल्या तेजानें मागें सारून तो आकाशामध्यें उडाला.

गरुडाची व महाविष्णूंची भेट.

इतक्यांत तेथें–त्या आकाशांत–त्याची व महाविष्णूंची गांठ पडली. तेव्हां त्याचें तें निर्लोभाचें कृत्य पाहून नारायण त्याच्यावर प्रसन्न झाले; आणि ते अक्षय्य असणारे भगवान नारायण त्या पक्ष्याला म्हणाले कीं, "मी तुला वर देण्यास सिद्ध आहें." तेव्हां त्या पक्ष्यानें "मी तुझ्यावर असावें" असा वर मागितला; आणि तो पुन: नारायणास असें म्हणाला कीं, "हे भगवन्! मीं अमृतावांचूनच अजरामर व्हावें." हें त्याचें भाषण श्रवण करून विष्णु त्या गरुडाला म्हणाले कीं, "त्याप्रमाणेंच होईल." ते विष्णूंनें दिलेले दोन वर ग्रहण केल्यानंतर गरुडही विष्णूस म्हणाला कीं, "मीही आपल्यास वर देतों. आपण भगवान आहां, तरी त्याचा स्वीकार करावा." तेव्हां त्या बलाढ्य गरुडापाशीं "तूं आमचें वाहन हो" असा विष्णूंनीं वर मागितला, आणि त्या भगवंतांनीं "तूं ध्वजावर राहशील" असें सांगून आपल्या ध्वजावर त्याची योजना केली. तेव्हां त्या देवाधिदेव नारायणाला 'तथास्तु' असें म्हणून, वेगामध्यें वायूशींही स्पर्धा करणारा तो गरुड मोठ्या वेगानें चालता झाला.

गरुडाचें व इंद्राचें सख्य.

तो पक्षिराज गरुड अमृत घेऊन चालला असतां इंद्रानें रागारागानें त्या पक्षिश्रेष्ठावर वज्राचा प्रहार केला. परंतु तो वज्राघात जणू काय झालाच नाहीं, अशा रीतीनें सहन करून तो पक्षिश्रेष्ठ गरुड गालांतल्या गालांत हसून सौम्य शब्दांनीं इंद्राला म्हणाला, "हे इंद्रा! ज्या ऋषींच्या अस्थींपासून हें वज्र झालेलें आहे, त्या ऋषींचा, ह्या वज्राचा, व तुझाही मी मान राखतों; आणि माझें एक पीस मी येथें टाकून देतों. पण त्याचा तुला अंतही लागणार नाहीं. तुझ्या वज्राच्या आघातानें मला यत्किंचितही इजा झालेली नाहीं." असें बोलून त्या पक्षिराजानें आपलें एक पीस काढून तें टाकून दिलें. तें पीस इतकें सुंदर व मनोरम होतें कीं, त्याला दुसरी उपमाच नाहीं. तें सुंदर पीस पहातांच सर्व प्राणिमात्रास अत्यानंद झाला; व हें पीस इतकें उत्तम आहे, ह्या अर्थी हा सुपर्ण—उत्तम पंखांचा–होवो, असें म्हणून त्यांनीं त्याचें "सुपर्ण" असेंच नांव ठेवलें. हा विलक्षण चमत्कार पाहून इंद्राला वाटलें कीं, हा कांहीं पक्षी नव्हे, तर हें एक महद्भूतच निर्माण झालेलें आहे. तेव्हां तो त्यास म्हणाला, "हे पक्षिवर्या, तुझें जें परमावधीचें बळ असेल, तें जाणण्याची मला उत्कंठा लागली आहे; व तुझ्याशीं निरंतर सख्य ठेवावें अशी माझी इच्छा आहे."

अध्याय चौतिसावा.

—:०:—

इंद्रगरुडसंवाद.

गरुड म्हणाला:—हे देवा पुरंदरा, तुझ्या इच्छेप्रमाणें माझें तुझ्याशीं सख्य राहील. आतां

माझें मोठें असह्य बळ किती आहे, तें ऐकण्याची तुला इच्छा आहे, तर तेंही श्रवण कर. हे शंभर यज्ञ करणाऱ्या इंद्रा! खरोखर, सज्जन आहेत ते आपल्या शरीरसामर्थ्याची, किंवा बुद्धिसामर्थ्याची स्तुति करीत नाहींत. किंवा आपल्या गुणांचे पवाडे गायलेलेही त्यांना आवडत नाहीत. परंतु, इंद्रा! तूं मला मित्र करून घेतलेंस; आणि आतां मित्रत्वाच्या नात्यानेंच तूं मला विचारीत आहेस, म्हणूनच त मी तुला सांगतों. कारणावांचून आत्मस्तुति करणें बरें नव्हे. इंद्रा! फार काय सांगूं ? परंतु हे सारे पर्वत, झाडून सारीं अरण्यें, हे भरलेले चट सारे समुद्र, हेंचसें काय? पण तुझ्यासहवर्तमान हीं सारी पृथ्वी मी माझ्या एकाच पंखावर वाहून नेईन ! इतकेंच नव्हे, तर स्थावरजंगमात्मक सारे लोक जरी एके ठिकाणी केले, तरी तेही मी उचलीन. आणखी चमत्कार हा कीं, ते उचलतांना मला यत्किंचितही श्रम पडणार नाहींत. इतकें माझें बळ आहे, हें तूं लक्षांत ठेव."

सौति म्हणतोः—हे शौनकादि मुनिवर्यहो, असें भाषण करणाऱ्या त्या शूर वीर गरुडाला, सर्व लोकाचें हित करणारा, सर्वांचा प्रभु व सर्व ऐश्वर्यवंतांमध्ये अग्रगणी असा जो देवेंद्र तो म्हणाला, "तूं म्हटलेंस तें अगदीं यथार्थ आहे. तूं सांगितलेंस तें तें सारें तुझ्यामध्यें असणारच यांत संशय नाहीं. तर आतां ह्या माझ्या अत्युत्तम मैत्रीचाही तूं स्वीकार कर; आणि अमृताचें तुला जर कांहीं कारण नसेल, तर तें मला परत दे. कारण, तूं हें ज्यांना नेऊन देणार, ते आम्हांला अत्यंत पीडा देतील."

इंद्राचें हें भाषण ऐकून गरुड म्हणाला, "मी हें अमृत थोड्याशा कामाकरितां नेत आहें. पण तें मी कोणालाही प्यावयास देणार नाहीं. तर, हे सहस्रनेत्रा, तें मी ज्या ठिकाणीं ठेवीन, तेथून, हे स्वर्गाधिपते, तूं मोठ्या शिताफीनें हरण करून आण." तेव्हां इंद्र म्हणाला, "हे पक्ष्या! तूं आतां जी युक्ति मला सांगितलीस, ती ऐकून मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहें. तर, हे पक्षिश्रेष्ठा! तुझ्या इच्छेस येईल तो वर तूं माझ्यापासून मागून घे."

ह्याप्रमाणें इंद्रानें गरुडास सांगितलें, तेव्हां त्याला कद्रुपुत्रांचें स्मरण होऊन व मातेच्या दास्यत्वासाठीं केलेलें कपट मनांत उभें राहून त्यानें इंद्राला प्रत्युत्तर दिलें कीं, "हे इंद्रा! मीही सर्वसमर्थ आहें. पाहिजे तें करण्याचें माझ्या अंगीं सामर्थ्य आहें. तरी, तूं ज्या अर्थी वर देण्यास तयार झाला आहेस, त्या अर्थी, मदोन्मत्त झालेले भुजंग माझें भक्ष्य व्हावें." ह्यावर 'तथास्तु' असें म्हणून तो दैत्यनाशक इंद्र, महात्मा व योगीश्वर जो श्रीहरि त्याच्याकडे गेला; आणि त्याची अनुज्ञा घेऊन गरुडानें मागितलेल्या त्यानें गोष्टीस अनुमोदन दिलें; आणि पुनः तो भगवान स्वर्गाधिपति इंद्र त्याला म्हणाला, "हे गरुडा! तूं ठेवलेलें अमृत मी हरण करून आणीन."

सर्पांच्या तोंडाला पानें पुसलीं!

ह्याप्रमाणें इंद्राचें भाषण श्रवण केल्यावर तो गरुड मोठ्या त्वरेनें आपल्या मातेजवळ आला; आणि जणू काय मोठा आनंदच झाला आहे असें दाखवून तो त्या सर्पांस म्हणाला, "हें आणलेलें अमृत मी येथें ह्या दर्भावर ठेवतों. हें तुमचें आहे बरें. सर्पांनो! तुम्ही स्नान करून व मंगल पदार्थ ग्रहण करून मंतर तें प्राशन करा; आणि मी जातेवेळीं तुम्ही बसून जें बोललां, त्याप्रमाणें आजपासून ही माझी माता तुमच्या दास्यत्वापासून मुक्त होऊं द्या. कारण, तुम्हीं सांगितल्याप्रमाणें मी तुमचें म्हणणें शेवटास नेलें आहें." ह्यावर "फार उत्तम आहे." असें उत्तर देऊन ते सर्प स्नानाला निघून गेले. इकडे इंद्रही ती संधि साधून तेथें आला, आणि तेथें असलेलें अमृत घेऊन पुनः स्वर्गांत निघून

गेला. नंतर, अमृताकरितां हापापलेले सर्प स्नान करून, जपजाप्य आटपून व मंगल पदार्थासहवर्तमान मोठ्या आनंदानें, आतां आपल्याला अमृत प्राशन करावयास मिळेल, असें मनांत म्हणत, जेथें दर्भावर अमृत ठेविलें होतें, त्या ठिकाणीं आले, आणि पाहतात तों तें तेथून कोणीं चोरून नेल्याचें दिसून आलें. तेव्हां आपण जसें पूर्वीं कपट केलें होतें, तसेंच कपट करून आपणांस ठकविल्याचें त्यांस दिसून आलें. तेव्हां आतां अमृत ठेविलेली जागा हीच; ही तरी चाटावी, असा विचार करून त्यांनीं ते दर्भच चाटले ! पण तशा करण्यानें [दर्भास धार असल्याकारणानें] त्या सर्पांच्या जिव्हा मात्र कापून दुभंग झाल्या ! व त्या ठिकाणीं अमृताचा स्पर्श झाल्यामुळें, तेथें असलेले दर्भही अमृतमयच झाले ! ह्याप्रमाणें तेथें आणलेलें अमृत तर इंद्र घेऊन गेलाच; आणि त्या महात्म्या गरुडानें त्या सर्पांना द्विजिव्ह करून सोडलें, हें वर. इतकें झालें तेव्हां, मातेसहवर्तमान त्या गरुडाला परम आनंद होऊन तो त्या अरण्यामध्यें विहार करूं लागला. तो भुजंगांस भक्षण करून आपला निर्वाह करीत असे. इतर सर्व पक्षीही त्यास मोठा मान देऊं लागले. त्याच्या कीर्तीला कधींच न्यूनता आली नाहीं; आणि आपली माता जी विनता तिला तो परमानंद देऊं लागला.

कथेची फलश्रुति.

ही कथा जो कोणी पुरुष निरंतर श्रवण करील, किंवा ब्राह्मणांच्या मुख्य समाजामध्यें जो कोणी पठन करील, तो पुण्यवान पुरुष महात्म्या पक्षाधिपति गरुडाच्या गुणसंकीर्तनामुळें निःसंशय स्वर्गाला जाईल.

अध्याय पसतिसावा.

—:०:—

सर्पनामकथन.

शौनक म्हणतातः—हे सूतपुत्रा, आईनें व विनतेचा पुत्र जो गरुड त्यानें सर्पांना शाप कां दिला, तें त्वां सांगितलें. तसेंच कद्रू आणि विनता ह्यांस त्यांच्या भर्त्यानें दिलेला वर, व विनतेचे पुत्र जे पक्षी त्या दोहोंचींही नांवें तूं निवेदन केलींस. परंतु, हे सूतपुत्रा, सर्पांचीं नांवें तूं सांगितलीं नाहींस. तीं—निदान त्यांतलीं मुख्य मुख्य तरी—आम्हांला ऐकावयास मिळावीं, अशी आमची इच्छा आहे.

सौति म्हणतोः—हे तपोधना, सर्प पुष्कळच प्रकारचे आहेत. त्या सगळ्यांचींच नांवें मी कांहीं सांगत नाहीं. परंतु त्यांतलीं मुख्य मुख्य सांगतों, तेवढीं ऐकून घ्या. प्रथमतः शेष जन्मास आला. त्यानंतर वासुकि, ऐरावत व तक्षक, तसेच कर्कोटक, धनंजय, कालिय, मणिनाग, आपूरण, पिंजरक, एलापत्र, वामन, नील, अनील, कल्माष, शबल, आर्यक, उग्रक, कलशपोतक, सुमन, तसाच दधिमुख, विमलपिंडक, आप्त, कर्कोटक, शंख, वालिशिख, निष्टानक, हेमगुह, नहुष, पिंगल, बाह्यकर्ण, हस्तिपद, मुद्गरपिंडक, कंबल, अश्वतर, कालीयक, वृत्त व संवर्तक नांवाचे दोन नाग ज्यांना पद्म अशी संज्ञा आहे ते, शंखमुख, कूष्मांडक, क्षेमक, पिंडारक, करवीर, पुष्पदंष्ट्र, बिल्वक, बिल्वपांडुर, मूषकाद, शंखशिरा, पूर्णभद्र, हरिद्रक, अपराजित, ज्योतिक, श्रीवह, कौरव्य, धृतराष्ट्र व वीर्यवान असा शंखपिंड, विरजा, सुबाहु व वीर्यशाली असा शालिपिंड, हस्तिपिंड, पिठरक, सुमुख, कौणपाशन, कुठर, कुंजर, प्रभाकर, कुमुद, कुमुदाक्ष, तित्तिरि, हलक, कर्दम, बहुमूलक, कर्कर, अकर्कर, कुंडोदर, महोदर इत्यादि मुख्य मुख्य सर्प मीं नि-

वेदन केले. हे द्विजवर्य, त्यांहून इतर पुष्कळच पुढें असल्यामुळें त्यांचीं नांवें मीं सोडून दिलीं आहेत. त्यांजपासून जन्मलेले व आणखी त्यांची जन्मलेली प्रजा ह्यांची तर मोजदादच होणें कठिण. म्हणून, हे तपोनिधे, मी ती सांगत बसत नाहीं. येथें सहस्रावधि, लक्षावधि—नव्हे कोट्यवधि सर्प असल्यामुळें त्या सर्वांचीं नांवें सांगतां येणें कठिणच आहे.

अध्याय छत्तिसावा.

—:०:—

शेषाचा वृत्तांत.

शौनक ऋषि प्रश्न करतात:—हे सूतपुत्रा! वीर्यशाली व जिंकण्यास कठिण असे हे सर्प तूं सांगितलेस खरे; परंतु पुढें त्यांनीं तें शापवचन ऐकिल्यानंतर काय बरें केलें ?

सौति सांगतो:—त्यांतला महान यशस्वी सर्प जो भगवान शेष, त्यानें कद्रूचा त्याग करून व वायु भक्षण करून घोर तप आरंभिलें, आणि गंधमादन पर्वत, बदरिकाश्रम, गोकर्ण, पुष्करारण्य, त्याचप्रमाणें हिमालय पर्वताच्या आसपास असलेलीं तीं तीं नानाप्रकारचीं पुण्यक्षेत्रें व तीर्थें ह्या स्थानीं जाऊन तो नियमशील, सदोदीत जितेंद्रिय व एकांतप्रिय अशा व्रतानें तपाचरण करण्यांत अगदीं गढून गेला. नंतर मांस, त्वचा व स्नायु हीं अगदीं सुकून गेलीं आहेत, आणि ज्यानें जटा व वल्कलें धारण केलीं आहेत, असें हें घोर तप आचरण करीत असलेला तो शेषरूप मुनि ब्रह्मदेवाच्या अवलोकनांत आला. तेव्हां ब्रह्मदेव त्या सत्यनिष्ठ तपोव्रताला म्हणाला, "हे शेषा, अरे! हें तूं काय आरंभिलें आहेस? लोकहिताकडे कांहीं पहा! हे पुण्यपुरुषा! उलट आपल्या प्रखर तपोव्रतानें तूं लोकांना तापवीत आहेस. अरे बाबा! तुझ्या हृदयांत असा हेतु तरी कोणता खेळत आहे तें मला एकवार कळूं दे."

शेष म्हणतो:—एकाच खाणींत जन्मलेले हे माझे सर्व भाऊ अगदीं मूढ आहेत. मला त्यांच्यांत मिळून मिसळून रहावेंसें वाटत नाहीं. तरी, भगवन्, ह्यास आपली अनुमति असावी. हे सदासर्वदा एखाद्या वैऱ्यासारखे एकमेकांवर जळफळत असतात. त्यांचें तोंड सुद्धां पाहूं नये म्हणून मीं हें तप आरंभिलें आहे. विनता व तिचे पुत्र ह्या उभतांसही ते अगदीं पाण्यांत पाहत असतात. तसाच विनतेचा पुत्र गरुड पक्षी हा माझा आणखी एक भाऊ आहे, त्याला हे कधींच बरें पाहत नाहींत; आणि पित्याच्या म्हणजे महात्म्या कश्यप ऋषींच्या वरप्रसादानें तो तर ह्यांना भारी होऊन बसला आहे ह्याकरितां, ही कुडी सोडल्यावर तरी त्यांचा संग होणार नाहीं म्हणून मी तपाचरण करून देहत्याग करूं इच्छीत आहें.

शेषाचें हें भाषण ऐकून ब्रह्मदेव म्हणतात, "हे शेषा, तुझे सर्व भाऊ कसे वागतात, तें मी जाणून आहें. आईच्या अपराधामुळें तुझ्या भावांना मोठें संकट उद्भवलें आहे; आणि, हे भुजंगा, त्याच्या परिहाराची योजनाही पूर्वींच झालेली आहे. तर, हे शेषा! तूं आपल्या एकाही भावाकरितां मनाला इतकें लागून घेऊं नको; व तुला हवा असेल तो वर मजकडून मागून घे. तूं आज मागशील तो वर मी तुला देईन. माझें तुझ्यावर अतिशयित प्रेम आहे. हे पन्नगश्रेष्ठा! तुझी बुद्धि धर्माच्या ठिकाणीं गढली हें फार उत्तम झालें; व ती दिवसानुदिवस अशीच अधिकाधिक धर्मामध्यें स्थिर होत जावो!"

शेष उत्तर करितो:—हे पितामहा प्रभो! मला ह्या एकाच वराची इच्छा आहे. तो कोणता म्हणून म्हणाल तर, हे ईश्वरा! धर्म, मनःशांति, व तपाचरण ह्यांमध्येंच माझी बुद्धि अखंड रमलेली असो.

ब्रह्मदेव म्हणतात:—हे शेषा! तुझें इंद्रियदमन व मनःशान्ति हीं पाहून मी फार संतुष्ट झालों आहें.

तर आतां मी तुला एक लोककल्याणाची गोष्ट सांगतों, ती ऐक. बाबारे! पर्वत, अरण्यें, उपवनें, समुद्र, गांवें, नगरें इत्यादि धारण केलेली जी ही पृथ्वी, ती फार डळमळत आहे, तर तिला चांगली सावरून ती नीट स्थिर राहील असा तिला टेंका देऊन रहा.

शेष म्हणतो—प्रजापति, पृथ्वीपति, भूतपति व जगत्पति असे जे आपण ब्रह्मदेव वरदवंत होऊन मला ही आज्ञा करीत आहां, तीप्रमाणें, ही पृथ्वी स्थिर राहील अशा प्रकारें मी तिला धारण करितों. हे प्रजापते! ती उचलून माझ्या डोकीवर द्या.

ब्रह्मदेव म्हणतातः—हे सर्पश्रेष्ठा! तूं पृथ्वीच्या तळाशीं जा. म्हणजे ती तुला आपण होऊनच विवरमार्ग करून देईल. हे शेषा! तूं ही पृथ्वी एकदा धारण केलीस म्हणजे माझें एक मोठें प्रिय कार्य केल्यासारखें होणार आहे.

सौति म्हणतोः—ऋषीहो, ब्रह्मदेवांच्या त्या आज्ञेनुरूप तो सर्पश्रेष्ठ, वासुकीचा वडील बंधु व भूमंडळाचा स्वामी शेष पृथ्वीनें केलेल्या विवरांत जाऊन पृथ्वीचे तळाशीं राहिला आहे, व त्यानें ही समुद्रवलयांकित पृथ्वीरूप देवी सर्व बाजूंनीं नीट सावरून शिरावर धारण केली आहे.

ब्रह्मदेव म्हणतातः—हे सर्पश्रेष्ठा! हा एकंदर भूगोल तूं ज्या अर्थी आपल्या असंख्य फडांनीं सावरून शिरावर धारण केला आहेस, त्या अर्थी, मी किंवा इंद्र ज्याप्रमाणें धर्मप्रभु आहों, त्याचप्रमाणें तूंही एक धर्मप्रभु होस.

सौति म्हणतोः—अशा प्रकारें त्या पराक्रमी भुजंगश्रेष्ठ शेषानें एकट्यानें ब्रह्मदेवाच्या आज्ञनुरूप पृथ्वी मस्तकीं धारण करून पाताळीं वास केला आहे, असें म्हणतात. त्यानंतर, देवांमध्यें श्रेष्ठ असे जे भगवान ब्रह्मदेव, त्यांनीं गरुडास (विनतेच्या दुसऱ्या पुत्रास) शेषाच्या साह्यार्थ दिलें.

अध्याय सदतिसावा.

—:०:—

सर्पांचे शापनिवारणार्थ चाललेले बेत.

सौति म्हणालाः—ऋषीहो, इकडे, सर्पांत श्रेष्ठ जो वासुकि, त्यास, आईचा तो शाप ऐकल्यापासून, ह्या शापाची निवृत्ति कशी होईल हा मोठा विचार पडला. ह्यास्तव, ऐरावत आदिकरून आपले एकुणएक बंधु जमवून त्यानें सर्वतोपरी ह्या गोष्टीचा खल चालू केला.

वासुकि म्हणालाः—हे पवित्र बंधुहो! हा शाप कशा हेतूनें देण्यांत आला आहे, हें सर्व तुम्हांला विदित आहेच; तेव्हां आपण ह्या शापाच्या निवारणाचा विचारपूर्वक प्रयत्न करूं. इतर कोणत्याही शापावर तोड म्हणून असतेच; परंतु मातृशाप झालेल्यांस कोठेंच सुटणूक नाहीं. सनातन, अगाध व सत्यस्वरूप असे जे ब्रह्मदेव, त्यांच्या देखत शाप दिला हें ऐकून तर माझ्या हृदयानें ठाव सोडला आहे. ज्या अर्थी सनातन ब्रह्मदेवांनीं त्या शापाला कांहींच प्रतिबंध केला नाहीं, त्या अर्थी आपल्या सर्वांचा विनाशकाल समीप आला आहे, यांत कांहीं शंका नाहीं. याकरितां, आतां सर्व सर्पांच्या हिताचा कांहीं तरी विचार योजिला पाहिजे. ही आपली चालढकल कांहीं कामाची नाहीं. आपण सर्व बुद्धिवंत व विचारी आहों. प्राचीन काळीं ज्याप्रमाणें देवांनीं गुप्त ठिकाणीं लपून बसलेला अग्नि शोधून काढिला, त्याचप्रमाणें विचारांतीं शापनिवारणाची कांहीं तरी युक्ति आपल्यास दिसून येईल. म्हणजे, जनमेजय राजाचें सर्पविनाशक सत्र मुळीं नच होईल, किंवा होऊं लागलेंच तर त्यास मध्येंच कांहीं तरी खो बसेल, अशा तऱ्हेची मसलत आपणांस योजिली पाहिजे.

सौति म्हणतोः—वासुकीचें हें भाषण ऐकून, मसलत देण्यांत निपुण असे ते सगळे कद्रूचे पुत्र एकेठायीं जमून एकमतानें मसलत योजूं लागले.

त्यांतील कांहीं म्हणूं लागले, " आपण ब्राह्मणवेष धारण करून जनमेजय राजापाशीं जाऊन याचना करूं कीं, राजा, तुझा यज्ञ न होवो." यावर, त्या सर्पांत कित्येक पंडित होते ते म्हणाले कीं, "आपण सर्वजण त्याचे सल्लामसलतगार होऊन त्याच्या गळ्यांतील ताईत बनूं. म्हणजे जनमेजय राजा आपणांस हरएक कामांत हें कसें ठरवावयाचें म्हणून सल्ला विचारील, व मग आपण यज्ञास खो येईल अशी कांहीं मसलत सांगूं. आपण त्याच्या मर्जीस उतरलों म्हणजे तो बुद्धिवानांत श्रेष्ठ असा राजा यज्ञासंबंधानें आपण होऊनच आम्हांस प्रश्न करील, म्हणजे आपण साफ नन्नाचा पाढा वाचूं; आणि इहपरलोकीं उत्पन्न होणारीं पुष्कळच भयंकर संकटें व तो यज्ञ न करण्याचे हेतु व कारणें हीं राजाच्या निदर्शनास आणून देऊं. किंवा, हें सर्पसत्र चालविण्यांत जो पुरा माहितगार, व राजकल्याणाविषयीं तत्पर असा जो कोणी उपाध्याय होणार असेल, त्यालाच जाऊन कोणा एखाद्या सर्पानें दंश करून तो मरेल असें करावें; म्हणजे याजक नाहींसा झाल्यावर त्या यज्ञावरही पण पाणी पडेल. तसेंच, आणखीही जे कोणी सर्पसत्रांतले जाणते म्हणून ऋत्विज असतील, त्या सर्वांनाही दंश केला म्हणजे आपण कृतकार्य होऊं."

दुसरे कांहीं धर्मशील सदय अंतःकरणाचे सर्प होते ते म्हणाले:—छे! छे! ही तुमची दुर्बुद्धि होय. ब्राह्मणाची हत्या करणें उचित नाहीं. उत्तम व सन्मान्य धर्मास अनुसरून संकट निवारण करणें हा उत्तम मार्ग होय. अधर्मानें वागूं लागल्यास दिवसानुदिवस सारें जगच अस्तास जाण्याची वेळ येईल."

ह्यावर आणखी कांहीं सर्प म्हणूं लागले, "आपण विजेसह मेघाचें रूप घेऊन यज्ञकुंडांत पेटलेला अग्नि मेघवृष्टि करून पार नाहींसा करूं."

दुसरे कांहीं श्रेष्ठ सर्प म्हणूं लागले:—आपण रात्रीचें जावें, आणि याज्ञिकांचें चित्त दुसऱ्या कशांत वेधलें आहे असें पाहून, स्रुवीसारखीं यज्ञांतलीं भांडींच झट्कन् लांबवावीं म्हणजे यज्ञांत खो आलाच! नाहीं तर असें करावें कीं, यज्ञमंडपांत जाऊन तेथल्या सहस्रावधि लोकांना डसावें, म्हणजे आपला सर्वच त्रास चुकला! किंवा सर्पांनीं जाऊन पक्वान्नांचे सर्व पदार्थ मलमूत्रोत्सर्गानें अमंगल करून ठेवावे, म्हणजे सर्व तयार केलेल्या अन्नाचें मातेरें उडेल. नंतर त्यांतले इतर कांहीं सर्प म्हणूं लागले:—आपण त्या सत्रांत ऋत्विजाचाच वेष धरून जाऊं, व राजास दक्षिणा मागून यज्ञांत बाध आणूं; आणि ऋत्विजाची मर्जी संपादून तो एकदा आमच्या हातचें बाहुलें बनला, कीं आपणांस हवें तेंच तो करील.

नंतर आणखी कोणी म्हणूं लागले कीं, "जनमेजय राजा जलक्रीडेला आला कीं त्याला धरीं घेऊन येऊं व बांधून ठेवूं; म्हणजे मुळीं सारें सत्रच आटोपलें!" त्यावर, त्यांतलेच पंडितंमन्य असे कांही भुजंग म्हणूं लागले:—आपण त्यासच धरून लगोलग दंश करावा, म्हणजे आपला कार्यभाग उरकला, आणि तो गेला म्हणजे त्याबरोबरच अनर्थाचें मूळही पण तोडून टाकलें, असें झालें! नंतर सगळेच सर्प, डोळेच ज्याचे कान आहेत अशा वासुकीला म्हणाले, " हे सर्पराजा! हीच आमची सर्वांची ठाम सल्ला आहे. आतां, यांत आपणांस गोड दिसेल तो उपाय तावडतोब अमलांत आणावा." असें म्हणून ते सर्व सर्प सर्पश्रेष्ठ वासुकीकडे पाहूं लागले, तेव्हां वासुकि त्या सर्पांस विचारपूर्वक म्हणतो, " तुमच्या ह्या ठाम सल्लाप्रमाणें करावेंसें मला वाटत नाहीं. ह्यांपैकीं एकही मसलत मला पसंत नाहीं. ह्यांत आपलें कल्याण करितां येईल असें काय आहे? मला तर वाटतें की, महात्मे कश्यप ऋषि ह्यांना ह्या वेळीं संतुष्ट करून घ्यावें हाच मार्ग उत्तम!

हे भुजंगहो! ज्ञातिवर्गाची व तशीच मला माझीही कळकळ असल्यामुळें तुमच्या एकाच्याही म्हण-ण्याप्रमाणें करावयाला मला माझें मन सांगत नाहीं. आपलें ज्यांत कल्याण आहे असाच उ-पाय मला योजिला पाहिजे; आणि ज्ञातीच्या हिताहिताचा सर्व बोल मजवरच येणारा आहे, ह्या विचारानें मला अतिशय त्रास होत आहे."

अध्याय अडातिसावा.

—:०:—

एलापत्रकथित उपाय.

सौति म्हणतोः—अशा प्रकारें त्या सर्व सर्पांचें व वासुकीचें भाषण ऐकून तेथें एलापत्र नांवाचा एक सर्प बोलूं लागला, "तें सत्र व्हावयाचेंच, चुकावयाचें नाहीं. पांडवकुलांत जन्मलेला, व ज्याचा आम्हांस धाक पडला आहे, तो जनमेजय राजाच मुळीं तशा प्रकारचा नाहीं. याकरितां, हे वासुके! जो नशिबाच्या सपाट्यांत सांपडले-ला असतो, तो नशिबावरच सारा हवाला ठेवतो. त्यावांचून त्याला गत्यंतरच नसतें. म्हणून, सर्प-श्रेष्ठहो! हाही आपल्यावर असाच प्रसंग आहे. तेव्हां माझें ऐकाल तर मी म्हणतों कीं, आपणही नशिबावरच हवाला ठेवून चालूं. पन्नगश्रेष्ठहो! जेव्हां शाप झाला, त्या वेळीं मी मातेच्या मांडीवर जाऊन बसलेला होतों. शापवचन ऐकतांक्षणींच मला मोठी भीति पडली; तों, दुःखानें त्रस्त झालेल्या व करुणा आलेल्या देवां-च्या तोंडून, "हे महातेजस्वी देवा! स्त्रिया कठोर! कठोर!" असे ब्रह्मदेवाजवळ निघालेले उद्गार माझ्या कानीं पडले. देव विचारूं लागले, "हे देवाधिदेवा ब्रह्मदेवा! प्रियपुत्र लाभले असून आपल्या देखत त्यांना शाप देणारी कदाचित् कद्रूशिवाय इतर कोणी स्त्री मिळेल का? आणखी, ब्रह्मदेवा! आपणही तिच्या शब्दाला 'तथास्तु' म्हणून मान डोलविली, तर तिचें निवारण करावयाचें टाकून आपण असें कां केलें, हें समजून घे-ण्याची जिज्ञासा आम्हांस झाली आहे."

ब्रह्मदेव म्हणाले:—तीव्र, भयंकर व विषारी असे पुष्कळच प्रकारचे सर्प असल्यामुळें लोकहिता-कडे लक्ष देऊन मीं त्या वेळेस तिला वारण्याचा यत्न केला नाहीं. कारण क्षुद्र, पापाचरण कर-णारे, जहर विषाचे, व लोकांस डसणें हेंच ज्यांचें व्रत आहे असे जे कोणी असतील, त्यांचाच ह्यांत फडशा पडणार आहे; आणि जे धर्मशील, त्यांना ह्यांत कांहींही इजा पोहोंचणार नाहीं.

ब्रह्मदेव म्हणतातः—देवहो, आतां ह्यां मोठ्या प्रसंगांतून त्या धर्मशीलांचा बचाव कोणत्या नि-मित्तानें होईल तें श्रवण करा. यायावर नामक कुलामध्यें जरत्कारु नामेंकरून कोणी एक सुप्र-सिद्ध, विचारशील, जितेंद्रिय व तपाचरण करणारा असा महान ऋषि अवतीर्ण होईल; आणि आस्तीक नांवाचा एक महातपस्वी पुत्र त्या जरत्का-रूच्या उदरीं येऊन तो त्या समयीं यज्ञांत हरकत घेईल; आणि अशा रीतीनें, त्या वेळीं, जे धर्मा-चरण करणारे सर्प असतील, त्यांची सुटका होईल."

देव विचारूं लागले:—ब्रह्मदेवा! त्या वीर्य-वंत व तपोनिधि महामुनि जरत्कारूला कोणत्या स्त्रीच्या उदरीं हा महात्मा पुत्र होईल बरें?

ब्रह्मदेव कथन करितातः—त्या वीर्यसंपन्न मुनिवर्यास त्याच (जरत्कारु) नांवाच्या स्त्रीच्या पोटीं हें वीर्यवान अपत्य होईल. सर्पश्रेष्ठ वासु-कीला जरत्कारु नांवाची एक बहीण आहे, तिच्या पोटीं हा पुत्र जन्मास येऊन तो सर्पांना त्यांच्या शापापासून मुक्त करील.

एलापत्र म्हणतो:—हें ऐकून देव ब्रह्मदेवाला म्हणाले, 'ठीक आहे, तसेंच होवो.' असो. ह्याप्रमाणें ही कथा देवांस निवेदन करून ब्रह्म-

---

१ नेहमीं फिरत असणारे.

देवांनीं स्वर्गी प्रयाण केलें. हे वासुके, तुझी जरत्कारु नांवाची प्रख्यात बहीण आहे, ती त्याचकरितां आहे, असें मला वाटतें. तर तूं काय कर कीं, ते भिक्षा मागावयाला येत असलेले जे सद्धर्मशील जरत्कारु मुनि आहेत, त्यांसच शापनिवारणार्थ भिक्षा म्हणून ही मुलगी तूं समर्पण कर, म्हणजे झालें. अशा रीतीनेंच आपण शापमुक्त होऊं, असें मीं ऐकिलें आहे.

अध्याय एकुणचाळिसावा.

—:०:—

जरत्कारूचा शोध.

सौति म्हणतोः—हे मुनिश्रेष्ठ शौनक ऋषे ! हें एलापत्राचें भाषण ऐकून सर्व सर्पांचीं मनें आनंदित झालीं, व ते त्यास "शाबास ! शाबास !" म्हणूं लागले. तें ऐकल्यापासून वासुकि फार आनंदित होऊन आपल्या जरत्कारु नांवाच्या बहिणीस जपूं लागला. त्यानंतर थोड्याच अवकाशांत त्या नेमानेमाच्या गोष्टी घडून आल्या. एकदा सगळ्या देवांनीं व दैत्यांनीं मिळून, सागर हें जें वरुणाचें राहतें ठिकाण त्याचें मंथन केलें. त्यांत, बलिष्ठांत बलिष्ठ जो वासुकि, तो त्यांतील दोरी झाला होता. नंतर तो कार्यभाग उरकून देव ब्रह्मदेवाकडे आले; आणि त्यास म्हणालेः—देवा, शापाचें भय उत्पन्न झालेल्या ह्या वासुकीच्या मनास फार ताप झालेला आहे. तर प्रभो ! स्वजातीचें कल्याण चिंतणारा जो हा वासुकि, त्याच्या मनाचें तेवढें मातृशापाचें कुसळ नाहींसें करा. हा सर्पांचा राजा, सदोदीत आपल्या मनासारखें व आपलें कल्याण करणारा आहे. तर, हे देवाधिदेवा ! आपण ह्यावर प्रसन्न होऊन ह्याच्या हृदयांतील तळमळ निववून टाका.

ब्रह्मदेव म्हणालेः—पूर्वी एलापत्र नामक सर्पानें वासुकीला जी हकीकत निवेदन केली होती, तिची प्रेरणा मींच माझ्या इच्छेनें त्याच्या हृदयांत केली होती. वास्तव, त्याच्या सांगण्याप्रमाणें ह्या नागेंद्रानें प्रसंगीं वर्तन ठेवावें. म्हणजे, जेवढे दुराचारी तेवढेच नाश पावतील; व धर्मशील असतील ते वांचतील. तो जरत्कारु अवतीर्ण झालेला असून घोर तपाचरणांत अगदीं गढून गेला आहे. ह्यानें आपली जरत्कारु नामक बहीण समयानुरूप त्यास दान करावी. देवहो ! एलापत्रानें सर्पांच्या कल्याणास्तव जें काय सांगितलें, तें अगदीं तसेंच व्हावयाचें ! अन्यथा होणार नाहीं !

ब्रह्मदेवाचें हें भाषण ऐकून, शापानें गोंधळून गेलेल्या सर्पश्रेष्ठ वासुकीनें सगळ्या सर्पांना तें श्रुत केलें; आणि आपली बहीण जरत्कारु ही जरत्कारु ऋषीस नेमस्त करून त्यास शोधण्याच्या कामीं त्यानें सदोदीत चांगली कळकळ बाळगणाऱ्या अशा सर्पांची योजना केली; आणि त्यांस सांगून ठेविलें कीं, " जरत्कारु महाराजांस जेव्हां भार्या वरावीशी वाटल, तेव्हां आम्हांस ताबडतोब येऊन वर्दी द्यावी. कारण, आपल्या हिताचा मार्ग तोच होणार आहे. "

अध्याय चाळिसावा.

—:०:—

जरत्कारुनामव्युत्पत्ति.

शौनक विचारतातः—हे सौते, जरत्कारु म्हणून ज्याचें नांव तूं कथन केलेंस, त्या महात्म्या मुनीला असें कां म्हणत, तें समजून घ्यावें असें मला वाटत आहे. तर, जरत्कारु हें नांव जगप्रसिद्ध कां झालें, त्याची समजूत पडण्याकरितां त्या शब्दाची यथातथ्य व्युत्पत्ति मला सांग.

सौति म्हणतोः—जरा म्हणजे क्षय होय; व कारु म्हणजे दारुण अशी संज्ञा आहे. त्याचें शरीर कारु म्हणजे दारुण होतें, तें त्या विचारशील ऋषीनें दिवसानुदिवस घोर तप आचरून क्षीण करून टाकिलें. यासाठीं, हे द्विजवर्य ! त्याला

व तसेंच वासुकीच्या बहिणीला जरत्कारु असें नांव पडलें.

सौतीनें असें सांगितलेलें ऐकून धर्मात्मे शौनक मुनि उग्रश्रव्यास हांक मारून हसूं लागले, व म्हणाले, 'वय, नाम व रूप हीं ज्यांचीं सारखीं आहेत त्यांचा परस्पर विवाह झाला हें ठीकच झालें. पुढें शौनक म्हणतातः—बा सौते! तूं नांवाची व्याख्या बरोबर सांगितलीस ती मीं श्रवण केली; पण आतां, जरत्कारूचा पुत्र आस्तीक कसा जन्मला, तें समजून घेण्याची जिज्ञासा मला झाली आहे. तर तेवढें सांग. तें त्यांचें भाषण ऐकून सौति शास्त्राधारें कथन करूं लागला.

परिक्षिताचें उपाख्यान.

सौति म्हणतोः—शौनकादिक ऋषीहो, सारखे डोळे लावून बसलेल्या त्या वासुकीनें सगळ्या सर्पांस वर्दी देऊन व जरत्कारूकरितां आपली बहीण सिद्ध करून बहुत काळ गेला, तरी त्या कडकडीत आचरण करणाऱ्या विचारशील तपोनिष्ठाला भार्या वरण्याची इच्छाच होईना. कारण, तपाचरण करण्यांत अगदीं गढून गेलेला व वेदाध्ययनशील असा तो मुनि उर्ध्वरेता असल्यामुळें निर्भय होत्साता सर्व पृथ्वीभर फिरत असे, आणि त्यामुळेंच त्या महात्म्याच्या हृदयांत भार्येचा विचार सुद्धां कधीं येत नसे. हे ब्रह्मन्, नंतर कोणे एके समयीं कुरूंच्या वंशांत परिक्षित नामेंकरून एक राजा झाला. ह्याचा पणजा महाप्रतापवान व श्रेष्ठ धनुर्धर असा जो पंडुराजा, त्याला जसा मृगयेचा फार शोक असे, तसाच ह्या राजासही असून हरिण, डुकर, तरस, गवे व आणखीही परोपरीचीं जंगली जनावरें ह्यांची पारध करीत करित तो वनांत फिरत असे. एके समयीं परिक्षित राजा आनतपर्व (गुढघे टेंकून सोडलेल्या) बाणानें एका हरिणास वेधून धनुष्यासहवर्तमान त्याच्या पाठोपाठ घोर जंगलांत निघून गेला; जणू काय यज्ञरूप मृगाला वेधून भगवान रुद्र पाठोपाठ धनुष्यासहवर्तमान त्याच्या शोधार्थ इतस्ततः फिरत आहे. त्याच्या बाणानें विद्ध झालेल्या कोणत्याही हरिणास जीव घेऊन वनांत जातां येत नसे; परंतु ह्या वेळीं परिक्षिताच्या बाणानें विद्ध झालेला हरिण निसटून गेला, हेंच आधीं त्या राजाच्या पुढें लवकरच ओढवणाऱ्या मृत्यूचें पूर्वचिन्ह होय. त्या हरिणाच्या मागें लागून पुष्कळच लांब गेल्यामुळें तो अगदीं थकून तहानेनें व्याकुळ होऊन जाऊन वनांत एका ऋषीसमीप आला. त्या वेळीं तो ऋषि, वत्स गाईस पीत असतांना त्याच्या तोंडांतून गळलेला पुष्कळसा फेंस प्राशन करीत होता. त्या घोर तपाचरण करणाऱ्या ऋषीसमीप लगबगीनें येऊन व धनुष्य उचलून घेऊन त्या भुकेलेल्या व थकलेल्या राजानें विचारलें, 'हे ब्रह्मन्, मी अभिमन्यूचा मुलगा परिक्षित् आहें. मीं बाणानें विद्ध केलेल्या हरिणाचा कोठें पत्ता नाहीं, तो आपल्या पाहण्यांत आला काय?' तो ऋषि मूकव्रत धरून बसला होता, त्यामुळें तो कांहीं बोलेना. तेव्हां राजास राग येऊन त्यानें एक मृत सर्प धनुष्याच्या टोंकानें उचलून त्याच्या खांद्यावर टाकून दिला, तरीही तो बोलेना, किंवा हें बरें अथवा हें वाईट कांहीं चकारशब्द सुद्धां त्यानें काढिला नाहीं. तेव्हां राजाचा राग वितळला, व तो त्रासून आपल्या नगराला निघून गेला. तरी देखील तो मुनि जशाचा तसाच होता.

आपली विडंबना झाली असूनही त्या क्षमाशील महर्षीनें त्या धर्मशील राजशार्दूल नृपाळाला दुखविलें नाहीं. पण भरतवंशांत श्रेष्ठ अशा त्या राजशार्दूलाला, तो ऋषि इतका धर्मपरायण आहे हें ठाऊक नसल्यामुळें त्यानें त्याचा अवमान केला! त्या ऋषीला एक प्रखर तेजाचा व महान तपाचरण करणारा असा तरुण पुत्र होता. तो मोठा कोपिष्ट, प्रसन्न करून घेण्यास फार कठिण, व महान व्रतस्थ असे. तो परमाजितेंद्रिय असा शृंगी सर्व भूतांच्या कल्याणांत गढून

गेलेल्या ब्रह्मदेवाची उपासना त्रिकाळ करीत असे. हे द्विजवर्य ! तो ब्रह्मदेवाच्या अनुज्ञेप्रमाणें घराकडे येत असतां, त्याचा एक संवगडी ऋषिपुत्र तेथें खेळत होता. तो धर्माचे पायीं कृश झालेला होता. तो हसत हसत त्याच्या पित्याचें वर्तमान त्यास सांगूं लागला. तें ऐकतांच रागाच्या भरांत लाल होणारा तो तामसी ऋषिपुत्र शृंगी क्रोधायमान झाला. तेव्हां कृश म्हणालाः–हे शृंगी ! तूं फारसा गर्व वाहूं नको. तूं तेजस्वी व तुझा पिताही तेजस्वी आहे. पण असें असतां, तुझ्या पित्यानें खांद्यावर सर्पाचें कलेवर वाहिलें आहे. ह्याकरितां आमच्यासारखे सिद्ध, ब्रह्मवेत्ते व तपस्वी ऋषिपुत्र बोलूं लागले असतां तूं चकारशब्द सुद्धां काढीत जाऊं नको. आपल्या पित्यानें मृत सर्प वाहिलेला असतां जो तूं तें खुशाल पाहत आहेस, त्या तुझा तो पौरुषाभिमान व तशाच तुझ्या त्या गर्वोक्ति आतां कोठें गेल्या ? हे मुनिवर्या ! असा अवमान होण्यासारखें तुझ्या पित्यानेंही कांहीं केलें नव्हतें; व त्यामुळें, जणू काय माझ्या पित्याचाच अवमान झाला असें मला वाटत असून माझ्या मनास फार खेद होत आहे !

अध्याय एकेचाळिसावा.

—:o:—

परिक्षितास शाप.

सौति सांगतोः—कृशानें तें वर्तमान सांगितल्यावर, तेजस्वी व मोठा रागीट असा तो शृंगी. आपल्या पित्यानें सर्पाचें कलेवर धारण केलें आहे हें ऐकून रागानें फारच संतप्त झाला; आणि कृशाकडे पाहून त्यानें त्यास सौम्य शब्दांनीं विचारिलें, " माझ्या पित्यानें हें मृत कलेवर कसें धारण केलें तें सांग. "

तेव्हां कृश म्हणालाः—बा शृंगी ! परिक्षित राजा या वनांत मृगयेस आला असतां त्यानें तुझ्या पित्याच्या खांद्यावर मृत सर्प टाकिला.

शृंगी म्हणालाः—हे कृशा, त्या दुष्ट राजानें माझ्या पित्यानें असें काय वाकडें केलें होतें, तें मला स्पष्ट सांग; आणि मग पहा माझें तपोबल कसें आहे तें! हें ऐकून कृश सांगूं लागला, "बा शृंगी, तो अभिमन्यूचा पुत्र परिक्षित राजा मृगया करीत असतां वेगानें जात असलेल्या एका हरिणास त्यानें बाणानें वेधिलें, व तो एकटाच त्याचे पाठोपाठ जाऊं लागला. त्या महावनामध्यें तो राजा भटकूं लागला; परंतु तो हरिण कांहीं त्याच्या दृष्टीस पडेना. इतक्यांत, मौन धरून बसलेला तुझा पिता त्याचे दृष्टीस पडला. तेव्हां त्यानें त्यास हरिणाविषयीं प्रश्न केला. तो राजा तहान, भूक व श्रम यांनीं अगदीं थकून गेला होता. त्यानें तुझ्या मुखस्तंभ बसलेल्या पित्यास 'हरिण कोठें गेला' म्हणून पुनः पुनः विचारून पाहिलें, परंतु तुझ्या पित्यानें त्यास कांहींच उत्तर दिलें नाहीं. हें पाहून त्या राजानें सर्पाचें कलेवर धनुष्याच्या टोंकानें उचलून तुझ्या पित्याच्या खांद्यावर टाकिलें. तथापि, बा शृंगी ! तो तुझा तपोनिष्ठ पिता जशाचा तसाच बसलेला असून राजा आपल्या हस्तिनापुर नगरास निघून गेला. "

सौति म्हणतोः—ह्याप्रमाणें आपल्या पित्याच्या खांद्यावर सर्पाचें कलेवर टाकिलेलें ऐकून त्या ऋषिपुत्राचे डोळे क्रोधानें लाल झाले, व त्याच्या अंगाची अगदीं लाही लाही होऊन गेली; आणि क्रोधानें संतप्त झालेल्या त्या तेजस्वी ऋषिपुत्रानें स्नान करून क्रोधावेशांत त्या राजास शाप दिलाः शृंगी म्हणाला, " मौन धरून बसलेल्या माझ्या पित्याच्या खांद्यावर ज्यानें मृत सर्प आणून टाकिला, त्या, ब्राह्मणाचा अवमान करणाऱ्या व कुरुकुलास कलंक लावणाऱ्या राजास, सर्व श्रेष्ठ सर्पांत ज्याचें विष अत्यंत प्रखर असून ज्याच्या दाढा विषानें भरलेल्या आहेत, त्या क्रोधानें लाल झालेल्या तक्षकाला माझ्या शापबलानें

प्रेरणा होऊन तो आजपासून सातव्या दिवशीं यमलोकास नेईल."

सौति म्हणतोः—तो क्रोधानें लाल झालेला शृंगी, असा शाप देऊन, गाईच्या गोठ्यांत जेथें आपला पिता मृत सर्प धारण करून बसला होता तेथें गेला; आणि त्यास पाहिल्यावर, त्याच्या खांद्यावर तो मृत सर्प पाहून तर त्यास अधिकच क्रोध चढला; तेव्हां दुःखाचे अश्रु टाकून शृंगी आपल्या पित्यास म्हणाला, "हे तात! त्या दुष्ट परिक्षित राजानें आपला हा अवमान केल्याचें ऐकून, तो कुरुकुलाधम प्रखर शापच देण्यास योग्य आहे असें वाटून मीं त्यास रागारागानें शाप दिला कीं, सर्पश्रेष्ठ जो तक्षक तो आजपासून सात दिवसांनीं त्या पातक्याला अत्यंत दारुण अशा यमलोकास नेईल."

शमीक मुनींचा उद्वेग.

ऋषीहो, क्रोधाविष्ट झालेल्या त्या शृंगीचें हें बोलणें ऐकून शमीक मुनि म्हणालेः—मुला, तूं कांहीं हें बरें केलें नाहींस. हा तपस्व्यांचा धर्म नव्हे. त्या नरपालाचे देशांत आपण राहात असून त्यानें न्यायानें व नीतीनें आपला सांभाळ केला आहे, याकरितां त्याचा द्रोह करणें योग्य नाहीं. त्यानें आपल्याशीं कसेंही वर्तन केलें असलें, तरी तें आपण नेहमीं पोटांतच घातलें पाहिजे. मुला, धर्माचा आपण नाश करूं लागलों तर धर्मही आपला नाश करूं लागतो ह्यांत कांहीं संशय नाहीं; कारण, राजानें जर आपलें रक्षण न केलें, तर आपणांस अतोनात त्रास भोगावा लागेल; आणि मग आपणास हवें तसें धर्माचरण करतां येणें शक्य नाहीं. बाबारे! सद्धर्मी राजे आपला सांभाळ करीत असतात, म्हणूनच आपणांस हवें तसें धर्माचरण करितां येतें. धार्मिकदृष्ट्या पाहिलें तर त्यांचाही त्यांत थोडाबहुत वांटा आहेच. तात्पर्य, आपल्याशीं राजाचें वर्तन कसेंही असलें, तरी आपण त्याची क्षमाच केली पाहिजे; आणि विशेषतः परिक्षिताला तर क्षमा करणें भागच आहे. कारण, ह्याचा पणजा पंडुराजा जसें आपल्या प्रजेचें रक्षण करीत असे, तसेंच हाही आपलें करीत आहे. प्रिय पुत्रा, प्रजेचा सांभाळ राजानेंच केला पाहिजे. भुकेनें व श्रमानें थकून गेलेल्या त्या राजाला माझें मौनव्रत न समजून, केवळ अजाणपणानें त्यानें हें कृत्य केलें असें वाटतें. बाबा! देशांत स्वामी नाहींसा झाला म्हणजे तेथें नेहमीं अनर्थ उद्भवूं लागतात; राजा दुष्ट लोकांस नेहमीं दंडानें शासन करीत असतो, त्यामुळें त्यांना दहशत बसते, व त्यायोगानें देशांत शांतता राहते. उद्विग्न पुरुषाला धर्मही करितां येत नाहीं आणि कर्मही करितां येत नाहीं. राजामुळें धर्माची व धर्मामुळें स्वर्गाची प्रतिष्ठा होते. राजामुळेंच सर्व यज्ञक्रिया चालतात; व त्या चालतात म्हणून देवांचें जीवन चालतें. देवांपासून वृष्टि व वृष्टीपासून औषधि उत्पन्न होतात हें प्रसिद्धच आहे. त्या औषधींच्या योगानें राजा मनुष्यांचें निरंतर कल्याण करीत असतो. मनुष्यांचें पालनपोषण करणारा आणि त्यांतही राज्यकर्ता असा जो राजा—ज्याची योग्यता वेदाध्ययन केलेल्या दहा ब्राह्मणाइतकी असल्याचें मनूनें सांगितलेलें आहे—त्या बिचाऱ्या श्रमानें व भुकेनें व्याकूळ झालेल्या राजाला माझें तपस्याचें हें व्रत माहित नसल्यामुळें त्याच्या हातून हें कृत्य घडलें असावें असें मला वाटतें; त्या अर्थी, हे पुत्रा, तूं हें अविचाराचें कृत्य कां केलेंस? बाबा, राजाची योग्यताच अशी आहे कीं, त्यास कोणत्याही प्रकारें आम्हीं शाप देऊं नये.

अध्याय बेचाळिसावा.

—:०:—

शमीक मुनींचा शृंगीस उपदेश.

शृंगी म्हणतोः—हे तात! मीं केलेलें हें कृत्य साहसाचें असो वा दुष्कृत्य असो; आपल्याप्रमाणें,

तें आपणांस योग्य वाटो वा न वाटो, मी जी वाणी उच्चारिली आहे, ती कधींही असत्य होणार नाहीं. बाबा, मी थट्टेंत सुद्धां कधीं खोटें बोलत नाहीं, मग शाप देत असतांना कसें बोलेन !

शमीक मुनि म्हणतात:—अरे, तूं महातेजस्वी व सत्यवचनी असून आजपर्यंत कधींही असत्य भाषण केलें नाहींस, तेव्हां तुझी वाणी मिथ्या होणार नाहीं हें मी जाणतों. परंतु तुला कांहीं सांगावें अशी माझी इच्छा आहे, व तें माझें कर्तव्यही आहे. पुत्र मोठा झाला असला तरी सुद्धां तो सद्गुणी व महायशस्वी व्हावा म्हणून त्याच्या पित्यानें त्याला तशा प्रकारचा उपदेश करावा असा धर्म आहे. त्यांतून, तूं तर अद्याप लहानच आहेस; तेव्हां तुला उपदेशाच्या दोन गोष्टी सांगितल्या पाहिजेत यांत शंका नाहीं. तूं तपामध्यें नेहमीं निमग्न असतोस, व जे योगी असतात त्यांच्या ठिकाणीं नेहमीं क्रोधाची वृद्धि होत असते; आणि क्रोध हा तर तपाचा नाश करणारा आहे. हे पुत्रा, तूं उत्तम प्रकारें धर्माचरण करणारा आहेस, परंतु तूं लहान असल्यामुळें अज्ञान असून साहसी आहेस. तेव्हां पुत्रप्रेमानें मी तुला सांगतों कीं, तूं वनांतील फलमूलांवर उपजीविका करून रहा, आणि शांतीचें अवलंबन करून क्रोधाचा नाश कर; म्हणजे तुझ्या हातून धर्मत्याग होणार नाहीं. अरे, स्वर्गप्राप्तीकरितां जें पुण्य संपादन करावें लागतें, तें अत्यंत कष्टसाध्य होय; व अशा प्रकारानें संपादन केलेलें पुण्यही क्रोधाच्या योगानें नाश पावतें, व पुण्य नाश पावलें असतां इष्ट गति प्राप्त होत नाहीं. म्हणून यतींना क्षमा आणि शांतिच सिद्धिदायक होत. अशा क्षमाशीलांना ऐहिक व पारलौकिक सुख प्राप्त होतें. याकरितां तूं क्षमावान आणि इंद्रियनिग्रही होशील अशा प्रकारचें वर्तन नेहमीं करीत जा. कारण, क्षमेच्या योगानें क्रमेंकरून ब्रह्मलोकापर्यंत असलेले सर्व लोक तुला प्राप्त होतील. बाबा, मी तर शांतीचें अवलंबन करून आज यासंबंधानें शक्य तो उपाय करितों. मी राजाला असा निरोप पाठवितों कीं, तूं माझ्याशीं जें उद्धटपणाचें वर्तन केलेंस, तें पाहून माझ्या अल्पमति लहान मुलानें क्रोधानें तुला शाप दिला आहे.

शापनिवेदन.

सौति सांगतो:—ऋषीहो, याप्रमाणें त्या मुलाला सांगून त्या सदाचरणी, दयाळू व महातपस्वी शमीक मुनींनीं गौरमुख नामक सुशील शिष्याला बोलाविलें, व राजाला सांगावयाचा निरोप तो त्याजजवळ सांगून त्याला राजाकडे पाठविलें. तेव्हां तो शिष्य लागलीच तेथून निघाला, आणि हस्तिनापुरांत आला. त्यानें प्रथम द्वारपालाबरोबर आपण आल्याची वर्दी राजाकडे पाठविली; व राजाकडून परवानगी आल्यावर तो वाड्यांत गेला, आणि त्यानें राजाची भेट घेतली. तेव्हां राजानें त्याचा योग्य सत्कार करून यथाविधि पूजा केली. नंतर थोडी विश्रांति घेऊन त्यानें राजाला शमीक ऋषींनीं सांगितलेला सर्व भयजनक वृत्तांत सांगितला. त्यावेळीं राजाचे मंत्रीही तेथेंच होते.

गौरमुख म्हणाला:—हे नृपवरा, तुझ्या देशांत शमीक नामक ऋषि राहत असतात हें तुला माहीत आहेच. ते परम धार्मिक असून जितेंद्रिय व क्षमाशील आहेत. हे नरपुंगवा, ते मौनव्रत धारण करून बसले असतां तूं आपल्या धनुष्याच्या टोंकानें एक मृत सर्प त्यांच्या स्कंधावर ठेविलास. तें त्यांनीं सहन केलें, परंतु त्यांच्या पुत्राला तें सहन न होऊन, " आजपासून सात दिवसांनीं तक्षकापासून तुला मृत्यु येईल " असा त्यानें तुला शाप दिला. हा प्रकार घडून गेल्यानंतर तो शमीक ऋषींना कळला. तेव्हां तूं आपल्या रक्षणाचा कांहीं उपाय कर म्हणून त्यांचें तुला आग्रहाचें सांगणें आहे. कारण, त्या मुलाची वाणी कोणाच्यानेंही असत्य करवणार

नाहीं, व तेही आपल्या कोपायमान झालेल्या त्या पुत्राला आवरून धरण्यास समर्थ नाहींत. म्हणून, हे राजा, तुझें हित करण्याचा उद्देश मनांत धरून त्यांनीं मला तुजकडे पाठविलें आहे.

सौति म्हणतोः—ऋषीहो, हें भयजनक भाषण श्रवण करून, आपल्या हातून घडलेल्या पापाबद्दल त्या महातपस्वी कुरुकुलश्रेष्ठ राजा परिक्षिताला अत्यंत पश्चात्ताप झाला; आणि त्यांतूनही, आपण ती गोष्ट केली त्या वेळीं ते ऋषि मौनव्रत धारण करून बसले होते असें ऐकिल्यामुळें तर त्याच्या मनाला अधिकच दुःख झालें; व आपण खरोखर अपराधी असतांही शमीक मुनींच्या अंतःकरणांत आपणाविषयीं दया उत्पन्न झाली, हें कळल्यावर तर त्याच्या दुःखाला पारावारच नाहींसा झाला! एकंदरींत, आपण त्या ऋषींचा अपराध केला म्हणून जितकें त्या राजाला वाईट वाटलें, तितकें स्वतःच्या मृत्यूच्या वार्तेनेंही त्याला वाईट वाटलें नाहीं!

असो; नंतर, भगवान शमीक मुनींनीं फिरूनही मजवर दया करावी, असें सांगून त्या गौरमुख नामक शिष्याला राजानें परत पाठविलें. गौरमुख गेल्यानंतर, उद्विग्नचित्त झालेल्या त्या परिक्षित राजानें आपल्या मंत्रिजनांबरोबर या गोष्टीसंबंधानें विचार केला. राजा परिक्षित मोठा मुत्सद्दी होता. त्यानें त्या मंत्रिमंडळाच्या विचारानें आपणास राहण्याकरितां सुरक्षित असा एकखांबी वाडा बांधविला, व तेथें सर्व प्रकारचा उत्तम बंदोबस्त करून आणि वैद्य, औषधि व मांत्रिक यांची सर्व तयारी ठेवून आपण तेथें रहावयास गेला. अशा प्रकारच्या त्या सुरक्षित जागेंतच तो धर्मवेत्ता राजा आपल्या मंत्रिजनांसह राज्यसंबंधी सर्व कामें पाहूं लागला. तेथें जाऊन राजदर्शन घेण्यास कोणीही समर्थ नव्हता; इतकेंच नव्हे, तर त्या देशांत संचार करणाऱ्या वायूचाही तेथें शिरकाव होऊं नये इतका कडेकोट बंदोबस्त केलेला होता. याप्रमाणें सहा दिवस जाऊन सातवा दिवस प्राप्त झाला.

काश्यपतक्षकसंवाद.

इकडे, राजा तक्षकदंश होऊन मृत्यु पावणार ही बातमी काश्यप नामक एका विद्वान ब्राह्मणास समजली. तेव्हां त्या विषापासून राजाचें संरक्षण करण्याच्या उद्देशानें तो राजाकडे यावयास निघाला. तक्षकानें राजाला दंश केला असतां त्यापासून राजाला निर्भय करण्याविषयींची त्याची खातरी होती. शिवाय, त्यानें असाही विचार केला कीं, या कृत्यापासून आपणास धर्म व अर्थ ह्या दोन्ही गोष्टी प्राप्त होतील. मार्गक्रमण करीत असतांही त्याच्या मनांत हेच विचार चाललेले होते. इतक्यांत त्या एकाग्रचित्त ब्राह्मणास नागराज तक्षकानें पाहिलें. त्याबरोबर त्यानें वृद्ध ब्राह्मणाचें रूप घेतलें, आणि त्या मुनिश्रेष्ठ काश्यपाजवळ जाऊन, "आपण इतक्या घाईघाईनें कोणीकडे जात आहां, व मनांत काय कार्य योजिलें आहे" असें त्याला विचारलें. तेव्हां काश्यप म्हणालाः—हे वृद्ध ब्राह्मणा, कुरुकुलोत्पन्न शत्रुंजय राजा परिक्षित यास नागराज तक्षक आज आपल्या तेजानें दग्ध करून टाकणार आहे; तेव्हां अग्नीप्रमाणें तेजस्वी, महापराक्रमी व कुरुकुलवर्धक अशा त्या परिक्षित राजाला तक्षकानें दंश केल्याबरोबर त्यापासून त्याला निर्भय करण्याकरितां मी घाईनें तिकडे चाललों आहें.

तक्षक म्हणतोः—हे ब्राह्मणा, राजाला दग्ध करणारा तक्षक तो मीच आहें; तेव्हां तूं परत जा. कारण, मीं दंश केला असतां त्याचा प्रतिकार करण्यास तूं समर्थ नाहींस.

काश्यप म्हणतोः—अरे, माझ्या विद्येचा प्रभाव असा आहे कीं, तूं जरी त्या राजाला दंश केलास, तरी मी निःसंशय त्यास निर्भय करीन!

अध्याय त्रेचाळिसावा.

—:०:—

काश्यपमंत्रप्रभाव.

तक्षक म्हणतो:–हे ब्राह्मणा, मी एखाद्याला दंश केला असतां त्यास बरा करण्यास मी समर्थ आहें म्हणून तूं म्हणतोस, तर आतां मी ह्या वृक्षाला दंश करितों, तूं त्याला जिवंत कर आणि तुझें जें अत्युत्तम मंत्रबल आहे तें मला दाखीव. हें पहा–मी आतां ह्या जवळच असलेल्या वटवृक्षाला तुझ्या समक्ष जाळून टाकितों, आणि तूं त्यास जिवंत करण्याचा प्रयत्न कर.

काश्यप म्हणतो:–हे नागश्रेष्ठा, तुला असें जर वाटत असेल, तर तूं ह्या वृक्षाला दंश कर, व मी त्याला जिवंत करितों.

सौति म्हणाला:–ह्याप्रमाणें महात्म्या काश्यपानें नागेंद्राला सांगितलें, तेव्हां तो सर्पश्रेष्ठ वटवृक्षाजवळ आला; आणि त्यानें वृक्षाला दंश केला. त्याबरोबर सर्व वृक्षामध्यें विष भिनून जाऊन तो चोहोंकडून पेटला! ह्याप्रमाणें तो वृक्ष जळून त्याची राख झाल्यावर तो सर्पराज पुन: काश्यपाला म्हणाला, "हे ब्राह्मणश्रेष्ठा, आतां तूं यत्न करून या वृक्षाला जिवंत कर."

सौति म्हणाला:–ह्याप्रमाणें नागराजाचें भाषण ऐकून, सर्पविषानें जळून भस्म झालेल्या त्या वृक्षाची सर्व राख काश्यपानें गोळा केली, आणि तो म्हणाला, "हे पन्नगेंद्रा, आतां माझ्या विद्येचा प्रभाव कसा काय आहे तो पहा! हे भुजंगश्रेष्ठा, तुझ्यासमक्ष मी ह्या वृक्षास आतां जिवंत करितों." याप्रमाणें भाषण करून त्या षड्गुणैश्वर्यसंपन्न व विद्वान द्विजश्रेष्ठ काश्यपानें आपल्या विद्येच्या प्रभावानें त्या भस्मरूपी वृक्षास सजीव केलें! प्रथमत: भस्मराशीला त्यानें अंकुर उत्पन्न केला. नंतर त्या अंकुरास दोन पानें आणिलीं. पुढें पुष्कळ पल्लव व डहाळ्याहीं उत्पन्न केल्या; आणि अशा रीतीनें पुन: तो वृक्ष पूर्वीप्रमाणें सजीव केला!

काश्यपनिवारण.

ह्याप्रमाणें काश्यपानें वृक्ष जिवंत केलेला पाहून तक्षक म्हणाला:–तुझा हा पराक्रम अद्भुत तर खराच. तूं माझें विष तर नाहींसें केलेंच आहेस, आणि माझ्यासारख्या दुसऱ्या कोणाचेंही नाहींसें करशील यांत शंका नाहीं. परंतु मी तुला असें विचारितों कीं, तूं जो राजाकडे जात आहेस, यांत तुझा उद्देश काय आहे? राजाकडे जाऊन जें कांहीं मिळवावयाची तुझी इच्छा असेल, तें दुर्लभ असलें तरी मी तुला येथेंच देतों. याकरितां, तूं विनाकारण राजापर्यंत जाण्याचे श्रम घेऊं नको. आतां, असें मी म्हणत असतांही जर तूं आग्रहानें जाशील, तर त्यांत तुझा तोटा आहे. कसा तो पहा: ब्राह्मणाच्या शापानें राजाचें आयुष्य संपलें आहे; आणि अशा स्थितींत जर तूं त्याला वांचविण्याचा प्रयत्न करशील, तर "ब्राह्मणाचें वचन कधींही अन्यथा होत नाहीं" या सिद्धांतानें कदाचित् तुझा प्रयत्न निष्फळ होण्याचा संभव आहे; आणि प्रसंगवशात् जर तसेंच घडून आलें, तर राहूच्या योगानें सूर्याचें तेज ज्याप्रमाणें नष्ट होतें, त्याप्रमाणें त्रैलोक्यांत प्रसिद्ध असलेली तुझी कीर्ति नाहींशी होईल.

काश्यप म्हणतो:—हे नागराजा, मी जो राजाकडे जात आहें, त्यांत माझा दुसरा उद्देश कांहींएक नसून मला फक्त द्रव्याची इच्छा आहे. तें तूं मला दिलेंस तर मी तें घेऊन येथून परत जाईन.

तक्षक म्हणतो:—हे द्विजश्रेष्ठा, इतकेंच जर आहे, तर राजापासून जितकें द्रव्य मिळावें अशी तुझी इच्छा असेल, त्यापेक्षांही मी तुला जास्त देतों. तर तूं आतां परत फीर.

सौति म्हणाला:—असें हें तक्षकाचें भाषण ऐकून तो बुद्धिशाली व अंतर्ज्ञानी ब्राह्मणश्रेष्ठ काश्यप किंचित् ध्यानस्थ झाला. तेव्हां त्याला त्या पांडुकुलोत्पन्न राजाचें आयुष्य खरोखरच संपलें

आहे असें समजलें. नंतर त्यानें ध्यान विसर्जन केलें, आणि पाहिजे होतें तेवढें द्रव्य तक्षकापासून घेऊन तो तेथूनच परत फिरला.

ह्या प्रमाणें विचार करून व इच्छित द्रव्य घेऊन महात्मा काश्यप परत आपल्या घरीं जाण्यास निघाला; आणि तक्षकानें आपला हस्तिनापुराचा मार्ग धरिला. तेव्हां जातां जातां वाटेनें त्यास असें कळलें कीं, राजाचें संरक्षण व्हावें म्हणून कित्येक मांत्रिक आणिले असून नानाप्रकारच्या विषहारक औषधिही पुष्कळ सिद्ध ठेविल्या आहेत.

परिक्षिताला तक्षकदंश.

सौति म्हणाला:—हें ऐकल्यावर तक्षकास मोठी चिंता उत्पन्न झाली. तो मनांत म्हणाला, "मला तर या राजाला मोह उत्पन्न करून फसवावयाचें आहे; आणि यानें तर मोठी तयारी केली आहे; तेव्हां आतां कोणता उपाय करावा?" शेवटीं त्याला एक युक्ति सुचली. त्यानें तत्काळ कांहीं भुजंगांना तपस्व्यांचे वेष दिले; आणि त्यांच्याजवळ फळें, दर्भ व उदक देऊन त्यांना राजाकडे जाण्यास सांगितलें. त्यानें त्यांस अशी सूचना देऊन ठेविली कीं, राजापुढें जाल तेव्हां तुम्ही आपल्या मुद्रा मोठ्या गंभीर ठेवा, आणि हरप्रयत्नानें, राजा तुमच्याकडून फळें वगैरे घेईल असें करा; म्हणजे माझें कार्य साध्य होईल.

सौति म्हणाला:—तक्षकाची आज्ञा घेऊन ते भुजंग राजाकडे गेले; आणि मोठ्या प्रेमदर्शक अभिनयानें बरोबर आणिलेलीं फळें, दर्भ व उदक ह्यांचा राजानें स्वीकार करावा अशा आशयानें त्यांनीं तें राजापुढें केलें. राजानेंही त्यांचा अत्यादरानें स्वीकार केला, आणि त्यांची उत्तम संभावना करून परत रवानगी केली. ते कपटवेषधारी नाग गेल्यावर राजा आपल्या मित्रांना आणि मंत्रिजनांना म्हणाला, "अहो, तपस्वीजनांनीं जीं हीं मधुर मधुर फळें आणिलेलीं आहेत, त्यांपैकीं तुम्ही कांहीं भक्षण करा, आणि मीही करितों."

सौति म्हणाला:—ऋषीहो, ब्रह्मलिखित कधीं चुकत नाहीं! ऋषीच्या शापानें आणि प्रारब्धयोगानें बद्ध झाल्यामुळें परिक्षित राजाला मंत्रिजनांसह तीं फळें खाण्याची बुद्धि झाली; आणि शेवटीं, ज्या फळांत तो दुष्ट तक्षक आळीच्या रूपानें राहिला होता, तेंच फळ त्यानें स्वतः खाण्याकरितां हातीं घेतलें. तें तो खाऊं लागला असतां त्यांतून एक लहानशी आळी निघाली! ऋषीहो, ती आळी आखूड असून तांबड्या रंगाची होती. तिचे नेत्र कृष्णवर्ण होते. त्या कुरुवंशभूषण नृपश्रेष्ठ परिक्षितानें ती हातीं घेतली, आणि तो मंत्र्यांना म्हणाला:—अहो, आज बरोबर सातवा दिवस आहे, व सूर्यही अस्तास जात चालला आहे. असें असतांही अजून मला विषापासून भय प्राप्त झालें नाहीं. याकरितां, ही आळीच तक्षक होवो, आणि मला दंश करून मुनिवाक्य खरें ठरो. म्हणजे, मी जो ब्राह्मणाचा अपराध केला आहे, त्या दोषांतून मुक्त होईन.

राजाचें हें भाषण ऐकून, कालानें प्रेरणा केली असल्यामुळें मंत्रिजनांनीही त्याच्या बोलण्यास अनुमोदन दिलें! असो; शौनकादिकहो, परिक्षित राजा मरणोन्मुख झाला असल्यामुळें त्याचें देहभान नष्ट झालें होतें. त्यानें मोठ्या आनंदानें हसत हसत ती आळी धरली, आणि आपल्या मानेवर ठेविली! तेव्हां तात्काळ त्या आळीचें रूप धारण केलेल्या तक्षकानें आपलें भव्य स्वरूप प्रकट केलें; आणि राजाचें सर्व शरीर वेढून टाकून व उच्च स्वरानें गर्जना करून, पृथ्वीचें परिपालन करणाऱ्या त्या परिक्षित राजाला त्यानें कडकडून दंश केला!

अध्याय चवेचाळिसावा.

—:०:—

जनमेजयाला राज्याभिषेक.

ह्याप्रमाणें सर्पानें राजाला पूर्णपणें वेढून टाकलेलें पाहतांच सर्व मंत्रिजनांचीं मुखें म्लान होऊन ते अत्यंत शोकाकुल झाले. त्याचप्रमाणें, तेथें जे मांत्रिक जमले होते, तेही, तक्षकाची गर्जना ऐकतांच 'आपल्या मंत्राचा येथें मुळींच प्रभाव चालणार नाहीं' असें वाटून तेथून पळून गेले. ते पळत असतां वरचेवर मागें पाहत; तों एक अद्भुत सर्प आकाशमार्गानें जात असलेला त्यांच्या दृष्टीस पडला; त्या वेळचा तो देखावा फारच विलक्षण होता! आकाश नीलवर्ण असून त्यांत गमन करणारा तक्षक रक्तकमलवर्णाचा असल्यामुळें, जणू काय एखादी स्त्री आपल्या नीलवर्ण केशकलापांत शेंदुरानें भांगच करीत आहे कीं काय असा भास होत होता! असो; इकडे, सर्पाच्या विषापासून उत्पन्न झालेल्या अग्नीनें राजा परिक्षिताचें तें एकस्तंभी मंदिर जळूं लागलें, तेव्हां तेथें असलेले मंत्रिजन वाट सांपडेल तिकडून बाहेर पडले, आणि विजेचा धडाका बसल्याप्रमाणें राजा परिक्षित खालीं पडला!

याप्रमाणें तक्षकाच्या विषापासून राजा मृत्यु पावल्यानंतर, त्याला उत्तम लोकाची प्राप्ति व्हावी म्हणून राजोपाध्याय, ब्राह्मण व सर्व मंत्री यांनीं उक्त कर्में केलीं, व ते मोकळे झाले. नंतर सर्व नगरवासी जनांनीं एकमतानें परिक्षिताचे मुलास राज्याभिषेक केला. तो वयानें अगदीं लहान होता. त्या कुरुकुलश्रेष्ठ शत्रुदमन परिक्षिताच्या पुत्राचें नांव जनमेजय होय. तो वयानें लहान होता तरी बुद्धीनें पोक्त होता. त्यानें बापाच्याच वेळचे मंत्री व पुरोहित कायम ठेविले, आणि त्यांच्या सल्लामसलतीनें सर्व राज्यकारभार चालविला. कौरवकुलश्रेष्ठ वीर धर्मराज हा याचा पणजा होय. त्यानें ज्याप्रमाणें राज्य केलें, त्याचप्रमाणें प्रजेचें पुत्रवत् पालन करून यानें राज्यकारभार चालविला.

जनमेजयाचा विवाह.

पुढें तो बालराजा सर्व विद्यांमध्यें पारंगत होऊन शत्रूचें मर्दन करण्यास योग्य झाला. तें पाहून सर्वांना मोठा आनंद वाटला; आणि त्याच्या लग्नाविषयींचे विचार मंत्रिजनांच्या मनांत घोळूं लागले. नंतर त्यांनीं सुवर्णवर्मा नामक काशीच्या राजाकडे त्याच्या वपुष्टमा नांवाच्या कन्येविषयीं मागणी केली. तेव्हां सर्व प्रकारें हा संबंध उत्तम आहे असें पाहून सुवर्णवर्म्यानें आपली मुलगी कौरवकुलावतंस जनमेजयाला दिली. या गोष्टीनें जनमेजयालाही आनंद झाला. तो मोठा सद्वर्तनी होता. त्यानें परस्त्रीकडे पापदृष्टीनें कधीं ढुंकूनही पाहिलें नाहीं. पूर्वीं पुरूरव्याला उर्वशी प्राप्त झाल्यानंतर ज्याप्रमाणें तिजशीं त्यानें विहार केला, त्याचप्रमाणें, अनेक प्रकारच्या पुष्पांनीं प्रफुल्लित झालेल्या वनांत व सरोवरांत प्रसन्न अंतःकरणानें आपल्या प्रिय पत्नीबरोबर जनमेजयानें विहार केला. वपुष्टमाही अत्यंत रूपवती असून महान पतिव्रता होती. सर्व राजांमध्यें श्रेष्ठ व गुणवान असा पति आपल्यास मिळाल्याबद्दल तिलाही मोठा आनंद वाटत असे. ती क्रीडाभुवनसुंदरी विहारसमयीं आपल्या प्रिय पतीबरोबर मोठ्या प्रेमभावानें रममाण होत असे.

अध्याय पंचेचाळिसावा.

—:०:—

जरत्कारुपितृसंवाद.

सौति सांगतोः—ह्याप्रमाणें जनमेजय राजा राज्यकारभारांत दक्ष राहून आपल्या प्रिय पत्नीसहवर्तमान कालक्रमणा करीत असतां, दुसरीकडे एक निराळीच गोष्ट घडत होती! जरत्कारु नामक एक महातपस्वी मुनि होता. जेथें सायंकाळ होईल, तेथेंच वस्ती करावयाची असा

त्याचा नियम असे. ह्या जितेंद्रिय पुरुषाचें आणखी एक मोठें कठिण व्रत होतें. तें हें कीं, तो फक्त वायुभक्षण करून आपला चरितार्थ चालवीत असे. परंतु यामुळें तो दिवसानुदिवस क्षीण होत चालला होता. पृथ्वीपर्यटन व तीर्थ-स्नानें करण्याचा त्याचा क्रम चालला असतां, एके ठिकाणीं एक खंदक त्याच्या दृष्टीस पडला. त्या खंदकांत अधोमुख असे लोंबत असलेले आपले पितर त्यानें पाहिले. त्या खंदकाच्या कडेच्या एका बाजूस, कडयावर एक वाळ्याचें झुडूप उगवलेलें होतें. त्याला फक्त एकच तंतु राहिला होता. त्या तंतूस धरून त्याच्याच आधारावर ते पितर लोंबत राहिले होते; आणि त्या तंतूच्याही मुळाला, तेथेंच बिळांत असलेला एक उंदीर हळू हळू कुरतडीत होता. तेथें खावयाला कांहींएक न मिळाल्यामुळें ते पितर अत्यंत कृश होऊन गेले होते; व आपलें रक्षण व्हावें अशी त्यांस प्रबळ इच्छा असल्यामुळें त्या काळजीनें ते अगदीं दीनवाणे झालेले दिसत होते. त्यांची ती शोचनीय स्थिति पाहून जरत्कारु त्यांच्या जवळ गेला; आणि दयार्द्र अंतःकरणानें त्यांना म्हणाला, " अहो! ह्या वाळ्याच्या निर्जीव तंतूला धरून राहिलेले असे तुम्ही आहां तरी कोण? ह्या तंतूचीं मुळें तर उंदरानें सर्व खाऊन टाकलीं आहेत. आतां नाहीं म्हणायाला काय तें एकच मूळ अवशिष्ट राहिलें असून तें सुद्धां तो उंदीर आपल्या तीक्ष्ण दांतांनीं कुडतडीत आहे; यामुळें तेंही आतां लवकरच तुटेल; आणि आधींच दीन झालेले तुम्ही खातरीनें या खंदकांत पडाल. तुमची ही स्थिति पाहून मला अत्यंत दुःख होत आहे. या दुर्धर संकटांतून तुम्हांला सोडविण्यास कांहीं उपाय असला तर तो मला सांगा, तो करण्यास मी सिद्ध आहें. मीं आजपर्यंत जी तपश्चर्या केली आहे, तिचा चतुर्थांश, तृतीयांश, अथवा अर्धा भाग दिला असतां तुम्हांस या संकटांतून मुक्त होतां येण्यासारखें असेल, तर विलंब न करितां मला तसें सांगा. मी आपली तेवढी तपश्चर्या तुमच्याकरितां खर्ची घालीन; इतकेंच नव्हे, तर सर्व तपश्चर्या द्यावी लागली तरी देखील ती देण्यास मी सिद्ध आहें; परंतु तुम्ही या संकटांतून पार पडावें अशी माझी फार इच्छा आहे."

पितर म्हणतातः—हे विप्रश्रेष्ठा, तूं ब्रह्मचारी असून वृद्ध झाला आहेस, तरी आपली सर्व तपश्चर्या खर्चून आमची मुक्तता करण्याची तुझी इच्छा आहे; परंतु आमचें हें संकट तपाच्या योगानें निवारण होण्यासारखें नाहीं; तसें असतें तर या स्थितीस आम्ही पोहोंचलोंच नसतों. कारण आम्हींही पुष्कळ तप केलेलें आहे. परंतु, हे श्रेष्ठा, आम्हांस ही दशा संतानक्षयामुळें प्राप्त झालेली आहे, व संतानवृद्धीचा जर कांहीं उपाय न झाला, तर आम्हांस याहीपेक्षां अत्यंत अपवित्र असा नरकवास भोगावा लागणार आहे! संतान असणें हें अत्यंत पुण्यप्रद आहे असें पितामह ब्रह्मदेवानें म्हटलें आहे. आतां प्रथमतः तूं आम्हांस एवढेंच सांग कीं, आम्हां वृद्धांना अत्यंत दुःखित व शोचनीय स्थितींत पाहून दयार्द्र बुद्धीनें दुःखित झालेला असा तूं कोण आहेस? आम्हांस तर याचें कांहींच ज्ञान होत नाहीं. खरोखर तूं मोठा उदार मनाचा असून लोकविख्यात पुरुष असावास असें आम्हांस वाटतें. हे द्विजश्रेष्ठा, आम्ही यायावर नामक ऋषि असून मोठे कडकडीत आचरण करणारे आहों; परंतु, हे मुनिवर्य, संतानक्षयामुळें आम्ही पुण्यलोकापासून भ्रष्ट होऊन या स्थलीं प्राप्त झालों आहों. संतानहीनत्वामुळें आमचें सर्व पुण्य नष्ट झालें आहे. प्रस्तुत आम्हां भाग्यहीनांस कसें-बसें एक संतान आहे; परंतु तें असून नसल्यासारखेंच आहे. त्याचें नांव जरत्कारु होय. तो वेदवेदांगपारंगत असून सदाचरणी व जितेंद्रिय

असा अत्यंत प्रख्यात महातपस्वी आहे. त्यास तप करणें हेंच श्रेष्ठ वाटत असल्यामुळें त्यानें लग्न केलेंच नाहीं. त्यास बंधु वगैरे कोणी नसून त्याचें लग्न न झाल्यामुळें त्याला पुत्र होण्याचीही आशा नाहीं; परंतु या त्याच्या तपोलोभामुळें आम्ही मात्र या संकटांत पडलों आहों ! तेव्हां या गोष्टीस सर्वस्त्रीं तोच कारण आहे, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. प्रस्तुत आम्ही ज्ञानशून्य होऊन अनाथांप्रमाणें या भयंकर खंदकांत लोंबत राहिलों आहों. याकरितां, तो जरत्कारु जर तुझ्या कोठें दृष्टीस पडला, तर कृपा करून तूं आमची ही सर्व स्थिति त्याला सांग, आणि 'योग्य भार्येशीं विवाह करून प्रजोत्पादन कर,' असा आमचा त्याला निरोप कळीव. शिवाय, "आमच्या कुलाचा तूंच काय तो एक तंतु राहिला आहेस, व आमचा उद्धार होण्यास आधार काय तो तुझाच आहे," असेंही त्याला सांग.

याप्रमाणें निरोप सांगितल्यानंतर ते पितर पुनः त्या ब्राह्मणाला म्हणाले:—हे ब्रह्मन् ! आम्ही ज्याचा आश्रय करून राहिलों आहों असें तुझ्या दृष्टीस पडत आहे, तें वाळयाचें झुडूप म्हणजे आमच्या कुळाची वृद्धि करणारा कुलस्तंब होय. त्याचीं खालीं मुळें जीं तुला दिसत आहेत, ते मूलतंतु म्हणजे कालानें भक्षण केलेले आमचे वंशज होत; त्याचप्रमाणें, आम्ही ज्याच्या आधारावर या खंदकांत राहिलों आहों, व जो तंतु उंदरानें अर्धामुर्धा कुरतुडलेला तुला दिसत आहे, तो, तपाचे ठिकाणीं स्थिर असलेला आमचा वंशज जरत्कारु होय. आतां उंदीर जो तुझ्या दृष्टीस पडला, तो महाबलाढ्य काळ असून तो त्या मंद, मूढमति, तपोलोभी व विचारशून्य जरत्कारूस हळू हळू कुरतुडून क्षीण करीत आहे. हे पुरुषश्रेष्ठा, तें त्याचें तप आम्हांस तारणार नाहीं. आतां असाच जर त्याचा हा क्रम सतत सुरू राहिला, तर बहुतेक क्षीण झालेला जरत्कारुरूप तंतु तुटेल, आणि आमचा सर्व आधार नाहींसा होईल व संतान नसल्यामुळें पुण्यलोकापासून भ्रष्ट होऊन, जे आम्ही मूढ होऊन या तंतूच्या आधारावर आशा धरून बसलों आहों, ते आम्ही सर्व पाप्यांप्रमाणें अधोगतीस जाऊं; आणि आमच्याबरोबर तो जरत्कारुही नरकांत पडेल. बाबा ! तप, यज्ञ व दुसरीं कित्येक पवित्र कर्मे उत्तम असलीं, तरी त्यांची आणि संततीची बरोबरी कधीही होणार नाहीं. याकरितां, हे तपोधना, आमच्यावर जर उपकार करण्याची तुझी इच्छा आहे, तर कसेंही करून त्या जरत्कारूची भेट घे; आणि येथील सर्व वृत्तांत त्याला सांग, व तो विवाह करण्यास प्रवृत्त होऊन प्रजोत्पादन करील असा प्रयत्न कर. म्हणजे आमच्याकरितां तूं सर्व कांहीं केलेंस असें होईल.

याप्रमाणें भाषण केल्यानंतर ते पितर त्या ब्राह्मणाला म्हणाले, "हे ब्राह्मणश्रेष्ठा, आम्हीं आपला सर्व वृत्तांत तुला सांगितला आहे. आतां तूं कोण आहेस हें आम्हांला सांग. आमच्याविषयीं तुझ्या मनांत जी इतकी दया उत्पन्न झाली, तिजवरून तूं कोणी तरी आमचा बंधु, आप्त, किंवा वंशज असावास असें आम्हांस वाटतें.

अध्याय शेचाळिसावा

—:०:—

वासुकि आणि जरत्कारु ह्यांची भेट.

सौति सांगतोः—ह्याप्रमाणें पितरांचें भाषण ऐकून, आपण ज्यांना अत्यंत दुःखद स्थितींत पहात आहों, ते आपलेच पूर्वज असून त्यांना दुःख देण्यास आपणच कारण झालों, असें लक्ष्यांत आल्यामुळें जरत्कारु अत्यंत शोकाकुल झाला. त्याचे नेत्र अश्रूंनीं भरून आले; कंठ सद्गदित झाला; आणि तोंडांतून स्पष्ट शब्दोच्चार

होईना. शेवटीं मोठ्या कष्टानें अडखळत अडखळत त्यानें पितरांना म्हटलें, " तुम्हांस अत्यंत दुःख देणारा जो तुमचा वंशज जरत्कारु, तो मीच; तुम्ही माझेच पूर्वज आहां. तुमच्या वंशांत जन्म घेऊन मी तुम्हांस दुःख देण्यास प्रवृत्त झालों, याबद्दल पाहिजे ती दंड मला करा; आणि आतां तुमचें प्रिय करण्याकरितां मी काय करूं तेंही मला आज्ञा द्या."

पितर म्हणतातः—मुला, तूं सहज इकडे आलास ही गोष्ट फार चांगली झाली. बरें, तूं लग्न कां केलें नाहींस ?

जरत्कारु म्हणतोः—पितरहो, उर्ध्वरेतोस्थितींतच परलोकप्राप्ति करून घ्यावी अशी माझी इच्छा असल्यामुळें मीं लग्न केलें नाहीं. परंतु, हे पूर्वजहो, पक्ष्यांप्रमाणें तुम्ही लोंबत आहां हें पाहून मीं ब्रह्मचर्यानें राहण्याचा आपला निश्चय आतां फिरविला आहे. आतां मी खरोखर लग्न करीन, आणि तुमचा इष्ट हेतु सिद्धीस नेईन. यांत माझी अट इतकीच आहे कीं, माझ्या नांवासारखेंच जिचें नांव आहे, अशी मुलगी असून तीही कोणी तरी आपण होऊन भिक्षा म्हणून मला अर्पण केली पाहिजे; तर मी तिचा स्वीकार करीन. शिवाय तिचें पोषणही मी करणार नाहीं. असें कधीं घडून येईल, तरच मी विवाह करीन, नाहीं तर करणार नाहीं. याप्रमाणें घडून आल्यास जो पुत्र होईल त्यापासून तुमचा उद्धार होईल. याकरितां, तोंपर्यंत आपण स्वस्थ असावें.

सौति सांगतोः—शौनका, याप्रमाणें पितरांना सांगून जरत्कारु पृथ्वीवर संचार करूं लागला. परंतु तो वृद्ध असल्यामुळें त्यास भार्या प्राप्त झाली नाहीं. तेव्हां त्याला अत्यंत दुःख झालें; व अरण्यांत जाऊन त्यानें अत्यंत आक्रोश केला; आणि पितृहिताची कामना धरून वनांत गेलेल्या त्या जरत्कारूनें तीन वेळां हळू हळू असे शब्द उच्चारिले कीं, " अहो येथें असणाऱ्या स्थावर, जंगम व गुप्त प्राण्यांनो, माझें म्हणणें ऐका ! माझे पितर उग्र तपश्चर्या करीत आहेत, परंतु पुढें संतानवृद्धीचा मार्ग त्यांस दिसेना म्हणून ते दुःखित झाले आहेत, व त्यासाठीं त्यांनीं मला लग्न करण्याविषयीं आज्ञा केली आहे; याकरितां मला कोणी कन्या द्या. मी दरिद्री असून दुःखी आहें, परंतु लग्न करण्याविषयीं पितरांनीं मला आज्ञा केल्यामुळें कन्येची भिक्षा मिळविण्याकरितां मी पृथ्वीवर हिंडत आहें; तर हें माझें भाषण ऐकणाऱ्यांपैकीं ज्या कोणास कन्या असेल, त्यानें, दशदिशा हिंडणारा जो मी त्या मला ती द्यावी. तिचें नांव माझ्या नांवासारखेंच असून ती भिक्षेप्रमाणें मला अर्पण केली पाहिजे, आणि तिचें पोषण मी करणार नाहीं."

इकडे, वासुकीनें जरत्कारूला शोधण्याकरितां जे अनेक सर्प पाठविले होते, ते या वेळीं त्या अरण्यांत होते. त्यांच्या कानीं हें जरत्कारूचें भाषण पडलें, तेव्हां त्यांनीं तात्काळ जाऊन ती हकीकत वासुकीस सांगितली. त्यावरून सर्पराज वासुकीनें आपल्या जरत्कारु नामक भगिनीस उत्तम प्रकारचे अलंकार घातले, व तिला बरोबर घेऊन जरत्कारु होता त्या अरण्यांत तो गेला; आणि भिक्षेप्रमाणें त्यानें ती कन्या त्या महात्म्याला अर्पण केली. परंतु ही आपल्याच नांवाची नसेल आणि अर्पण करणाऱ्यानें तिच्या पोषणाचाही विचार केला नसेल, असें समजून त्यानें तिचा स्वीकार केला नाहीं; कारण, त्याला मोक्षप्राप्तीची इच्छा होती, व लग्न करणें हें मुमुक्षूला दुःखदायक असल्यामुळें त्याच्या तो विरुद्ध होता; परंतु पितृकार्य करण्याकरितांच तो या गोष्टीस प्रवृत्त झाला होता; तरी पण कुटुंबपोषणाची खटपट करण्यास तो सिद्ध नव्हता. म्हणून तिच्या पोषणाविषयींचा खुलासा झाल्याखेरीज तो तिचा स्वीकार करीना.

हे शौनका, नंतर त्या जरत्कारूनें वासुकीस त्या कन्येचें नांव विचारिलें, आणि आपण हिचें पोषण करणार नाहीं असेंही त्यास सांगितलें.

अध्याय सत्तेचाळिसावा.

—:०:—

जरत्कारुपरिणय.

सौति सांगतो:—याप्रमाणें जरत्कारूचें भाषण ऐकून वासुकि त्यास म्हणाला, "ही वधू धर्मचारिणी असून हिचें नांव आपल्या नांवासारखेंच आहे; आणि ही माझी बहीण आहे. हे द्विजश्रेष्ठा, या भार्येचें पोषण मी करीन. हे तपोधन, मी आपल्या सर्व सामर्थ्यानें हिचें रक्षण करीन; आपण हिचा स्वीकार करावा. मुनिवर्य, आपल्याकरितांच मीं आजपर्यंत हिचें रक्षण केलें आहे."

वासुकीचें हें भाषण ऐकून जरत्कारूनें आणखी त्याला असें सांगितलें कीं, "मी हिचें पोषण तर करणार नाहींच, पण हिनें मला न आवडेल अशी कोणतीही गोष्ट करतां उपयोगी नाहीं; केल्यास मी हिचा त्याग करीन अशी माझी प्रतिज्ञा आहे."

सौति सांगतो:—याप्रमाणें जरत्कारूचें बोलणें ऐकल्यावर वासुकीनें सर्व गोष्टी कबूल केल्या. तेव्हां तो मंत्रविदश्रेष्ठ, तपोवृद्ध व सदाचारी जरत्कारु मुनि त्याच्या घरी गेला, व त्या धर्मात्म्यानें वासुकीच्या भगिनीचें विधियुक्त व समंत्रक पाणिग्रहण केलें. त्या वेळीं मोठमोठे ऋषि त्याची स्तुति करूं लागले. पुढें नागराज वासुकीनें दाखविलेल्या रमणीय मंदिरांत जरत्कारु मुनि भार्येसह गेले. त्या मनोहर मंदिरांत उत्तम प्रकारच्या वस्त्रांनीं शय्या अलंकृत केली होती; तेथें ती दोघें राहिलीं. तेथें गेल्यावर साधुश्रेष्ठ जरत्कारूनें आपल्या भार्येला सांगितलें कीं, "मी येथें राहिलों आहें खरा, परंतु माझ्या इच्छेविरुद्ध तूं कांहींएक करतां कामा नये, किंवा बोलतांही कामा नये; आणि जर तूं माझ्या इच्छेविरुद्ध वागलीस, तर मी येथून लागलाच चालता होईन. हें माझें म्हणणें तूं लक्षांत ठेव."

हें पतीचें भाषण ऐकून नागराजाची भगिनी जरत्कारु इचें मन उद्विग्न झालें, व तिला अतिशय दुःख वाटलें. तरी तिनें त्यास 'बरें' असें उत्तर दिलें. असो. जगत्कारु मोठी पतिव्रता होती. पतीच्या मर्जीप्रमाणें वागावें अशीच त्या यशस्विनी जरत्कारूची इच्छा होती. पतीची मर्जी जाईल कीं काय म्हणून तिला नेहमीं भय वाटत असल्यामुळें ती फार जपून वागत असे. ऋषीहो, तिचा भर्ता जरी दुःखदायक होता, तरी नित्य जागरूक असणें, यत्किंचित् गोष्टीनेंही भयचकित होणें, व इंगित जाणणें ह्या अनुक्रमें कुत्रा, हरिण व कावळा ह्यांच्या गुणरूप स्वभावांचें अवलंबन करून तिनें त्याची उत्तम प्रकारें सेवा चालविली. असो. कांहीं दिवसांनीं तिला ऋतु प्राप्त झाला. तेव्हां योग्य दिवशीं स्नान करून शुद्ध झाल्यानंतर ती पतिसेवेस तत्पर झाली असतां तिच्या ठिकाणीं अग्नीप्रमाणें अत्यंत तेजस्वी असा गर्भ राहिला. तो गर्भ शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें दिवसानुदिवस वाढूं लागला.

जरत्कारुनिर्गमन.

पुढें एके दिवशीं तो कीर्तिमान जरत्कारु श्रमल्यासारखा होऊन आपल्या स्त्रीच्या अंकावर डोकें ठेऊन निजला, तों भगवान सूर्यनारायण अस्ताचलास जाऊं लागला तरी जागा झाला नाहीं. तेव्हां तिला मोठी चिंता पडली. तिला वाटलें, "आतां जर हे जागे झाले नाहींत, तर सायंकाळ होऊन गेल्यास धर्माचा लोप होईल; बरें, जर मुद्दाम यांस उठवावें, तर त्याचा परिणाम चांगला होईल कीं नाहीं कोण जाणे? हे धर्मात्मे आहेत खरे; परंतु बायकोवर कांहीं तरी निमित्त ठेवून, तिला दुःख देऊन निघून जावयाचें हें तर यांचें ठरलेलेंच

आहे. तेव्हां आतां करावें तरी काय ? कोणत्या उपायानें मी यांची अपराधी होणार नाहीं बरें ?" याप्रमाणें विचार करून, त्या धर्मशीलाचा कोप आणि त्याचा धर्मलोप, या दोन गोष्टींमध्यें धर्मशीलाचा धर्मलोप होणें हें फार वाईट आहे असें तिच्या मनांत आलें; आणि संध्याकाल होऊन गेला असतां याचा खचीत धर्मलोप होणार, व याला उठविलें तरी हा रागावणार; [तथापि याचा धर्मलोप होण्यापेक्षां हा आपल्यावर रागावला तरी चालेल] असा विचार करून ती सर्पकुलोत्पन्न मधुरभाषिणी जरत्कारु, आपल्या महातपस्वी निद्रित पतीला सौम्य शब्दांनीं जागृत करूं लागली: ती म्हणाली, "हे महाभागा, पश्चिमेकडे आकाशांत संध्याकालचीं पूर्ण चिन्हें दिसूं लागलीं असून भगवान सूर्यनारायण अस्तास जात आहे, व अग्नीला होम देण्याची वेळ झाली असून जिकडे तिकडे अग्नि दृग्गोचर होऊं लागला आहे. ही वेळ भूतपिशाचादिकांच्या संचाराची असल्यामुळें भयंकर आहे, तरी ती धर्मसाधनास योग्य असल्यामुळें रम्य दिसत आहे. याकरितां, हे प्रभो, आपण जागे व्हा, आणि स्नान करून संध्योपासना करा."

तिचें हें भाषण ऐकून, आपणास जागृत केल्याबद्दल महातपस्वी भगवान जरत्कारूला अतिशय राग आला; त्याचे ओठ थरथर कांपूं लागले आणि तो आपल्या भार्येला म्हणाला, "हे सर्पिणी ! तूं माझा अपमान केलास, तेव्हां आतां मी येथें रहाणार नाहीं; जसा आलों तसा परत जाईन. भग, माझी अशी खातरी आहे कीं, संध्याकाळ झाला असला तरी मी निजलों असतां अस्तास जाण्याचें सूर्याचें सामर्थ्य नाहीं. असें असून तूं मला जागें केलेंस, हा तूं माझा फार मोठा अवमान केलास. अवमान झाला असतां येथें राहणें कोणालाही रुचणार नाहीं; मग मज धर्मशीलाची किंवा माझ्यासारख्या इतराची गोष्ट काय विचारावी ?"

पतीचें हें भाषण ऐकून जरत्कारूच्या उरांत धडधडूं लागलें; आणि ती मोठ्या नम्रतेनें व करुणस्वरानें त्याला म्हणाली, "महाराज, आपला अपमान करावा ह्या हेतूनें खरोखर मीं आपणांस जागें केलें नाहीं! आपला धर्मलोप होऊं नये म्हणून मीं आपणांस जागें केलें !" ऋषीहो, इतकें तिनें सांगितलें तरी, भार्येचा त्याग करण्याविषयीं त्याचा पूर्वींपासूनच निश्चय झालेला असल्यामुळें, त्या कडकडीत व्रताचरणी जरत्कारूच्या मनांत यत्किंचितही दया आली नाहीं. त्यानें तिला साफ सांगितलें कीं, "माझी वाणी कधींही असत्य होणार नाहीं. मी जाणार. मी पूर्वीं तुझ्याशीं असाच करार केला असून तो तूं कबूल केल्यावरूनच मी येथें राहिलों. हे भीरु, हे भद्रे, आतां मी येथून गेल्यावर 'तो भगवान गेला' असें तूं आपल्या भावाला सांग, व माझ्या मागें तूंही शोक करूं नको."

भर्त्याचें हें भाषण ऐकून ती कोमलांगी चिंतेनें व शोकानें व्याप्त झाली; तिचे नेत्र पाण्यानें भरून आले, कंठ सद्गदित होऊन तोंडाला कोरड पडली, आणि तिचें काळीज कांपूं लागलें; तरी तसेंच धैर्य धरून ती भीत भीत आपल्या पतीला पुनः म्हणाली, "हे धर्मज्ञा, मी निरपराधी व धर्मनिष्ठ असून पतिहिताविषयीं नेहमीं तत्पर असतां माझा त्याग करणें आपणांसारख्या धर्मनिष्ठांना योग्य नाहीं. हे द्विजश्रेष्ठ, माझ्या भावानें ज्या हेतूनें आपणांस मला दिली, तो त्याचा हेतु माझ्या हातून अद्याप सिद्धीसही गेला नाहीं; तेव्हां तो मला काय म्हणेल बरें ! हे साधुश्रेष्ठा, मातेनें शाप दिल्यामुळें भयभीत झालेल्या माझ्या ज्ञातिबांधवांना, आपणांपासून मला झालेलें अपत्य पाहिजे आहे; आणि तें तर अद्याप झालें नाहीं ! मला अपत्यलाभ झाला असतां माझ्या सर्व ज्ञातीचें कल्याण होणार आहे; म्हणून, महाराज ! मी आपणांस प्रार्थना करितें कीं, आपणांशीं झालेला माझा संबंध व्यर्थ

होऊं नये. हे सत्पुरुषा, माझ्या ठिकाणीं आपण गर्भ स्थापित केला आहे खरा; परंतु त्याचें स्वरूप अद्याप व्यक्त झालें नाहीं; तेव्हां अशा स्थितींत आपण मला टाकून कसे जातां?"

हें तिचें बोलणें ऐकून महातपस्वी जरत्कारु मुनीनें योग्य व प्रसंगाला अनुरूप असें उत्तर दिलें: तो म्हणाला, "हे सुभगे, हा तुझा गर्भ अग्नीप्रमाणें तेजस्वी असून तो परम धर्मनिष्ठ व वेदवेदांगपारंग असा ऋषि आहे."

ऋषीहो, असें सांगून तो कृतनिश्चयी धर्मात्मा जरत्कारु महर्षि उग्र तपश्चर्या करण्याकरितां निघून गेला!

अध्याय अठ्ठेचाळिसावा.

—:०:—

वासुकिजरत्कारुसंवाद.

सौति सांगतोः—हे तपोधनहो, ह्याप्रमाणें सांगून भर्ता निघून गेल्याबरोबर जरत्कारूनें झालेली सर्व हकीकत आपल्या भावाला सांगितली. ती अत्यंत अप्रिय वार्ता ऐकून त्यास फार वाईट वाटलें; आणि तो सर्पराज वासुकि खिन्नवदन व दीन झालेल्या आपल्या भगिनीला म्हणाला, "हे भद्रे तुला त्या जरत्कारूला कां अर्पण केलें, व त्यांत कोणतें कार्य साधावयाचें होतें, हें तुला ठाऊक आहेच. त्याच्यापासून तुला पुत्र झाला तर तो आम्हां सर्पांचा हितकर्ता होईल, व तो पराक्रमी पुत्र आम्हांस सर्पसत्रापासून मुक्त करील, असें पूर्वी ब्रह्मदेवानें सर्व देवांसमक्ष सांगितलें आहे. तस्मात्, हे सुभगे, त्या मुनिश्रेष्ठापासून तुझ्या ठिकाणीं गर्भ राहिला आहे का? तुझ्याशीं जो त्याचा विवाहसंबंध झाला, तो फलद्रूप व्हावा अशी माझी फार इच्छा आहे. आतां, वास्तविक पाहिलें तर, मीं तुला हें असें विचारणें योग्य नाहीं; परंतु कार्याच्या महत्त्वामुळें मीं तुला विचारलें; तर कृपा करून आमची कार्यसिद्धि झाली आहे किंवा नाहीं तें सांग. आतां ह्याविषयीं तुझ्या भर्त्यालाच विचारण्याकरितां मी त्याच्या मागें गेलों असतों, परंतु तो मोठा कोपिष्ट असल्यामुळें कदाचित् शाप देईल, म्हणून माझ्यानें तसें करवत नाहीं. ह्यास्तव, हे कल्याणी, तुझ्या पतीचें सर्व हृद्गत मला सांग; आणि माझ्या हृदयांत जें भयंकर शल्य चिरस्थायी झालें आहे, तें काढून टाक."

वासुकीचें हें भाषण ऐकून, आपली सर्व हकीकत समजून घेण्याविषयीं अत्यंत उत्सुक झालेल्या आपल्या भावास 'सर्व कांहीं सांगतें' असें म्हणून जरत्कारूनें आश्वासन दिलें; आणि ती म्हणाली, "आपल्या संबंधाचा प्रश्न मीं त्या महात्म्या तपस्व्यांना विचारला, तेव्हां त्यांनीं मला 'होय' म्हणून उत्तर दिलें, व नंतर ते निघून गेले. हे सर्पराजा, विनोदांत सुद्धां त्यांनीं कधीं असत्य भाषण केलेलें मला स्मरत नाहीं, तेव्हां मजवर आलेल्या पतिवियोगरूप संकटकालीं मीं विचारिलेल्या प्रश्नाचें उत्तर ते खोटें कधींही देणार नाहीत. ते जातांना मला असें म्हणाले कीं, 'हे भुजंगमे, कार्यासंबंधानें तूं काळजी करूं नको. तुला अग्नि व सूर्य यांच्याप्रमाणें तेजस्वी असा पुत्र होईल.' तर, बंधुराया, तुला आतां दुःख करण्याचें कारण नाहीं."

आस्तीकजन्म.

सौति सांगतोः—भगिनीचें हें भाषण ऐकून नागराज वासुकीला अत्यानंद झाला. त्यानें तिचें सांत्वन केलें, आणि तिला अलंकारादिक देऊन तिचा योग्य सत्कार केला. पुढें त्या भुजंगभागिनीचा गर्भ शुक्लेंदूप्रमाणें वाढूं लागला. नंतर योग्य समयीं उभय कुलांचें भय दूर करणारा असा दिव्य सुपुत्र ती प्रसवली. तो नागराज वासुकीच्याच घरीं लहानाचा मोठा झाला. त्यानें च्यवनभार्गव ऋषीपाशीं सांग वेदाध्ययन केलें. तो मोठा सत्त्वगुणी होता. त्याची धर्मकर्मावर उत्तम निष्ठा

होती. लहानपणींच त्यानें अनेक व्रतानुष्ठानें केलीं. ह्या ज्ञानवैराग्यसंपन्न पुत्राचें नांव आस्तीक असें होतें.

आस्तीकनामोत्पत्ति.

हा आस्तीक गर्भस्थ असतांना त्याचा पिता वनांत निघून गेला, तेव्हां तो जातेवेळीं ह्याच्या मातेनें आपल्याविषयीं त्यास प्रश्न केला असतां "आस्ति" असें तो म्हणाला. त्यावरून या मुलाचें नांव 'आस्तीक' असें पडलें. ह्या परम बुद्धिमान बालकाचें संगोपन त्याच्या मातुलानें फार आस्थेनें केलें. देवाधिदेव भगवान शूलपाणी शंकराप्रमाणें कांतिमान असा तो आस्तीक जसजसा मोठा होऊं लागला, तसतसा त्याला पाहून त्या सर्व सर्पांना मोठा आनंद वाटूं लागला !

अध्याय एकुणपन्नासावा.

—:०:—

परिक्षिच्चरितकथन.

शौनक म्हणतात:—हे सौते, राजा जनमेजयानें आपल्या पित्याच्या मरणाविषयींचें वृत्त आपल्या मंत्रिजनांना विचारिलें असतां त्यांनीं सविस्तर सांगितलेलें तें वृत्त तूं आम्हांस सारांशरूपानें कथन केलेंस, तें फिरून एकवार सविस्तर सांग. तो चमत्कारिक इतिहास ऐकण्याची आमची फार इच्छा आहे.

सौति सांगतो:—हे ब्रह्मन, राजानें मंत्र्यांस काय विचारिलें व त्यांनीं परिक्षिताच्या मरणाचा वृत्तांत कसा सांगितला, तो मी आपणांस सविस्तर सांगतों, श्रवण करा.

जनमेजय म्हणाला:—मंत्रिजनहो,माझ्या पित्याचें सर्व चरित्र आपण जाणत आहां, व तो महायशस्वी नृपति कसा मरण पावला हेंही आपणांस माहीत आहे. तर तो सर्व वृत्तांत मला सांगा. म्हणजे त्याबद्दलचा मी योग्य सूड घेईन. परंतु त्यापासून लोकांचें कोणत्याही प्रकारचें अकल्याण न होतां कल्याणच होत असेल, तर मी या कार्यास प्रवृत्त होईन.

सौति सांगतो:—ह्याप्रमाणें त्या महात्म्या जनमेजयानें विचारिलें असतां धर्मवेत्ते आणि शहाणे असे ते मंत्रिजन त्यास म्हणाले, "राजा, तुझा पिता नृपश्रेष्ठ परिक्षित याचें चरित्र, व त्याचा शेवट कसा झाला तें तूं श्रवण कर. तुझा पिता मोठा पराक्रमी असून मनाचा उदार होता. त्यानें प्रजेचें पुत्रवत् पालन केलें. ज्यानें त्यानें आपापल्या धर्माप्रमाणें वागावें अशी त्याची इच्छा असे. त्याप्रमाणें त्यानें सर्वांस आपापल्या धर्माप्रमाणें वागावयास प्रवृत्त केलें. तो मूर्तिमंत धर्मच होता म्हटलें तरी चालेल. त्या भाग्यशाली व अतुलपराक्रमी राजानें चारी वर्णांचें व पृथ्वीचें उत्तम प्रकारें रक्षण केलें. तो सर्वांशीं दयाळूपणें वागत असल्यामुळें त्याच्यावर आबालवृद्ध प्रीति करीत. प्रजापति ब्रह्मदेवाप्रमाणें त्याची सर्वांचे ठिकाणीं समबुद्धि होती. याप्रमाणें तो प्रजेचें पालन करीत असल्यामुळें, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे चारही वर्ण प्रसन्न अंतःकरणानें आपापल्या धर्माचरणांत निमग्न असत. तो विधवांचें योग्य रक्षण व अनाथांचें संगोपन करून दरिद्र्यांचा परामर्ष घेत असे. चंद्राचें दर्शन घेण्यास जसा कोणासच प्रत्यवाय नसून त्या अमृतकिरणमय शितांशूच्या दर्शनानें जसा ताप हरण होऊन आनंद होतो, तसें त्याचें दर्शन सर्वांस सुलभ असून आनंदजनक असें होतें त्याच्या राज्यांत संतोष मूर्तिमंत नांदत असे. तो राजा मोठा वैभवशाली असून सत्यवचनी व अतुलपराक्रमी होता. जनमेजया, तो तुझा पिता परिक्षित कृपाचार्यांजवळ धनुर्विद्या शिकला. भगवान श्रीकृष्ण परमात्म्याचें त्याच्यावर फार प्रेम होतें. त्या महायशस्वी व लोकप्रिय राजाचें जन्म कौरवांचा क्षय झाल्यानंतर उत्तरेच्या उदरीं झालें. सर्व कौरव "परिक्षिण" झाल्यानंतर म्हणजे क्षय

पावल्यावर हा जन्मास आला, म्हणून या अभिमन्यु-पुत्राचें "परिक्षित" असें नांव पडलें. तो सर्वगुणसंपन्न असून राजधर्मग्रंथांचें त्यानें उत्तम परिशीलन केलें होतें. कामक्रोधादिक षड्रिपूंना जिंकून त्यानें अंतर्बाह्य इंद्रियांचें दमन केलें होतें. तो मोठा बुद्धिमान असून त्याची धारणाशक्ति अपूर्व होती. धर्मावर त्याची निःसीम निष्ठा असे. तो नीतिनिपुण असून चांगला मुत्सद्दी होता. त्यानें आपल्या वयाचीं साठ वर्षें होत तोंपर्यंत प्रजेचें उत्तम प्रकारें परिपालन करून राज्य केलें; आणि नंतर तो मृत्यु पावला. त्याच्या मृत्यूमुळें सर्वांना अत्यंत दुःख झालें. राजा, पुढे, हजारों वर्षें कुरुकुलाकडे चालत आलेलें हें राज्य धर्मानें तुला प्राप्त झालें. हा राज्याभिषेक तुला तुझे लहानपणींच झाला; आणि पित्याच्या मागें सर्व प्राण्यांचें परिपालन करण्याचा अधिकार तुझ्याकडे आला."

जनमेजय म्हणतोः—तुम्हीं सांगितलेल्या एकंदर चरित्रावरून पाहतां, सर्व कौरवकुलांत आणि विशेषतः सदाचरणतत्पर अशा माझ्या पूर्वजांच्या कुलामध्यें प्रजेला अप्रिय व अहितकर्ता असा राजा केव्हांही झाला नाहीं असें दिसतें. असें असतां माझ्या पित्याला अशा प्रकारचें मरण कसें आलें, तें इत्थंभूत मला सांगा. तें ऐकण्याची माझी फार इच्छा आहे.

सौति सांगतोः—ऋषीहो, याप्रमाणें राजा जनमेजयानें मंत्र्यांना विचारिलें. ते त्याचे मंत्री, आपल्या राजाला जें प्रिय असेल व ज्या योगानें त्याचें हित होईल तें करण्याविषयीं नेहमीं उत्सुक असत. राजाचे इच्छेप्रमाणें त्यांनीं त्याला परिक्षिताच्या मरणाची हकीकत जशी झाली तशी सांगितली: ते म्हणाले, "हे राजा, तुझा पृथ्वीपालक पिता सर्व शस्त्रधरांमध्यें अग्रेसर असून त्याला मृगयेचें फार व्यसन असे. पांडु राजालाही असेंच मृगयेचें व्यसन होतें. तो आपला राज्यकारभार मंत्रिजनांवर सोंपवून नेहमीं शिकारीस जाई. त्याचप्रमाणें एके दिवशीं तुझा पिता सर्व राज्यकारभार आमच्यावर सोंपवून शिकारीकरितां वनांत गेला. तेथें एक मृग त्याच्या दृष्टीस पडला, तेव्हां त्यानें त्यास बाण मारिला. परंतु तो मृग त्याच्या हातीं न लागतां तसाच पळत सुटला, तो गहन अरण्यांत गेला. तेव्हां राजाही त्याच्या मागोमाग गेला. त्या वेळीं त्याजवळ घोडा वगैरे कांहीं नसून तो पायींच त्या मृगाच्या मागें पळत सुटला त्याच्या कमरेस तरवार, हातांत धनुष्य, आणि पाठीवर पुष्कळ बाण भरलेला एक भाता इतकीच सामुग्री होती. त्यानें त्या मृगाचा पुष्कळ पाठलाग केला, परंतु एकदा तो जो राजाच्या दृष्टीआड झाला, तो सांपडला नाहीं. त्याच्या वयाला साठ वर्षें झालीं होतीं; वार्धक्याची छाया त्याच्यावर पूर्णपणें आली होती; त्यांतून त्याला क्षुधाही फार लागली होती; अशा स्थितींत त्याला फार श्रम झाल्यामुळें तो अगदीं थकला, इतक्यांत त्या वनांत एक मुनि त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां राजानें त्यास 'इकडून एखादा मृग गेला का?' म्हणून प्रश्न विचारला, परंतु ते मुनिश्रेष्ठ मौनव्रत धारण करून बसले असल्यामुळें त्यांनीं त्याच्या प्रश्नास उत्तर दिलें नाहीं. ते एखाद्या खांबाप्रमाणें स्तब्ध बसले होते. राजा आधींच क्षुधेनें व श्रमानें व्याकुळ झाला होता, व तशा स्थितींत त्याच्या प्रश्नाचें उत्तर त्याला न मिळाल्यामुळें त्याला त्या शांत मुनीविषयीं अतिशय संताप आला, आणि ते व्रतस्थ आहेत ही गोष्ट लक्षांत न येऊन संतप्त झालेल्या त्या तुझ्या पित्यानें त्या मुनीशीं अतिशय उद्धटपणाचें वर्तन केलें! तेथें जवळच एक मृत सर्प पडला होता, तो त्यानें धनुष्याच्या टोंकानें उचलून त्या मुनीच्या खांद्यावर ठेविला! इतकें झालें तरी त्या मुनींनीं मुखावाटे एक अक्षरही काढलें नाहीं, व त्या गोष्टीचा त्यांना रागही आला नाहीं. राजानें ठेवलेला

मृत सर्प तसाच खांद्यावर राहूं देऊन ते स्वस्थ बसले होते ! "

अध्याय पन्नासावा.

—:०:—

काश्यपतक्षकसंवादोपलब्धि.

मंत्री सांगतातः—ह्याप्रमाणें त्या मुनींच्या खांद्यावर सर्प ठेवून तो भुकेनें व्याकूळ झालेला राजा आपल्या नगराला परत गेला. त्या ऋषीला गाईपासून झालेला एक शृंगी नांवाचा पुत्र होता. तो महायशस्वी, महातेजस्वी व प्रखर वीर्यवान असून अत्यंत कोपिष्ट होता. ही गोष्ट घडली त्यावेळीं तो ब्रह्मदेवाकडे गेला असून त्यानें त्याचें पूजन वगैरे केलें होतें. तो ब्रह्मदेवाची आज्ञा घेऊन परत निघाला, तों राजा परिक्षितानें आपल्या पित्याचा अवमान केल्याचें साद्यंत वर्तमान त्याच्या मित्राकडून त्याला समजलें. तेव्हां आपला पिता मौनव्रत धारण करून बसला असतां त्याच्या खांद्यावर राजानें मृत सर्प ठेविला असून तो अद्यापिही तसाच आहे, हें कळतांच तो अतिशय संतापला, आणि जितेंद्रिय, शुद्ध, कर्मनिष्ठ, अद्भुत तपाच्या योगानें उज्ज्वल देह धारण करणारा, वाक् आदिकरून इंद्रियांचें दमन केलेला, सदाचारसंपन्न, शुभ भाषण करणारा, शांत, निर्लोभी, गंभीर, निर्मत्सर, वृद्ध, मौनव्रतस्थ आणि सर्व भूतांचें आश्रयस्थान अशा आपल्या पित्याचा तुझ्या पित्यानें अपराध केला हें जाणून त्या महातेजस्वी शृंगीनें क्रुद्ध होऊन तुझ्या पित्याला शाप दिला. तो अत्यंत कांतिमान ऋषिपुत्र वयानें लहान होता तरी त्याचें तेज मोठें प्रखर होतें. त्या वेळीं त्याच्याकडे पहाणाराला तो तेजानें जळतच आहे कीं काय असा दिसत होता. त्यानें रागारागानें हातांत उदक घतलें, आणि तुझ्या पित्याला उद्देशून तो म्हणाला, " माझ्या तपाचें सामर्थ्य कसें आहे तें तूं आतां पहा ! " आणि लागलीच त्यानें शापवाणीचा उच्चार केलाः तो म्हणाला, " ज्यानें माझ्या निरपराधी पित्याच्या खांद्यावर मृत सर्प ठेविला, त्या दुष्ट पाप्याला माझ्या वचनाच्या बलानें आजपासून सात दिवसांनीं अत्यंत प्रखर व विषारी असा तक्षक क्रुद्ध होऊन दंश करील, व त्या योगानें तो दग्ध होईल ! " राजा जनमेजया, ह्याप्रमाणें बोलून तो तेथून निघाला व जेथें त्याचा पिता होता तेथें गेला आणि त्यानें आपण दिलेला शाप पित्याला निवेदन केला. पुढें त्या मुनिश्रेष्ठानें एक गुणशीलसंपन्न गौरमुख नामक आपला शिष्य तुझ्या पित्याकडे पाठविला, आणि " माझ्या मुलानें तुला 'तक्षक आपल्या तेजानें जाळून भस्म करील' असा शाप दिला आहे, याकरितां आपलें रक्षण करण्याचा कांहीं प्रयत्न करावयाचा असेल तर कर, " असा निरोप तुझ्या पित्याला सांगण्याविषयीं त्याला आज्ञा केली. तो शिष्य लागलीच तुझ्या पित्याकडे आला, आणि थोडी विश्रांति घेतल्यावर त्यानें ऋषींचा इत्थंभूत निरोप राजास सांगितला. जनमेजया, तें त्याचें भाषण ऐकून, सर्पराज तक्षकापासून आपणास भय प्राप्त होऊं नये अशा बंदोबस्तानें तो राहिला; तों सातवा दिवस आला.

इकडे काश्यप नामक एक ब्रह्मर्षि राजाकडे येण्याच्या इच्छेनें घरून निघाला असतां वाटेंत नागराज तक्षकाची व त्याची गांठ पडली. तेव्हां त्यानें काश्यपास विचारिलें, " अहो ब्राह्मणश्रेष्ठ, आपण इतक्या घाईनें कोणीकडे जात आहां व मनांत काय योजिलें आहे ? "

काश्यपानें सांगितलें:—हे द्विजा, कुरुश्रेष्ठ परिक्षित नामक राजाला आज सर्पराज तक्षक दंश करून दग्ध करणार आहे, तेव्हां त्यापासून त्याला निर्भय करण्याकरितां मी जात आहें. कारण, मीं त्याचें संरक्षण केलें असतां त्याचा नाश खचीत होणार नाहीं !

तक्षक म्हणतोः—हे ब्रह्मन्, त्याला तक्षक दंश करणार म्हणून जें तूं म्हणतोस, तो तक्षक मीच आहें, आणि मीं दंश केल्यावर त्याला जिवंत करण्याचें तुझें सामर्थ्य नाहीं, याकरितां ती इच्छा तूं व्यर्थ कां करितोस ?

याप्रमाणें भाषण करून तो त्या ब्राह्मणास म्हणाला, "माझा पराक्रम कसा आहे तो तूं पहा." असें बोलून त्यानें तेथेंच एक वृक्ष होता त्याला दंश केला. त्याबरोबर तो वृक्ष जळून भस्म झाला! परंतु राजा, काश्यपानें आपल्या मंत्रसामर्थ्यानें तो वृक्ष लागलीच जिवंत केला. तक्षकानें जेव्हां हें पाहिलें, तेव्हां ब्राह्मणाच्या सामर्थ्याविषयीं त्याची खातरी झाली. आतां ह्या गोष्टीला कांहीं तरी उपाय केला पाहिजे असें मनांत आणून, त्याची लोभाकडे प्रवृत्ति व्हावी या युक्तीनें त्यानें ब्राह्मणास म्हटलें कीं, 'आपली काय इच्छा आहे ती सांगा.'

ब्राह्मण म्हणालाः—मला द्रव्याची इच्छा आहे, व त्याकरितां मी राजाकडे जात आहें.

हें त्या महात्म्याचें भाषण ऐकून तक्षक मधुर शब्दांनीं म्हणाला, "हे पुण्यपुरुषा, राजापासून जितक्या द्रव्याची तूं इच्छा करीत आहेस, त्याहीपेक्षां मी तुला जास्त देतों तें तूं घे आणि परत जा."

ह्याप्रमाणें तक्षकानें सांगितल्यावर काश्यपानें इच्छेस वाटेल तितकें द्रव्य तक्षकापासून घेतलें व तो परत गेला.

असो; तो ब्राह्मण परत गेल्यावर, तुझा धर्मनिष्ठ पिता राजा परिक्षित अत्यंत सुरक्षित ठिकाणीं राहिला होता, तरी तेथें तो नागराज तक्षक कपटवेषानें गेला, आणि आपल्या विषरूप अग्नीच्या योगानें त्यानें त्याला जाळून टाकिलें! नंतर, हे पुरुषश्रेष्ठा, विजयाकरितां तुला राज्याभिषेक केला. हे राजाधिराज, ह्याप्रमाणें त्या भयंकर प्रसंगासंबंधी आम्हीं जें जें ऐकिलें व पाहिलें, तें सर्व तुला सांगितलें आहे. आतां, हे नरश्रेष्ठा, तुझ्या पित्याचा आणि उत्तंक ऋषीचा झालेला पराभव ऐकून तुला काय कर्तव्य असेल तें तूं कर.

सौति सांगतोः—अशा प्रकारें मंत्र्यांनीं राजा परिक्षिताच्या मृत्यूची हकीकत सांगितली, त्याच वेळीं त्या शत्रुदमन जनमेजयानें मंत्र्यांना आणखी विचारिलें, "तुम्हीं मध्यंतरीं वृक्षासंबंधानें जी हकीकत सांगितली, ती तुम्हांस कशी कळली? तक्षकानें जाळून भस्म केलेल्या वृक्षाला काश्यपानें पुनः सजीव केलें म्हणतां ही गोष्ट खरोखर अपूर्व होय! मला असें वाटतें, काश्यपाच्या मंत्रसामर्थ्यानें माझा पिता निर्विष होऊन खचीत नष्ट झाला नसता! परंतु आपण दंश केला असतां ब्राह्मणानें राजाला जिवंत केलें ही वार्ता जर लोकांत पसरली, तर लोक आपणाला हसतील आणि आपण निर्विष झालों असें ते लोक म्हणूं लागतील, असें त्या दुष्टबुद्धि नीच सर्पाला वाटलें असावें, आणि खरोखर याच विचारानें त्यानें त्या ब्राह्मणाची इच्छा पूर्ण करून त्यास वाटेंतून परत फिरविलें असावें. असो; कांहीं असलें तरी मी त्याचा सूड घेतल्यावांचून कधींही राहणार नाहीं. परंतु, हे मंत्रिजनहो, तक्षकाचा आणि काश्यपाचा संवाद झाला तेव्हां तेथें तिसरें कोणी असल्याचें तुम्हीं सांगितलें नाहीं; मग तें कोणीं कसें पाहिलें व पुढें तें तुम्हांस कसें कळलें, तेवढें समजण्याची मुख्यत्वेंकरून मला इच्छा आहे. ती तृप्त झाल्यावर मग सर्पनाशाचा काय विचार करावयाचा तो करूं.

मंत्री सांगतातः—राजन्, सर्पराज तक्षक व ब्राह्मणश्रेष्ठ काश्यप यांची वाटेंत गांठ पडली; तें वर्तमान आम्हांस कोणीं व कसें सांगितलें तें आम्ही आपणास सांगतों. कोणा एका ब्राह्मणाचा एक सेवक होता, तो लांकडें आणण्याकरितां त्या रानांत गेला होता. ज्या वृक्षास तक्षकानें दंश करून तो जाळून टाकिला, त्यावर तो वाळलेल्या•

फांद्या तोडण्याकरितां चढलेला होता. ही गोष्ट तक्षक व ब्राह्मण यांस मुळींच माहीत नसून वृक्षाबरोबर तोही जळून गेला. पुढें काश्यपानें जेव्हां तो वृक्ष आपल्या मंत्रसामर्थ्यानें सजीव केला, तेव्हां त्याबरोबर तो सेवकही जिवंत झाला; आणि त्यानें तेथील सर्व हकीकत आम्हांस सांगितली, तीच हकीकत जशी त्यानें आम्हांस सांगितली तशीच आम्हीं तुला सांगितली. तेव्हां आतां तुला जें करावयाचें असेल तें तूं कर.

सौति सांगतोः—ह्याप्रमाणें तक्षकाच्या दुष्टपणाची हकीकत ऐकून, आधींच संतप्त झालेल्या जनमेजय राजानें त्वेषानें हात चोळले, आणि तो दीर्घ उच्छ्वास टाकूं लागला. त्याच्या डोळ्यांतून अश्रुपात होऊं लागला, तो त्याच्यानें आवरेना ! नंतर थोडा विवेक करून अश्रु बंद झाल्यावर तो क्षणभर स्वस्थ बसला, आणि आपणास काय करावयाचें त्याचा मनांत निश्चय करून तो आपल्या मंत्र्यांना म्हणाला, "अहो मंत्रिजनहो, माझ्या पित्याच्या मृत्यूसंबंधानें तुम्हीं जें मला सांगितलें, तें ऐकून माझ्या मनाचा जो निश्चय झाला आहे तो मी तुम्हांस सांगतों. मला असें वाटतें, ज्यानें माझ्या पित्याचा वध केला आहे, त्याचा तावडतोब सूड घ्यावा. त्यानें शृंगीचें निमित्त करून माझ्या पित्याला दग्ध केलें आणि काश्यपालाही परतविलें हा त्याचा खरोखर अत्यंत दुष्टपणा होय. जर तो ब्राह्मण आला असता, तर माझा पिता वांचला असता यांत शंकाच नाहीं. अहो ! काश्यपाच्या प्रसादानें व मंत्राच्या प्रभावानें जर तो राजा जिवंत राहिला असता, तर यांचें काय खर्च झालें असतें ? परंतु राजाला जिवंत करण्याकरितां आलेल्या द्विजश्रेष्ठ काश्यपाला त्यानें परत फिरविलें हा त्याचा खोडसाळपणा होय. त्यानें माझ्या सामर्थ्याचा विचार केला नाहीं. राजाला जिवंत करण्याकरितां आलेल्या ब्राह्मणाला द्रव्य देऊन परत फिरविलें हा त्या दुष्ट तक्षकाचा महान अपराध होय. यास्तव, उत्तंक, मी आणि तुम्ही या सर्वांचें अत्यंत प्रिय होण्याकरितां मी पित्याबद्दल तक्षकाचा सूड घेणार !

अध्याय एकावन्नावा.

—:०:—

सर्पसत्रोपक्रम.

सौति म्हणालाः—ब्रह्मन्, पृथ्वीपति जनमेजय राजाच्या या बोलण्यास मंत्रिमंडलाचें अनुमोदन मिळून त्यानें सर्पांचा नाश करण्याची प्रतिज्ञा केली; आणि तीप्रमाणें ऋत्विज व पुरोहित यांस बोलावून तो भाषणपटु राजर्षि मोठ्या आवेशानें म्हणाला, 'ऋषिश्रेष्ठहो, ज्या दुष्टानें माझ्या पित्यास दंश करून त्याचा प्राण घेतला, त्या तक्षक सर्पाचा जेणेंकरून पुरा सूड उगवितां येईल असा कांहीं तरी उपाय तुम्ही मला सांगा. ज्यापेक्षां त्या दुरात्म्यानें माझ्या पित्याला विषरूप अग्नीनें भाजून काढिलें आहे, त्यापेक्षां त्यालाही अग्नींत दग्ध करून कृतापराधाबद्दल योग्य दंड करावा, असें माझ्या मनांत येतें. तर ज्यांतील प्रदीप्त अग्नींत त्या दुष्टास सपरिवार टाकितां येईल, असा एखादा यज्ञ आपणांस विदित असल्यास तो मला कृपा करून सांगा.'

ते ऋषि म्हणालेः—राजा, ईश्वरानें हें पुढील भवितव्य मनांत आणून, सर्पसत्र नामक एक मोठा यज्ञ केवळ तुजसाठींच निर्माण करून ठेविला आहे. त्याचें माहात्म्य पुराणांतरीं वर्णन केलें असून, तो क्रतु करण्याचा अधिकार तुजवांचून दुसऱ्या कोणासही नाहीं, असें पौराणिक सांगतात. त्याच्या विधानाची आम्हांस पूर्ण माहिती आहे.

ब्राह्मणाचें हें भाषण श्रवण करतांच जनमेजय राजास अत्यानंद झाला; पितृघातक तक्षक प्रदीप्त अग्नींत पडून दग्ध झालाच असें त्यास वाटलें; आणि तें सत्र करण्याविषयींचा आपला निश्चय त्यानें त्या वेदवेदांगवेत्त्या ब्राह्मणांस निवे-

दन करून, तत्संबंधी सर्व सिद्धता करण्यास सांगितलें. नंतर ब्राह्मणांनीं यज्ञमंडपासाठीं प्रथम यथाशास्त्र भूमापन केलें, आणि त्या ठिकाणीं विधिपूर्वक यज्ञमंडप उभारिला. वेदार्थाचें उत्तम परिशीलन केलेले कित्येक महाबुद्धिमान ब्राह्मण या यज्ञासाठीं मुद्दाम बोलावून आणिले. धन, धान्य इत्यादिकांची समृद्धि करून सर्व प्रकारची सिद्धता केली, व जनमेजय राजानें यज्ञदीक्षा घेतली. आतां सर्पसत्रास प्रारंभ होणार, इतक्यांत त्या यज्ञास विघ्न करणारी एक मोठी गोष्ट घडून आली: तेथें कोणीएक बुद्धिवान स्थपति (सुतार) होता; कोणतें घर कशा प्रकारें जयास येईल हें ज्यावरून समजतें, त्या वास्तुशास्त्रांत तो निष्णात होता. त्यानें त्या यज्ञमंडपाविषयीं असें भविष्य सांगितलें कीं, "हा यज्ञमंडप ज्या स्थलावर उभारण्यांत आला आहे, व ज्या वेळेवर भूमापनास आरंभ झाला त्या स्थलाच्या व त्या वेळेच्या गुणांनीं या यज्ञास मोठेंच विघ्न येईल. त्यास कोणीएक ब्राह्मण कारणीभूत होईल; व यज्ञ पूर्ण होणार नाहीं." यज्ञास प्रारंभ होण्यापूर्वींच जनमेजय राजास हें भविष्य समजलें; तेव्हां आंत येऊन कोणीही यज्ञास विघ्न करूं नये म्हणून, आपल्या आज्ञेशिवाय कोणासही आंत न येऊं देण्याविषयीं त्यानें द्वारपालास सक्त ताकीद केली.

अध्याय बावन्नावा.

—:०:—

सर्पसत्रारंभ.

सौति म्हणाला:—ऋषीहो, अशा प्रकारें बंदोबस्त केल्यावर यज्ञमंडपांत सर्पसत्रास प्रारंभ झाला. ऋत्विज आपआपलीं कामें यथाविधि करूं लागले. त्या ऋत्विजांनीं कृष्णवस्त्रें परिधान केलीं होतीं; होमधूम्रानें त्यांचे नेत्र आरक्त झाले होते; आणि उच्च स्वरानें मंत्रोच्चार करून ते यज्ञकुंडांतील प्रदीप्त अग्नींत आहुति टाकीत होते. त्यांनीं त्या अग्नींत सर्पांचें आव्हान करण्यास प्रारंभ केला, तेव्हां सर्व सर्पांचीं अंतःकरणें भीतीनें थरारून गेलीं! कांहीं अत्यंत दीन होऊन केविलवाण्या स्वरानें एकमेकांस हांका मारूं लागले; व भीतीनें मूर्छित होऊन धडाधड त्या प्रदीप्त अग्नींत येऊन पडले! सर्वांगास कंप सुटून ज्यांचीं अंतःकरणें धडाडून गेलीं आहेत, असे दीर्घ निश्वास टाकणारे शेंकडों सर्प, पुच्छ व मस्तक यांनीं एकमेकांस शेवटचें आलिंगन देत त्या अग्नींत प्रवेश करूं लागले! श्वेत, कृष्ण व नील वर्णांचे सर्प—कित्येक वयोवृद्ध तर कित्येक बाल्यावस्थेंत असलेले—नानाप्रकारें विलाप करीत त्या अग्नींत देह अर्पण करूं लागले. हे श्रोत्रियश्रेष्ठा शौनका, त्या वेळचा तो अनर्थ काय वर्णन करावा! कोसकोस, चारचार कोस लांबीचे सर्प, परंतु ते देखील गाईच्या कानाइतके आखूड होऊन वरचेवर त्या अग्नींत वेगानें येऊन पडूं लागले! याप्रमाणें, ज्यांस कोणत्याही प्रकारचा तरणोपाय राहिला नाहीं व जे निराधार झाले आहेत, असे ते सर्प निरुपाय होऊन त्या सत्रांत किती लक्ष किंवा किती कोटि नष्ट झाले, याची गणती करणेंही अशक्य आहे! कित्येकांचीं शरीरें घोड्यासारखीं होतीं; कित्येक हत्तींच्या सोंडेप्रमाणें दिसत होते; कित्येक महाद्वाराच्या अडसराप्रमाणें लांब व लठ्ठ असे होते; कित्येक तर मत्त गजांप्रमाणें स्थूलदेही असून बलानेंही त्यांसारखेच होते. सारांश, मातेच्या आज्ञेविरुद्ध वागणारे मोठ्यापासून तों अति सूक्ष्म सर्पापर्यंत सर्व प्रकारचे व सर्व रंगांचे भयंकर विषारी सर्प मातेनें दिलेल्या शापाच्या प्रभावानें पीडित होऊन त्या वेळीं अग्नींत येऊन पडले!

अध्याय त्रेपन्नावा.

—:०:—

सर्पसत्रांतील ऋत्विजादिकांचीं नांवें.

शौनक विचारितात:—ज्याच्या योगानें सर्पांस

अति भयंकर अवस्था प्राप्त झाली, त्या बुद्धिमान जनमेजय राजाच्या या दारुण सर्पसत्रांत यज्ञकर्म करण्यास ऋत्विज तरी कोणकोण महर्षि होते, तो सर्पांचा भयंकर देखावा पाहण्यास त्या ठिकाणीं सभासद कोण होते, व या सत्राचा विधि ज्यांस उत्तम प्रकारें अवगत आहे त्यांमध्यें मुख्य असे महर्षि तरी त्या प्रसंगीं कोण होते, हें सर्व सविस्तर श्रवण करण्याची आमची इच्छा आहे.

सौति म्हणाला:–ऋषींहो, जनमेजय राजाच्या त्या यज्ञांत असलेल्या ऋत्विजांचीं व सभासदांचीं नांवें तुम्हांस सांगतों. वेदार्थ जाणणाऱ्या सर्व ब्राह्मणांमध्यें वरिष्ठ व च्यवनाच्या कुलांत उत्पन्न झालेल्या अशा चंडभार्गव नामक ब्राह्मणानें या यज्ञांत होत्याचें काम स्वीकारिलें होतें, कौत्सकुलोत्पन्न जैमिनी नामक वयोवृद्ध व विद्वान ब्राह्मण उद्गाता झाला होता, शार्ङ्गरव नामक ऋषीनें ब्रह्मत्व पतकरिलें होतें, आणि पिंगल नांवाचा ऋषि अध्वर्यु होता. तसेंच, पुत्र व शिष्य यांसहवर्तमान व्यास मुनि, उद्दालक, प्रमतक, श्वेतकेतु, पिंगल, असित, देवल, नारद, पर्वत, आत्रेय, कुंड, जरठ, कालघट, वात्स्य, वेदाभ्यासन व तपश्चर्या करतां करतां वृद्ध झालेला श्रुतश्रवा, कोहल, देवशर्मा, मौद्गल्य आणि समसौरभ हे व दुसरे पुष्कळ वेदवेत्ते ब्राह्मण जनमेजयाच्या त्या सत्रांत सदस्य होते. असो.

ऋषींहो, त्या महायज्ञाच्या हवनास ऋत्विजांनीं प्रारंभ करतांच, सर्व प्राण्यांस भयभीत करून सोडणारे सर्प दीन होऊन तेथें येऊन पडूं लागले; सर्पांची वसा व मेद यांचे पाट वाहूं लागले; आणि याप्रमाणें सर्पांचें दहन एकसारखें चालू असल्यामुळें चोहींकडे दुर्गंध पसरला ! त्या यज्ञकुंडापासून तों अंतराळापर्यंत सर्पांची सारखी रांग लागली होती.* त्या सर्वांचे दुःखोद्गार व अग्नींत होरपळणाऱ्यांचे ते विलाप यांचा तर त्या ठिकाणीं हलकल्लोळ माजून राहिला !

तक्षकाला इंद्राचें आश्वासन.

मुनिवर्यहो, जनमेजय राजाच्या सर्पसत्राची वार्ता सर्पराज तक्षकास समजतांच तो अत्यंत भयभीत झाला. आपण पूर्वी केलेल्या अपराधामुळेंच हा दुर्धर प्रसंग ओढवला हें तात्काळ त्याच्या ध्यानांत आलें; व केवळ आपल्या पारिपत्याकरितांच हें सर्व चाललें आहे, असें मनांत येऊन त्याचा थरकांप झाला. तेव्हां आश्रय मागण्यासाठीं स्वर्गांत इंद्राकडे जाऊन त्यानें त्यास घडलेलें सर्व वर्तमान कळविलें; व त्यास शरण जाऊन आपलें रक्षण करण्याविषयीं त्याची प्रार्थना केली. त्याच्या विनवणीनें संतुष्ट होऊन इंद्र त्यास म्हणाला, " तक्षका, या सत्रापासून तुझ्या केंसासही धक्का लागणार नाहीं. अरे, हें पुढील भविष्य मनांत आणून, तुझ्यासाठीं मीं पूर्वीच ब्रह्मदेवांस प्रसन्न करून घेतलें आहे. या सत्रांत तुझा नाश होणार नाहीं असें त्यांनीं सांगितलें असल्यामुळें, आतां तुला भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. तूं अगदीं निश्चित अंतःकरणानें रहा. "

वासुकीचें जरत्कारूशीं भाषण.

सौति म्हणाला:–शौनकादिक मुनिश्रेष्ठहो, इंद्राकडून अशा प्रकारचें आश्वासन मिळतांच तक्षकास अत्यानंद झाला; व तो इंद्राच्या घरीं सुखानें राहिला. इकडे अग्नींत सर्प येऊन पडण्याचा एकसारखा तडाका चालला होता; त्यामध्यें वासुकीचा बहुतेक सर्व परिवार नष्ट झाल्यामुळें त्यास अत्यंत दुःख होऊन मोठी काळजी पडली. त्याचें काळीज तीळतीळ तुटूं लागलें; आणि त्याला भयंकर मूर्छा आली. नंतर थोड्या वेळानें सावध होऊन तो आपल्या जरत्कारु नामक भगिनीस म्हणाला, "ताई, आम्हांवर कोणता भयंकर प्रसंग येऊन गुजरला आहे, हें तुला विदित आहेच. माझ्या सर्वांगाचा दाह होत असून हृदय धडधडत आहे. दिशांचेंही भान नाहींसें होऊन, मला वेड लागल्यासारखें झालें आहे; आणि डोळ्यांपुढें

अंधारी येत असून हृदय विदीर्ण होत आहे असें वाटतें. आमचा समूळ उच्छेद करण्यासाठींच परिक्षित्पुत्र जनमेजयान चालविलेल्या त्या सत्रांतील प्रदीप्त अग्नींत आज मलाही निःसंशय जाऊन पडावें लागणार! मला आपल्या रक्षणाचा कांहींएक उपाय करतां येणें शक्य नाहीं, तेव्हां आज मला यमसदनीं जावें लागणार हें उघड दिसतें. ताई, हें पुढील भविष्य मनांत आणून या भावी संकटाच्या निरसनार्थ म्हणून जरत्कारु मुनीशीं तुझें जें आम्हीं लग्न करून दिलें, त्याची सफलता करून दाखविण्याची वेळ आज येऊन ठेपली आहे. या प्रसंगीं माझें व आपल्या गणगोताचें संरक्षण करणें तुझ्या स्वाधीन आहे. पूर्वी ब्रह्मदेवानें आम्हांस असा उश्शाप दिला आहे कीं, जनमेजयाचें हें सत्र चाललें असतां त्यास जरत्कारुपुत्र आस्तीक अडथळा करील. यास्तव, भगिनी, कौमार अवस्थेंतच वेदवेत्त्यांत वरिष्ठ होऊन जो वयोवृद्धांसही सन्माननीय झाला आहे, त्या तुझ्या आस्तीक नामक पुत्रास आमचें व आमच्या कुळाचें संरक्षण करण्यास सांग."

अध्याय चौपन्नावा.

—:०:—

आस्तीकजरत्कारुसंवाद.

सौति म्हणाला:—भुजंगराज वासुकीचें तें भाषण श्रवण करून त्या जरत्कारु नामक भुजंगीनें आस्तीक नामक आपल्या मुलास जवळ बोलाविलें व म्हटलें, "पुत्रा, वासुकी दादानें माझें तुझ्या पित्याशीं लग्न लाविलें यांत त्याचा कांहीं विशेष हेतु होता; तो सिद्धीस नेण्याची वेळ आज आलेली आहे; यास्तव तूं त्याचें कार्य योग्य प्रकारें तडीस ने."

आस्तीक म्हणाला:—माते, तुझ्या लग्नाच्या वेळीं माझ्या मामानें कोणता हेतु मनांत योजिला होता, हें तर मला पुरतेपणीं कळूं दे; मग तें कार्य कितीही बिकट असलें, तरी तें करण्याचें माझ्याकडे लागलें.

सौति म्हणाला:—जरत्कारूचें आपल्या भावांवर विलक्षण प्रेम असल्यामुळें त्यांचें हित करण्याची तीस उत्कट इच्छा होती. भावांवर संकट आल्यामुळें तिला फार काळजी लागली होती; परंतु पुत्राच्या त्या उत्साहयुक्त भाषणानें ती तिच्या मनांतील भीति तत्क्षणीं नष्ट होऊन ती म्हणाली, "बाळा, कद्रू मातेपासून सर्व सर्पांची उत्पत्ति झाली, हें तर तुला ठाऊक आहेच. एकदा ती कद्रू व तिची सवत विनता यांच्यामध्यें, उच्चैःश्रवा अश्वाच्या रंगाविषयीं पण लागला. 'तो सर्व पांढरा आहे,' असें विनतेचें म्हणणें असून, 'त्याचें पुच्छ काळें आहे' असें कद्रूचें म्हणणें होतें. जिचें म्हणणें खोटें ठरेल, तिनें दुसरीचें दास्यत्व पतकरावें, असा करार झाला होता. त्या वेळीं कद्रूनें आपल्या पुत्रांस त्या अश्वाच्या पुच्छाच्या ठिकाणीं कृष्णवर्णानें राहण्यास आज्ञा केली; परंतु कांहीं सर्पांकडून तें न घडल्यामुळें ती संतप्त होऊन म्हणाली, 'कुलांगारांनो, ज्यापेक्षां तुम्ही माझी आज्ञा मान्य करीत नाहीं, त्यापेक्षां तुम्ही पुढें जनमेजय राजाच्या सर्पसत्रांत प्राणांस मुकाल, व यमसदनीं जाल!' याप्रमाणें तिनें त्यांस शाप दिला, इतक्यांत त्रैलोक्य निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवांनीं, सर्पांचें जालिम विष प्राणिमात्रास त्रास देणारें आहे हें मनांत आणून 'तथास्तु' म्हणून त्या शापास अनुमोदनही दिलें!

"बाळा, तो शाप व त्यास मिळालेलें तें ब्रह्मदेवांचें अनुमोदन ऐकून वासुकि अति उद्विग्न झाला. पुढें समुद्रमंथनाच्या वेळीं त्यानें स्वतः रज्जु होऊन देवांस मदत केल्यामुळेंच देवांस अमृत प्राप्त झालें व समुद्रमंथनाचा हेतु सफल झाला; यास्तव देव त्यावर प्रसन्न झाले. तेव्हां त्यांस शरण जाऊन वासुकीनें आपली सर्व हकीकत

त्यास निवेदन केली. तेव्हां सर्व देव माझा भाऊ वासुकि यास पुढें करून कमलोद्भव ब्रह्मदेवांकडे गेले; व त्या सर्वांनीं विनंती करून ब्रह्मदेवांस प्रसन्न करून घेतलें: देव म्हणाले, 'हे कमलोद्भवा, हा सर्पांचा राजा वासुकि आपल्या चरणांस शरण आला आहे. सर्पजातीस झालेल्या मातृशापामुळें हा अत्यंत दुःखित झाला आहे. आपण याजवर कृपादृष्टि करून त्या शापाची निवृत्ति होण्यास कांहीं तरी उपाय सांगावा.'

"देवांचें हें भाषण श्रवण करून ब्रह्मदेव म्हणाले:—जरत्कारु मुनीचा त्याच नांवाच्या कन्येशीं विवाह होईल, आणि त्या दोघांपासून झालेला पुत्र या शापापासून सर्पांची मुक्तता करील."

जरत्कारु म्हणतेः—हे पुत्रश्रेष्ठा, ब्रह्मदेवाच्या या भाषणाच्या अनुरोधानें, माझें तेंच नांव असलेमुळें, सर्पराज वासुकीनें माझें तुझ्या थोर पित्याशीं लग्न लाविलें; व तो दारुण काल यावयाच्या पूर्वींच सुदैवानें त्या ऋषीपासून माझे उदरीं तुझें जन्म झालें. असो. तो भीतिप्रद काल सांप्रत प्राप्त झाला आहे. तेव्हां त्या भयंकर अग्नीपासून माझ्या बंधूंची सुटका करून आमची भीति नाहींशी करणें हें तुझें कर्तव्य आहे. कारण, पुढें आपला बचाव व्हावा ह्याच उद्देशानें तुझ्या वासुकि मामानें माझें त्या ज्ञानधन मुनींशीं लग्न केलें असल्यामुळें, त्याचा तो उद्देश विफल न होऊं देणें हें आपलें कर्तव्य आहे, असें मला वाटतें. तेव्हां, बाळा, तुला यासंबंधानें कसें काय वाटतें?

सौति म्हणालाः—ऋषीहो, मातेचें तें भाषण श्रवण करतांच आस्तीकानें तिच्या म्हणण्यास अनुमोदन दिलें; आणि दुःखानें संतप्त झालेल्या वासुकीकडे पाहून त्यास धीर देणारें असें भाषण केलें: तो म्हणाला, "हे सर्पश्रेष्ठा वासुके, त्या भयंकर शापापासून तुमची मी निःसंशयं मुक्तता करीन. महाशया, तुझें अंतःकरण स्वस्थ असूं दे. आतां तुला यत्किंचितही भीति बाळगावयास नको. जेणेंकरून तुमचें कल्याण होईल, असा उद्योग मी करीन. नागराजा, मी जरी सहज कांहीं बोलून गेलों, तरी तें देखील असत्य होणें नाहीं, मग या वेळचें हें माझें प्रतिज्ञावचन अन्यथा होण्याची वार्ता कशाला पाहिजे? मातुला, जनमेजय राजा फार थोर आहे. तो यज्ञदीक्षा घेऊन बसला असेल त्या ठिकाणीं मी जाईन, त्यास अनेक प्रकारचे मंगलप्रद आशीर्वाद वगैरे देऊन त्याचें अंतःकरण संतुष्ट करीन, आणि त्या नृपतीकडून तें सत्र बंद करवीन. सर्पराजा, आपल्या भावी स्थितीबद्दल तूं करून ठेवलेल्या एकंदर योजनेवरून तुझें बुद्धिवैभव व्यक्त होत आहे. 'हा आपली पुढें मुक्तता करील' अशा प्रकारचा मजविषयीं जो तुझा फार दिवसांचा मनोरथ आहे, तो कदापि अन्यथा होणार नाहीं. तेव्हां आतां सर्व गोष्टींविषयीं मजवर पूर्ण भरंवसा ठेऊन तूं अगदीं स्वस्थ ऐस."

आस्तिकाचें हें भाषण ऐकून वासुकि म्हणालाः—बाळा आस्तीका, मी भीतीनें अगदीं गांगरून गेलों आहें. माझें हृदय विदीर्ण होत आहेसें मला वाटतें. 'मातेची आज्ञा पाळणें हें पुत्राचें कर्तव्य होय' या वेदाज्ञेचें परिपालन न घडल्यामुळें आम्हांस मातृशापरूप ब्रह्मदंड झाला आहे. त्यामुळें माझें मन भ्रमिष्ट होऊन मला दिशाभानही राहिलें नाहीं!

आस्तीक म्हणालाः—नागराजा, तूं मुळींच कष्टी होऊं नको. सर्पसत्रांतील त्या प्रदीप्त अग्नीची तुला फार भीति वाटत आहे; परंतु तिचा नाश मी तेव्हांच करीन. मातेच्या आज्ञेचा भंग करणें म्हणजे वेदाज्ञा मोडणें होय; तेव्हां तूं वेदाज्ञा अवमानिल्यामुळें तुला जो मातृशापरूप ब्रह्मदंड झाला आहे, तो प्रलयकालच्या अग्नीप्रमाणें प्रखर असून अतिभयंकर आहे खरा; तथापि मी त्याचें निवारण करीन. त्याबद्दल तूं तिळप्रायही भीति बाळगूं नको.

आस्तीकाचें यज्ञमंडपीं आगमन.

सौति म्हणाला:—आस्तीकानें याप्रमाणें प्रतिज्ञा करून वासुकीस चिंतामुक्त केलें; आणि त्या चिंतेचा सर्व भार आपणावर घेतला. परंतु आपली प्रतिज्ञा शेवटास कशी न्यावी याचा त्यास मोठाच विचार पडला. भुजगेंद्रांची मुक्तता करण्यासाठीं तो तात्काळ तेथून निघाला; व मोठ्या त्वरेनें त्या जनमेजय राजाच्या यज्ञासन्निध येऊन पोहोंचला. तो यज्ञमंडप अप्रतिम असून, त्यांत सूर्य व अग्नि यांसारखे तेजस्वी असे अनेक सदस्य बसले आहेत, असें त्याच्या दृष्टीस पडलें. आस्तीक यज्ञमंडपांत प्रवेश करूं लागला, तेव्हां राजाज्ञेप्रमाणें द्वारपालांनीं त्यास प्रतिबंध केला. परंतु आस्तीक मोठा चतुर असून, शत्रूंस वश करण्याची कला त्यास उत्तम साधलेली होती; तेव्हां त्यानें या वेळीं त्या यज्ञाची अशी कांहीं प्रशंसा केली कीं, तेणेंकरून संतुष्ट झालेल्या राजाची अनुज्ञा मिळून त्याचा आंत प्रवेश झाला. यज्ञमंडपांत शिरतांच त्या द्विजश्रेष्ठानें त्या यशस्वी जनमेजय राजाची, तेथील ऋत्विज व सदस्य यांची, आणि अग्निनारायणाची स्तुति करून आपल्या अपार पुण्यबलानें त्या सर्वांस संतुष्ट केलें.

अध्याय पंचावन्नावा.

—:०:—

आस्तीककृत राजस्तुति.

आस्तीक म्हणाला:—हे भरतर्षभा जनमेजय राजा, प्राचीनकाळीं सोम, वरुण व प्रजापति यांनीं प्रयागक्षेत्रीं केलेल्या यज्ञाच्या योग्यतेचा हा तुझा यज्ञ आहे. यापासून आपलें सर्वांचें व आपल्या इष्टमित्रांचें कल्याण व्हावें. इंद्रानें शंभर अश्वमेध यज्ञ केले, त्यांच्या शंभरपट म्हणजे इंद्राच्या दहा हजार क्रतूंबरोबर हा तुझा यज्ञ आहे. याच्या योगानें तूं, तुझे ऋत्विज, आणि आपले प्रियजन या सर्वांचें हित होवो; आणि त्याबरोबर माझेंही होवो. परिक्षिता, पूर्वी यम, हरिमेधा व राजा रंतिदेव यांनीं थोर थोर यज्ञ केले, तशाच प्रकारचा हा तुझा यज्ञ आहे. यापासून आपलें व आपणास प्रिय असलेल्यांचें कल्याण असो. राजा, तुझ्या या यज्ञाची योग्यता गय, शशबिंदु व कुबेर यांनीं केलेल्या महायज्ञाहून यत्किंचितही कमी नाहीं. यापासून आपण व आपले प्रियजन यांपैकीं कोणासही अपाय न व्हावा. हे भरतश्रेष्ठा, नृग, अजमीढ व दाशरथि रामचंद्र यांनीं केलेल्या यज्ञांप्रमाणें अतिश्रेष्ठ असलेल्या या तुझ्या यज्ञापासून आपलें व आपल्या इष्टमित्रांचें सर्वथा हितच व्हावें. हे भरतकुलावतंसा, तुझ्या या यज्ञाची थोरवी किती म्हणून वर्णन करावी? अजमीढ राजानें केलेला यज्ञ, किंवा धर्मराज युधिष्ठिरानें केलेला यज्ञ, यांची स्वर्गांत प्रशंसा होत असते; परंतु तुझा हा यज्ञ त्यांहून बिलकूल कमी नाहीं. त्यांच्या यज्ञांप्रमाणेंच हाही इष्टमित्रांसह आपणां सर्वांस मंगलप्रद होवो. पारिक्षिता, सत्यवतीपुत्र व्यास मुनींनीं स्वतः अनुष्ठान करून केलेला यज्ञ ज्याप्रमाणें सर्वांस मंगलकारक झाला, त्याप्रमाणेंच तुझाही हा यज्ञ आपलें व आपल्या प्रियजनांचें मंगल करो. राजा, इंद्राच्या यज्ञाप्रमाणेंच तुझ्या या यज्ञांत हे सूर्यासारखे तेजस्वी ब्राह्मण अनुष्ठान करीत आहेत. हे सर्वज्ञ असल्यामुळें आज त्यांस कोणतीही एखादी गोष्ट म्हणजे अज्ञात आहे असें नाहीं. यास्तव, परब्रह्मस्वरूप असलेल्या या ब्राह्मणांस तूं जें अर्पण करशील, तें साक्षात् परब्रह्माच्या ठिकाणीं अर्पण केल्याप्रमाणें होणार आहे; व यामुळें, त्या दानापासून मिळणाऱ्या पुण्याचा नाश कदापि होणें नाहीं. परलोकसाधनाविषयीं कृष्णद्वैपायनासारखा कुशल दुसरा ऋत्विज नाहीं हें मी निश्चयानें सांगतों. आपआपल्या कर्मांत प्रवीण असे हे पृथ्वीवर संचार करणारे सर्व ऋत्विज

त्याच व्यास मुनींचे शिष्य होते; व ते आज तुझ्या या यज्ञास आलेले आहेत. राजा, विलक्षण तेज हेंच ज्याचें धन आहे, ज्याचे किरण चित्रविचित्र आहेत, पृथ्वीतलावर विद्यमान असलेलें हिरण्य हें ज्याचें रेत, सर्व भूतांच्या ठिकाणीं अंशरूपानें जो निवास करितो, व हवनीय द्रव्यांचें भक्षण करून जो आपला मार्ग कृष्णवर्ण करितो, तो हा भगवान अग्निनारायण यज्ञकुंडांत प्रदीप्त झाला असून, त्याच्या प्रदक्षिण फिरणाऱ्या ज्वालांनीं त्याची प्रसन्नता व्यक्त होत आहे; व तीवरून, तुझ्या हवनीय द्रव्याची तो इच्छा करीत आहे हें स्पष्ट दिसतें. राजा, या पृथ्वीतलावर पुष्कळ राजे आहेत; परंतु प्रजेचें उत्तम प्रकारें पालन करणारा तुजप्रमाणें एकही नाहीं. तुला तुझीच उपमा द्यावयास पाहिजे. तुझें अप्रतिम धैर्य पाहून मला सदोदीत मोठें कौतुक वाटतें. जनमेजया, या सर्व गुणांमुळें तुला खरोखर वरुण किंवा यमधर्म यांचीच उपमा योग्य होय. हे नृपश्रेष्ठा, वज्रपाणी इंद्र या जगताचें पालन करण्यास जसा तत्पर राहतो, तद्वत् तूं आपल्या प्रजांचें दक्षतेनें रक्षण करतोस; यामुळें आम्हां सर्व प्रजाजनांस तूं अत्यंत प्रिय झाला आहेस. खरोखर तुझ्या योग्यतेचा राजा सांप्रत कोणी नाहीं; इतकेंच नव्हे, तर यामागेंही कधीं झाला नाहीं. राजा, खट्वांग, दिलीप व नाभाग यांसारखी तुझी योग्यता असून तुझा पराक्रम ययाति व मांधाता यांप्रमाणें अवर्णनीय आहे. प्रत्यक्ष सूर्याप्रमाणें तुझें तेज असून तूं आपल्या सदाचरणानें भीष्माचार्यांप्रमाणें शोभत आहेस. वाल्मीकि मुनींप्रमाणें तूं आपलें सामर्थ्य गुप्त ठेविलें आहेस, व वसिष्ठांप्रमाणें आपल्या कोपाचें नियमन करून शांतीचा अवलंब केला आहेस. राजेंद्रा, तुझी सार्वभौमसत्ता इंद्राप्रमाणें अव्याहत चालत असून, प्रत्यक्ष महाविष्णूसारखी तुझी कांति आहे. सर्व प्रकारचा धर्माधर्मविचार जाणण्यासंबंधानें तूं दुसरा यमधर्मच होस. सर्वगुणसंपन्नतेनें एक द्वारकाधिपति कृष्णच तुझी बरोबरी करूं शकेल. राजेंद्रा, तुझें भांडागार हें अष्टवसूंच्या संपत्तीचें निवासस्थान होय, तद्वत् तूं स्वतः अनेक यज्ञांचें निधान होस. दंभोद्भव राजाप्रमाणें तुझें सामर्थ्य असून, तूं अस्त्रविद्येंत व इतर सर्व शास्त्रांत परशुरामाप्रमाणें निष्णात आहेस. और्व व त्रित ऋषि, किंवा भगीरथ राजा यांप्रमाणें तूं तेजस्वी असल्यामुळें तुजकडे पाहणेंही दुष्कर आहे.

सौति सांगतोः—ऋषीहो, याप्रमाणें जनमेजय राजा, सदस्य, ऋत्विज व अग्नि यांची आस्तीकानें स्तुति केली, तेव्हां ते सर्व प्रसन्न झाले. आस्तीकाविषयीं सर्वांच्या मनांत आपल्याप्रमाणेंच आदरबुद्धि उत्पन्न झाली आहे, हें त्यांच्या मुद्रेवरून जनमेजयानें तेव्हांच ताडलें, व तो प्रसन्न होऊन बोलूं लागला.

अध्याय छप्पन्नावा.

—:०:—

आस्तीकवरयाचना.

जनमेजय म्हणालाः—विप्रहो, हा दिसण्यांत अगदीं लहान दिसत आहे, तथापि वृद्ध पंडिताप्रमाणें भाषण करीत आहे; हा वयानें बाल असला, तरी विद्वत्तेनें वृद्धच आहे, असें मला वाटतें. याची जी मनःकामना असेल, ती पूर्ण करण्याविषयीं माझ्या मनांत उत्कट इच्छा उत्पन्न झाली आहे; यास्तव याबद्दल आपण योग्य विचार करून मला एकमतानें सल्ला सांगा.

सदस्य म्हणालेः—राजन्, ब्राह्मण अल्पवयस्क असला, तथापि तो राजास पूज्यच आहे. मग याच्यासारखा जो महाविद्वान असेल, तो तर परमपूज्य होय. तुजकडून आज याचे सर्व मनोरथ परिपूर्ण झाले पाहिजेत; तथापि यास वरप्रदानानें संतुष्ट करण्यापूर्वीं तक्षक या ठिकाणीं

लवकर येईल असें करणें हें आपलें पहिलें कर्तव्य होय.

सौति म्हणाला:—त्यास वर देण्याची राजास प्रबल इच्छा होऊन 'वर माग' असें म्हणून तो ती प्रकट करणार, इतक्यांत, तक्षक येथें येण्यापूर्वी यास वर देणें इष्ट नाहीं, असें होत्याचे मनांत येऊन, तें सुचविण्याच्या उद्देशानें तो कांहींसा खिन्नतेनें म्हणाला, "राजा, हा आपला यज्ञ इतके दिवस चालला आहे, परंतु अजून तक्षक येथें येत नाहीं; तेव्हां तोंपर्यंत यास तूं वर देऊं नये."

हें त्याचें भाषण ऐकतांच जनमेजय राजा खिन्न होऊन म्हणाला, "ब्रह्मन्, माझा चिरद्वेषी तक्षक येथें येऊन पडेपर्यंत हा यज्ञ चालविण्याचा माझा निश्चय आहे. यास्तव तो जेणेंकरून सत्वर येथें येईल, व हें आपलें कृत्य पूर्ण होईल, अशा प्रकारचा शक्य तितका प्रयत्न तुम्हीं सर्वांनीं करावा.

तेव्हां ऋत्विज म्हणाले:—हे महाराजा, आमच्या स्तुतीनें प्रसन्न झालेल्या मंत्रदेवता व अग्निनारायण यांकडून आम्हांस असें कळलें आहे कीं, या सत्राच्या भयानें त्रस्त झालेला तक्षक इंद्राच्या घरीं आहे. तो सूत लोहिताक्ष पौराणिक (स्थपति) खरोखर मोठा ज्ञानी आहे. त्यानें हें सर्व पूर्वींच जाणिलें होतें; व आपण त्यास विचारल्यावरून त्यानें व ब्राह्मणांनीं त्या वेळीं आपणांस जें सांगितलें, त्याप्रमाणेंच सांप्रत हें सर्व घडून येत आहे. तसेंच, कोणतीही गोष्ट मागील कल्पांत जशी घडली असेल, तशीच ती या कल्पांतही घडावयाची असा नियम आहे. त्याप्रमाणें मागील कल्पांतील आम्हांस माहीत असलेल्या वृत्तांतास अनुसरून आम्ही सांगतों. सांप्रत तक्षक इंद्रास शरण गेला असून, 'तूं या ठिकाणीं मजजवळ गुप्तपणें रहा, म्हणजे अग्नि तुला कदापि जाळूं शकणार नाहीं,' असें इंद्रानें त्यास अभिवचनही दिलें आहे.

हें त्यांचें भाषण श्रवण करून, आपण आरंभिलेलें हें सत्र व्यर्थ होतें कीं काय असें मनांत येऊन जनमेजय राजा दुःखित झाला. तथापि कर्म जोरानें चालविण्याविषयीं त्यानें होत्यास प्रेरणा केली. तेव्हां स्वकर्मांत तत्पर असलेल्या त्या चंडभार्गव होत्यानें हवन करण्यास प्रारंभ केला. तेव्हां, सर्व देव ज्याची स्तुति करिताहेत, बलाहक मेघ ज्याच्या मागून जात आहेत, आणि विद्याधर व अप्सर यांचे समुदाय ज्यासमवेत आहेत, असा तो महापराक्रमी इंद्रही विमानांत बसून स्वतः त्या ठिकाणीं येण्यास निघाला. पहा—इंद्राच्या उत्तरीय वस्त्राचा आश्रय करूनही तक्षकाचें भयव्याकुळ मन शांत झालें नाहीं. असो. इतक्यांत जनमेजय राजा अतिशय क्रुद्ध होऊन तक्षकास ठार करण्याची आपली मनीषा शेवटास नेण्याच्या उद्देशानें पुनः ऋत्विजांस म्हणाला, 'ब्रह्मन्, ज्यापेक्षां आमचा शत्रु तक्षक यास इंद्रानें आपल्या घरीं आश्रय दिला आहे, त्यापेक्षां तो इंद्रासह या प्रदीप्त अग्नींत पडेल असें करा.'

सौति म्हणतो:—ऋषीहो, जनमेजय राजाच्या मुखांतून तक्षकासंबंधानें असे शब्द निघतांच, होत्यानें इंद्रगृहीं असलेल्या तक्षकास तशा प्रकारें आव्हान केलें. त्याबरोबर तो व्यथित होऊन एका क्षणांत इंद्रासह आकाशांत दृग्गोचर होऊं लागला. तेथून इंद्रानें खालीं त्या यज्ञाकडे दृष्टि फेंकिली, तों त्याचें तें अत्युग्र स्वरूप अवलोकन करून तो भयभीत झाला; व तक्षकास एकटा सोडून अमरावतीस निघून गेला. हें पाहून ऋत्विज म्हणतात, "राजेंद्रा, इंद्र आपणास सोडून गेला हें अवलोकन करतांच, आपला सर्व आधार तुटला असें वाटून तक्षक अगदीं गोंधळून गेला आहे; व त्यास भीतीमुळें भयंकर मूर्छानाही आली आहे; ह्या आमच्या मंत्रसाम-

र्ध्यानें बद्ध होऊन तो निरुपायानें अग्नीच्या ज्वालांसन्निध येऊं लागला आहे पहा!"

पुनः ऋत्विज जनमेजय राजास म्हणाले, "हे राजाधिराजा, आपलें हें यज्ञकृत्य सांप्रत यथासांग चाललें आहे. यास्तव या श्रेष्ठ ब्राह्मणास जो वर द्यावयाचा असेल, तो देण्यास हरकत नाहीं." तेव्हां जनमेजय राजा आस्तीकास म्हणाला, "बटो, तुझें ज्ञान इतकें अगाध आहे कीं, त्याविषयीं आम्हांस नुसती कल्पनाही करितां येत नाहीं. तुझ्या या योग्यतेस साजेल असा वर मी देतों. यास्तव, जी प्रिय गोष्ट तुझ्या अंतःकरणांत वास करीत असेल, ती तूं या वेळीं मजपासून मागून घे. मग ती देण्यास अशक्य असली तथापि मी देईन." इतक्यांत पुनः ऋत्विज म्हणाले, "राजा, हा पहा तो तक्षक—तुझ्या ताब्यांत सांपडून त्वरित इकडे येत असून, भयविव्हल झाल्यामुळें मोठयानें फूत्कार करीत आहे! हा जो भयंकर शब्द आपणांस ऐकूं येत आहे, तो त्याचाच. त्यास इंद्रानें पूर्णपणें सोडिलें असून आमच्या मंत्रांनीं त्याचें शरीर निःसत्त्व झालें आहे; व मूर्छना येऊन ज्याची ज्ञानशक्ति नष्ट झाली आहे असा हा नागराज तक्षक उष्ण व दीर्घ निःश्वास टाकीत जवळ जवळ येत आहे!"

सौति पुढें सांगतोः—ऋषीहो, तक्षक त्या प्रज्वलित अग्नींत येऊन पडणार, इतक्यांत, आपला वर मागून घेण्याची हीच वेळ आहे असें जाणून, आस्तीक जनमेजय राजास म्हणाला, "राजा, तूं जर मला वर देण्यास सिद्ध झाला आहेस, तर मला हा वर दे—तुझें हें सर्पसत्र येथेंच थांबावें; आणि या ठिकाणीं इतउत्तर एकही सर्प अग्नींत पडूं नये. हेंच मागणें मी मागतों!"

आस्तीकाचें हें भाषण श्रवण करतांच जनमेजय राजास परम विषाद वाटून तो आस्तीकास म्हणाला, "भगवन्, सुवर्ण, रौप्य, गाई किंवा याहून दुसरें कोणतेंही जें मागाल, तें देण्यास मी सिद्ध आहें. परंतु, ब्रह्मन्, या माझ्या यज्ञास व्यत्यय आणूं नका." राजाचें हें भाषण ऐकून आस्तीक म्हणाला, "हे राजा, सुवर्ण, रौप्य, गाई वगैरे तूं देशील, परंतु तें घेऊन मला कांहीं कर्तव्य नाहीं; यास्तव मला तें नको. तुझें हें सत्र थांबलें म्हणजे, माझ्या मातृकुलाचा यांत विध्वंस होणार आहे तोही थांबेल. याकरितां मला हाच वर पाहिजे."

सौति म्हणालाः—हे भृगुनंदना शौनका, याप्रमाणें आस्तीकानें सांगितलें असतां जनमेजय राजानें त्याचें मन वळविण्याविषयीं आपल्या वाक्चातुर्याची पराकाष्ठा केली; अनेक प्रकारें स्तुति करून, कल्याण इच्छून व विनवूनही पाहिलें; पण व्यर्थ! त्या आस्तीकानें दुसरा वर मागितलाच नाहीं. तेव्हां त्या ठिकाणीं असलेल्या सर्व वेदवेत्त्या सभासदांनीं एकविचार करून आस्तीकास इच्छित वर देण्याविषयीं राजास सूचना केली.

अध्याय सत्तावन्नावा.

—:०:—

सत्रदग्ध सर्पांचीं नांवें.

शौनकांनीं प्रश्न केलाः—हे सूतनंदना, हें सर्पसत्र चाललें असतां जे जे सर्प अग्नींत येऊन पडले, त्या सर्वांचीं नांवें ऐकण्याची माझी इच्छा आहे.

सौति म्हणालाः—द्विजश्रेष्ठा, त्या वेळीं त्या अग्नींत हजारों कोट्यवधि सर्प पडले—इतके कीं, त्यांची गणती करणेंही शक्य नाहीं. तथापि त्यांतील मुख्य मुख्य सर्पांचीं नांवें मला आठवत आहेत, तीं सांगतों; श्रवण करा. मातृशापरूप दंडानें पीडित होऊन दीन व निराश्रित झालेले निळे, तांबडे, पांढरे इत्यादिक अनेक प्रकारचे, वासुकीच्या कुळांत जन्मलेले अति भयंकर सर्प त्या अग्नींत दग्ध झाले. त्यांपैकीं—कोटिश, मा-

नस, पूर्ण, शल, पाल, हलीमक, पिच्छल, कौणप चक्र, कालवेग, प्रकालन, हिरण्यबाहु, शरण, कक्षक व कालदंतक हे मुख्य मुख्य होत. यांशिवाय दुसऱ्या कुलांतील अनेक धिप्पाड व बलाढ्य. सर्पांची त्या अग्नींत आहुति पडली. तक्षकाच्या कुलापैकीं पुच्छांडक, मंडलक, पिंडसेक्ता, रभेणक, उच्छिख, शरभ, भंग, बिल्वतेजा, बिरोहण, शिली, शलकर, मूक, सुकुमार, प्रवेपन, मुद्गर, शिशुरोमा, सुरोमा व महाहनु हे मुख्यत्वें करून जळून मेले. पारावत, पारियात, पांडर, हरिण, कृश, विहग, शरभ, मेद, प्रमोद व संहतापन हे ऐरावतकुलोत्पन्न सर्प अग्नींत जाऊन पडले. त्याचप्रमाणें, नागांच्या कौरव्य नामक चौथ्या कुलांतील एरक, कुंडल, वेणी, वेणीस्कंध कुमारक, बाहुक, शृंगवेर, धूर्तक, मातर व आतक हे मुख्य सर्प अग्नींत प्रविष्ट झाले. द्विजवरा, धृतराष्ट्रकुलांतील दग्ध झालेले सर्प वायूप्रमाणें चपळ असून अत्यंत विषारी होते. त्यांतील मुख्य मुख्य सर्पांचीं नांवें सांगतों: शंकुकर्ण, पिठरक, कुठारमुख, सेचक, पूर्णांगद, पूर्णमुख, प्रहास, शकुनि, दरि, अमाहठ, कमठक, सुषेण, मानस, अव्यय, भैरव, मुंडवेदांग, पिशंग, उद्रपारक, ऋषभ, वेगवान्, नाग, पिंडारक, महाहनु, रक्तांग, सर्वसारंग, समृद्ध, पटवासक, वराहक, वीरणक, सुचित्र, चित्रवेगिक, पराशर, तरुणक, मणि, स्कंध व अरुणि.

विप्रहो, याप्रमाणें मुख्य मुख्य सर्पांचीं नांवें मीं सांगितलीं. एकंदर संख्या फारच मोठी आहे, म्हणून मीं त्या सर्वांचीं नांवें सांगितलीं नाहींत. हे जे मुख्य मुख्य प्रख्यात सर्प सांगितले, त्या सर्वांची संतति व त्यांचे पुढें झालेले नातूपणतू इत्यादि जे जे अग्नींत जाऊन पडले, त्यांची गणना करणें अशक्य होय. त्यांपैकीं कित्येकांस तीन, तर कित्येकांस सात व कित्येकांस दहा फडा होत्या; व प्रलयकालच्या अग्नीप्रमाणें त्यांचें विष कडक होतें. पर्वतशृंगाप्रमाणें उंच उंच, एकेक दोनदोन योजनें लांब, अत्यंत अवाढव्य असतांही विलक्षण चपल, आपलें रूप व बळ स्वेच्छेनुरूप पालटणारे, असे लाखों भयंकर विषारी सर्प, मातृशापामुळें त्या सर्पसत्र नामक महायज्ञांत दग्ध झाले!

अध्याय अठ्ठावन्नावा.

—:०:—

सर्पसत्रसमाप्ति.

सौति म्हणालाः—जनमेजय राजा आस्तीकास वर देऊन संतुष्ट करण्याच्या विचारांत आहे, इतक्यांत असा चमत्कार घडला कीं, इंद्रापासून भ्रष्ट होऊन तक्षक खालीं येत असतां मध्येंच आकाशांतच थांबला. त्या प्रदीप्त अग्नींत एकसारखें बिनचूक हवन होत असूनही, तो भयभीत झालेला तक्षक त्यांत येऊन पडेना, तेव्हां जनमेजय राजास मोठीच चिंता उत्पन्न झाली.

शौनक प्रश्न करितातः—सूता, इतकें करूनही अग्नींत तक्षकाची आहुति पडली नाहीं, त्या अर्थीं त्या विचारसंपन्न ब्राह्मणांचे मंत्रसमुदाय जागृतच नव्हते कीं काय?

सौति सांगतोः—हे मुनिश्रेष्ठा, अशी गोष्ट नाहीं. तक्षक न येण्याचें कारण दुसरेंच आहे: इंद्राचा आश्रय सुटून तो नागराज खालीं पडत असतां, त्यास आस्तीकानें "तिष्ठ तिष्ठ" 'थांब थांब' म्हणून त्रिवार सांगितलें. त्याबरोबर, जसा एखादा मनुष्य पृथ्वी व आकाश यांमध्यें अधांतरींच लोंबत रहावा, त्याप्रमाणें तो तक्षक अंतराळींच राहिला. असो; इकडे सर्व सभासदांनीं राजास वारंवार विनंती केल्यावरून व आपणही वचनबद्ध झाल्यामुळें, जनमेजयानें आस्तीकास इच्छित वर दिलाः तो म्हणाला, "काहीं हरकत नाहीं. आस्तीकाच्या म्हणण्याप्रमाणेंच कां होईना? ऋत्विजहो, आपलें हें सर्पसत्र इतकेंच पुरें करा.

जे सर्प इतउत्तर अवशिष्ट राहिले असतील, ते सर्व सुखी असोत, व आस्तीक मुनींस आनंद होवो. त्याचप्रमाणें, हें सर्व पूर्वींच कथन करणाऱ्या त्या सूतकुलोत्पन्न सुताराचेंही तें भविष्य खरें होवो."

राजाच्या मुखांतून हे शब्द निघतांच सर्वत्र आनंदाचे उद्गार निघूं लागले. पांडुकुलोत्पन्न जनमेजय राजानें आस्तीकास वर देऊन, परिक्षिताच्या मृत्यूबद्दल सूड उगविण्याच्या उद्देशानें आरंभिलेला तो यज्ञ येथेंच थांबविला; आणि त्याचा कोप शांत होऊन तो संतुष्ट झाला. त्या यज्ञाकरितां आलेल्या सर्व ऋत्विजांस व सदस्यांस राजानें शेंकडों, हजारों मोहोरा दक्षणा दिली; व 'एक ब्राह्मण कारणीभूत होऊन हा यज्ञ अपूर्ण राहील' असें भविष्य ज्यानें वर्तविलें होतें, त्या सूतकुलोत्पन्न लोहिताक्ष सुताराचाही त्यानें पुष्कळ द्रव्य देऊन गौरव केला. नंतर विधिविधानानुसारें द्रव्यदान, वस्त्रदान व अन्नदान केल्यावर, त्या अतुलपराक्रमी जनमेजय राजानें मोठ्या संतोषानें विधिपूर्वक अवभृथस्नान करून यज्ञ समाप्त केला. नंतर त्यानें त्या कृतकार्य झालेल्या आस्तीकाची वस्त्रभूषणें देऊन यथायोग्य संभावना केली. नंतर, 'पुढें मला अश्वमेध यज्ञ कर्तव्य आहे, त्यांत सदस्यत्वाचा स्वीकार करण्यासाठीं आपण येथें पुनः अवश्य आलें पाहिजे,' अशी विनंती करून, त्यानें त्यांस घरीं जाण्यास निरोप दिला. आस्तीक मुनिही 'ठीक आहे' असें म्हणून तेथून निघाले. आपण पतकरिलेलें अति दुर्घट काम सिद्धीस गेलें, शिवाय जनमेजय राजही कष्टी न होतां आनंदित झाला, यामुळें आस्तीकास फारच समाधान वाटलें. त्यानें प्रफुल्लित अंतःकरणानें आपली माता व मातुल यांजकडे जाऊन त्यांस नमन केलें, व सर्व वर्तमान इत्थंभूत निवेदन केलें.

ऋषीहो, आस्तीक आलेला पाहतांच सर्व नाग त्याच्या भोंवतीं जमले. ही हकीकत ऐकतांच त्यांचें सर्व दुःख नष्ट होऊन ते परमानंदांत निमग्न झाले; व आस्तीकावर प्रसन्न होऊन त्यास 'पाहिजे तो वर माग' म्हणून म्हणूं लागले. ते पुनः पुनः म्हणाले, "बाळा आस्तीका, तूं खरोखर महाविद्वान आहेस. आम्हां सर्वांस जीवदान दिल्यामुळें आम्ही तुजवर प्रसन्न झालों आहों. तर आज तुझी कोणती मनःकामना पूर्ण करून तुला आम्हीं संतोष द्यावा तें सांग."

सर्पांचें हें भाषण श्रवण करून आस्तीक म्हणालेः—मामा, हें माझें आख्यान या भूतलावरील जे प्राणी सकाळ संध्याकाळ भक्तिपुरःसर पठन करतील, त्यांस तुम्हांपासून बिलकूल बाधा होऊं नये. यावर सर्प आनंदानें म्हणाले, "आस्तीका, ही तुझी उत्कृष्ट मनीषा पूर्ण होईल. तूं केलेल्या उपकारामुळें आम्ही तुझ्या चरणीं लीन झालों आहों. तुझें हें इच्छित आम्ही मोठ्या प्रेमानें सर्व प्रकारें परिपूर्ण करूं."

[प्रसंगास अनुसरून सर्पभयनिवारक मंत्र येथें देणें उचित आहे म्हणून दिले आहेत. ते असेः—]

सर्पभयनिवारक मंत्र.

[1]असितं चार्तिमंतं च सुनीथं चापि यः स्मरेत् ।
दिवा वा यदि वा रात्रौ नास्य सर्पभयं भवेत् ।

१ अर्थ–असित मुनि, आर्तिमंत व सुनीथ यांचें जो दिवसा किंवा रात्रीं केव्हांही स्मरण करील, त्यास सर्पबाधा होणार नाहीं. सर्पहो, जरत्कारु मुनींपासून त्यांच्या जरत्कारु नामक पत्नीच्या उदरीं जन्मलेल्या महायशस्वी आस्तीकानें जनमेजय राजाच्या सर्पसत्रांतून तुम्हांस सोडविलें आहे; यास्तव, महाभागांनो, त्या आस्तीक मुनीचें स्मरण करणाऱ्या मला दंश करणें तुम्हांस उचित नव्हे. सर्पा, पलीकडे हो. तुझें कल्याण असो. वा महाविषारी सर्पा, येथून निघून जा. जनमेजय राजानें केलेल्या सर्पसत्राचे शेवटीं आस्तीकानें काय सांगितलें आहे, त्याचें स्मरण कर. आस्तीकाचें नांव ऐकूनही जो सर्प परावृत्त होत नाहीं, त्याचें मस्तक शिंशवृक्षाच्या फलाप्रमाणें शतधा विदीर्ण होतें!

यो जरत्कारुणा जातो जरत्कारौ महायशाः ॥
आस्तीकः सर्पसत्रे वः पन्नगान्योऽभ्यरक्षत ।
तं स्मरंतं महाभागा न मां हिंसितुमर्हथ ॥
सर्पापसर्प भद्रं ते गच्छ सर्प महाविष ।
जनमेजयस्य सत्रांते आस्तीकवचनं स्मर ॥
आस्तीकस्य वचः श्रुत्वा यो न सर्पो निवर्तते ।
शतधा भिद्यते मूर्ध्नि शिंशवृक्षफलं यथा ॥

सौति म्हणालाः—मुनिवर्यहो, तेथें जमलेल्या सर्व भुजगेंद्रांनीं आस्तीकास अशा प्रकारें वचन दिल्यावर त्या महात्म्यास अत्यानंद होऊन तो तेथून निघून गेला. सर्पसत्रांतून नागांची मुक्तता करण्याचें आपलें जन्मकृत्य केल्यानंतर, त्यानें आपलें उर्वरित आयुष्य धर्मचिंतनांत घालविलें; व पुत्रपौत्रादि झाल्यानंतर तो योग्य काळीं मोक्षास गेला. अशा प्रकारचें हें आस्तीकाचें आख्यान मीं जसेंच्या तसें तुम्हांस सांगितलें. याचें श्रवण व पठन केलें असतां, सर्पापासून बिलकूल भय प्राप्त होत नाहीं.

हे भृगुकुलोत्पन्ना शौनका, तुझ्या प्रमति नामक पूर्वजास त्याच्या रुरु नामक पुत्रानें विचारल्यावरून त्यानें प्रसन्न चित्तानें त्यास ही कथा जशी सांगितली, त्याचप्रमाणें, महाज्ञानी आस्तीकाचें हें चरित्र माझ्या ऐकण्यांत जसें आलें आहे, तसेंच्या तसेंच मीं तुला प्रारंभापासून सर्व कथन केलें. हे जितेंद्रिया ब्राह्मणोत्तमा, डुडुभाचें भाषण श्रवण करून सर्पसत्राविषयीं तुझ्या मनांत साश्चर्य जिज्ञासा उत्पन्न झाली होती, ती आतां हें पुण्यवृद्धि करणारें धार्मिक आख्यान श्रवण करून तृप्त झालीच असेल.



अंशावतरणपर्व.

अध्याय एकुणसाठावा.

—:०:—

भारतकथनार्थ शौनकप्रश्न.

शौनक म्हणाले:—सौते, भृगुवंशापासून जीं जीं आख्यानें सविस्तर तूं मला सांगितलींस, तीं श्रवण करून माझें अंतःकरण समाधान पावलें. आतां यापुढें, व्यास मुनींनीं ज्या ज्या कथा वर्णन केल्या असतील, त्या सर्व इत्थंभूत श्रवण करण्याची माझी इच्छा आहे; तर त्या कथा तूं सविस्तर कथन कर. तसेंच, त्या अवाढव्य सर्पसत्रामध्यें, सत्राचें नित्य कृत्य केल्यानंतर विश्रांतीच्या काळांत, त्या ठिकाणीं जमलेल्या व्यासप्रभृति महाज्ञानी सभासदांमध्यें ज्या नानाप्रकारच्या कथा निघाल्या असतील, त्याही सर्व त्यांच्या प्रसंगांसह जशाच्या तशा तुझ्या मुखांतून श्रवण करण्याची आमची इच्छा आहे. तेव्हां त्या तूं विशेष स्पष्ट करून सांग.

सौति म्हणाला:—ऋषे, त्या विश्रांतीच्या वेळीं वेदज्ञ ब्राह्मणांनीं शुनःशेपाख्यानासारख्या अनेक वेदमूलक कथा सांगितल्या. परंतु विचित्रार्थपरिप्लुत अशा ह्या अतिविस्तृत महाभारताख्यानाची योग्यता त्या वेदमूलक कथांपेक्षांही अधिक आहे हें मनांत येऊनच कीं काय, भगवान व्यास मुनींनीं वैशंपायनांकडून त्या प्रसंगीं तेंच सांगविलें.

शौनक म्हणाले:—पांडवांचें चरित्र ज्यांतसाद्यंत वर्णिलें आहे, असें तें यशस्कर महाभारताख्यान जनमेजय राजानें केव्हां विचारिलें, व वैशंपायनांनीं तें कसें सांगितलें, तें मला सांग. हे श्रेष्ठा, महर्षि व्यासांनीं योगाभ्यासानें आपल्या मनोरूप समुद्राचें मंथन केलें असतां त्यांतून उत्पन्न झालेली ही रत्नरूपी कथा सांगून तूं आमची इच्छा पूर्ण कर.

सौति म्हणाला:—फार उत्तम आहे. तें व्यासप्रणीत अत्युत्कृष्ट महाभारत मी प्रारंभापासून सर्व सांगतों; श्रवण करा. या पवित्र ठिकाणीं तुम्हांसारख्या योग्य श्रोत्यांस तें कथन करण्याची संधि मिळाल्याबद्दल मलाही फार आनंद होत आहे.

अध्याय साठावा.

—:०:—

कथानुबंध.

सौति सांगूं लागला:—हे विप्रोत्तमा, जनमेजय राजानें सर्पसत्राची दीक्षा घेतली हें श्रवण करतांच महाज्ञानी व्यास मुनि त्या ठिकाणीं गेले. यमुनाद्वीपांत शक्तिपुत्र पराशरापासून सत्यवतीच्या कन्यकावस्थेंतच तिच्या उदरीं ज्यांचा जन्म झाला, जे पांडवांचे पितामह, ज्यांनीं उत्पन्न होतांच इच्छामात्रेंकरून आपला देह वाढविला, चारी वेद, षडंगें व इतिहास यांचें सांग अध्ययन करून ज्यांनीं अपार कीर्ति संपादिली, ज्यांचें तपाचरण, अध्ययन, व्रतें, उपवास इत्यादिकांची बरोबरी कोणीही करूं शकणार नाहीं, जें इतर कोणत्याही साधनांनीं प्राप्त होण्यास अशक्य तें आत्मज्ञानही ज्यांनीं जन्मतांक्षणींच संपादिलें, ज्यांनीं वेदाचे ऋक्, यजुः साम व अथर्वण असे चार विभाग केले, जे ब्रह्माचें सोपाधिक व उपाधिरहित स्वरूप जाणणारे, जे भूत, भविष्य, व वर्तमान जाणणारे, जे सदाचारसंपन्न, ज्यांपासून पांडु, धृतराष्ट्र व विदुर यांचा जन्म झाला, शंतनूचा वंशविस्तार ज्यांच्या प्रसादानें झाला, श्रवण होतांच जिचें अनुकरण करावेंसें वाटतें अशी पवित्र ज्यांची कीर्ति, व आश्चर्यानें थक्क करून आनंदसागरांत मग्न करणारें ज्यांचें महद्यश, त्या महात्म्या व्यास मुनींनीं आपल्या वेदवेदांगपारंगत शिष्यांसहवर्तमान जनमेजय राजाच्या त्या सभेंत प्रवेश केला, तेव्हां त्या ठिकाणीं पुष्कळ सदस्य व नानादेशचे राज्याभिषिक्त भूपाळ यांनीं परि-

वेष्टित असा जनमेजय राजा, देवगणांनीं परिवृत इंद्राप्रमाणें बसला आहे असें त्यांनीं पाहिलें.

व्यास मुनि सभेंत येतांच तो भरतर्षभ जनमेजय राजा व सर्व सभासद हर्षित होऊन तात्काळ उठून उभे राहिले. त्यांनीं त्यांस सुवर्णासन बसावयास देऊन, इंद्रसभेंत बृहस्पति आला असतां तेथें त्याचा जसा सन्मान होतो, तसा सन्मान केला. देव व ऋषि ज्यांस बहुमान देतात, ते वरदायक व्यास मुनि आसनावर बसल्यानंतर, जनमेजय राजानें त्यांचें विधिपूर्वक पूजन केलें. नंतर पाद्य, अर्घ्य, आचमनीय इत्यादि समर्पण करून, त्या दानार्ह ब्रह्मतुल्य मुनींस त्यानें मधुपर्कपूर्वक एक धेनुही अर्पण केली. जनमेजय राजानें केलेल्या त्या पूजेचा व्यास मुनींनीं प्रीतिपूर्वक स्वीकार केला, व 'धेनु सर्वथा अवध्य आहे' ही गोष्ट मनांत आणून त्यांनी तीस पाहिजे तिकडे निघून जाण्यास अनुज्ञा दिली. पूजन झाल्यानंतर जनमेजयानें त्यांस साष्टांग प्रणिपात केला, व नम्रपणें त्यांच्या सन्निध बसून त्यांस कुशलप्रश्न केला. तेव्हां व्यासांनीं त्याकडे सप्रेम अवलोकन करून 'खुशाल आहों' म्हणून सांगितलें. नंतर सर्व सदस्यांनीं त्यांची पूजा केली, व उलट व्यासांनींही त्या सर्वांचा गौरव केला. यानंतर जनमेजय राजाने सर्व सदस्यांसह कर जोडून व्यासांस प्रश्न केला.

जनमेजय म्हणाला:—द्विजवरा, कौरव, पांडव इत्यादि सर्वांस आपण प्रत्यक्ष पाहिलें असल्यामुळें, त्यांच्या सर्व गोष्टी आपणांस उत्तम विदित आहेत; यास्तव त्या आपल्या मुखांतून श्रवण कराव्या अशी आमची मनीषा आहे. माझ्या प्रपितामहांचें आचरण रागद्वेषादिविकारशून्य असतांही त्यांचें व कौरवांचें वितुष्ट येऊन दैवयोगानें त्यांचीं अंतःकरणें परस्पराविषयीं कशीं कलुषित झालीं, व बहुत जीवांचा संहार करणारें तें महायुद्ध कसकसें झालें, तें सर्व आम्हांस इत्थंभूत निवेदन करा.

सौति म्हणाला:—ऋषीहो, जनमेजय राजाचें हें भाषण श्रवण करतांच, भगवान व्यास मुनींनीं आपल्या सन्निध बसलेल्या वैशंपायन नामक शिष्यास तें भारताख्यान सांगण्याविषयीं आज्ञा केली: ते म्हणाले, "वैशंपायना, कौरव व पांडव यांच्यामध्यें वैरभाव कसकसा उत्पन्न होत गेला, व त्याचा कसा परिणाम झाला, तें सर्व तूं मजपासून श्रवण केलें आहेस; तें तसेंच्या तसेंच यांस कथन कर."

मुनिवर्यहो, वैशंपायनानें ही गुरूची आज्ञा शिरसा मान्य करून, जनमेजय राजा, अन्य पार्थिव, व तेथील सर्व सभासद यांस कौरवपांडवांमधील भेद व परिणामीं झालेला भयंकर विनाश या सर्वांचें साद्यंत वर्णन सांगितलें.

अध्याय एकसष्टावा.

—:०:—

संक्षिप्त भारतकथावर्णन.

वैशंपायन म्हणतात:—राजा, एकाग्र चित्त करून श्रद्धापूर्वक मनोभावानें प्रथम व्यास सद्गुरूंस नमस्कार करून, आणि सर्व ब्राह्मण व दुसरे विद्वज्जन या सर्वांस सन्मानपूर्वक वंदन करून, ज्या महात्म्याचें नांव आज त्रैलोक्यांत गाजत आहे, त्या महाज्ञानी व्यास महर्षींचें संपूर्ण मत आपणांस मी विशद करून सांगतों. राजा, ही भारती कथा अवगत झाल्यानंतर, तुजसारख्या सत्पात्रास ती कथन करण्याविषयीं गुरुमुखांतून निघालेलें हें आज्ञावचन माझ्या मनास प्रोत्साहन देत आहे. राजेंद्रा, कौरवपांडवांमध्यें राज्यासाठीं कसें वाकडें आलें, द्यूत खेळल्यामुळें पांडवांस वनवास कसा प्राप्त झाला, व पृथ्वीतलावरील बहुतेक सर्व क्षत्रियांचा क्षय करणारें तें दारुण युद्ध कसकसें

घडलें, हें सर्व तुझ्या प्रश्नानुरूप मी कथन करितों, ऐक.

पांडु राजा मृत झाल्यानंतर ते वर्यिशाली पांडव अरण्यांतून स्वगृहीं परत आले, आणि अल्प काळांतच वेद व धनुर्विद्या यांत पारंगत झाले. पांडवांचें अलौकिक शरीरसामर्थ्य, उत्साह, चित्ताची व इंद्रियांची दृढता इत्यादि सद्गुणांमुळें ते पौरजनांस अत्यंत प्रिय झाले. तसेंच, त्यांचें वैभव व कीर्ति फार वाढली. हें पाहून कौरवांस त्यांविषयीं वैषम्य वाटूं लागलें. दुर्योधन, कर्ण, शकुनि वगैरे दुष्टांनीं त्यांचा निग्रह करण्यासाठी व त्यांस दूर करण्यासाठीं नानातऱ्हा केल्या. कलिंग पक्ष्यानें सिंहाच्या दाढेंतील मांस काढून घेण्याचा प्रयत्न करावा, तद्वत् त्या साहसी दुर्योधनानें पांडवांचें राज्य हरण करण्याच्या हेतूनें त्यांस अनेक प्रकारें त्रास दिला. त्या पाप्यानें भीमसेनास विष देण्याचेंही धाडस केलें, परंतु बहुभक्षक वृक नामक अग्नि त्याच्या उदरांत असल्यामुळें त्या बहादरानें तें विष अन्नाबरोबरच पचवून टाकलें ! तथापि त्या विषाच्या अमलानें त्यास गुंगी येऊन गाढ झोंप लागली ही संधि साधून दुर्योधनानें त्याचे हातपाय बांधून प्रमाणकोटि तीर्थावर त्यास गंगेच्या उदकांत लोटून दिलें, व तो हस्तिनापुरास परत आला. इकडे तो महाबाहु भीमसेन विषाचा अंमल उतरून सावध झाल्यावर बंधन तोडून सुखरूपपणें गंगेंतून बाहेर निघाला. पुढें एकदा तर दुर्योधनानें भीमसेन निद्रित असतां त्याच्या सर्वांगास भयंकर विषारी कृष्णसर्प डसविले; तथापि शत्रूंचा निःपात करणारा तो वीर मेला नाहींच. कौरवांनीं जे जे अपकार करावे,त्यांचा प्रतिकार करून त्यांतून पांडवांची मुक्तता करण्यास महाबुद्धिमान विदुर सदोदीत तत्पर असे. स्वर्गांत राहणारा इंद्र पर्जन्यवृष्टीनें जसा सर्व प्राण्यांस सुखावह होतो, तसा विदुरही पांडवांच्या हिताविषयीं तत्पर राहून व त्यांस सद्बोध करून त्यांस सुखावह झाला. असो; भावी कौरवक्षयादि हेतूस्तव दैवानेंच ज्यांचें रक्षण केलें, त्या पांडवांचा नाश याप्रमाणें नानाप्रकारचे गुप्त व उघड उपाय योजूनही जेव्हां करतां येईना, तेव्हां कर्णदुःशासनप्रभृति मंत्र्यांनीं विचार करून व धृतराष्ट्राचें अनुमोदन घेऊन पांडवनाशार्थ लाक्षागृह निर्माण केलें. राज्योपभोगाच्या अतितृष्णेनें व आपल्या पुत्रांचें कल्याण व्हावें या इच्छेनें त्या आंबिकासुत धृतराष्ट्र राजानें पांडवांस नगराबाहेर हांकून दिलें. ते सर्वजण हस्तिनापुरांतून बाहेर पडले, तेव्हां त्यांबरोबर महात्मा विदुरही गेला. त्यानें पांडवांस या संकटांतून सुटण्याची युक्ति सांगितली, व तीप्रमाणें ते मध्यरात्रीच्या सुमारास जतुगृह सोडून अरण्यांत शिरले, आणि तेथून वारणावतीस जाऊन ते अहितांतक पांडव मातेसह तेथेंच गुप्तपणें राहिले. धृतराष्ट्राच्या आज्ञेप्रमाणें ते जतुगृहांत राहिले असतां त्यांनीं पुरोचनापासून एक वर्षपर्यंत मोठ्या सावधगिरीनें आपलें संरक्षण केलें, आणि विदुराच्या युक्तीप्रमाणें विवर तयार झाल्यानंतर त्या लाक्षागृहास आग लावून त्यांनीं त्यांत पुरोचनासच दग्ध केलें ! ह्याप्रमाणें शत्रूचा नाश केल्यावर ते पांडव तेथून मातेसह निघून गेले. पुढें ते वनांतून प्रवास करीत असतां एका जलप्रवाहासन्निध हिडिंबासुर नामक भयंकर राक्षसाची व त्यांची गांठ पडली. पांडवांनीं तात्काळ त्यास ठार केलें; परंतु या कृत्यानें लोक आपणांस ओळखतील व तसें झाल्यास कदाचित् तें कौरवांच्याही कानावर जाईल, या भीतीनें ते तेथून रातोरात निघाले. वाटेंत भीमास हिडिंबेची प्राप्ति होऊन घटोत्कचाचा जन्म झाला. असो. हे सदाचारसंपन्न पांडव एकाचक्रा नगरींत पोहोंचल्यावर वेदाध्ययनांत तत्पर राहून ब्रह्मचर्यानें काळ घालवीत मातेसहवर्तमान तेथेंच एका ब्राह्मणाच्या घरीं राहिले त्या ठिकाणीं बकासुर नामक एक बलिष्ठ राक्षस नित्य मनुष्य भक्षण

करीत असे. एकदा त्या बुमुमु राक्षसाची व भीमसेनाची गांठ पडली असतां त्या वीराग्रणी वृकोदरानें आपल्या बाहुबलानें त्या राक्षसास क्षणार्धात ठार करून नगरवासीयांस संतुष्ट केलें. पुढें पांचाल देशांत राजकन्या द्रौपदीचें स्वयंवर व्हावयाचें आहे ही बातमी पांडवांस समजल्यामुळें ते लगेच तिकडे गेले, व त्याप्रमाणें त्यांस द्रौपदी मिळालीही. या प्रसंगीं पांडवांनीं शत्रूंचा नाश करून पराक्रम गाजविल्यामुळें, हे पांडव असें सर्वांस समजलें. पुढें एक वर्षपर्यंत तेथेंच द्रुपदगृहीं राहून नंतर ते हस्तिनापुरांत परत आले. तेथें आल्यावर धृतराष्ट्र व पितामह भीष्म यांनीं त्यांस असा उपदेश केला कीं, " बाबांनो, तुम्ही व कौरव एकत्र असलां म्हणजे तुमच्या वारंवार कलागती होतात, यास्तव तुम्ही येथें न राहतां खांडवप्रस्थांत जाऊन रहा, म्हणजे तंटा आपोआप मिटेल; अशी तोड आम्हीं विचार करून काढिली आहे, यास्तव मनांत बिलकूल मत्सर न आणतां तुम्ही तेथें रहावयास जा. तो प्रदेश अगदीं पृथक असून कांहीं कमी नाहीं. त्यांतील रस्ते विस्तृत असून त्यांत पुष्कळ देशांचा अंतर्भाव होतो. "

राजा, या त्यांच्या आज्ञेप्रमाणें पांडव आपली सर्व संपत्ति घेऊन सुहृज्जनांसहवर्तमान खांडवप्रस्थीं राहावयास गेले. आपल्या शस्त्रप्रतापानें अन्य भूपालांस वश करून ते बहुत कालपर्यंत त्या ठिकाणीं सुखानें राहिले. त्या सदाचारसंपन्न व क्षमाशील पांडवांनीं केवळ धर्मावर सर्व भिस्त ठेवून व कोणत्याही प्रकारें मदोन्मत्त न होतां जागृत राहून आपल्या शेंकडों शत्रूंस धुळीस मिळविलें. महायशस्वी भीमसेनानें पूर्व दिशा जिंकिली; अर्जुनानें उत्तरदिग्विजय केला; आणि नकुलानें पश्चिम दिशा व शत्रुवीरांतक सहदेवानें दक्षिण दिशा जिंकिली. ह्याप्रमाणें पांडवांनीं संपूर्ण पृथ्वी आपल्या स्वाधीन करून घेतली. आपल्या अद्वितीय क्षात्रतेजानें पांचही पांडव सूर्याप्रमाणें झळकूं लागले. हे सूर्योपम पांच वीर व सहावा प्रत्यक्ष सूर्यनारायण असे सहा सूर्य भूतलावर विराजमान झाले असतां पृथ्वीस अनुपम शोभा आली. सव्यसाची अर्जुन अत्यंत गुणवान व स्थिरचित्त असून धर्मराजास प्राणांपेक्षांही प्रिय होता; तथापि त्यासही त्या धर्मात्म्यानें कांहीं कारण उपस्थित झाल्यामुळें वनवासास पाठविलें. तो तेरा महिनेपर्यंत अरण्यवास केल्यानंतर द्वारावतीस जाऊन श्रीकृष्णास भेटला. त्या ठिकाणीं त्या महावीराचा कृष्णभगिनी सुभद्रा इजशीं विवाह झाला. ज्याप्रमाणें महेंद्राशीं शची किंवा श्रीकृष्णाशीं रुक्मिणी, त्याप्रमाणें ती मितभाषणी कमलनयना सुभद्रा अनुरूप अर्जुनाशीं संगत झाली. असो; सुभद्रेनें अतिप्रीतीनें अर्जुनास वरल्यानंतर तो तीसहवर्तमान खांडवप्रस्थास परत आला. त्या ठिकाणीं त्यानें खांडववन देऊन अग्नीस तृप्त केलें. अमकी गोष्ट अमुक प्रकारेंच करावयाची अशा निश्चयाचें बळ असलेल्या विष्णूस शत्रुनाश करणें म्हणजे कांहींच विशेष वाटत नाहीं, तद्वत्, श्रीकृष्ण परमात्म्याचें साह्य असल्यामुळें अर्जुनास खांडववनदाहाचें बिलकूल ओझें वाटलें नाहीं. अर्जुनाच्या या कृत्यानें संतुष्ट होऊन अग्नीनें त्यास गांडीव धनुष्य, दोन अक्षय्य भाते, व कपिध्वज रथ दिला. खांडववन दहन करीत असतां त्यांतून अर्जुनानें मयासुराची मुक्तता केली होती, त्या उपकाराची अंशतः फेड करण्याच्या हेतूनें त्यानें पांडवांकरतां एक रत्नखचित दिव्य सभागृह निर्माण केलें. दुष्टबुद्धि दुर्योधनानें अज्ञानतेमुळें परिणामावर दृष्टि न देतां त्या सभागृहाविषयीं लोभ धरला, व शकुनीच्या साह्यानें युधिष्ठिरास द्यूतांत कपटानें जिंकून बारा वर्षेपर्यंत वनवासास पाठविलें. त्याप्रमाणें वनवास करून व एक वर्षपर्यंत अज्ञातवासांत राहून चौदाव्या वर्षी पांडव प्रकट झाले, व त्यांनीं आपली संपत्ति

कौरवांजवळ परत मागितली. परंतु ती देण्याचें कौरवांनीं नाकारल्यामुळें तें भयंकर युद्ध जुंपलें. त्यामध्यें कौरवपक्षीय योद्ध्यांचा निःपात करून दुर्योधनास ठार केल्यानंतर पांडवांस तें नष्टप्राय झालेलें राज्य परत मिळालें. हे वीरश्रेष्ठा, अशा प्रकारें त्या निर्विकल्प कर्म करणाऱ्या पांडवांविषयीं कौरवांच्या मनांत भेदभाव उत्पन्न होऊन पांडवांचें राज्य गेलें, परंतु शेवटीं विजय होऊन त्यांस सर्व पुनः प्राप्त झालें !

अध्याय बासष्टावा.

—:०:—

ग्रंथवर्णन.

जनमेजय विचारतोः—हे द्विजोत्तमा, महाभारताख्यान, व त्यांतील कौरवपांडवांचें समग्र चरित्र तूं संक्षेपानें कथन केलेंस तें श्रवण करून, त्या विचित्र अर्थाच्या कथा विस्तारपूर्वक ऐकण्याची मला अत्यंत उत्सुकता उत्पन्न झाली आहे; यास्तव, हे तपोधना, हें समग्र चरित्र तूं पुनः सविस्तर कथन कर. तूं सांगितलेल्या संक्षिप्त कथाभागानें माझें समाधान न होतां, माझ्या पूर्वजांचें तें अति विस्तृत चरित्र श्रवण करण्याची जी मला इच्छा होत आहे, तीस तशींच बळवत्तर कारणें आहेत. पहा—पांडवांस धर्माधर्मविचार उत्तम अवगत असूनही त्यांनीं भीष्मद्रोणादि अवध्य मंडळीचा घात केला; आणि त्यांच्या हातून असें धर्मबाह्य कृत्य घडलें असूनही लोक त्याबद्दल त्यांची प्रशंसाच करतात ! तसेंच, पांडवांचा कांहींएक अपराध नसतां कौरवांनीं त्यांची जी इतकी गांजणूक केली, ती, प्रतिकाराचें सामर्थ्य अंगात असूनही त्या नरश्रेष्ठांनीं कशी सहन केली ? अयुत गजांचें ज्याचें बळ, त्या भुजवीर्यशाली वृकोदरास इतके क्लेश झाले असतां त्यानें आपला क्रोध आवरून तरी कसा धरिला ? पाषाणहृदयी कौरवांनीं पतिव्रता द्रौपदीची तशा प्रकारें विडंबना केली असतां त्यांस शापून भस्म करण्याचें सामर्थ्य तीस असतांही तिनें त्यांस दग्ध कां करून टाकलें नाहीं ? त्याचप्रमाणें, ते नरश्रेष्ठ भीमार्जुन व माद्रीसुत नकुलसहदेव हे, दुष्ट कौरव आपला घात करीत आहेत हें समजूनही द्यूतासक्त धर्मराजास कसे बरें अनुकूल झाले ? राजा युधिष्ठिर तरी प्रत्यक्ष यमधर्माचा पुत्र, धर्म जाणणारा व तदनुरूप वर्तन करणारांत वरिष्ठ; तेव्हां अशा त्या युधिष्ठिरानें तरी आपला कांहींएक अपराध नसतां इतके क्लेश कसे सहन केले ? गोपालकृष्ण ज्याचा सारथि, त्या पांडुपुत्र धनंजयानें बाणांचा वर्षाव करून तीं अफाट सैन्यें एकट्यानें यमसदनीं पाठविलीं तरी कशीं ? हे तपोधना, असे नानाप्रकारचे प्रश्न माझ्या मनांत उद्भवले आहेत, यास्तव हें सर्व यथातथ्य कथन करून, त्या महारथ्यांनीं ज्या ज्या स्थळीं जें जें कांहीं केलें असेल तेंही सर्व सांग.

वैशंपायन म्हणालेः—हे महाराजा, अंमळ धीर धर. त्या परमपवित्र महाभारताची ही व्यासप्रणीत अनुक्रमणिका मात्र मी सांगितली आहे. आतां पुढें, सर्व लोक ज्यांचें पूजन करतात त्या महातेजस्वी व्यास महर्षींचें संपूर्ण मत मी सांगणार आहें. या भारत ग्रंथांत त्या महाज्ञानी सत्यवतीपुत्रानें पुण्यकारक अशा एक लक्ष श्लोकांचें व्याख्यान केलें आहे. जो ज्ञानी हे श्लोक दुसऱ्यांस ऐकवील, व जे लोक ते श्रवण करतील, त्यांस ब्रह्मलोक प्राप्त होऊन ते देवतुल्य होतील. हें आख्यान प्रत्यक्ष वेदांप्रमाणें पवित्र असून फारच रमणीय आहे. श्रवण करण्यास योग्य अशा सर्व पुराणांमध्यें हें वरिष्ठ असल्यामुळें मंत्रद्रष्टे ऋषिही याची फार प्रशंसा करतात. या परमपावन इतिहासांत कामशास्त्र व अर्थशास्त्र यांचें पूर्णपणें स्पष्टीकरण केलें असून, मोक्षोचित ज्ञानही प्रतिपादन केलें आहे.

धर्माविषयीं आस्तिक्यबुद्धि धारण करणाऱ्या सत्यप्रिय दानशूर थोर ग्रहस्थांस या महर्षि कृष्णद्वैपायनप्रणीत पांचव्या वेदाचें पुराण वगैरे सांगून विद्वज्जन द्रव्यार्जन करितात. या ग्रंथाच्या श्रवणानें भ्रूणहत्येचें पातकही निःसंशय नष्ट होतें; फार काय वर्णन करावें ? हा इतिहास श्रवण करून अतिदारुण पापीही सर्व पापांपासून मुक्त होऊन, राहुमुक्त चद्राप्रमाणें सोज्ज्वळ होतो! या भारतेतिहासास ‘जय’ अशी संज्ञा आहे, यास्तव सर्व विजयेच्छूंनीं याचें अवश्य श्रवण करावें. ज्याच्या योगानें सुपुत्र उत्पन्न होतात असें हें श्रेष्ठ व उत्तम पुंसवनच होय. तसेंच, अमित कल्याण करणारें हें एक श्रेष्ठ स्वस्त्ययनच होय. भूपाळानें आपल्या पट्टराणीसहवर्तमान याचें अवश्य श्रवण करावें. तणेंकरून त्यास वीर्यशाळी पुत्र होईल. कदाचित् कन्या झालीच तर ती राज्यभागिनी तरी होईल. हें महाभारत म्हणजे एक परमपवित्र धर्मशास्त्र होय. यास सर्वश्रेष्ठ असें अर्थशास्त्रही म्हणतां येईल. अमित बुद्धिमान व्यास मुनींनीं हें एक वेदान्तशास्त्रच निर्माण केलें आहे. कित्येक विद्वज्जन सांप्रत हें कथन करीत आहेत, व दुसरे पुष्कळ लोक तें श्रवण करीत आहेत. याच्या श्रवणानें पुत्रांस मातापितरांची शुश्रूषा करण्याची इच्छा उत्पन्न होते, आणि सेवक आपल्या धन्यास कल्याणप्रद होतात. जो मनुष्य हें आख्यान श्रवण करितो, त्याचें कायिक, वाचिक व मानसिक असें सर्व प्रकारचें पाप क्षणांत नष्ट होतें. परगुणाविषयीं निर्मत्सर अशा भरतश्रेष्ठ महात्म्या पांडवाचें, व अमित द्रव्यवान असून पराक्रमी, सर्वविद्याविशारद व लोकप्रसिद्ध कृत्यें करणाऱ्या अन्य क्षत्रियाचें हें विस्तृत जन्मवृत्त श्रवण करणारास कोणत्याही प्रकारची रोगबाधा होण्याचें भय नाहीं. या जगांत जो कोणी द्रव्येच्छा मनांत न धरितां केवळ पुण्यप्राप्तीस्तव भारताख्यान शुचिर्भूत ब्राह्मणांस कथन करील, त्याचें पुण्य किती म्हणून सांगावें ? प्रत्यक्ष सनातन धर्म हा त्याचा आहे. या प्रसिद्ध कुरुवंशाचें सतत संकीर्तन करणारास पुष्कळ संतति होते, व तो लोकांत पूज्य होतो. जो ब्राह्मण व्रतस्थ राहून या भारताख्यानाचें अध्ययन करितो, तो वर्षाकालांतील फक्त चार महिन्यांच्या अवधींत सर्व पापांपासून मुक्त होतो. महाभारत पठन करणारालाच ज्ञाता असें म्हणावें, व त्यालाच वेदपारंगत समजावें. ज्यांनीं आपल्या पातकांचें क्षालन केलें आहे असे देवर्षि, राजर्षि व परमपावन ब्रह्मर्षि यांच्या कथा या महाभारतांत असून, शिवाय केशवाचेही गुणानुवाद गाइले आहेत. लोकाधिदेव भगवान शंकर व आदिमाया पार्वती यांचें चरित्र वर्णिलें असून त्यांत षट्कृतिकांपासून जन्म पावलेल्या कार्तिकेयाचें जन्मवृत्त कथन केलें आहे. ब्राह्मण व धेनु यांचें माहात्म्य ज्यांत वर्णिलें आहे असा हा महाभारत ग्रंथ म्हणजे कर्मब्रह्मपर सर्व श्रुतींचें भांडागारच होय. हा धार्मिकांनीं अवश्यमेव श्रवण करावा. जो विद्वान हा ग्रंथ ब्राह्मणांस पर्ववार ऐकवील, तो सर्व पातकांपासून निर्धूत होऊन व स्वर्गासही जिंकून शाश्वत ब्रह्मपदास जाऊन पोहोंचेल. याचा अंतिमपाद जें श्राद्धपर्व, तें श्राद्धकालीं ब्राह्मणांस ऐकविणाऱ्या मनुष्याचें तें श्राद्ध अक्षय्य होऊन पितरांत सदोदीत संतुष्ट करितें. समजून उमजून किंवा अज्ञतेनें मनुष्य जें जें पाप इंद्रियें व मन यांच्या योगानें साऱ्या दिवसांत करितो, तें सर्व या महाभारताच्या श्रवणमात्रेंकरूनच नष्ट होतें. भरताचें विस्तृत जन्मवृत्त यांत कथन केलें असल्यामुळें यास महाभारत असें म्हणतात. याचें सार जो जाणतो, त्याचें कोणतेंच पातक अवशिष्ट रहात नाहीं. भरतकुलोत्पन्न राजांचा जो अत्यद्भुत इतिहास यांत कथन केला आहे, त्याचें अनुवादन केलें असतां तो मनुष्यांस महदपराधापासूनही सोडवील. कृष्णद्वैपायन महर्षीस हा ग्रंथ करण्याची स्फूर्ति झाल्या-

नंतर त्यांनीं नित्य त्याच्या व्यासंगांत तत्पर राहून आदिपर्वापासून हें संपूर्ण महाभारत तीन वर्षांत निर्माण केलें. तो शुचिर्भूत मुनि महासमर्थ असतांही त्याची मनःकामना पूर्ण व्हावयास तीन वर्षें लागलीं, इतका प्रचंड हा ग्रंथ आहे. व्यासांनीं तपोनियमांचा अवलंब करून पवित्रपणें हा ग्रंथ रचिला आहे, यास्तव ब्राह्मणांनीं व्रतस्थ राहून याचें श्रवण करावें. कृष्णद्वैपायनप्रणीत ही पुण्यकारक सर्वोत्तम अशी भारती कथा जे साग्र पठन करतील, व जे नर ती श्रवण करतील, ते बऱ्या अथवा वाईट कोणत्याही मार्गानें वागणारे असोत, तसेंच त्यांनीं पापपुण्य केलें असो वा नसो, त्यांस त्याबद्दल शोक करावयास नको. कारण, याच्या श्रवणानेंच त्या सर्व प्रत्यवायांचा परिहार होणार आहे. आपल्या हातून धर्म घडावा अशी ज्यास इच्छा असेल, त्यानें हाच समग्र ग्रंथ श्रवण करावा. कारण, याच्या श्रवणानें, धर्माचें फल जें चित्तशुद्धि होणें वगैरे, तें प्राप्त होतें. जो पुण्यवान या अद्भुत ग्रंथाचें श्रद्धापूर्वक पठन करील, त्यास राजसूय व अश्वमेध हे यज्ञ केल्याचें पुण्य लागतें. सागर व मेरु पर्वत हे दोन रत्ननिधि म्हणून प्रसिद्ध आहेत, तद्वत् या महाभारतासही रत्ननिधि असेंच म्हणतात. हें वेदांसारखें पवित्र व उत्तम, रमणीयार्थपरिप्लुत, कर्णमधुर आणि शीलवृद्धि करणारें असून पावन आहे. ज्यानें हा ग्रंथ वाचकास अर्पण केला, त्यानें समुद्रवलयांकित सर्व पृथ्वीच दान केली. राजा, मी आतां जी हर्षप्रद दिव्य कथा सांगणार आहें, ती तूं विजयप्राप्तीस्तव व पुण्यवृद्धीस्तव संपूर्ण श्रवण कर. सदोदीत तत्पर असलेल्या कृष्णद्वैपायन मुनींस हें महाभारत रचण्यास तीन वर्षें लागलीं इतकें हें अद्भुत आहे. पहा—धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हें अवश्यसंपादनीय चतुष्टय व अधर्मानर्थदुःखसंसाररूप त्याज्य चतुष्टय यांचें या ग्रंथांत संपूर्णपणें निरूपण केलें आहे. ह्या ग्रंथांत जें सांगितलें आहे, तेंच दुसऱ्या सर्व ग्रंथांत घेतलें आहे. इतर ग्रंथांत महाभारताहून अधिक असें कांहींएक आढळावयाचें नाहीं. यास्तव, सर्व शास्त्रांच्या अर्थांचें संपूर्णपणें पर्यालोचन करण्याची ज्यास इच्छा असेल, त्यानें याच ग्रंथाचा आदर करावा.

अध्याय त्रेसष्टावा.

—:०:—

उपरिचरराजचरित.

वैशंपायन म्हणाले:—राजा, प्रजाचें रंजन करणारा उपरिचर नामक एक धर्मनिष्ठ भूपाल होता. तो सदोदीत मृगया करण्यांत निमग्न असे. त्या पूरुकुलोत्पन्न राजानें इंद्राच्या उपदेशावरून चेदि देश ग्रहण केला, तो प्रकार असा: उपरिचर राजा शस्त्राचा त्याग करून आश्रमांत उत्तम प्रकारें तपाचरण करीत राहिला असतां, इंद्रप्रभृति देव त्याजपुढें गुप्तपणें येऊन उभे राहिले. आपल्या तपोबलानें हा राजा इंद्रपदासही योग्य झाला आहे असें पाहून देवांनीं त्यापुढें आपलें प्रत्यक्ष रूप प्रकट केलें, व तपाचरणापासून त्यास निवृत्त केलें: देव म्हणाले, " उपरिचरा, सांप्रत भूमीवर नियंता असा कोणी नसल्यामुळें तेथें धर्मसंकर होण्याचा संभव आहे. तो न व्हावा म्हणून तूं पृथ्वीचें राज्य धारण कर. धर्मास तुझा पाठिंबा मिळाल्यावर तो संपूर्ण जग निश्चयानें धारण करील. "

इंद्र म्हणाला:—राजा, तूं सदोदीत तत्पर राहून पृथ्वीचें पालन कर. ह्या भूलोकीं धर्माचरण केल्यानंतर त्याच्या योगानें तुला सनातन असे पुण्यलोक प्राप्त होतील. स्वर्गांत राहणाऱ्या माझा तूंच एक या भूलोकीं राहणारा प्रियमित्र आहेस. हे नराधिपा, या पृथ्वीतलावर अतिरमणीय असा जो चेदि देश, त्यामध्यें तूं वास्तव्य कर. हा देश

पशूंस हितकर व पवित्र असून धनधान्यांनीं समृद्ध आहे. हा स्वर्गतुल्य असल्यामुळें रक्षणीय असून अगदीं सौम्य आहे. उपभोगण्यास अवश्यक असे सर्व गुण या भूमीमध्यें आहेत. सर्व प्रकारचीं द्रव्यें व रत्नें विपुल असून जमिनीच्या पोटांत पुष्कळ द्रव्यनिधि असल्यामुळें हा देश संपत्तिमान झाला आहे. यास्तव तूं या देशांत वास्तव्य कर. हे चेदिपते, येथील लोकवस्तीचीं स्थलें म्हणजे प्रत्यक्ष धर्मपदतीर्थेंच होत. त्यांत राहणारे लोकही साधु असून पूर्ण समाधानी आहेत. याचेदि देशांत एरवीं तर नाहींच, पण थट्टेमध्येंसुद्धां कधीं असत्य भाषण आढळावयाचें नाहीं. पुत्र हे वडिलांपासून विभक्त न होतां सदोदीत त्यांच्या सेवेस सादर राहतात. यांतील जमीन इतकी सुपीक आहे कीं, ती नांगरण्याची जरूर पडत नसल्यामुळें बैलांच्या मानेवर जोकड ठेवण्याचा प्रसंगच येत नाहीं. बरें, जमिनीची मशागत न करतांही इतकें धान्य पिकतें कीं, दीन, अनाथ लोकही येथें आले असतां पुष्ट होतात. हे मानधना, या चेदि देशांतील सर्व वर्णांचे लोक आपापल्या विशिष्ट धर्माप्रमाणेंच नित्य आचरण करतात. राजा, तुला सर्व विदित आहेच. आत्मज्ञानानें तुला न कळलेलें असें या त्रैलोक्यांत कांहींही नाहीं. देवांनीं उपभोग घेण्यास योग्य अशा प्रकारचें एक आकाशांत गमन करणारें स्फटिकमय दिव्य विशाल विमान माझ्या प्रसादानें तुला प्राप्त होईल. भूलोकवासी सर्व लोकांत तूं एकटाच या श्रेष्ठ विमानांत बसून उंच आकाशांत भ्रमण करीत असतां युद्धास निघालेल्या एखाद्या देवाप्रमाणें शोभशील. शिवाय, जींतील कमलें कधींच कोमेजत नाहींत अशी ही वैजयंती माला मी तुला अर्पण करितों. हिचा असा प्रभाव आहे कीं, युद्धप्रसंगीं ही माला गळ्यांत असली म्हणजे तुला शस्त्रांचे व्रण होण्याची भीति नाहीं. हे राजा! 'इन्द्रमाला' नामक ही दैवी माला तुझें एक मोठें अद्वितीय असें इहलोकचें धन्यवाद देणारें भूषणच होईल.

नंतर इंद्रानें या राजाला आपल्या प्रेमाची खूण म्हणून साधूंचे प्रतिपालनार्थ एक वेळूची काठी दिली. असो; इंद्राचे उपकार स्मरून राजानेंही तो संवत्सर संपण्याच्या दिवशीं ती काठी थोडी जमिनींत पुरून ठेविली. ही चाल अद्यापिही राजे लोकांत सुरू आहे. नंतर नवीन वर्षाच्या प्रथम दिवशीं (वर्षप्रतिपदेला) त्या काठीला वस्त्रभूषणें, गंधपुष्पें इत्यादिकांनीं अलंकृत करून उंच उभारितात आणि वसुराजाप्रीत्यर्थ धारण केलेल्या हंसरूपी ईश्वराची या यष्टिद्वारा विधिपूर्वक मोठ्या आदरानें पूजा करितात. आपला हा असा उत्सव त्या वसुराजानें प्रचलित केलेला पाहून त्या चक्रवर्ती नृपावर इंद्राचा अनुग्रह होऊन त्यानें असा वर दिला कीं, "जे नृप व जे लोक चेदिराजाप्रमाणें माझा उत्सव व पूजा करितील, त्यांचा सदैव विजय होत जाऊन त्यांच्या राज्यांत अखंड लक्ष्मी वास करील, व त्यांच्या प्रजाजनांचेंही कल्याण होऊन ते नेहमीं संतुष्ट राहतील." याप्रमाणें त्या उदार महेंद्रानें चेदिमहाराजाचा उत्तम सत्कार केला; असो.

या वसु महाराजाप्रमाणेंच जे जे लोक इंद्राचा प्रतिवार्षिक उत्सव करून भूमिदान किंवा रत्नदान करितील, तेही वसूप्रमाणेंच पूज्य होतील. असो; याप्रमाणें इंद्राचा आवडता झालेल्या त्या चेदिराजानें पृथ्वीचें पालन धर्मतत्त्वानुसार केलें. हा राजा इंद्राचा उत्सव प्रतिवर्षीं करी. याला महाशूर व महापराक्रमी असे पांच पुत्र होते. बृहद्रथ, प्रत्यग्रह, कुशांब (मणिवाहन) मावेल्ल व यदु हीं त्यांचीं नांवें होत. या आपल्या पुत्रांस त्यानें निरनिराळ्या देशांचीं राज्यें देऊन त्यांस अभिषिक्त केलें. तेही मोठे पराक्रमी निघाले. त्यांनीं आपलीं नांवें त्या त्या राष्ट्रांस व नगरांस देऊन आपलें नांव चिरस्थायी

केऊं ' यांचे निरनिराळे शाश्वत असे पांच वंश झाले हें सांगावयास नकोच. इकडे वसु राजा हा इंद्रदत्त स्फटिकविमानांत राहून आकाशांत संचार करीत असतां तेथें गंधर्वादिकांनीं उत्तम प्रकारें त्या महाराजाची सेवा केली. राजा नेहमी आकाशातच राही, म्हणून त्याचें ' उपरिचर ' असें नांव प्रसिद्ध झालें.

एकदा असा चमत्कार झाला कीं, आपल्या नगरीजवळूनच वाहणाऱ्या शुक्तिमति नामक नदीला कोलाहल नांवाच्या पर्वतानें कामवासनापूर्वक अडविलें आहे, हें पाहून वसु राजानें त्या पर्वताला लाथ मारून एक विवर पाडिलें, व नदीप्रवाहाचा मार्ग मोकळा केला. पण त्या पर्वतसंगतीनें नदीला एक मुलगा व एक मुलगी असें जुळें झालें होतें. तें जुळें त्या कृतज्ञ नदीनें प्रसन्न होऊन राजाला दिलें. राजानें मुलाला आपलें सैनापत्य दिलें, आणि मुलीचें आपण स्वतः पाणिग्रहण केलें. या नूतन स्त्रीचें नांव गिरिका. ही लवकरच ऋतुस्नात झाली. नंतर, शुद्धस्नान करून शुचिर्भूत झालेल्या त्या नवीन भार्येला ऋतुदान द्यावयाचें त्या दिवशींच, त्या महाराजावर प्रेम करणाऱ्या पितरांनीं ' मृगयेस जा ' अशी त्या धार्मिक राजाला आज्ञा केली. राजा मृगयेस गेला, पण अतिसुंदर गिरिकेचें स्मरण त्यास वारंवार होत होतें. तो मृगया करून एका रमणीय वनांत शिरून पाहतो, तों तेथें अनेक प्रकारचे सुगंधि वृक्ष पुष्पफलांनीं ओथंबलेले आहेत, कोकिलरवानें व भ्रमरांच्या गुंजारवानें त्या वनांत अश्रुतपूर्व मधुर स्वर निघत आहे, वसंत ऋतु आहे, पण आपली नूतन भार्या गिरिका नाहीं असें त्यानें पाहिलें. अशल्या कामपोषक रमणीय वनांत आपली भार्या नाहीं, हें मनांत येऊन त्याचा कामसंताप अत्यंतच वाढला, आणि फिरण्यानें समाधान होत नाहीं हें पाहून तो संतापव्याकुळ वसु राजा संतापशमनाप्रीत्यर्थ पर्णपुष्पफलयुक्त अशा रमणीय अशोक वृक्षाखालीं बसला. इतक्यांत तो रम्य देखावा, सुगंध, वसंत ऋतु इत्यादि मादक वस्तूंनीं कामोन्मत्त झालेल्या त्या राजाचें रेतस्खलन झालें! तेव्हां आपलें अमोघ रेत व्यर्थ जाऊं नये म्हणून त्यानें तें एका वृक्षपत्रांत (द्रोणांत) धरून ठेविलें, व हें उपयोगीं रेत आपलें मार्गप्रतीक्षण करणाऱ्या ऋतुस्नात भार्येस शुभ मुहूर्तावर कसें मिळेल याचा तो विचार करूं लागला, इतक्यांत त्याच्या दृष्टीस एक श्येन पक्षी पडला. हा लवकर चालणारा पक्षी आपलें कार्य करील असें वाटून तो धर्मरहस्य जाणणारा राजा श्येनाजवळ गेला, आणि ' हें अभिमंत्रित रेत माझ्या प्रिय भार्येला लवकर नेऊन दे ' अशी त्यानें प्रार्थना केली. ती विनंती मान्य करून तो श्येन जोरानें उडून कांहीं मार्गक्रमण करीत आहे तों त्याच्यावर दुसऱ्या एका बुभुक्षु श्येनानें झडप घातली. तेव्हां अर्थातच त्या उभयतांचें आकाशांत मोठें कडाक्याचें तुंड युद्ध झालें; त्यांत त्या रेतवाहक श्येनाच्या पायांतून रेतपूर्ण द्रोण यमुना नदींत पडला !

राजा, या यमुना नदींत अद्रिका नांवाची अप्सरा ब्रह्मशापानें मत्स्यी होऊन पडली होती. तिनें तो द्रोण घेऊन त्यांतील वीर्य भक्षिलें ! पुढें त्या मत्स्यीला दहाव्या महिन्यांत धीवरांनीं धरून फाडिलें. तेव्हां तिच्या उदरांतून एक मुलगा व मुलगी अशीं दोन मुलें बाहेर आलीं. हा चमत्कार धीवरांनीं राजास सांगितला, व तीं बालकें त्याच्यापुढें ठेविलीं. उपरिचर राजानें मुलाचें नांव मत्स्य असें ठेवून त्याचा स्वीकार केला. हा मुलगा पुढें धर्मयुद्ध करणारा झाला. इकडे ती अद्रिका मत्स्यी, ' दोन मानवांस जन्म दिल्याबरोबर तूं मुक्त होशील ' या उश्शापाच्या आधारानें मुक्त होऊन स्वर्गधामाला गेली. त्या मुलांपैकीं मुलगी होती ती एका नाविकाला अर्पण करून ' स्वकन्येप्रमाणें इचें पालन कर ' असें राजानें

त्या नाविकाला सांगितलें. ही मुलगी रूप, बळ, तेज इत्यादिकांनीं व स्त्रीजातीला शोभा देणाऱ्या सर्व गुणांनीं युक्त अशी होती. इचें नांव सत्यवती. ह्या मुलीला मासे धरणाऱ्या कोळ्यांची संगति असल्याकारणानें तिच्या अंगाला माशांची घाण येत असे. ही सत्यवती आपल्या मानींव पित्याच्या कामाला हातभार लावून नावही चालवीत असे.

व्यासादिकांची उत्पत्ति.

राजा, पुढें एके दिवशीं, तीर्थयात्रेसाठीं पर्यटन करणारे भगवान पराशर महर्षि त्या नदीवर येऊन नावेंत बसले, तेव्हां या अतिलावण्ययुक्त व सिद्धांना सुद्धां मोह पाडणाऱ्या सत्यवतीचें अनुपम सौंदर्य पाहून कामवश झाले, आणि 'मला रतिदान दे' असें म्हणाले. तेव्हां सत्यवती म्हणाली, "भगवन्! चोहींकडे ऋषि बसले आहेत, तेव्हां यांच्या समक्ष आपला व माझा समागम कसा होऊं शकेल?" सत्यवतीचें हें भाषण ऐकून, त्या कामप्रेरित महर्षींनीं स्वप्रभावानें गाढ धुकें उत्पन्न करून दिवसाढवळ्याच सर्वत्र घनदाट अंधकार पसरविला! हा चमत्कार पाहून ती मुलगी सलज्ज होत्साती पराशरास म्हणाली, "मी बापाच्या आज्ञेंत चालणारी कन्या आहें. आपल्याशीं संग केला तर माझा कन्याभाव दूषित होईल. महाराज! पुढें हें काळें तोंड घेऊन मी जगूं तरी कशी? अशा स्थितींत मला घरीं जातां येत नाहीं, व पाप होईल या भीतीनें मला येथें रहातांही येत नाहीं."

त्या कन्येचें हें अर्थपूर्ण भाषण ऐकून पराशर ऋषि प्रसन्न झाले व म्हणाले, "माझी कामशांति केलीस तरी तुझा कन्याभाव दूषित होणार नाहीं, समजलीस? आणखीही तुला कांहीं अभीष्ट वर मागावयाचा असेल तर माग. माझी वाणी किंवा माझा वर केव्हांही मिथ्या होणार नाहीं." तेव्हां सत्यवतीनें वर मागितला कीं, 'माझ्या सर्व अंगाला सुगंध यावा.' ऋषींनीं 'तथास्तु' असा आशीर्वाद दिला. पुढें त्यांचा समागम प्रीतिपुरःसर झाला. या वरप्राप्तीच्या दिवसापासून सत्यवतीला 'गंधवती' असें म्हणूं लागले, व एक योजनपर्यंत तिच्या अंगाचा सुवास जात असे म्हणून तिला 'योजनगंधा' असेंही म्हणूं लागले. पराशर ऋषीपासून तिला गर्भप्राप्ति झाली व पुढें पुत्र झाला. तोच महातेजस्वी श्रीव्यास होय. यमुनाद्वीपांत जन्म झाला म्हणून ह्याला 'द्वैपायन' असें नांव मिळालें; व कृत, त्रेता, द्वापर आणि कलि या युगांत अनुक्रमानें धर्माचा ऱ्हास होत जाणार, त्याच्या चार पायांपैकीं एकएक पाय अनुक्रमानें नष्ट होणार; तसेंच मनुष्यांची शक्ति व त्यांचें आयुष्य हीं युगानुसार कमी होणार; हें पाहून, आणि ब्रह्म व ब्राह्मण यांचें संरक्षण झालें पाहिजे, असें मनांत आणून, श्रीमद्द्वैपायनांनीं वेदांचा शाखाभेदानें विस्तार केला व एकंदरीनें वेदाभ्यास सुलभ केला, म्हणून त्यांस 'व्यास'[1] ही संज्ञा मिळाली. असो; 'माझें स्मरण करशील तेव्हां तुला दर्शन देईन' असा मातेस वर देऊन हे व्यास ऋषि तपश्चर्येसाठीं निघून गेले. श्रीव्यासांनीं भारतासकट पांच वेद सुमंतु, जैमिनि, पैल, वैशंपायन हे शिष्य व शुकाचार्य आपला मुलगा, या सर्वांस पढविले. पुढें, भारताला आधारभूत जे चार वेद, त्यांच्या संहिता, मंत्र व ब्राह्मण हीं पूर्वोक्त शिष्यांनीं निरनिराळ्या स्वरूपांनीं प्रकट केलीं.

राजा, व्यासांप्रमाणेंच श्रीगंगेच्या उदरीं शंतनूपासून महापराक्रमी व शुद्ध कीर्तीचे भीष्माचार्य उत्पन्न झाले. ते अष्टवसूंच्या अंशापासून झाले. तसाच विदुरही यमधर्माच्या अंशापासून जन्मला. त्याचें कथानक असें:—

वेदार्थ जाणणारे महाप्रसिद्ध व महायोग्य अणीमांडव्य महर्षि यांच्यावर एकदा चोरीचा

१ विव्यास वेदान् यस्मात्स तस्माद्व्यास इति स्मृतः।

आळ येऊन त्यांत त्यांस सुळावर चढविण्याची शिक्षा झाली ! पुढें यमधर्मास त्यांनीं बोलावून आणून विचारिलें कीं, " यमधर्मा ! मीं बाळपणीं एका कीटकाला नुसत्या काटकीनें टोंचिलें होतें, ह्या पातकाशिवाय माझ्या हातून कोणतेंही पातक झालेलें मला आठवत नाहीं. पुन: तें क्षुल्लक पातक माझ्या उग्र तपश्चर्येनें सहजच जळून भस्म झालें असेल. तेव्हां या एवढयाशा दग्ध झालेल्या पातकासाठीं मला तूं ही उग्र शिक्षा दिलीस, व ब्राह्मणवधाचें महापातक केलेंस, यासाठीं तुला शूद्र योनींत जन्म घ्यावा लागेल." या शापामुळें यमधर्माला शूद्र योनींत जन्म घेणें भाग पडलें. हा शूद्र म्हणजे महापुण्यशाली व महाज्ञाता विदुर होय. गवल्गणापासून ऋषितुल्य संजय सारथिकुळांत जन्म पावला. कुंती कन्यास्थितींत असतांनाच सूर्यापासून तिला महाबळी आणि जन्मापासूनच कवचकुंडलें धारण करणारा सतेज कर्ण झाला. सर्व लोकांवर अनुग्रह करणारा, दिव्य, देदीप्यमान, सर्ववंद्य व महायशस्वी श्रीकृष्ण भगवान वसुदेवापासून देवकीच्या उदरीं धर्मसंस्थापनेप्रीत्यर्थ अवतीर्ण झाला. तो प्रभु जन्ममरणातीत असून या जगाच्या उत्पत्तिस्थितिलयांचा कर्ता, व स्वत:सिद्ध प्रकाशमान आहे. त्यानें केवळ जगताच्या कल्याणासाठीं यादवकुळांत अवतार घेतला. राजा, जें अव्यक्त, अक्षर, त्रिगुणात्मक व अव्यय ब्रह्म जगताच्या उत्पत्तीला कारण व आधिष्ठान, पुराणपुरुष, पंचमहाभूतात्मक विश्व हें ज्याचें कर्म आहे, ज्याची प्राप्ति केवळ सत्त्वगुणानेंच होते, प्रणव नामक वर्ण हेंच ज्याचें व्यक्त स्वरूप असून जें अनंत, अचल, शुद्ध चैतन्यस्वरूपी असें आहे, तेंच परब्रह्म धर्मसंरक्षणाकरितां वृष्णिकुळांत अवतीर्ण झालें !

असो; अंधकवृष्णिकुळांत सर्व शास्त्रास्त्रज्ञानांत व सर्व शास्त्रज्ञानांत परिपूर्ण आणि महावीर्यशाली अशा बळराम व श्रीकृष्ण यांनीं धर्मरक्षणासाठीं अवतार घेतले. सत्यक व हृदीक यांच्या उदरीं सात्यकि व कृतवर्मा हे झाले. हे नारायणाचे अनुयायी व अस्त्रशास्त्रज्ञ होते. उग्र तपश्चर्या करणारे महर्षि भरद्वाज़ यांचें रेत एका पर्वतदरीमध्यें स्खलित झालें, त्यापासून द्रोणाचार्य, व गौतमाच्या स्खलित रेतापासून कृपाचार्य व अश्वत्थाम्याची मातु:श्री कृपी हें मिथुन झालें. बळवंत अश्वत्थामा हा द्रोण व कृपी यांचा पुत्र होय. यज्ञांतील प्रज्वलित अग्नीपासून तेजस्वी धृष्टद्युम्न द्रोणवधासाठीं अमोघ धनुष्यबाण घेऊन जन्मास आला. अत्युत्तम रूप धारण करून सर्व जगास स्वतेजानें प्रकाशित करणारी कृष्णा (द्रौपदी) ह्या यज्ञांतूनच निर्माण झाली. प्रऱ्हादाचा शिष्य नग्नजित् हा सुबल नामक गांधार राजाचा पिता होय. या सुबल राजाचीं मुलें देवकोपामुळें धर्मविघातक झालीं. सुबलाचा मुलगा शकुनि व मुलगी गांधारी होय. शकुनि हा महास्वार्थी असून, दुर्योधनाची मातु:श्रीही दुर्योधन महास्वार्थी म्हणून महास्वार्थी होती. विचित्रवीर्याच्या क्षेत्रामध्यें राजा धृतराष्ट्र व राजा पांडु हीं अपत्यें कृष्णद्वैपायन व्यासांपासून झालीं. धर्म आणि अर्थ उत्तम रीतीनें जाणणारा महाविवेकी व महाबुद्धिमान असा विदुर हाही त्याच क्षेत्रामध्यें द्वैपायनांपासून झाला. पांडु राजास दोन स्त्रियांपासून देवांसारखे तेजस्वी असे पांच पुत्र झाले. त्यांत युधिष्ठिर हा वयानें व गुणांनीं सर्वांहून श्रेष्ठ होता. हा यमधर्मापासून झाला. वायूपासून भीम आणि इंद्रापासून सर्व शस्त्रधाऱ्यांमध्यें श्रेष्ठ व श्रीमान असा अर्जुन झाला. हे तिघेही कुंतीचे पुत्र होत. गुरुसेवेमध्यें निष्णात असे रूपसुंदर नकुलसहदेव हे अश्विनीकुमारांपासून माद्रीला झाले. गांधारीपासून दुर्योधनप्रभृति शंभर पुत्र व वैश्यस्त्रियेपासून युयुत्सु असे एकशें एक पुत्र श्रीमान धृतराष्ट्राला झाले. राजा, ह्यांपैकीं दुःशासन, दुःसह, दुर्मषण, विकर्ण,

चित्रसेन, विविंशति, जय, सत्यव्रत, पुरुमित्र आणि वैश्यापुत्र युयुत्सु हे महारथी होते. अभिमन्यु हा सुभद्रा व अर्जुन यांचा मुलगा, श्रीकृष्णाचा भाचा, आणि पांडूचा नातू होय. द्रौपदीलाही युधिष्ठिरापासून प्रातिविंध्य, भीमापासून सुतसोम, अर्जुनापासून श्रुतकीर्ति, नकुलापासून शतानीक व सहदेवापासून प्रतापी श्रुतसेन हे पांच पुत्र रूपसंपन्न आणि सर्वशस्त्रास्त्रपंडित असे झाले होते. हिडिंबेपासून भीमाला घटोत्कच वनामध्यें झाला. शिखंडी हा द्रुपदपुत्र प्रथम स्त्री होता; पुढें त्या मुलीचें प्रिय करावें या इच्छेनें स्थूण नामक यक्षानें तिला पुरुषत्व दिलें. कौरवपांडवांच्या युद्धामध्यें आणखी लाखों राजे विद्यमान होते. त्या सर्वांचीं नांवें सांगण्याला सुद्धां हजारों वर्षे पुरणार नाहींत. तेव्हां, ज्यांचीं चरित्रें येथें विस्तारानें येणार आहेत, व ज्यांच्या चरित्रामुळेंच हा ग्रंथ एवढा मोठा झाला आहे, ते मुख्य पुरुष मात्र येथें निर्दिष्ट केले आहेत.

अध्याय चौसष्टावा.

—:०:—

अवतारनिश्चय.

जनमेजय विचारतोः—ब्रह्मन्! आपण ज्या हजारों पुरुषांचें हें नामसंकीर्तन केलें, त्या सर्वांच्या कथा व त्यांच्या अवतारांचीं कारणें सविस्तर ऐकावीं अशी इच्छा आहे. तेव्हां या देवतुल्य महारथांच्या कथा मला विस्तरतः सांगण्याची कृपा करावी.

वैशंपायन म्हणालेः—राजा! हें सर्व देवांचें रहस्य आहे, असें ऐकितों; तथापि स्वयंभू ब्रह्मदेवाला नमस्कार करून तुला मी सर्व वृत्तांत सांगतों ऐकः परशुरामांनीं एकवीस वेळ निःक्षत्रिय पृथ्वी केल्यानंतर ते महेंद्र पर्वतावर तपश्चर्या करण्यासाठीं गेले. नंतर, पुढें अनेक क्षत्रियस्त्रिया पुत्रप्राप्त्यर्थ पुण्यशील ब्राह्मणांशीं वंशसंरक्षणासाठीं ऋतुकालीं मात्र संगत झाल्या. पुढें गर्भ राहून त्या स्त्रिया प्रसूत झाल्या, व जास्त बलवंत क्षत्रियपुत्र व सुस्वरूप कन्या हीं निर्माण झालीं. सारांश, अर्वाचीन क्षत्रिय स्त्रीपुरुषें ब्रह्मबीजापासून झालेलीं आहेत. हा क्षत्रिय वर्ण धर्माचरणानें वृद्धिंगत होऊन दीर्घायुषी झाला. ह्या चारही वर्णांतील नरनारी व पशुपक्ष्यांतील नरमाद्या सदैव ऋतुकालीं मात्र संगत होत. यामुळें प्रजा दीर्घायुषी होत असे. याप्रमाणें धर्मव्रतानें चालणारी सर्व प्रजा आधिव्याधींच्या शारीरिक व मानसिक त्रासापासून मुक्त झाली होती. असो; अशा प्रकारें समुद्रवलयांकित व पर्वत, वनें व नगरें यांनीं भूषित झालेली ही भूमि पुनः धर्मशील क्षत्रियांच्या हस्तगत झाली. या वेळीं ब्राह्मणादि वर्णांस उत्तम सुख झालें. राजे लोक कामक्रोधादिजन्य दोषांचा त्याग करून न्यायमनसुबे करीत, व अपराध्यांस योग्य शिक्षा करीत. येथें धर्माचरण उत्तम आहे, असें पाहून इंद्रही वेळच्या वेळीं व योग्य स्थळीं पर्जन्याची योजना करी. या युगांत मुलें मरत नसत, व यौवनावस्थेपूर्वीं स्त्रीसंग होत नसे. मनुष्यांस अपमृत्यु येत नसत, म्हणून सर्वत्र लोकवस्ती भरपूर झाली. क्षत्रिय राजे महायज्ञ करून पुष्कळ दक्षिणा देत. ब्राह्मण हे सांग व उपनिषदांसह वेदाध्ययन करीत. ते ज्ञानाचा क्रयविक्रय करीत नसत, व शूद्रांजवळ (अनार्यांसन्निध) वेदोच्चार करीत नसत. वैश्य लोक बैल घेऊन शेतकीचीं कामें करीत, पण अशक्त बैलांकडून काम घेत नसत; इतकेंच नव्हे, तर त्यांस धष्टपुष्ट करीत. अंगावर वासरें पीत आहेत तोंपर्यंत गाईंचें दूध काढीत नसत. तसेंच, हे लोक खोटीं वजनें घेऊन क्रयविक्रय करीत असत. सारांश, आर्यलोकांच्या तीन वर्गांचे लोक धर्मनिष्ठ असून धर्मदृष्टीनें आपआपलें कर्तव्य करीत; म्हणून धर्माची स्थिति पूर्णत्वाची होती. गाई व स्त्रिया योग्य कालीं प्रसूत होत व ऋतुकालीं वृक्षही पुष्पफलयुक्त होत. ही कृतयुगाची स्थिति होय.

राजा, धर्म जिवंत असला म्हणजे पृथ्वीवर सर्व जीवांची भरभराटच असते. पण पुढें लवकरच उतरता पाया लागला. संततिसंपत्तीचा उन्माद प्रकट होऊन कित्येक क्षत्रिय राजांच्या वंशांत राक्षसी पुरुष उत्पन्न झाले. स्वर्गलोकी देवदैत्यांचें युद्ध झालें, त्यांत पराभूत झालेले असुर पदच्युत झाले व येथें जन्मास आले. या असुरांस, मानवलोकीं तरी देवत्व (श्रेष्ठत्व) मिळावें अशी इच्छा उत्पन्न होऊन, त्यांनीं अनेक योनींमध्यें म्हणजे गाई, घोडे, खेचर, उट, म्हशी, मांस खाणारे लांडगे, खोकड, कोल्हे, वाघ, सिंह, तसेच हत्ती व इतर मृग यांमध्यें जन्म घेतले. याप्रमाणें हजारों राक्षस पृथ्वीवर जन्म पावल्यामुळें व जन्म पावत असल्यामुळें, आपल्या या गरीब धरित्री मातेला अत्यंत भार होऊन तो तिचा तिलाच सहन होईनासा झाला. कारण, यांपैकीं कांहीं असुर (दितीचे दैत्य व दनूचे दानव) अत्यंत मदोन्मत्त असे राजे झाले. ते महाशूर, मोठे अभिमानी व शत्रूचा पराभव करणारे असे असून अनेक वेष घेऊन सर्व समुद्रवलयांकित पृथ्वीवर धुमाकूळ माजवूं लागले. त्यांनीं ब्राह्मणादि चारही वर्णांस व इतर प्राणिमात्रांस सतावून सोडिलें; इतकेंच नव्हे, तर या सर्वांस अनेक प्रकारानें त्रास देऊन ते ठार मारूं लागले. यांच्या धांगडधिंग्यानें कोठेंही सुरक्षित जागा राहिली नाहीं! विद्याविद्वेषी, मदोन्मत्त, महाबलिष्ठ व भगीरथ प्रयत्नाचे कष्ट भोक्ते अशा या राक्षसांनीं ऋषींचे आश्रम सुद्धां दूषित केले, म्हणून, व शेषादि नागांस ही पृथ्वी धरण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं म्हणून भयभीत झालेली पृथ्वी माता ही सर्वभूतपिता मह ब्रह्मदेवास शरण गेली. तिच्याबरोबर देव, द्विज व ऋषि होते. या सर्वांस–सृष्टिकर्ता, अव्यय व देवकार्यतत्पर जे गंधर्वादिक त्यांनीं आनंदानें वंदिलेला असा ब्रह्मदेव दृष्टीस पडला. पृथ्वीनें ब्रह्मदेवास नमस्कार केला, आणि शरण जाऊन सर्व लोकपालांसमक्ष प्रभूची प्रार्थना केली. पण त्या स्वयंभू परमेष्ठी व मायापति ब्रह्मदेवाला, पृथ्वी काय प्रार्थना करणार आहे हें पूर्वींच कळून चुकलें होतें. खरेंच आहे! सर्व जगतास उत्पन्न करणाऱ्या ब्रह्मदेवाला देवदानवादि सर्व प्राणिमात्रांचे मनोगत कळलें तर त्यांत नवल तें काय? सर्वांचे अभिप्राय त्याला कळावयाचेच. कारण तो सर्वांचें उत्पत्तिस्थान, स्वामी व कल्याणकर्ता आहे. असो.

पृथ्वीचें मनोगत जाणून ब्रह्मदेव म्हणाले:— बाई! ज्या कारणासाठीं तूं मला शरण आलीस, तें कारण मनांत आणूनच मी सर्व देवांस आज्ञा करितों. तूं जा.

नंतर ब्रह्मदेवानें सर्व देवांस स्वतः सांगितलें कीं, "भूमीचा भार हरण करण्याकरितां व भारभूतक राक्षसांचा नाश करण्याकरितां, तुम्ही सर्वजण आपआपल्या पृथक् अंशांनीं पृथ्वीवर अवतीर्ण व्हा." त्याचप्रमाणें, गंधर्वादि इतर गण होते त्यांसही सांगितलें कीं, "मनुष्य किंवा इतर योनींत स्वांशानें जन्म घेऊन देवब्राह्मणांचें कार्य व पृथ्वीचा उद्धार करा." त्या सुरश्रेष्ठाचें हें तथ्य, अर्थकर व पथ्यकर असें भाषण इंद्रादि देवांस उत्तम मानवलें, व 'आपापल्या अंशांनीं पृथ्वीवर जन्म घ्यावयाचा,' असा कृतनिश्चय करून, शत्रुविघातक जो नारायण त्याचें दर्शन घेऊन त्यांसही विनंति करण्यासाठीं ते सर्व वैकुंठास गेले. तेव्हां त्यांस चक्रगदाधारी, पीतांबरभूषित, मेघश्याम, पद्मनाभ, असुरमर्दन, दयाघन, देवाधिदेव, ब्रह्मदेवपिता, महाबली, श्रीवत्सांकित, हृषीकेश, सर्वदेवदैवतवंद्य आणि सकलसात्त्विकगुणमंडित जो श्रीभगवान परमेश्वर विष्णु, त्याचें दर्शन झालें. दर्शनानंतर, 'पृथ्वीचा भार हरण करून तिला शुद्ध करावयाची आहे, तेव्हां भगवंतांनीं अवतार घेणें इष्ट आहे,' अशी इंद्रानें प्रभूची प्रार्थना केली; व प्रभूंनींही त्याला 'तथास्तु' असा सार्थ आशीर्वाद दिला!

संभवपर्व.

अध्याय पासष्टावा.

—:०:—

अदित्यादिवंशकथन.

वैशंपायन सांगतातः—तदनंतर वैकुंठसभेंत श्रीनारायणाचे साक्षित्वानें, कोणीं कोणीं कसे अवतार घ्यावयाचे, ह्याविषयीं देवांनीं निश्चय केला; आणि प्रत्येक देवतेस तिचा कार्यभाग स्पष्टपणानें सांगून देवपति इंद्र हा वैकुंठलोकांतून आपल्या लोकास गेला. नंतर असुरनाश व लोककल्याण करण्यासाठीं कोणी ब्रह्मर्षिकुळांत व कोणी राजर्षिकुळांत असे आपल्या इच्छेप्रमाणें सर्व देव स्वांशानें पृथ्वीवर अवतीर्ण झाले; आणि त्यांनी दानव, राक्षस, गंधर्व, सर्प व इतर मानवभक्षक प्राणी यांचें निर्दालन केलें. राजा, हे अवतीर्ण झालेले देव बाल्यावस्थेंत असतांनाच राक्षसांच्या हातून का मेले नाहीत, अशी शंका घेण्याचें कारण नाहीं; कारण, हे देवत्वाच्या अंशानें लहानपणापासून बलिष्ठच होते. असो, याप्रमाणें भूभार नाहींसा झाला!

जनमेजय विचारतोः—भगवन्! देवदानवांचें, गंधर्वाप्सरसांचें, मानवांचें, यक्षराक्षसांचें व इतर प्राण्यांचें जन्मवृत्त प्रथमपासून तत्त्वपूर्वक ऐकण्याची माझी इच्छा आहे.

वैशंपायन सांगतातः—राजा! स्वयंभू ब्रह्मदेवाला नमस्कार करून मी तुला देवादिकांचे जन्मवृत्त व निधनवृत्त सांगण्यास आरंभ करितों. ब्रह्मदेवाला सहा मानसपुत्र होते. त्यांचीं नावें मरीचि, अत्रि, अंगिरस, पुलस्त्य, पुलह व क्रतु हीं होत. मरीचि ऋषीचा कश्यप हा पुत्र होय. कश्यपापासून सर्व प्रजोत्पादन झालें. दक्षाला अदिति, दिति, दनु, काला, दनायु, सिंहिका, क्रोधा, प्राधा, विश्वा, विनता, कपिला, मुनि, आणि कद्रू अशा तेरा कन्या होत्या. यांपासून वीर्यसंपन्न असे कोट्यवधि पुत्रपौत्रादि झाले. अदितीला बारा आदित्य झाले. त्यांचीं नांवें धाता, मित्र, अर्यमा, शक्र, वरुण, अंश, भग, विवस्वान्, पूषा, सविता, त्वष्टा व विष्णु हीं होत. या सर्वांत धकटा जो विष्णु, तो सर्वांपेक्षां गुणांनीं श्रेष्ठ होता. प्रसिद्ध हिरण्यकशिपु हा दितीला एकच मुलगा झाला. त्याला महात्मे असे पांच मुलगे झाले. प्रऱ्हाद, संऱ्हाद, अनुऱ्हाद, शिबि आणि बाष्कल हीं त्यांचीं अनुक्रमानें नांवें होत. विरोचन, कुंभ व निकुंभ हे प्रऱ्हादाचे लोकविख्यात पुत्र. विरोचनाचा प्रतापी पुत्र बलि, आणि सर्वश्रुत बाणासुर हा बलीचा पुत्र होय. हा महासंपत्तिवान बाणासुर, ज्याला महाकाल असें म्हणतात त्या श्रीरुद्राचा महाभक्त होता. राजा, दनूचे चाळीस पुत्र सर्वत्र विख्यात होते. त्यांपैकीं महायशस्वी राजा विप्रचित्ति हा ज्येष्ठ होता. इतर पुत्रांचीं नांवें—शंबर, नमुचि, पुलोमा, असिलोमा, केशी, दुर्जय, अयःशिरा, अश्वशिरा, ज्याला वीर्यवान, गगनमूर्धा, वेगवान आणि केतुमान असें म्हणत तो अश्वशंकु, स्वर्भानु, अश्व, अश्वपति, वृषपर्वा, अजक, अश्वग्रीव, सूक्ष्म, महाबलवान असा तुहुंड, इषुपात्, एकचक्र, विरूपाक्ष, महोदर, निचंद्र, निकुंभ, कुपट, कपट, त्याचप्रमाणें शरभ, शलभ, सूर्य, चंद्रमा, एकाक्ष, मृतप, वीर, प्रलंब व नरक, शत्रुतपन वातापी, शठ, गविष्ठ, वनायु आणि दीर्घजिव्ह राक्षस हीं होत. राजा, हीं दनूच्या वंशांतील श्रेष्ठ राक्षसांचीं नांवें तुला सांगितलीं. या दानवश्रेष्ठांमध्यें जे सूर्य आणि चंद्रमा म्हणून सांगितले, ते देवांमधील सूर्यचंद्रांहून भिन्न होत. राजा, ह्या सर्वत्र विश्रुत असलेल्या दानववंशामधील शेवटचे दहा दनुपुत्र सत्त्ववान आणि महाबलाढ्य

म्हणून प्रसिद्ध असून, त्या सर्वांचे पुत्रपौत्र असंख्यात होते; असो.

चंद्रसूर्यांचा ग्रास करणारा राहु, तसेच सुचंद्र, चंद्रहर्ता व चंद्रप्रमर्दन हे सिंहिकेचे पुत्र होत. क्रोधेचे क्रूरस्वभावी असे पुत्रपौत्र अनंत होते. त्यांतच क्रोधवश नांवाचा क्रूर व शत्रुहंता असा एक गण होता. विक्षर, बल, वीर व वृत्र हे असुरश्रेष्ठ दनायूचे मुलगे. विनाशन, क्रोध, क्रोधशत्रु व क्रोधहंता हे महाबली असुरश्रेष्ठ असे कालकेय होत. या असुरांचे उपाध्याय ऋषिसुत शुक्राचार्य होत. यांस चार पुत्र असून ते असुरयाजक म्हणून प्रसिद्ध होते. यांत त्वष्टाधर, अत्रि आणि दुसरे दोघेजण भयंकर कर्म करणारे असे होते. हे सर्व सूर्यासारखे तेजस्वी आणि ब्रह्मविद्याप्रवीण होते.

याप्रमाणें, राजा, पुराणामध्यें ऐकलेली बलवंत देवांची व दैत्यांची उत्पत्ति तुला सांगितली. यांची पुनः पूर्णतः वंशसंतति सांगावी, तर ती गोष्ट अशक्य आहे. कारण ती अनंत आहे. पुनः, या संततीचें महत्त्वही फारसें नाहीं.

असो; राजा, तार्क्ष्य, अरिष्टनेमि, गरुड, अरुण, आरुणि व वारुणि हे विनतापुत्र होत. शेष, अनंत, वासुकि, तक्षक, भुजंगम, कूर्म व कुलिक हे कद्रुपुत्र होत. भीमसेन, उग्रसेन, सुपर्ण, वरुण, गोपति, धृतराष्ट्र, सूर्यवर्चा, सत्यवाक्, अर्कपर्ण, प्रयुत, भीम, प्रसिद्ध-सर्वज्ञ आणि मनोनिग्रही चित्ररथ, शालिशिरा, पर्जन्य, कलि आणि नारद हे देवगंधर्व मुनिपुत्र होत. आणखी ऐक. अनवद्या, मनु, वंशा, असुरा, मार्गणप्रिया, अरूपा, सुभगा व भासी ह्या प्राधेच्या कन्या होत. तसेंच सिद्ध, पूर्ण, बर्हि, महायशस्वी पूर्णायु, ब्रह्मचारी, रतिगुण, सुपर्ण, विश्वावसु, भानु व सुचंद्र हे प्राधेचे पुत्र होत. हा देवगंधर्व वंश झाला. आतां पुण्यलक्षणी अप्सरांची उत्पत्ति ऐक: देवर्षि कश्यपापासून प्राधेला संतति झाली: अलंबुषा, मिश्रकेशी, विद्युत्पर्णा, तिलोत्तमा, अरुणा, रक्षिता, रंभा, मनोरमा, केशिनी, सुबाहु, सुरता, सुरजा व सुप्रिया ही त्या अप्सरांचीं नांवें होत. अतिबाहु, हाहा, हूहू व तुंबुरु हे चार गंधर्वश्रेष्ठ होत. अमृत, ब्राह्मण, गाई, गंधर्व व अप्सरा हा कपिलेचा वंश असें पौराणिक म्हणतात. याप्रमाणें सर्व भूतांची उत्पत्ति विस्तारानें तुला सांगितली. त्याचप्रमाणें गंधर्व, अप्सरा, भुजंग, सुपर्ण, रुद्र, मरुत्, गाई, ब्राह्मण यांची वंशोत्पत्ति सांगितली. राजा, हें कथानक आयुष्य देणारें, पुण्य जोडणारें व धन्यता आणणारें असून ऐकण्यास मनोहर आहे. हें सर्वांनी सदैव भक्तिपूर्वक ऐकावें. हा महात्मे पुरुषाचा वंश विस्तारनियमानें देवब्राह्मणांजवळ जो पठन करील, त्याला पुत्रप्राप्ति, अमूप संपत्तिलाभ व कीर्तिलाभ होईल, आणि तो मेल्यावर त्याला उत्तम गति मिळेल.

अध्याय सहासष्टावा.

—:०:—

वंशवर्णन.

वैशंपायन सांगतातः—राजा, ब्रह्मदेवाचे मानसपुत्र सहा महर्षि प्रसिद्धच आहेत. आतां, स्थाणूचे परम तेजस्वी असे जे अकरा पुत्र त्यांचीं नांवें ऐकः मृगव्याध, सर्प, निर्ऋति, अजैकपाद, अहिर्बुध्न्य, पिनाकी, दहन, ईश्वर, कपाली, महाद्युति, स्थाणु व भगवान भव हे अकरा रुद्र होत. ब्रह्मदेवाचे सहा मानसपुत्र तुला मागें सांगितले व मरीचीची संततिही वर्णन केली. बृहस्पति, उतथ्य आणि संवर्त हे सर्वप्रसिद्ध आणि धृतव्रत असे अंगिरसपुत्र होत. अत्रीला पुष्कळ पुत्र असून ते सर्व वेदवेत्ते, सिद्ध, आणि शांतात्मे होते. बुद्धिवंत पुलस्त्यापासून राक्षस, वानर, किन्नर व यक्ष झाले. शलभ, सिंह, किन्नर, व्याघ्र, यक्ष (ऋक्ष ?=अस्वल ?) व लांडगे ही पुलहाची संतति होय. क्रतूचे पुत्र त्याच्यासारखेच तपस्वी,

सत्यव्रतपरायण आणि सूर्याबरोबर हिंडणारे असे असत. ब्रह्मदेवाच्या उजव्या अंगठ्यांतून महाशांत व महातपस्वी असा महर्षि दक्ष झाला; डाव्या अंगठ्यांतून दक्षाची भार्या उत्पन्न झाली. हिला दक्षापासून सर्वांगसुंदर अशा पन्नास कन्या झाल्या. पुत्र नाहीं असें पाहून दक्ष प्रजापतीनें या सर्व कन्यांस पुत्रिका[1] नात्यानें वागविलें; आणि त्यानें मोठा दिव्य विधि व समारंभ करून दहा कन्या धर्मास, सत्तावीस चंद्रास, व तेरा कश्यपाला दिल्या. कीर्ति, लक्ष्मी, धृति, मेधा, पुष्टि, श्रद्धा क्रिया बुद्धि, लज्जा व मति ह्या धर्माच्या सहधर्मचारिणी होत. सारांश, धर्माकडे जाण्याची –धर्मांत प्रवेश करण्याचीं–हीं द्वारेंच जणू काय ब्रह्मदेवानें निर्माण केलीं आहेत. चंद्राच्या सत्तावीस स्त्रिया महापतिव्रता असून कालगणनेमध्यें अत्यंत उपयोगी आहेत. हीं सत्तावीस नक्षत्रें होत किंवा त्यांवरील अधिष्ठात्र्या देवता होत. लोकयात्रा चालविण्यासाठीं ह्या स्त्रिया नक्षत्रांबरोबर असतात. ब्रह्मदेवाचा पुत्र दक्ष प्रजापति याच्या वसु नामक कन्येपासून धर्माला आठ वसु झाले. ते धर, ध्रुव, सोम, अह, अनिल, अनल, प्रत्यूष आणि प्रभास हे होत. धर. ब्रह्मविद्य व ध्रुव हे धूम्रेचे पुत्र, चंद्र हा मनस्विनीचा व श्वसन हा श्वासेचा पुत्र होय. तसेंच रतेचा अह, अग्नि हा शांडिल्येचा, आणि प्रभातेचे प्रत्यूष आणि प्रभास हे पुत्र होत. द्रविण आणि हुतहव्यवह हे धराचे व लोककालव्यवस्थापक काल[2] हा ध्रुवाचा पुत्र. सोमाचा वर्चा पुत्र होय. यानेंच श्रेष्ठत्व मिळतें. मनोहरेचे शिशिर, प्राण आणि रमण हे पुत्र होत. ज्योति, शांत आणि मुनि हे आहाचे व कार्तिकेय (षडानन) हा अग्नीचा पुत्र होय. षडाननाचे धाकटे बंधु म्हणजे शाख, विशाख आणि नैगमेय हे होत. कृत्तिकांपासून अग्नीला झाला म्हणून षडाननाला कार्तिकेय (कार्तिकस्वामी) म्हणतात. शिवा नामक भार्येच्या उदरीं अनिलाला मनोजय व अविज्ञातगति असे दोन पुत्र झाले. देवल हा प्रत्यूषाचा मुलगा. याला क्षमावान व मनीषी असे दोन पुत्र होते. सर्व स्त्रियांमध्यें श्रेष्ठ, ब्रह्मवेत्ती, योगिनी व सर्वत्र संचार करणारी अशी बृहस्पतीला बहीण होती. हिचें लग्न प्रभासाबरोबर झालें. महानुभाव विश्वकर्मा हा सर्व शिल्पशास्त्रवेत्ता व शिल्पशास्त्रोत्पादक असून सर्व देवांचा वर्धकी (सुतार) होता. हाच देवांचे अलंकार व दिव्य विमानें सिद्ध करी. यानें प्रसिद्ध केलेल्या शिल्पज्ञानानेंच मनुष्यांचा निर्वाह होतो, म्हणून या अव्यय (अगाधज्ञानी) विश्वकर्म्याची सर्व लोक मनोभावानें पूजा करितात. सर्व लोकांस सुख देणारा भगवान धर्म हा शरीरी होऊन ब्रह्मदवाच्या दक्षिणस्तनांतून बाहेर पडला. त्याला तीन पुत्र होते. ते सर्व चित्ताकर्षी आणि लोकसंरक्षक होते. शम, काम आणि हर्ष हे ते तीन तेजस्वी पुत्र होत. कामाची स्त्री रति, शमाची प्राप्ति आणि हर्षाची नंदा होय. यांच्या पराक्रमानेंच सर्व जगतास आधार मिळतो. मरीचीपासून कश्यप व कश्यपापासून सर्व देवदानव झाले. सर्व लोकांचें उत्पत्तिस्थान कश्यप ऋषि होय. अश्वस्त्रीचें रूप धारण करणारी त्वाष्ट्री ही सूर्याची भार्या होय. हिच्या उदरीं दिव्य अश्विनीकुमार झाले. अदितीला इंद्रादि बारा आदित्य झाले. त्यांतील धाकटा विष्णु हा सर्वश्रेष्ठ व जगदाधार.झाला. याप्रमाणें आठ वसु, अकरा रुद्र व बारा आदित्य मिळून एकतीस व दोन अश्विनीकुमार मिळून तेहतीस देव झाले. आतां

---

१ अभ्रातृकां प्रदास्यामि तुभ्यं कन्यामलंकृताम् ।
अस्यां यो जायते पुत्रः स मे पुत्रो भवेदिति ॥
अर्थ—' ही अलंकार घातलेली कन्या मी तुला देतों; हिला भाऊ नाहींत, [तस्मात्] हिला जो पुत्र होईल, तो माझा पुत्र होवो. ' (तो त्वां मला द्यावा.) अशा संकेतानं दिलेल्या कन्येस ' पुत्रिका ' म्हणतात.

२ अनंताचा-नित्यस्थिराचा–काल पुत्र आहे ही कल्पना किती उत्तम आहे!

यांचा अन्वय, कुल, पक्ष इत्यादि सांगतों; व त्यांचे गणही सांगतों. रुद्रांचा पक्ष निराळा व साध्य-मरुतांचा पक्ष निराळा. वसु व विश्वदेव यांचा भार्गवगण होय. विनतापुत्र गरुड, बलवान अरुग आणि भगवान बृहस्पति ह्यांचा आदित्यगणांत अंतर्भाव होतो. सर्वौषधि, पशु व गुह्यक हे अश्विनीकुमारांमध्यें येतात. हे देवगण अनुक्रमें तुला सांगितले. यांचें कीर्तन पापविघातक आहे. भगवान भृगु हे ब्रह्मदेवाचें हृदय फोडून बाहेर आले. भृगूचा पुत्र विद्वान कवि आणि त्याचा शुक्र ग्रह होय. ह्याला ब्रह्मदेवानें लोकसंरक्षणार्थ पर्जन्याचा (वृष्टि, अवर्षण) व भयाभयांचा अधिपति केला आहे, म्हणून हा भुवनांतरीं हिंडत असतो. हा मोठा बुद्धिमान व योगाचार्य होता. याला दैत्यांचें गुरुत्व मिळालें. देवांचाही हा यतव्रत व ब्रह्मचर्यानें राहणारा कवि कुलगुरु होता. याप्रमाणें शुक्राचार्यास लोककल्याणाच्या मार्गामध्यें प्रवेशित केल्यानंतर भृगु ऋषींनीं च्यवन या नांवाचा शुद्ध, तपस्वी, धर्मात्मा व यशस्वी असा एक सुत निर्माण केला. हा मातेची सुटका करावी म्हणून गर्भांतून लवकर बाहेर आला होता, म्हणून याला च्यवन असें नांव मिळालें. ह्या मनीषी ऋषीला आरुषी नांवाची कन्या मनूनें भार्यात्वासाठीं दिली. तिचेपासून च्यवनाला और्व झाला. हा यशस्वी और्व ऊरु म्हणजे मांडी फोडून झाला. बालपणींच और्व हा तेजस्वी व वीर्यशाली असे. याचा पुत्र ऋचीक आणि पौत्र जमदग्नि होय. जमदग्नीला चार महात्मे पुत्र होते. त्यांतील कनिष्ठ पण गुणांनीं ज्येष्ठ असा परशुराम झाला. या मनोनिग्रही महात्म्यानें शस्त्रास्त्रांमध्यें नैपुण्य संपादन करून क्षत्रियांचा नाश केला हें लोकप्रसिद्धच आहे. और्वाला जमदग्निप्रमुख शंभर पुत्र होते, व त्यांसही हजारों पुत्र, होऊन त्यांचा मोठाच विस्तार झाला. ब्रह्मदेवाचे धाता व विधाता नांवाचे दोन पुत्र होते. ते मनूसह अद्यापिही आहेतच. राजा, असें पहा–दिवा लावला म्हणजे घटादिकांच्या संबंधानें जो अंधेर असतो तो नाहींसा होतो व घट स्फुरण पावतो. अज्ञान नाश करणें हा धातृत्वाचा धर्म आणि घटस्फुरण करणें हा विधातृत्वाचा धर्म. घटस्फुरण झालें म्हणजे आनंदावाप्ति अथवा दुःखप्राप्ति होणें. हा मनु म्हणजे जीवाचा धर्म. सारांश धाता, विधाता व मनु ही त्रिपुटी नित्य आहेच आहे. पद्मामध्यें राहणारी (हृदयपद्मांत प्रकट होणारी) दिव्य लक्ष्मी (विद्या) ही यांची भगिनी होय. हिला चार मानसपुत्र झाले. हे आकाशांत संचार करणारे व शीघ्रगामी असत. शुक्राची मुलगी ज्येष्ठा वरुणाला दिली. बल व सुरा (देवांस प्रिय असणारें पेय) हीं ज्येष्ठेचीं अपत्यें होत. असो; बल व सुरा यांचा संचार अत्यंत झाल्यामुळें उपभोगाची इच्छा करणाऱ्या प्रजांमध्यें कलह उत्पन्न होऊन अन्योन्यांचा अपहार सुरू झाला, म्हणजे अधर्माची प्रवृत्ति झाली. अधर्मप्रवृत्ति म्हणजे जीवांचा संहारसमय जवळ आणणारें यंत्रच होय. अधर्माला निर्ऋति भार्या मिळाली, आणि राक्षस जन्मास येऊं लागले. निर्ऋतीच्या उदरीं तीन घोर पुत्र उत्पन्न झाले. हे नेहमीं पापकर्मांमध्यें रत असत. भय, महाभय व मृत्यु हे ते तीन घोर पुत्र होते. यांपैकीं मृत्यु हा सर्वभक्षक असल्यामुळें त्याला भार्या किंवा पुत्र कांहीं नव्हते. ताम्रा या नांवाच्या देवीला काकी, श्येनी, भासी, धृतराष्ट्री व शुकी अशा प्रसिद्ध पंचकन्या झाल्या. काकीपासून उलूक, श्येनीपासून श्येन पक्षी, भासीला भास व गृध्र, धृतराष्ट्रीला हंस व कलहंस, भद्रेला चक्रवाक आणि यशस्वी, सद्गुणी व सल्लक्षणी शुकीला शुक झाले. क्रोधाला तामसी नऊ कन्या झाल्या. मृगी, मृगमंदा, हरी, भद्रमना, मातंगी, शार्दूली, श्वेता, सुरभि आणि सल्लक्षणी सुरसा ह्या त्या नऊ कन्या होत.

राजा, मृगीला सर्व मृग, मृगमंदेला ऋक्ष, (अस्वल) व सृमर, भद्रमनेला ऐरावत, (देवांचा हत्ती) हरीला हरि, वानर, तरस्वी व गोलांगूल, शार्दूलीला महाबलवंत सिंह, व्याघ्र व द्वीपि, मातंगीला मातंग, श्वेतेला शीघ्रगामी श्वेताख्य दिग्गज, आणि सुरभीला रोहिणी व गंधर्वी या कन्या, अशी प्रजोत्पत्ति झाली. अनला व विमला या मुलींशिवाय रोहिणीपासून गाई व गंधर्वी पासून अश्व झाले. अनलेपासून ताडमाडादि सात पिंडफल[1] नामक वृक्ष झाले. अनलेची मुलगी शुक्री. कंक हा क्रोधकन्या जी सुरसा तिचा मुलगा होय. अरुणाला व श्येनीला संपाति व बलवंत जटायु हे पुत्र झाले. सुरसेला नाग व कद्रूला सर्प झाले. विनतेला गरुड व अरुण असे प्रसिद्ध पुत्र झाले. याप्रमाणें, राजा, श्रेष्ठ भूतांचा उद्भव कसा झाला तें तुला सांगितलें. ह्याचे श्रवण भक्तिपूर्वक केलें असतां पापनिवृत्ति होऊन येथें सर्वज्ञता व शेवटीं उत्तम गति मिळेल.

अध्याय सद्दुसष्टावा.

—:०:—

अंशावतरण.

जनमेजय विचारतोः—भगवन्! दवे, दावन, गंधर्व, उरग, राक्षस, सिंह, व्याघ्र मृग, सर्प, पक्षी ह्या सर्व योनीमधील कित्येक प्राण्यांस मनुष्यजन्म मिळाला तो वृत्तांत, व या सर्वांचे पूर्ववृत्तींतील जन्म व कर्म हीं कसलीं होतीं तीं मला कृपा करून सांगावीं.

वैशंपायन सांगतातः–राजा, स्वर्गामध्यें राहणाऱ्या दानवांस मनुष्ययोनींत जन्म झाला तें वर्तमान प्रथम सांगतों. विप्रचित्ति नांवाचा दानवश्रेष्ठ हा मानवलोकीं जरासंध नांवाचा पराक्रमी राजा झाला. दितिपुत्र हिरण्यकशिपु हा येथें नरश्रेष्ठ शिशुपाल झाला. प्रऱ्हादानुज संऱ्हाद हा सारथ्यकर्मनिपुण शल्य, तेजस्वी अनुऱ्हाद (प्रऱ्हादाचा कनिष्ठ बधु) हा धृष्टकेतु, नरपति शिबि दैत्य हा द्रुम राजा, बाष्कल नामक असुरश्रेष्ठ हा भगदत्त नामक वरपुरुष, आणि अयःशिरा, अश्वशिरा, अश्वःशंकु, गगनमूर्धा आणि वेगवान् हे पांच महाबली दैत्यपति होते, ते राजे केकेयश्रेष्ठ होत. कतुमान् नामक प्रतापी राक्षस हा उग्र कर्मे करणारा अमितौजा नृप झाला. स्वर्भानु नांवाचा पराक्रमी दानव पृथ्वीवर उग्रसेन नांवाचा उग्र राजा झाला. अश्व नामक राक्षस अशोक नांवाचा समरविजयी राजा झाला. अश्वपति असुर हार्दिक्य राजा झाला. वृषपर्व्याला दीर्घप्रज्ञ नांवाचा राजा व्हावें लागलें अजक हा वृषपर्व्याचा धाकटा भाऊ, तो शाल्व नामक राजा झाला. अश्वग्रीव बलाढ्य राक्षस पृथ्वीवर रोचमान् नामक राजा झाला. सूक्ष्म हा बृहद्रथ, तुहुंड हा सेनाबिंदु, बलिष्ठ इषुपात् हा महापराक्रमी नग्नजित्, एकचक्र हा प्रतिविंध्य, विचित्र योद्धा विरूपाक्ष हा चित्रधर्मा, शत्रुविघाती हर हा सुबाहु, शत्रूची धूळधाळ करणारा अहर हा राजा बाल्हीक, चंद्रमुखी निचंद्र हा मुंजकेश, महाबुद्धिमान निकुंभ हा महाराज देवाधिप, शरभ हा पौरव नामक राजर्षि, कुपट हा सुपार्श्व, कपट हा तेजस्वी पार्वतेय, दुसरा शलभ हा प्रऱ्हादसंज्ञक बाल्हीकराज, चंद्रासारखा तेजस्वी चंद्र दैत्य हा कांबोजपति चंद्रवर्मा, अर्क हा ऋषिक राजर्षि, मृतपा हा पश्चिमानूपक, तेजस्वी गविष्ठ हा द्रुमसेन, मयूर हा विश्व, सुपर्ण (धाकटा भाऊ) हा कालकीर्ति, असुरश्रेष्ठ चंद्रहंता हा शुनक राजर्षि, चंद्रविनाशन हा जानकि, दीर्घजिव्ह हा काशिराज, व सूर्यचंद्रांचा ग्रास करणारा

---

१ शाखा नसून शेंड्यांशीं फलें येणारीं झाडें:—
खर्जूरतालहिंतालौ ताली खर्जूरिका तथा।
गुवाका नारिकेलश्च सप्त पिंडफला द्रुमाः ॥
अर्थ--खजूर, ताड, माड, भेरळीमाड, लहानखजूर, शिंदी आणि नारळ हे सात ' पिंडफल वृक्ष होत.

सिंहिकासुत ग्रह (राहु) हा क्राथराजा झाला. दनायूचे चार मुलगे. त्यांपैकीं पहिला विक्षर हा वसुमित्र व दुसरा बल पांड्यराष्ट्राधिप झाला. वीर राक्षस पौंड्रमात्स्यक राजा, वृत्रासुर मणिमान् नामक राजा, त्याचा धाकटा भाऊ क्रोधहंता हा दंड राजा व क्रोधवर्धन हा दंडधार राजा झाला. कालेयांच्या पुत्रांपैकीं आठ मुलगे सिंहासारखे राजे मनुष्यलोकांत अवतरले. पहिला पुत्र मगध देशांत जयत्सेन नामक राजा, दुसरा हरिहयोपम हा अपराजित, तिसरा तेजस्वी व महामायावी तो महापराक्रमी निषदाधिपति, चौथा श्रेणिमान राजर्षिश्रेष्ठ. पांचवा प्रवरासुर तो प्रसिद्ध महौजा, व सहावा मतिमान् हा अभीरु नामक राजर्षिवर झाला. समुद्रवलयांकित पृथ्वीवर प्रसिद्ध असून धर्मार्थतत्त्वें जाणणारा समुद्रसेन हा सातवा पुत्र, आणि आठवा पुत्र हा सर्व प्राणिमात्राच्या हिताविषयी तत्पर असणारा बृहन्नामक धर्मात्मा राजा झाला. महाबळ कुक्षि राक्षस सुवर्णपर्वताप्रमाणें तेजस्वी पार्वतीय राजा. क्रथनासुर हा सूर्याक्ष राजा, व सूर्यासुर हा बाल्हीकांमध्यें दरद नामक नृपाधिपति झाला. क्रोधवश म्हणून जो तुला गण सांगितला, त्यांतून या पृथ्वीवर अनेक शूर राजे निर्माण झाले. मद्रक, कर्णवेष्ट, सिद्धार्थ, कीटक, सुवीर, सुबाहु, बाल्हीक महावीर, क्रथ, विचित्र सुरथ, नील व चीरवास राजा हे ते होत. दंतवक्त्र व दुर्जय हे रुक्मी व जनमेजय झाले. आषाढ वायुवेग, भूरितेजा, एकलव्य, सुमित्र, वाटधान, गोमुख, कारूषक राजे, क्षेमधूर्ति, श्रुतायु, उद्वह, बृहत्सेन, क्षेम, उग्रतीर्थ, कुहर, ईश्वर नामक व मतिमान नामक कलिंगाधिपति हे सर्व राजे क्रोधवश नामक गणांतील राक्षसांचे अवतार झाले. हे सर्व राजे उदार, कीर्तिवान व बलवान होते. कालनेमि नामक बलिष्ठ दानव उग्रसेनपुत्र कंस झाला. हा मोठा बलवान होता. राजा, इंद्राप्रमाणें तेजस्वी देवकराजा गंधर्वलोकांतील मुख्य अधिपति होय. विश्वविख्यात देवर्षि जो बृहस्पति, त्याच्या अंशानें द्रोणाचार्य. हे अयोनिसंभव असून भारद्वाजकुलांत जन्म पावले. हे सर्व धनुर्धाऱ्यांमध्यें श्रेष्ठ, शस्त्रास्त्रपंडित, महाकीर्तिमान व महातेजस्वी असत. ज्याप्रमाणें हे धनुर्वेदांत निष्णात होते, तसेच वेदविद्येमध्येंही पटाईत असत. ह्यांचें कर्म अलौकिक म्हणून हे श्रेष्ठ व कुलभूषण झाले. महादेव, अंतक व कामक्रोध हे सर्व एकत्र होऊन अश्वत्थामारूपानें अवतरले. कमलनेत्र अश्वत्थामा महापराक्रमी, व शत्रुवर्गास भय देणारा वीर होता. आठ वसु सांगितले, ते सर्व वसिष्ठाच्या शापानें व इंद्राच्या आज्ञेनें शंतनु राजाला गंगेच्या उदरीं अष्टपुत्ररूपानें प्रकट झाले. यांतील कनिष्ठ भीष्माचार्य होत. हे कुरुकुलाला स्वास्थ्य देणारे, वक्तृत्वपूर्ण, मतिमान, वेदशास्त्रप्रवीण, व शत्रूस भय देणारे असे होते. ह्यांचा पराक्रम इतका तेजस्वी होता कीं, निःक्षत्रिय पृथ्वी करणाऱ्या जामदग्न्य परशुरामाबरोबर युद्ध करून यांनीं आपल्या शस्त्रास्त्रनैपुण्यानें भार्गवरामास पराजित केलें. रुद्रगणांतून कृपाचार्य ब्रह्मर्षि झाले. यांची उत्पत्ति अलौकिक आहे. अरिमर्दन करणारा द्वापर हा शकुनि नामक महारथी राजा झाला. वृष्णिकुलभूषण सत्यप्रिय सात्यकि हा मरुद्गणांपासून अवतरला. शस्त्रास्त्रांमध्यें श्रेष्ठ द्रुपद राजा व अद्वितीय पराक्रमी कृतवर्मा नृप हे मरुद्गणांपासूनच झाले. परराष्ट्राला संताप देणारा विराट राजा हाही मरुद्गणांचाच अंश होय. अरिष्टेचा पुत्र व गंधर्वपति जो हंस तो कुरुवंश वृद्धिंगत करणारा धृतराष्ट्र राजा झाला. हा कृष्णद्वैपायनांचा पुत्र होता. हा तेजस्वी आजानुबाहु होता. पण आईच्या दोषानें व ऋषींच्या शापानें अंध झाला; म्हणून याला प्रज्ञाचक्षु असें म्हणत. ऋषींच्याबरोबर संगत होतांना याच्या आईनें, ऋषीचें तेज सहन होईना म्हणून डोळे झांकिले होते, त्यामुळें ऋषिकोप झाल्याचा हा परि-

णाम झाला! त्याचा धाकटा बंधु पांडु हा होय. हा ओज, तेज यांनीं युक्त असून, सत्यधर्मप्रिय व विशुद्धाचरणी होता. विदुर, हा अत्रि पुत्र होय. हा अत्यंत उदार मनाचा, वंश भूषणरूप मातापितरांस धन्यत्व देणारा असून बुद्धिवंतांमध्यें महश्रेष्ठ होता. दुर्बुद्धि, दुर्मति व कौरवकुलकलंक दुर्योधन हा कलीचा अंश होय. यानें स्वाचरणानें सर्व जगाचा द्वेष संपादन केला, व सर्वांचा घात करणारें वैर प्रज्वलित करून यच्चावत् भूतांचा संहार केला! दुःशासनादि सर्व याचे भाऊ पौलस्त्यांचे अंश होते. यांनी दुर्योधनास साहाय्य केलें.

राजा जनमेजय विचारितोः—भगवन्, आपण धृतराष्ट्राचे जे शंभर पुत्र सांगितले, त्या सर्वांचीं नांवें क्रमशः मला सांगा.

वैशंपायन म्हणालेः—राजा, ऐक. धृतराष्ट्राचा युयुत्सु नामक वैश्यापुत्र होता, तो एकशेंएकावा होय. दुर्योधन, युयुत्सु, दुःशासन, दुःसह, दुःशल, दुर्मुख, पर, विविंशति, विकर्ण, जलसंध, सुलोचन, विंद, अनुविंद, दुर्धर्ष, सुबाहु, दुष्प्रधर्षण, दुर्मर्षण, दुर्मुख, दुष्कर्ण, कर्ण, चित्र, उपचित्र, चित्राक्ष, चारु, चित्रांगद, दुर्मद, दुष्प्रहर्ष, विवित्सु, विकट, सम, ऊर्णनाभ, पद्मनाभ, नंद, उपनंदक, सेनापति, सुषेण, कुंडोदर, महोदर, चित्रबाहु, चित्रवर्मा, सुवर्मा, दुर्विरोचन, अयोबाहु, महाबाहु, चित्रचाप, सुकुंडल, भीमवेग, भीमबल, बलाकी, भीमविक्रम, उग्रायुध, भीमशर, कनकायु, दृढायुध, दृढवर्मा, दृढक्षत्र, सोमकीर्ति, अनूदर, जरासंध, दृढसंध, सत्यसंध, सहस्रवाक्, उग्रश्रवा, उग्रसेन, क्षेममूर्ति, अपराजित, पंडितक, विशालाक्ष, दुराधन, दृढहस्त, सुहस्त, वातवेग, सुवर्चा, आदित्यकेतु, बव्हाशी, नागदत्त, अनुयायी, कवची, निषंगी, दंडी, दंडधार, धनुर्ग्रह, उग्र, भीमरथ, वीर, वीरबाहु अलोलुप, अभय, रौद्रकर्मा, दृढरथ, अनाधृष्य, कुंडभेदी, विरावी, दीर्घलोचन, दीर्घबाहु, महाबाहु, व्यूढोरु, कनकांगद, कुंडज व चित्रक हे अनुक्रमें शंभर, दुःशला मुलगी व वैश्यापुत्र युयुत्सु हा एकशेंएकावा होय. हे सर्व अतिरथी होते म्हणजे युद्धकलानिपुण असून शूर, वेदशास्त्रसंपन्न, विद्वान् व कुलीन होते. सर्वांची अनुरूप स्त्रियांशीं लग्नें झालीं होतीं. योग्य समयीं (ती उपवर झाल्यावर) शकुनीच्या संमतीनें दुःशलेचा विवाह सिंधुराजा जयद्रथ याच्याशीं केला.

जनमेजया, राजा युधिष्ठिर हा धर्माचा अंश, व नयनमनोहर वायूचा अंश भीम, इंद्राचा अर्जुन व अश्विनीकुमारांपासून सर्वांगसुंदर नकुल सहदेव झाले. सोमपुत्र वर्चा हा महाप्रतापी व कीर्तिवान अभिमन्यु झाला. हा अर्जुनाचा पुत्र होय. अभिमन्यूच्या अवताराची कथा अशी आहेः पृथ्वीवर अवतार घेण्याची देवसभेंत गोष्ट निघाली, तेव्हां सोमानें सांगितलें कीं, " देवांचें कार्य करणें व असुरांचा वध करणें हें इष्टच आहे. तथापि माझा मुलगा माझ्या प्राणांहूनही मला प्रिय असल्यामुळें मी त्याला पृथ्वीवर पाठवीत नाहीं. फार दिवस तो तेथें रहावयाचा नाहीं हें जर संमत असेल, तर तुमच्यासाठीं मी सोळा वर्षेंपर्यंत त्याचा वियोग सहन करीन. श्रीनारायणसखा जो इंद्रपुत्र प्रतापी अर्जुन, त्याच्या उदरीं अभिमन्यु नांवानें हा महारथी अवतार घेईल. याला सोळावें वर्ष लागलें म्हणजे, वीरसंहारक जो कौरवपांडवांचा संग्राम होईल, त्यांत हा अभिमन्यु एके दिवशीं श्रीकृष्णार्जुनांव्यतिरिक्त अभेद्य चक्रव्यूहामध्यें शिरेल. तेथ घनघोर संग्राम होईल, आणि माझा मुलगा सर्व शत्रूंचा पराभव करील; इतकेंच नव्हे, तर हजारों महारथ्यांचा रणकंदनामध्यें संहार करील. त्या दिवशीं हा महावीर दोन प्रहरांमध्यें शत्रुसैन्याचा एकचतुर्थांश यमराजपुरीला पाठवील! नंतर अनेक महावीर एकत्र जमून माझ्या एकट्या बाळावर पडतील, आणि सूर्यास्ताच्या वेळीं माझा मुलगा वंशवर्धक

असा एक पुत्र गर्भस्थ ठेऊन माझ्या लोकाप्रत येईल. अस्तंगत होणारें भारतकुळ केवळ या मुलाच्या पुत्रद्वारानें मात्र पुन: उदयास येईल. हें संमत असेल तर मी आपला मुलगा देतों."

राजा, हें ऐकून देवांनीं 'तथास्तु' म्हणून आपली अनुमति प्रकट केली, व सोमराजाची पूजा केली. याप्रमाणें तुझ्या पितामहाचें अवतरण तुला सांगितलें. महारथी धृष्टद्युम्न हा अग्नीचा भाग होता. शिखंडी हा राक्षसाचा अंश असून प्रथमत: स्त्रीरूपानें जन्मास आला. द्रौपदीचे पांच पुत्र हे विश्वेदेवगणांचे अंश आहेत. प्रतिविंध्य, सुतसोम, श्रुतकीर्ति, नकुलपुत्र शतानीक आणि श्रुतसेन हीं पांडवपुत्रांचीं नांवें आहेत.

राजा, वसुदेवाचा पिता शूर नामक यादवाधिपति होता. त्याला पृथा नांवाची अद्वितीय रूपसुंदरी कन्या होती. या शूराचा आतेभाऊ कुंतिभोज नांवाचा राजा होता. त्याला अपत्य नव्हतें; तेव्हां 'माझ्या अपत्यांपैकीं पहिलें मूल मी तुला देईन' असें प्रतापी शूरानें कुंतिभोजास पूर्वींच कधीं वचन दिलें होतें. पुढें पृथा ही शूराला पहिली मुलगी झाली. तेव्हां कुंतिभोजावर अनुग्रह करण्यासाठीं त्या सत्यसंध शूरानें आपली ज्येष्ठ मुलगी कुंतिभोजाला दत्तक दिली. पुढें ही मुलगी मोठी झाली, तसें कुंतिभोजानें तिला ब्राह्मण, अतिथी यांची सेवा करण्याचें काम दिलें; व तिनेंही ही खडतर ब्राह्मणसेवा मोठ्या आदरानें व काळजीपूर्वक केली. एकदा मोठे कडकडीत, तामसी परंतु स्वच्छाचरणाचे व महा धार्मिक दुर्वास ऋषि तेथें आले. त्यांचें मन पृथेनें मोठ्या काळजीनें संभाळून त्यांची सेवा एकनिष्ठ मनानें इतकी उत्तम केली कीं, ती महातामसी ब्राह्मणमूर्ति सर्वात्मना प्रसन्न होऊन तिनें पृथेला यथाविधीनें काहीं मंत्र दिले, आणि 'तुजवर प्रसन्न आहें, तुझें कल्याण होईल' असा आशीर्वाद दिला. ते पुन: म्हणाले, "या मंत्रानें ज्या ज्या देवतेचें आराधन करशील, ती ती देवता प्रसन्न होऊन तिच्या प्रसादानें तुला पुत्रप्राप्ति होईल.' असें बोलून दुर्वासांची स्वारी निघून गेली!

असो; इकडे पृथेला 'हा काय चमत्कार आहे' हें पाहण्याची पोरपणामुळें इच्छा झाली, व तिनें एक मंत्र म्हणून सूर्याचें आव्हान केलें. ब्राह्मणाचा आशीर्वाद तो! तो काय व्यर्थ होणार! प्रकाशकारी सूर्य तत्काल खालीं येऊन त्यानें त्या विमलकीर्ति कुंतीच्या कन्यकावस्थेंतच तिच्या ठिकाणीं गर्भस्थापना केल्यानंतर, सर्वशस्त्रधराग्रणी असा पुत्र ती प्रसवली. हा जन्मत:च सतेज व कवचकुंडलांसहित जन्मास आला. सूर्याप्रमाणें तेजस्वी व सर्वांगसुंदर असा हा मुलगा लोकलज्जेमुळें व कुलभीतीमुळें तिला लपवावा लागला. अर्थातच, यशस्वी व पुढें महायोद्धा होणारा तो मुलगा कौमार अवस्थेंत झाला म्हणून त्याचें तिनें नदींत उत्सर्जन केलें! तो पुढें एका सारथ्याला सांपडला, व त्यानें आपल्या राधा नामक बायकोस 'हा तुझा मुलगा असें समज' असें म्हणून दिला. हा बलवान मुलगा वाढत गेला, तसा क्षात्रविद्येत उत्तम निष्णात व सांगवेदांमध्यें प्रवीण झाला. याचें नांव 'वसुषेण' असें आईबापांनीं ठेविलें होतें. वेदांगांचा जप करीत असतां 'कोणत्याही ब्राह्मणानें काय वाटेल तें मागितलें तरी तें त्यास द्यावयाचें' असें याचें उदार व्रत असे. असो.

राजा, एकदा याचा जप चालला असतां तेथें देवेंद्र ब्राह्मणाचें रूप धारण करून आला, व आपल्या पुत्राचें (अर्जुनाचें) हित करावें या बुद्धीनें त्या जगत्पोषक देवानें कर्णापाशीं 'तुझीं अंगभूत कवचकुंडलें दे' अशी याञ्चा केली. तेव्हां तीं कवचकुंडलें तोडून व सोलून काढून कर्णानें त्या ढोंगी ब्राह्मणास दिलीं. तेव्हां इंद्राला मोठें आश्चर्य वाटलें, आणि प्रसन्न होऊन त्यानें त्याला एक 'शक्ति' दिली आणि सांगितलें कीं, 'देव, असुर, मनुष्य, यक्ष, राक्षस, गंधर्व सर्प इत्यादि

कोणावरही ही शक्ति फेकलीस तर तो तत्काळ मरून जाईल. ' असें म्हणून इंद्र अंतर्धान पावला. या त्याच्या [कवचकुंडलें कर्तन करून देण्याच्या] कृत्याच्या योगानें त्या दिवसापासून त्याला 'वैकर्तन कर्ण' असें नांव प्राप्त झालें. जन्मतःच कवचासह अवतीर्ण झालेला हा कर्ण कुंतीचा पहिला मुलगा होय. हा वीर सारथ्यांच्या कुळांत वाढला. हा नरवरश्रेष्ठ, सर्व शस्त्रास्त्री योद्धयांचा अग्रणी, दुर्योधनाचा मित्र, मसलतगार, प्रधान, व शत्रुविध्वंसक अद्वितीय कर्ण सूर्यांश होय.

राजा, सनातन देवाधिदेव जो नारायण, त्याचा प्रतापी वासुदेव हा अंश होय. शेषाचा अंश महाबली बळदेव, व सनत्कुमाराचा अंश महावीर्यशाली प्रद्युम्न होय. याचप्रमाणें, वसुदेवकुलाला भूषित करणारे आणखी जे मनुष्यश्रेष्ठ होते, तेही देवांचेच अंश होते. अप्सरांचा गण सांगितला त्यांच्या अंशांपासून इंद्राज्ञेनें सोळा सहस्र देवी होऊन त्या श्रीकृष्णाच्या स्त्रिया द्वापरयुगांत झाल्या. श्रीकृष्णाची पट्टराणी भीष्मककन्या साध्वी रुक्मिणी ही लक्ष्मीचा अंश होती. यज्ञवेदीवर जन्मास आलेली शुद्धसत्वा द्रौपदी ही शचीचा अंश होय. द्रौपदी फार कृश नव्हे, फार लठ्ठ नव्हे अशी असे. तिच्या अंगास कमलांचा सुवास असे. कमलाप्रमाणें डोळे, सिंहाची कटि व भृंगासारखे केश असणारी द्रौपदी सर्वलक्षणसंपन्न असून वैडूर्य मण्यासारखी तेजस्वी असे. ही आपल्या पंचपतींचें मनाधारण करण्यांत कुशल होती. सिद्धि व धृति यांच्या अंशांपासून कुंती व माद्री झाल्या. मतीच्या अंशानें सुबलकन्या गांधारी झाली.

याप्रमाणें राजा, देव, असुर, गंधर्व, अप्सरा, राक्षस यांचें अंशावतरण भूलोकीं कसें झालें, कोणकोणते युद्धोन्मत्त राजे झाले, यादवकुलांत कोण झाले, व ब्राह्मणादि चार वर्णांत कोणाचे कोण अंशभाग होते, तें तुला सांगितलें. हे अंशावतरण धन्यप्रद, यशस्वी, पुत्र देणारें, आयुष्य वाढविणारें व विजय करणारें आहे. हें सर्वांनीं ऐकावें. हें देवादिकांचें अंशावतरण ऐकिलें असतां, त्यांचे उदयास्त कसे होतात, यांचें ज्ञान झाल्यामुळें संकटकालींही मनुष्यांचें अवसान खचत नाहीं.

अध्याय अडुसष्टावा.

—:०:—

दुष्यंतवर्णन.

जनमेजय विचारतोः—भगवन्, हे द्विजश्रेष्ठ ! आपण मला या विप्रमंडळीच्यासह देवदानवगंधर्वाप्सरादिकांचें अंशावतरण कृपा करून सांगितलें, तें ऐकून मी धन्य झालों. आतां पुनः अशी इच्छा आहे कीं, कुरुवंशाची उत्पत्ति प्रथमपासून ऐकावी. आपण मला हा वृत्तांत कृपा करून सांगावा.

वैशंपायन म्हणतातः--राजा ! ऐकः पौरवकुळाचा आदिस्थापक दुष्यंत नांवाचा वीर्यशाली राजा होता. हा समुद्रापर्यंत चाऱ्ही दिशांस पसरलेल्या सर्व पृथ्वीचें परिपालन करीत असे. पृथ्वीच्या चारही भागांचा हा उपभोग घेई, व तसेंच समुद्राच्या कांठीं असलेल्या देशांवरही या समरविजयी राजाचें स्वामित्व असे. हा शत्रुविनाशक राजा ब्राह्मणादि चार वर्ण जेथें राहतात त्या समुद्रगामी प्रदेशावर म्हणजे म्लेच्छ लोकांचे देशांच्या सीमेपर्यंतच्या प्रदेशावर, प्रभुत्वानें राज्य करी. हा राजा राज्य करीत असतां, वर्णसंकर करणारे, कृषिकर्म अगर पृथ्वीचा छल करून तिच्यापासून फलप्राप्ति इच्छिणारे (खाणीचें काम करणारे) व पापकर्म करणारे लोक मुळींच नसत. प्रजेची धर्मावर उत्तम प्रकारची निष्ठा असल्यामुळें या राजाच्या कारकीर्दींत प्रजेला धर्म आणि अर्थ यांची प्राप्ति सहज होई. सारांश, धर्मावर निष्ठा असली म्हणजे प्रपंच साधून परमार्थाचा लाभ सहज होतो. त्या वेळीं चोरांचें अथवा क्षुधेचें किंवा रोगांचें भय बिलकूल नव्हतें. स्वधर्मावर पूर्ण निष्ठा व देवसंबधी कर्म करीत असतां यज्ञयागादिकांचे वेळीं

कर्त्याचा पूर्ण निष्कामीपणा या राजाच्या अमदानींत सर्वांशांनीं दृष्टीस पडे; कारण सर्वत्र भयशून्यता झालेली होती. पर्जन्य योग्यकाळीं वर्षे आणि धान्येंही उत्तम रसवंत होत. पृथ्वीवर सर्व प्रकारचीं रत्नें व सर्व प्रकारचे पशु असत. ब्राह्मण हे आपल्या धर्मामध्यें गढून गेलेले असत म्हणजे स्वकर्मनिष्ठ असत. असत्य भाषण त्यांस स्वप्नांतही विदित नसे. राजा दुष्यंताचा प्रताप अद्भुत व शरीर वज्रासारखें दृढ असे. हा तरुण राजा पाहिला असतां असें वाटे कीं, आपल्या दोर्दंडांवर सगळ्या वृक्षसृष्टीसकट मंदर पर्वत घेऊन हा लीलेनें सहज निघून जाईल !

असो; चारही प्रकारच्या गदायुद्धामध्यें व शस्त्रविद्येमध्यें हा प्रवीण असे. गदा फेंकणें, मारणें, दस्त्यानें ढोंसणें आणि स्वसंरक्षणार्थ स्वतांभोंवतीं फिरविणें ह्या चारी रीति त्यास पूर्ण अवगत होत्या. हत्तीवर अथवा घोड्यावर बसण्यांत याची मांड बिनतोड होती. हा राजा बळानें विष्णूसारखा, तेजानें सूर्यासारखा, शांतीमध्यें व मर्यादापरिपालनांत समुद्रासारखा, आणि सहनशीलतेमध्यें पृथ्वीसारखा होता. हा राजा लोकप्रिय असल्या कारणानें याच्यावर लोकांची निष्ठा असे. याच्या राज्यांतील सर्व लोक व सर्व नगरें आनंदित असत. पुनः, हा सद्धर्मप्रवर्तक असल्यामुळें लोकांस धर्ममार्गानें माव जाण्याची प्रेरणा वारंवार करी, व लोकांसही या राजाचें शासन उन्नतिकारक आहे, असें वाटे; आणि वस्तुस्थितिही तशीच होती.

अध्याय एकुणसत्तरावा.

—:०:—

दुष्यंताची मृगया.

जनमेजय विचारतोः—महाराज ! हे तत्त्वज्ञश्रेष्ठ ! बुद्धिमान भरताची उत्पत्ति कशी झाली, त्याचें चरित्र काय, आणि शकुंतलेच्या उत्पत्तीचा वृत्तांत काय, हें ऐकण्याची मला इच्छा आहे. त्याचप्रमाणें, वीर दुष्यंताला शकुंतला कशी प्राप्त झाली, व दुष्यंताची ही हकीकत सविस्तर कशी काय आहे, तेंही मला कृपा करून सांगावें.

वैशंपायन सांगतातः—राजा, ऐक. एकदा हा चतुरंग सेनेचा स्वामी आजानुबाहु राजा दुष्यंत हजारों हत्ती व घोडे बरोबर घेऊन एका मोठ्या घोर अरण्यांत गेला. त्याच्या बरोबर अत्यंत रमणीय असा चतुरंग सेनासंभार चालला होता. स्वारीच्या मागें व पुढें हजारों योद्धे चालत होते. कोणी खड्ग घेतलेले, कोणी शक्ति घेतलेले वीर, त्याचप्रमाणें गदा, मुसळ, प्रास, तोमर इत्यादि शस्त्रें धारण केलेले योद्धे मोठ्या समारंभानें चालले होते. हें समुद्रप्राय सैन्य चाललें असतां योद्ध्यांचा सिंहनाद, शंख, दुंदुभि यांचे कानठळ्या बसविणारे युद्धप्रेरक भयंकर शब्द, रथांचा घडघटाट, पर्वतप्राय अशा गजवरांचें ओरडणें, घोड्यांचें खिंकाळणें, अनेक तऱ्हेच्या युद्धप्रसाधनांनीं सज्ज झालेल्या विचित्र शस्त्रधारी वीरांचें दंड थोपटणें, व युद्धांतील 'हर-हर महादेव' यासारख्या सांकेतिक गर्जना, या सर्वांच्या योगानें, स्वारी निघाली असतां मोठा कलकल शब्द झाला ! हा रणगंभीर शब्द ऐकून आपापल्या मोठमोठ्या प्रासादांच्या गच्चांवर स्त्रियांचे थवेचे थवे स्वारी पाहण्यासाठीं जमले. त्यांनीं राजशोभाविभूषित दुष्यंताला—ह्या शूर आणि स्वतांची व स्वतांच्या राष्ट्राची कीर्ति वाढविणाऱ्या इंद्रतुल्य शत्रुसिंहाला—मोठ्या प्रेमानें पाहिलें. 'हा पुरुषव्याघ्र, हा वसूसारखा पराक्रमी, याच्या बाहुबलाशीं गांठ पडली असतां शत्रु नाहींतसे होतात' इत्यादि प्रकारानें प्रेमपूर्वक व अभिमानपुरःसर ह्या स्त्रिया आपल्या राजाची स्तुति करीत होत्या, व राजाच्या मस्तकावर पुष्पवृष्टि करीत होत्या. स्तुति ऐकून व पूजा पाहून राजास मोठा संतोष झाला. स्वारी निघण्याचे वेळीं ब्राह्मणश्रेष्ठांनीं राजास मंगलकारक आशीर्वाद देऊन

त्याची स्तुतिही केली. ब्राह्मणांचे आशीर्वाद घेऊन राजा मृगया करण्याच्या इच्छेनें मत्त गजाच्या स्कंधावर बसून नगरीच्या बाहेर पडला; तेव्हां इंद्रासारख्या त्या पराक्रमी राजाच्या सत्कारार्थ मागोमाग जाणारे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चारही वर्णांचे लोक प्रतिक्षणीं वाढत होते. ब्राह्मणांनीं आशीर्वाद दिले, व इतरांनीं 'जय' शब्दाची लाखोली वाहिली. बरेच लांब लोक आले आहेत असें पाहून राजानें त्यांस 'परत मागें फिरा' अशी अनुज्ञा दिली. नंतर, गरुडासारख्या वेगानें चालणाऱ्या रथांत बसून राजा चालला, तेव्हां त्याच्या रथघोषानें पृथ्वी आणि स्वर्ग हीं दुमदुमून गेलीं. असो; स्वारी चालली असतां त्या बुद्धिवान राजाला एक नंदनतुल्य रमणीय वन वाटेंत लागलें. येथें बेल, रुई, खैर, कवठ, धव इत्यादि वृक्षांनीं गर्दी करून सोडिली होती. पर्वतावरून सुटून आलेले हजारों दगड तेथें पसरले असल्यामुळें जाण्यायेण्याला अवघड झालें होतें. हें वन पुष्कळ कोसभर पसरलेलें असून येथें पाणी अगर मनुष्य कांहींएक दिसत नव्हतें. येथें मृग, सिंह आणि इतर हजारों वनचर संचार करीत होते. आपले सेवक व सैन्य घेऊन वाहनस्थ राजा या वनांत शिरला,आणि अनेक मृग मारून सर्व वन त्यानें पालथें घातलें. बाणांच्या टप्प्यांत आलेले अनेक व्याघ्रगण त्या राजानें शरसंधान करून विव्हळ केले; आणि जमिनीवर पाडले; दूर असलेले कित्येक जखमी केले; अतिशय समीप आलेल्यांस त्यानें तरवारीनें तोडून टाकिलें; व त्या बलश्रेष्ठ राजानें कित्येक हरिण मारले. गदा फिरविण्यामध्यें पटाईत असलेला तो राजा वनभर फिरला, आणि तोमर व असि घेऊन आणि गदा, मुसळ, कंपन इत्यादिकांच्या साहाय्यानं त्यानें हजारों वन्य मृग व पक्षी ठार केले. याप्रमाणें तो अतुलपराक्रमी राजा आणि त्याचे संगरप्रिय योद्धे सर्व अरण्यभर फिरत आहेत असें पाहून मृगपति तें अरण्य सोडून पळत सुटले. आपले पुढारी नष्ट झाले व आपले कळप विस्कळित झाले, हें पाहून सर्व मृगांनीं कावरेबावरेपणानें ओरडण्यास आरंभ केला. नद्यांस पाणी नाहीं म्हणून निराशेनें थकलेले व पळण्याच्या धांदलीनें मोठ्यानें श्वासोच्छ्वास करणारे हे मरणोन्मुख मृग धडाधड जमिनीवर पडले. तहानभुकेनें जर्जर होऊन ते जे तेथें पडले, तेथून उठण्याची त्यांस शक्ति नव्हती. पुढें त्यांस कित्येक बुभुक्षित सैनिकांनीं तसेंच खाऊन टाकिलें. कित्येकांस अग्निसंस्कार देऊन कुटून वनचरांनीं खाल्लें. इकडे कित्येक मदोन्मत्त व बळकट हत्ती शस्त्रांनीं घायाळ झाले होते, ते आपल्या सोंडा संकुचित करून जिवाच्या भीतीनें पळत असतां वाटेनें देहधर्म करीत व रक्त सांडत जात होते. पण कांहीं वन्यगजश्रेष्ठांनीं मनुष्यांशीं गांठी घालून त्यांस पायांखालीं तुडविलें!

असो; याप्रमाणें तें वन सैन्यरूपी मेघांनीं सोडलेल्या शरधारांनीं सुशोभित दिसूं लागलें. यूथनायक मेल्यामुळें मृग सर्वत्र सैरावैरा धावपळ करीत होते, त्यामुळेंही त्या भयंकर वनाला रमणीय शोभा आली होती!

अध्याय सत्तरावा.

—:०:—

वनश्रीवर्णन.

वैशंपायन सांगतातः—राजा, याप्रमाणें हजारों मृगांचा नाश करून तो राजा सेवक, सैन्य आणि वाहनें यांसह मृगयानिमित्तानें दुसऱ्या वनांत शिरला. जातां जातां हा अद्वितीय बलाचा राजा तहानभुकेनें व्याकुळ होत्साता वनाच्या शेवटीं एक मोठें ओसाड अरण्य होतें त्यांत प्रविष्ट झाला. तेंही ओलांडून तो राजा पुढें गेला, तों उत्तम आश्रम असलेलें, मनाला आल्हाद देणारें व दृष्टीला आकर्षित करणारें असें एक रमणीय वन त्याच्या

दृष्टीस पडलें. येथें मंद व शीतल असा वायु वाहत होता. येथील घनदाट वृक्षांस सुगंध पुष्पें असल्यामुळें मनोहर सुवास सर्वत्र पसरला होता, आणि येथें उगवलेलें मऊ गवतही सुंदर दिसत होतें. जेथें झिल्ली नामक कीटकांचा मधुर शब्द ऐकूं येत आहे, कोकिल आपल्या मधुर स्वरानें सर्व वन आनंदित करिताहेत, अनेक पक्षी आपआपल्या गोड आवाजांनीं वनचर प्राण्यांस तल्लीन करून सोडीत आहेत, मोठमोठ्या जुनाट वृक्षांनीं आपल्या विस्तीर्ण शाखा पांथस्थांस स्वागतपर छायासुख देण्यासाठीं सभोंवार पसरल्या आहेत, भृंगांचा गुंजारव चाललाच आहे, वनश्री आपलें सर्व ऐश्वर्य पसरून उभी राहिली आहे, सर्व वृक्षराजी पुष्पफलांनीं भारावून गेली आहे, त्यांच्या सुवासाला लुब्ध झालेल्या भ्रमरांची गर्दी झाल्यामुळें सर्व वनाला मेघःशामत्व आलें आहे, कांट्यांचें अथवा कांटेरी झाडांचें नांवही नाहीं; त्याचप्रमाणें, पक्ष्यांचा मनोवेधक तारस्वर, प्रशस्त छाया देणाऱ्या वृक्षांस सर्व ऋतूंतील पुष्पांनीं आलेली विलक्षण शोभा, अतिथिअभ्यागतांस शिष्ट वायूच्या प्रेरणेनें स्वागतपर झालेली प्रतिक्षणींची पुष्पवृष्टि, गगनचुंबित वृक्षांनीं केलेले चित्ताकर्षक विचित्र पुष्पांचे रमणीय पोषाक, नूतन पल्लवांनीं व पुष्पभारांनीं विनम्र झालेल्या शाखांवरील मधुमत्त भ्रमरांचा गुंजारव व पुष्पांचा सडा झालेला तो भूप्रदेश, आणि मनाची प्रीति वाढविणारे लतामंडप व परस्परांस शाखाबाहूंनीं आलिंगन देणारे अनेक वृक्ष जेथें विपुल आहेत, अशा त्या मनोरम वनोद्यानांत शिरल्यानंतर राजाला अत्यंत संतोष झाला. येथें सिद्ध, चारण, गंधर्व अप्सरा इत्यादिकांची वसति असलीच पाहिजे, असा त्याचा ग्रह झाला व तो खराच होता. कारण, महेंद्राच्या ध्वजाइतके उंच असे हजारों वृक्ष येथें होते, आणि मत्त वानर व किन्नरही विपुल होते. येथील वायुही थंड, सुखकर आणि पुष्पपरागांनीं सुगंधित झाल्यामुळें तेथील मनोहर वृक्षपंक्तीला प्रेमभरानें भेटण्यासच येतो कीं काय असा भास होई!

कण्वाश्रमदर्शन.

असो; याप्रमाणें नदीतटाकावर असणाऱ्या त्या अत्युच्च व अति रमणीय वनाची शोभा पाहून दुष्यंत राजाला फारच आल्हाद झाला; आणि तो पुढें जातो तों रम्य, मनोहर आणि आनंदित विहंगांच्या कलकलाटानें नादित झालेला असा एक श्रेष्ठ आश्रम त्याच्या दृष्टीस पडला. त्या आश्रमाभोंवतीं अनेक वृक्षांच्या रांगा दिसत होत्या; तसेंच तेथें अग्निही प्रज्वलित झाले आहेत, असें दिसलें. तेव्हां त्या राजानें त्या लोकोत्तर आश्रमाला विधिपूर्वक नमस्कार करून त्याची पूजा केली. या आश्रमांत संन्यासी, वालखिल्य ऋषि, अनेक मुनिगण, व अनेक अग्निशाला दिसत असून सर्व भूप्रदेशावर पुष्पांचीं आसनें घातलींशीं दिसत होतीं; तसेंच महाकच्छ नांवाच्या तुंग व पुष्ट वृक्षांनीं त्या आश्रमाला विलक्षण शोभा आली होती. त्या आश्रमाच्या समीपच, आश्रमप्रदेशाच्या मधूनच मालिनी नदी वाहत होती. तिचें उदक स्वच्छ, सुखकर आणि पथ्यकर होतें. त्या नदीच्या तीरावर पक्ष्यांचे थवेचे थवे बसलेले दिसत होते. येथील तपोवनामुळेंही या नदीला मनोहरत्व आलें होतें. तेथें सर्प आणि पक्षी एकाच ठिकाणीं सौम्यपणानें खेळतांना पाहून राजाला पराकाष्ठेचें कौतुक आणि प्रेमाचा आनंद झाला; असो.

राजा जनमेजया, असा हा देवलोकाप्रमाणें तेजस्वी आणि सर्व दिशांनीं मनोहर व शोभायमान आश्रम पाहून तो श्रीमान व शूर राजा तिकडेसच जावयास निघाला. जातांना, आश्रमाला आलिंगन देऊन जाणारी ती मालिनी नदी त्यानें पाहिली. तिचें तें स्वच्छ जल आणि

शांत व मनोहर स्वरूप पाहून, ही नदी म्हणजे येथील प्राण्यांची मातुःश्रीच आहे कीं काय, असा त्यास भास झाला. तिच्या वाळवंटावर चक्रवाक पक्ष्यांची गर्दी झाली असल्यामुळें चक्रवाकांचेंच वाळवंट झालें होतें. तसेंच, तिच्या लाटांवरील फेंस म्हणजे हजारों पुष्पें झालीं होतीं. येथें किन्नरगण, वानर, अस्वलें, मत्त हत्ती व मोठमोठे नाग यांची रेलचेल होती. हिच्या तीरावर पवित्र वेदांचा घोष चालला होता. येथेंच महात्म्या भगवान काश्यपकुलपतींचा मनोहर व महर्षींनीं गजबजलेला असा श्रेष्ठ आश्रम होता. हा आश्रमप्रदेश व त्या जवळची ती नदी पाहून राजाचें चित्त शांत झालें, आणि त्यानें त्या आश्रमांत प्रवेश करण्याचा विचार केला. जिचा तीरप्रदेश रम्य आहे अशा त्या द्वीपवती मालिनी नदीनें त्या आश्रमाला पुष्कळ शोभा आणिली होती. श्रीगंगा नरनारायणांचें स्थान सुशोभित करिते, तशीच ही नदी श्रीकण्व मुनींच्या आश्रमाला शोभा देत होती. श्रीकुबेराच्या वनाप्रमाणें अति सुंदर असणाऱ्या व मत्त मयूरांच्या आरवांनीं नादावून गेलेल्या या रमणीय वनांतील पवित्र व पुण्यशील आश्रमाकडे जाण्याला राजा निघाला, तेव्हां काश्यपकुलोत्पन्न कण्व महामुनींचें–त्या अत्यंत गुणसंपन्न व विलक्षण तेजस्वी तपोधनाचें–दर्शन घेऊन धन्य व्हावयाचें असा संकल्प करून निघाला. अर्थातच त्यानें आपली अश्व, रथ, गज, व पदाति यांनीं युक्त अशी चतुरंग सेना वनद्वारावर ठेवली आणि म्हटलें, "सेनापते ! महाशांत, महाविरागी आणि महापवित्र काश्यपकुलोत्पन्न श्रीकण्व तपोधनाच्या दर्शनाकरितां मी जात आहें; तेव्हां मी दर्शन घेऊन परत येईपर्यंत तुम्ही येथेंच असा."

राजा, असें सांगून तो राजा त्या नंदनतुल्य वनांत उपाध्यायासह शिरल्याबरोबर त्याची सर्व तहानभूक हरून गेली ! व त्याला अतिशय आनंद झाला. अमात्यांसह त्या राजानें आपलीं सर्व राजभूषणें अगोदरच काढून ठेविलीं होतीं; कारण, राजा दुष्यंताला त्या तपोराजाचें—त्या निर्विकल्प महामुनि कण्वाचें—दर्शन घेण्याची अत्यंत लालसा उत्पन्न झाली होती; असो.

आश्रमप्रवेश.

ब्रह्मलोकाप्रमाणें देदीप्यमान, व भ्रमरांच्या गुंजारवानें नादित झालेल्या त्या आश्रमप्रदेशांत शिरतांक्षणींच तेथील अनेक खग, मृग त्याच्या दृष्टीस पडले. तसेंच, तेथें अनेक वेदोनारायणप्रभृति द्विजगण पदक्रमांसह ऋग्वेदीय मंत्रांचें पठन करीत आहेत, इष्टि, सोम, पशु इत्यादि यज्ञकर्मांमध्यें गढून गेलेले यजुर्वेदवेत्ते अनेक महाब्राह्मण कल्पसूत्रादिकांचे पाठ देत असल्यामुळें सर्व आश्रमाला शोभा आली आहे, व्रतस्थ राहिलेल्या ऋषींच्या सामवेदीय मधुर गीतांनीं सर्व आश्रमभर नादब्रह्मच अवतीर्ण झालें आहे, भारुंड (पूगयज्ञीय) सामांच्या व अथर्ववेदीय मंत्रांच्या उच्चारानें सर्वत्र पवित्रता देवी संचार करीत आहे, व्रतस्थ व मनोनिग्रही ब्राह्मणांच्या तपस्तेजानें आश्रमाला पूर्ण सात्त्विकता प्राप्त झाली आहे, व अथर्ववेदाचे व भारुंडसामांचे मंत्र पदक्रमांसह उदात्तानुदात्तादिसंस्कारपूर्वक उच्चारिले जात आहेत, असा तो शब्दब्रह्माचा मनोहर घोष ऐकून त्या राजाला वाटलें कीं, हा दुसरा ब्रह्मलोकच आहे कीं काय ? इष्टकोपाधान, यज्ञवेदि इत्यादि कर्मांच्या क्रमामध्यें निपुण, तसेंच क्रम, शिक्षा यांत पंडित, न्यायतत्त्वें आणि आत्मविज्ञान (अध्यात्मविद्या) यांनीं संपन्न, वेदपारंगत, एकाच शाखेंतील अनेक वाक्यांचा समाहार आणि अनेक शाखांतर्गत असलेल्या गुणविधींचा एका शाखेंत समवाय करण्यामध्यें विशारद, सगुण उपासनेमध्यें विद्वान व मोक्षधर्मामध्यें पंडित; त्याचप्रमाणें प्रतिज्ञा, शंका, सिद्धांतमंडन इत्यादिकांच्या साहाय्यानें परमार्थ जाणणारे, व्याकरण, छंद, निरुक्त

ह्या शास्त्रांमध्यें पारंगत, उत्तम ज्योतिषी, द्रव्य, गुण आणि कर्म यांची व्यवस्था पूर्णत्वानें जाणणारे, कार्यकारणनियमांचे पूर्ण ज्ञाते, पक्षी, वानर इत्यादिकांचें व मंत्रादि अव्यक्त वाक्यांचें रहस्य पूर्णतः जाणणारे, संकलित ग्रंथांचें मर्म समजणारे, आणि नानाशास्त्रांचे विधिपूर्वक आलोडन करून त्यावर प्रामाणिकपणानें बोलणारे अशा हजारों ऋषींचा जो चित्ताकर्षक गजर चालला होता, व नास्तिकपंथांच्या मुख्यांनीं केलेल्या वादापवादांची ज्यांत भर पडत होती, तो मधुर संमीलित स्वर राजाचे कानीं पडला! त्या शत्रुवीरनाशक राजाला जिकड तिकडे विरक्तच व स्वच्छाचरणाचे असे विप्रश्रेष्ठ जपहोमांमध्यें गढून गेलेले दिसत होते. त्यांची तीं विचित्र, मनोहर आणि प्रयत्नसंपादित आसनें पाहून राजाला अतिशय साश्चर्यकौतुक वाटलें. तेथील देवतांची पूजा ब्राह्मण करीत आहेत हेंही त्यानें पाहिलें. हा सर्व अपूर्व देखावा पाहून, आपण ब्रह्मलोकांतच आलों कीं काय, अशी त्याला वारंवार भ्रांति झाली! असो.

जनमेजया, काश्यपांच्या तपानें संरक्षित असलेला पुण्यशील व तपोवनास योग्य असणाऱ्या गुणांनीं युक्त असा तो आश्रम कित्येक घटकांपर्यंत त्यानें पाहिला, तरी त्याची तृप्ति होईना. नंतर तो शत्रुहंता दुष्यंत राजा आपले अमात्य व पुरोहित यांस बरोबर घेऊन त्या कश्यपकुलोत्पन्न कण्व मुनींच्या निर्दोष, मंगलकारक, अत्यंत मनोहर, आणि सभोंवार तपोधनात्मक ऋषींनीं गजबजून गेलेल्या आश्रमामध्यें प्रविष्ट झाला.

अध्याय एकाहत्तरावा.

—:०:—

शकुंतलादर्शन.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, तदनंतर तो आजानुबाहु राजा अमात्यादिकांस मागें ठेवून आपण एकटाच पुढें गेला, तों त्यास ते पुण्यश्लोक कण्व मुनि कोठें दिसेनात. आश्रमांत कोणी नाहीं, शून्य आहे, असें पाहून ' येथें कोणी आहे काय ? ' अशी गर्जना करून त्या राजानें विचारलें. हा त्या राजाचा महाशब्द ऐकून, मूर्तिमंत लक्ष्मीच कीं काय, अशी एक तापसी वेष धारण करणारी कन्या आश्रमांतून बाहेर आली. राजाला पाहिल्याबरोबर ' आपलें स्वागत असो ' असें शिष्ट स्वरानें म्हणून त्या कृष्णनयनेनें त्याची आसन, पाद्य, अर्घ्य इत्यादिकांनीं पूजा केली; आणि ' आपलें अनामय राष्ट्र क्षेम आहेना ? कुशल आहेना ? ' असें ममत्वपूर्वक विचारिलें. नंतर स्मितहास्य करून ' काय आज्ञा आहे ? ' असाही कुलीन कुमारीजनांस उचित असा प्रश्न केला.

राजा जनमेजया, त्या सर्वांगसुंदरीचा तो मधुर भाषेनें उच्चारिलेला प्रश्न ऐकून, व आतिथ्यपूजेचें सर्वस्व हिला माहित आहे असें पाहून, त्या राजाला कौतुक वाटलें, आणि तो म्हणाला, " महाभाग कण्व ऋषि यांचें दर्शन घेण्याकरितां व त्यांची सेवा करण्याकरितां मी आलों आहें. हे भद्रे ! ते कोठें बरें गेले आहेत ? हे सुंदरी ! तूं मला कृपा करून सांगशील काय ? "

शकुंतला म्हणालीः—माझे बाबा फळें आणण्यासाठीं बाहेर गेले आहेत. आपण एक घटकाभर थांबाल तर ते आपल्यास येथेंच भेटतील.

वैशंपायन सांगतातः—राजा, आश्रमांत ऋषि नाहींत व ही मुलगीही तेंच सांगते हें पाहून व ऐकून राजा क्षणभर स्तब्ध राहिला, तों रूपसुंदर, तेजस्वी, व हास्यवदन अशा चारुगात्रीच्या नैसर्गिक अंगकांतीला तपस्तेजाची व इंद्रियनिग्रही ब्रह्मचर्यतेजाची भर पडल्या कारणानें अत्यंत तेजस्वी दिसत असलेलें तिचें सर्वांगसुंदर स्वरूप त्याच्या दृष्टीस पडलें! नंतर त्या रूपयौवनसंपन्न कुलीन कन्येला दुष्यंत राजानें प्रश्न केला, "मुली, हे सिंहकटि ! तूं कोण ? कोणाची ?

तुला वनांत येण्याचें कारण काय ? असें हें तुझें अद्वितीय लावण्य या वनांतील तपश्चर्येला योग्य नव्हे. सुंदरी ! नुसतें तुला एकदा पाहिल्याबरोबर माझें मन मला सोडून तुझें दास झालें ! याकरितां, तूं कोण आहेस हें समजण्याची मला भारी उत्कंठा झाली आहे, तेव्हां सांग लवकर."

राजाचें हें भाषण ऐकून ती हसत हसतच मधुर स्वरानें बोलली:—राजा ! भगवान कण्व ऋषींची मी कन्या आहें. ते महातपस्वी, महाबुद्धिवंत, धर्मवेत्ते आणि उदार मनाचे आहेत हें सर्वविश्रुतच आहे.

दुष्यंत म्हणतो:—सुंदरी, सर्ववंद्य भगवान कण्व ऋषि हे ब्रह्मचारी आहेत हें मला विदित आहे. प्रत्यक्ष धर्मही आपल्या व्रतापासून च्युत होईल, पण सद्धर्मापासून कण्व मुनि कधींही परावृत्त होणार नाहींत. तेव्हां, हे वरारोहे, त्यांची कन्या तूं कशी होशील ? हें कांहीं जुळत नाहीं. माझें मन संशयक्रांत झालें आहे. कृपा करून माझा संशय दूर कर.

शकुंतलाजन्मवृत्तकथन.

(मेनकेचें विश्वामित्रांकडे आगमन.)

शकुंतला म्हणाली:—महाराज ! मी कण्व मुनींची कन्यका कशी झालें, यासंबंधानें झालेलें वर्तमान जसें मला वडिलांच्या तोंडून ऐकावयास मिळालें, तसेंच मी आपल्याला सांगतें; ऐकावें. एकदा, भगवान कण्व बाबांकडे कोणी ऋषि भेटावयास आले होते, त्यांनीं बाबांस विचारिलें, 'ही तुमची मुलगी कशी ?' तेव्हां बाबांनीं जें त्यांना सांगितलें, तेंच आतां मी आपणांस सांगतें.

कण्व बाबा म्हणाले, "कांहीं वर्षांचे पूर्वी विश्वामित्र ऋषींनीं अति उग्र व खडतर तपश्चर्या आरंभिली. ती पाहून, देवांचा स्वामी इंद्र याला भारी तळमळ लागली कीं, ह्या उग्र तपश्चर्येनें विश्वामित्र अत्यंत सामर्थ्यवान होऊन मला माझ्या स्थानापासून पदच्युत करील कीं काय ? ह्याप्रमाणें तळमळणाऱ्या त्या इंद्रानें मेनकेला बोलाविलें आणि सांगितलें, "मेनके ! आपल्या स्वतांच्या दिव्य गुणांनीं तूं सर्व अप्सरांमध्यें श्रेष्ठ आहेस.म्हणून माझें हित करण्याचें सामर्थ्य तुला सहजच आलें आहे.हे कल्याणी,मी सांगतों एवढें काम कर. हा पहा सूर्याप्रमाणें प्रखर तेजाचा विश्वामित्र महातपश्चर्या करीत आहे; यामुळें माझ्या मनाला भीति उत्पन्न होऊन तें कांपावयास लागलें आहे. हा शुद्ध आचरणाचा विश्वामित्र तुझ्याशिवाय कोणासही बधावयाचा नाहीं. तेव्हां तूं जा, आणि त्याच्या मनांत विषयवासना उत्पन्न कर; म्हणजे त्याच्या त्या उग्र तपश्चर्येची राखरांगोळी होईल व मीही पदच्युत होणार नाहीं. ह्या कामाचा भार तुजवरच घातला पाहिजे. सुंदरी ! विश्वामित्राच्या तपश्चर्येला विघ्न केलेंस म्हणजे माझें पद अविघ्न झालेंच समज. आपलें रूप, यौवन, माधुर्य, चेष्टा, स्मितहास्य, मधुर भाषणें इत्यादिकांनीं त्याला मोहित करून तूं त्याची तपश्चर्या जाळून टाक ! "

" मेनका म्हणते:—महाराज ! विश्वामित्र अगोदरच महातेजस्वी; त्यांत त्याची ती उग्र तपश्चर्या चाललेली आहेना ? शिवाय, हा मुनि महाकोपिष्ट आहे हें आपल्यासही विदित आहेच. महाराज ! ज्याचें तेज, ज्याचें तप, आणि ज्याचा प्रकोप हीं आपल्याही मनांत जर पराकाष्ठेची भीति उत्पन्न करितात, तर, भगवन्, माझ्यासारख्या अबलेला तर भयानें मूर्छाच येईल यांत काय नवल ? ज्या विश्वामित्रानें महाभाग वसिष्ठ ऋषीचे प्रियपुत्र मारिले, जो जातीचा क्षत्रिय परंतु स्वतपोबलानें ब्राह्मण झाला, ज्यानें केवळ स्नानपानांकरितां स्वतांच्या सामर्थ्यानें ती प्रसिद्ध व पावनकारी कौशिका नदी दुर्गम केली, म्हणजे ती पुष्कळ उदक धारण करील इतकी खोल केली, त्याचा पराक्रम पाहून मी तर गांगरूनच जाईन. महाराज ! आपल्याला विदितच आहे

कीं, पूर्वी एकदा मोठा दुष्काळ पडला होता; तेव्हां पित्याच्या क्रोधामुळें मातंगत्व पावलेल्या राजा त्रिशंकूनें विश्वामित्र बाहेर गेले असल्यामुळें या ऋषीच्या कुटुंबाचें पोषण केलें. पुढें दुष्काळ आटोपल्यावर या मुनीची स्वारी परत आली. तेव्हां ह्या मातंगाच्या उपकाराचें स्वरूप त्यांना समजलें; तेव्हां प्रसन्न होऊन त्यांनीं त्या मातंगाकडूनच एक याग करविला. त्या वेळीं आपण सुद्धां विश्वामित्र ऋषीच्या भयानें सोमपान करण्यास गेलां होतां. कौशिकी नदीला 'पारा' हें नांव त्याच वेळीं मिळालें! ह्याच ऋषीला क्रोध आला तेव्हां प्रतिश्रवणादि नक्षत्रांसह यानें निराळाच एक लोक उत्पन्न केला हें आपण विसरलां नसालच. बापाला राग येण्यासारखा त्याचा अपमान, गोहत्या, आणि गोमांसभक्षण हीं तीन बाणासारखीं टोचणारीं महापातकें ज्याच्या हातून झालीं म्हणून ज्याला 'त्रिशंकु' हें नांव मिळालें, त्याला–त्या महापातक्याला–सुद्धां ज्यानें तारणाचा मार्ग दाखवून त्याचें संरक्षण केलें, त्या महात्म्या व महापराक्रमी आणि महातामसी विश्वामित्राला मी अबला भितें याचें नवल नाहीं! ह्या महाभागाची हीं असलीं भीति उत्पन्न करणारीं कर्में असल्यामुळें, तो रागावेल व मला जिवंत जाळून टाकील! तेव्हां असें कर्म मला आपण सांगू नये. त्याचा राग होणार नाहीं असें मला वाटेल तें काम सांगा. महाराज! हा ऋषि आपल्या तेजानें सर्व त्रैलोक्य जाळून भस्म करील, पायानें सर्व धरणी हालवून सोडील, महामेरूचा चुराडा करील, आणि एका क्षणांत सर्व दिशांस एकवट करील, असें याचें सामर्थ्य आहे. अशा अग्नीप्रमाणें तेजःपुंज व मनोनिग्रही तपस्व्याला माझ्यासारख्या पापी अबलेनें कसा बरें स्पर्श करावा? हे देवेश! अग्नि हें ज्याचें मुख, सूर्यचंद्र हीं ज्याच्या डोळ्यांतील बुबुळें, कृतांत हीच ज्याची जिव्हा, त्या महाभागाला माझ्यासारख्या शलभभूत स्त्रीनें स्पर्श करण्याचा अवकाश, कीं जळून खाक होणार! यम, सोम, महर्षि साध्य, सर्व वालखिल्य हे सुद्धां ज्याच्या प्रभावाला पाहून भयानें गर्भगळित होतात, तेथें माझ्यासारख्या स्त्रीचा काय पाड? सुरेंद्रा! आपण आज्ञा केलीच आहे, तेव्हां 'मी जात नाहीं' असें तरी कसें म्हणूं? महाराज! हें कर्तव्य करीत असतां माझें संरक्षण होईल असा उपाय काढा, म्हणजे आपल्या आश्रयानें मला त्या ऋषीजवळ सुखानें जातां येईल. महाराज! मी तेथें जाऊन नृत्यादि लीलांस आरंभ केला म्हणजे वायूनें माझें नेसलेलें वस्त्र सोडून दूर फेकून द्यावें, आणि आपल्या अनुज्ञेनें मन्मथ देवानें माझें सर्व प्रकारें साहाय्य करावें. जेथें विश्वामित्र तप करीत आहेत, आणि जेथें त्यांस मोह घालण्याकरितां मी जाणार आहें, तेथल्या वनांतून सुगंध आणि उन्मत्त करणारा वायु वाहण्यास प्रारंभ व्हावा, इतकीच माझी विनंती आहे.

" मेनकेचें हें भाषण श्रवण करून इंद्रानें 'बरें' असें म्हटलें, व कामदेवतेस व वायुदेवतेस तिच्या दिमतीस दिलें. तेव्हां ती रूपसुंदरी कामवायूंसह कौशिकाश्रमास गेली."

अध्याय बहात्तरावा.

—:०:—

शकुंतलाजन्मवृत्तकथन.

(शकुंतलाजन्म).

कण्व म्हणतातः—याप्रमाणें शक्राज्ञेनें मेनकादेवी वायूसह निघाली म्हणून सांगितलेंच आहे. ती रूपसुंदरी वरारोहा भीतभीतच आश्रमाजवळ आली, तों तपानें सबाह्यांतर शुद्ध झालेले विश्वामित्र ऋषि आश्रमांत तपःसंग्रह करीत आहेत, असें तिच्या दृष्टीस पडलें. नंतर त्या महर्षीला तिनें दुरूनच नमस्कार केला, आणि ऋषीसमोरच ज-

जलक्रीडा करण्यास तिनें आरंभ केला. इतक्यांत तिचें तें कांठावर ठेवलेलें चंद्रासारखें उज्ज्वल वस्त्र वाऱ्यानें उडविण्यास आरंभ केला. तेव्हां जणू काय तें वस्त्र घेण्यासाठींच त्या रूपसुंदरीनें लगबगीनेंच जलाशयांतून बाहेर येण्यासाठीं धाव मारली ! नग्नस्थितींत बाहेर यावें लागल्यामुळें तिला साहजिकतांच व संकल्पाप्रमाणें मनोहर लज्जा उत्पन्न होऊन तिनें चित्तवेधक स्मित केलें. हा सर्व चमत्कार त्या अग्नितुल्य विश्वामित्र ऋषींच्या देखतच होत होता. त्या महात्म्यानें ह्या संकटांत सांपडलेल्या, शुद्ध, वस्त्र धरण्याच्या गडबडींत असलेल्या, परंतु न सांपडल्यामुळें बेसुमार गांगरून गेल्यानें जास्तच सुंदर दिसणाऱ्या वस्त्ररहित मेनकेला पाहिलें, तेव्हां तिचें तें अभिनव रूप, न सांगतां येण्यासारख्या तारुण्याची मुसमुशी, व तिचे ते प्रलोभनीय गुण पाहूनच, ते,त्या मदनसाहाय्या जी मेनका तिच्या ह्या दर्शनसंसर्गानें मोहित होऊन प्रथम करुणेच्या व नंतर मदनाच्या स्वाधीन झाले ! व त्यांनीं तिला प्रेमानें हाक मारिली. तेव्हां तिनेंही मोठ्या औत्सुक्यानें आणि शुद्ध स्वभावानें त्या ऋषींच्या आमंत्रणास मान दिला ! पुढें पुष्कळ काळपर्यंत त्या उभयतांचा मालिनीतीराजवळ हिमवत पर्वतावर कामक्रीडाव्यवहार झाला. त्यांचा तो यथेच्छ विहार त्या उभयतांसही एक दिवसासारखाच वाटला ! या समागमानें विश्वामित्रापासून मेनकेच्या उदरीं एक मुलगी उत्पन्न झाली. त्या मुलीला मालिनी नदीच्या कांठींच ठेवून मेनका देवी कृतकार्य होत्साती शक्रसभेंत गेली. सिंहव्याघ्रादि क्रूर पशु जेथें यथेच्छ संचार करितात अशा त्या निर्मनुष्य वनामध्यें तें अपत्य ठेवलेलें पाहून शकुंतांस म्हणजे पक्ष्यांस दया आली, व मांसाहारी श्वापदांनीं या गर्भाचा अपहार करूं नये म्हणून त्याच्या सभोंवतीं पहारा करून त्यांनीं तिचें संरक्षण केलें. एकदा मी संध्यावंदनाकरितां नदीतीरावर गेलों होतों, तेव्हां या शकुंतरक्षित बाळेला निजलेली पाहिली. या घोर व निर्जन वनामध्यें, पक्ष्यांनीं पाळलेली असली तरी हिचें संरक्षण यथास्थित होणार नाहीं, असा विचार करून मीं तिला घरीं आणिली, आणि कन्येप्रमाणें वाढविली आहे. शकुंतांनीं पाळिली म्हणून हिचें शकुंतला हें नांव ठेविलें आहे. शरीर देणारा, प्राणदान करणारा व अन्न देणारा हे सर्व अनुक्रमानें पितृत्वाचे अधिकारीच होतात, असें धर्मशासनांत सांगितलें आहे, म्हणून या शकुंतरक्षित मुलीचें मीं शकुंतला हें नांव ठेविलें आहे; याप्रमाणें ती पाळिली म्हणून माझीही ही मुलगीच होय, व शुद्धसत्त्व शकुंतलाही मला वडिलाप्रमाणेंच मानिते.

शकुंतला म्हणते:—राजन्, याप्रमाणें कण्व बाबांनीं त्या ऋषींस माझ्या जन्माची काहाणी सांगितली. हाच श्रीकण्व बाबांचा आणि माझा कन्यापितृत्वाचा संबंध आहे. शिवाय, माझे आईबाप मीं पाहिलेच नाहींत, कण्व मुनींनींच मला ममतेनें वाढविलें आहे, म्हणून मीही त्यांस परमार्थत्वानें माझे वडील असें मानितें. हा माझा वृत्तांत जसा मीं ऐकिला, तसाच आपल्यास निवेदन केला आहे.

अध्याय त्र्याहात्तरावा.

—:०:—

दुष्यंतशकुंतलाविवाह.

दुष्यंत म्हणतो:—हे कल्याणी ! तुझ्या या वृत्तांतावरून, तूं राजकन्या आहेस हें तर स्पष्ट होत आहे. तेव्हां, हे सुंदरी ! तूं माझी भार्या हो. तूं काय मागशील तें मी तुला देतों. आणखी मी काय करावें बरें ? सोन्याच्या माळा, उत्तम सोन्याच्या कोंदणांत बसविलेलीं अशीं अनेक देशांत निर्माण झालेलीं कर्णहस्तादिकांचीं रत्नजडित भूषणें, वाटेल तितकें द्रव्य, तसेंच सर्व प्रकारचीं आसनें,

फार तर काय ? माझें सर्व राज्य तुझ्या स्वाधीन करितों. हे शोभने! माझी तूं भार्या हो. अग भित्रे! गांधर्वविधीनेंच तूं मला वर. कारण, हे रंभोरु, अष्टविवाहविधींमध्यें गांधर्वविवाहच श्रेष्ठ आहे असें सर्वत्र मानितात.

शकुंतला म्हणतेः—राजन्, फळें आणण्या-करितां माझे बाबा बाहेर गेले आहेत. एक घटकाभर वाट पहा. ते आल्यानंतर ते मला अर्पण करतील.

दुष्यंत म्हणतोः—हे सुंदरी, हे शोभने! तूंच माझा अंगीकार करावास अशी माझी इच्छा आहे तुझ्यासाठीं मात्र मी येथें उभा राहिलों आहें. तुझ्यावरच माझें प्रेम जडलेलें आहे. सुंदरी! खरेंच पाहिलें असतां आपणच आपले हितकर्ते व आपणच आपलें निदानचें तारकस्थान आहों. म्हणून, धर्माच्या बाजूनेंही तूं आपणच आपलें दान करण्याला योग्य व स्वतंत्र आहेस. सुंदरी! धर्मदृष्टीनें विवाहाचे आठ मार्ग होतात. बाकीचे मार्ग या अष्टमार्गांतच अंतर्भूत होतात. (१) सालंकृत कन्यादान करणें हा ब्राह्म, (२) यज्ञाच्या शेवटीं ऋत्विजाला कन्यादान करणें हा दैव, (३) 'उभयतांही धर्माचरण करा' असें सांगून केलेलें दान प्राजापत्य, (४) वरापासून गोमिथुन घेऊन मोबदला कन्या देणें हा आर्ष, (५) पुष्कळसें धन घेऊन कन्या देणें हा आसुर, (६) वरवधूंचें एकमत होऊन झालेला लग्नविधि गांधर्व, (७) निजलेल्या अथवा उन्मत्त झालेल्या कन्यापितरांजवळून कन्या पळवून नेणें हा पैशाच, आणि (८) मारामारी करून रडणाऱ्या वधूला रडणाऱ्या आईबापांपासून नेणें हा राक्षस, असे आठ विधि आहेत. यांपैकीं पहिले पहिले—प्रथम प्रथम सांगितलेले जास्त धार्मिक होत, असें स्वायंभुव मनूचें मत आहे. ब्राह्मणांस पहिले चार उक्त, क्षत्रियांस पहिले सहा प्रशस्त आहेत. क्षत्रियांनीं राक्षसविधीचें अवलंबन केलें तरी हरकत नाहीं. वैश्य व शूद्र यांस असुरविवाहविधि विहित आहे. पहिल्या पांचांपैकीं पहिले तीन (ब्राह्म, दैव व प्राजापत्य) क्षत्रियांस धर्मविहित, आणि दुसरे—दोन आर्ष व आसुर—क्रयस्वरूपी असल्यामुळें धर्मनिषिद्ध आहेत. यांत आसुरविधि हा पैशाचविधीइतका निंद्य आहे. हा धर्मविचार ऋषिप्रणीत आहे. गांधर्व व राक्षस हे विधि क्षत्रियांस विहित आहेत; यांत शंका घेण्याचें बिलकूल कारण नाहीं. क्षत्रियाचें लग्न व्हावयाचें तें या दोहोंपैकीं कोणत्या तरी एका विधीनें किंवा दोन्ही एकत्र करून व्हावें. असो. सुंदरी! मी सकाम आहें, आणि तूंही सकामा आहेस. उभयतांही एकमताचींच आहों, म्हणून गांधर्वविधीनें आपण विवाहविधि उरकून घेऊं!

शकुंतला म्हणतेः—आपण म्हणतां हा धर्ममार्ग जर आहे, आपलें दान स्वतः करण्याचें स्वातंत्र्य जर मला आहे, तर, हे पौरवश्रेष्ठा! माझें दान करितांना मी एक अट सांगतें ती अशीः 'मजपासून जो तुला पुत्र होईल तो युवराजा व्हावा व पुढें राजा व्हावा.' ही गोष्ट आपल्याला संमत असेल तर मला तसें वचन द्या. हें वचन खरोखरच मला पाहिजे. आपण एकांतांत हा ठराव करितों आहों, तरी आपण पौरव आहां म्हणून आपल्या बोलण्यावर माझा विश्वास आहे. हे सत्यप्रतिज्ञ! जर हें सर्व आपणांस संमत असेल, व जर आपण असें वचन देत असाल, तर आपला विवाह होऊं द्या.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, शकुंतलेचें हें भाषण ऐकून विचार न करितां राजा 'तथास्तु' असें बोलून गेला, व असें म्हणाला, "हे वरारोहे! सर्वांगसुंदरी! तूं अत्यंत योग्य आहेस, म्हणून मी, तुला स्वनगरींत घेऊन जाईन." असें[1]

१ श्रीकृष्ण आणि रुक्मिणी यांचा विवाह झाला त्याप्रमाणें.

वचनद्वय देऊन, राजानें, शुद्धकुळांत जन्म पावलेल्या भर्त्याची भार्या होणाऱ्या त्या सुंदर वनकन्येचें पाणिग्रहण केलें, आणि गांधर्वविध्यनुसार गर्भाधानकर्म करून तिला पुनः पुनः वचन दिलें कीं, "तुला नेण्यासाठीं मी चतुरंगसेना पाठवून देतों, आणि स्वनगरीला घेऊन जातों. हे सुमंगलहास्ये! तूं कांहीं चिंता करूं नको." असें म्हणून राजानें तिचा निरोप घेतला आणि तो निघून गेला.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, आपण दिलेलें वचन व त्याचा परिणाम यांचें चिंतन करीत तो राजा परत फिरला तेव्हां, व वचन देत असतांही, त्यास श्रीकण्व ऋषींचें स्मरण होत असून त्याचा थरकांप होत होता. असो. 'आतां हा तपोधन हें सर्व वर्तमान ऐकल्यावर काय करील, माझें कसें होईल,' अशा चिंताग्रस्त अवस्थेमध्येंच तो स्वनगरास जाऊन पोहोंचला. इकडे, राजा जाऊन एक घटका लोटल्यानंतर कण्व मुनि त्या आश्रमांत आले. नेहमींप्रमाणें शकुंतला सामोरी यावयाची, पण तिला त्या दिवशीं लज्जेमुळें बाहेर येववेना. श्रीकण्व मुनि दिव्यज्ञानीच! तपामुळें अंतर्ज्ञानाचें सामर्थ्य पूर्णत्वानें प्राप्त झालेले ते ऋषि आपल्या पश्चात् झालेला सर्व व्यवहार जाणते झाले, आणि समाधानसूचक प्रीतीच्या स्वरानें कन्येला हांक मारून म्हणाले, "हे कल्याणी! मला न विचारतां व माझी वाट न पहातां तूं आज एकांतांत जो विवाहविधि पूर्ण केलास, तो कांहीं धर्मनिषिद्ध नाहीं. कारण, क्षत्रियांस गांधर्वविधिच श्रेष्ठ आहे. परस्परांवर प्रीति जडलेल्या स्त्रीपुरुषांनीं एकांतांत ऐकमत्य करून घेऊन जो मंत्रशून्य विवाहविधि केला, त्यासच 'गांधर्व' म्हणतात व तो क्षत्रियांस उचितच आहे. मुली, ज्या पुरुषश्रेष्ठाला तूं भार्यात्वानें वरिलेंस, तो राजा दुष्यंत धर्मवेत्ता व उदार मनाचा आहे बरें. शकुंतले! तुलाही महापराक्रमी व महात्मा असा पुत्र होईल. तो सर्व समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्यसुख घेईल. शत्रूवर त्यानें केव्हांही स्वारी केली तरी त्या चक्रवर्ती राजाचें सैन्य सदैव विजयी होईल. त्याचा रोध करण्यास पृथ्वीवर कोणीही समर्थ होणार नाहीं. हा माझा तुला आशीर्वाद आहे."

राजा, ऋषींचें हें भाषण श्रवण करून शकुंतलेला मोठा आनंद झाला व ती बाहेर आली आणि कण्व बाबांचे पाय धुऊन तिनें त्यांच्या खांद्यावरील ओझें खालीं ठेविलें आणि फळांचीही व्यवस्था केली. नंतर ती म्हणाली, "बाबा! मीं पुरुषश्रेष्ठ दुष्यंत राजाला वरिलें आहे. आपण त्या राजावर व त्याच्या सचिवादि प्रधानांवर कृपा करून प्रसन्न व्हावें!"

कण्व म्हणतातः—हे सुमंगले! तुझ्यावर माझें प्रेम म्हणून मी राजा दुष्यंतावर प्रसन्नच आहें. मुली! तुला काय पाहिजे तो इष्ट वर माझ्यापासून मागून घे.

वैशंपायन म्हणतातः—राजा, नंतर त्या महापतिव्रतेनें, दुष्यंताचें सदैव हित असावें या सदिच्छेनें असा वर मागितला कीं, "पौरव कुलांतील सर्व राजे धर्मपर असावे, आणि ते कधींही राज्यभ्रष्ट होऊं नयेत."

अध्याय चौऱ्याहत्तरावा.

—:०:—

भरतजन्म.

वैशंपायन सांगतातः—याप्रमाणें वचन देऊन राजा दुष्यंत तर निघून गेला. इकडे, ती सर्वांगसुंदर कण्वकन्या शकुंतला प्रसूत होऊन तिला महातेजस्वी असा पुत्र झाला. तीन वर्षे लोटल्यानंतर तो प्रदीप्त अग्नीसारखा तेजस्वी, व रूप, औदार्य इत्यादि गुणांनीं युक्त असा मातृगर्भांतून बाहेर येऊन शोभूं लागला. त्या वाढत जाणाऱ्या बुद्धिमंत मुलाचे जातकर्मादि संस्कार पुण्यवान कण्व मुनींनीं विधिपूर्वक केले. त्याचे शुभ्र दांत

अणकुचीदार होते. तो सिंहासारखा बलिष्ठ होता. त्याच्या हातावर महत्त्वसूचक चक्ररेषा होत्या. त्या वैभवशाली व पराक्रमी मुलाचें मस्तकही चांगलें मोठें होतें. तो कुमार देवपुत्राप्रमाणें लवकर लवकर वाढतच गेला. हा बालक सहा वर्षांचा झाला नाहीं तोंच, कण्व आजोबांच्या आश्रमासमीप असणाऱ्या झाडांस सिंह, व्याघ्र अथवा वराह यांस धरून आणून बांधीत असे. त्यानें त्या हिंस्र पशूंवर कुर्र घोडी करून बसावें, त्यांस जेरीस आणावें, आणि निर्भयपणानें त्यांच्या बरोबर खेळून त्यांच्या संगतीनें धावा माराव्या. सर्व क्रूर पशूंचें हा दमन करी, म्हणून याला कण्वाश्रमांतील ऋषि 'सर्वदमन' असें म्हणूं लागले; असो.

राजा, हा कुमार पराक्रमानें, तेजानें व बलानें युक्त आहे असें पाहून, व याचीं कर्मे अमानुष आहेत असें पाहून, कण्व मुनींस वाटलें कीं, 'यौवराज्याचा अभिषेक करून घेण्याचें या महापराक्रमी मुलाचें वय झालें.' नंतर शकुंतलेला आपला विचार सांगून कण्व मुनि आपल्या शिष्यांस म्हणाले, "शिष्यहो! ह्या माझ्या सर्वसुलक्षणी शकुंतलेला तिच्या मुलासहवर्तमान तिच्या नवऱ्याच्या घरीं घेऊन जा. कारण, स्त्रियांनीं फार दिवस माहेरीं राहणें ठीक नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यापासून कीर्तीला, चरित्राला, शीलाला, व धर्मव्रताला अपाय होतात. याकरितां विलंब न करितां हिला नवऱ्याच्या घरीं पोहोंचवा."

राजा, ऋषींचें हें भाषण ऐकून ते शिष्य बरें आहे असें म्हणाले, व ऋषींचा आशीर्वाद घेऊन ते सर्व तेजस्वी शिष्य शकुंतलेला व तिच्या पुत्राला पुढें करून गजपुराकडे जाण्यास निघाले. याप्रमाणें, कमलनेत्र व देवकुमाराप्रमाणें शोभिवंत अशा सर्वदमन नामक पुत्राला घेऊन ती वामनेत्री शकुंतला देवी त्या सर्वविश्रुत वनांतून निघून दुष्यंताच्या नगरीप्रत आली. राजवाड्यांत जाऊन तिनें आपण आल्याची सूचना दिली, व तिचा प्रवेश झाला. तिच्या बरोबर तिचा बालसूर्याप्रमाणें तेजस्वी पुत्र होताच. त्या सर्व शिष्यांनीं राजाला कण्व ऋषींच्या आशीर्वादासह त्यांचा निरोप सांगितला, व ते आश्रमाप्रत निघून गेले. शकुंतलेनेंही राजाची यथाविधि पूजा केली; आणि नंतर ती म्हणाली; "राजन्! हा तुझा मुलगा. तुझ्यापासूनच हा देवतुल्य मुलगा मला झाला आहे. तेव्हां पूर्वी वचन दिल्याप्रमाणें याला आतां यौवराज्याचा अभिषेक करणें तुझ्यासारख्या पुरुषश्रेष्ठाला योग्यच आहे. कण्व ऋषींच्या आश्रमामध्यें मला हें वचन आपण दिलें होतें, तें आपल्याला स्मरत असेलच; त्याची आठवण करा आणि आपलें वचन पुरें करा."

जनमेजया, दुष्यंत राजाला हें स्मरण स्पष्ट होतेंच; तथापि आपल्याला कांहीं आठवत नाहीं, असें दाखवून तो म्हणाला, "अगे दुष्ट तापसी! मला कांहीं स्मरण नाहीं. धर्मार्थकामसंबंधी मीं कांहीं तुला वचन दिलें होतें, असें मला मुळींच आठवत नाहीं. येथें तूं रहा किंवा जा, अथवा तुला वाटेल तें कर. माझा तुझ्याशीं कोणताही धार्मिक संबंध नाहीं."

शकुंतलेचें भाषण.

त्या राजाचें हें निष्ठुर व लज्जादायक भाषण ऐकून ती दुर्दैवी सुंदरी दुःखानें विव्हल होऊन क्षणभर निश्चल स्तंभाप्रमाणें निचेष्टित होऊन उभी राहिली; तेव्हां, क्रोधानें जिचे डोळे लाल झाले आहेत, व ओंठ थरथर हालत आहेत, अशी ती पतिव्रता शकुंतला स्वकटाक्ष फेकून आपल्या प्रकोपानें राजाला दग्धच करीत आहे कीं काय, असा भास झाला. तथापि त्या वेळीं आपल्या तपःसामर्थ्याच्या योगानें अत्यंत स्फुरित असलेला क्रोधावेश आवरून धरून ती क्षणभर स्तब्ध राहिली. नंतर राजाकडे ओझरतें पाहून ती म्हणाली, "महाराज! आपल्यास सर्व वृत्तांत स्मरत असूनही 'मला ठाऊक नाहीं' असें सामान्य

व बिनकिमतीच्या मनुष्याप्रमाणे आपण निःशंकपणानें कसें हो असें बोलतां? मी बोलत आहें तें खरें आहे अथवा खोटें आहे हें आपलें अंतःकरणच आपल्याला सांगेल. राजा! *सर्वसाक्षी आत्मारामाचें स्मरण करून सदैव मंगल होणारें सत्यच बोल. आपल्या आत्मारामाचा असा अनादर करूं नको. आपला आत्मा, अमुक आहे, असें सांगत असतां जो भलतेंच प्रतिपादन करितो, तो आत्मापहारी चोर कोणतें पातक करणार नाहीं? सर्व पातकें करील! पातकसाक्षी मी एकटाच आहें असें तुला वाटत असेल, तर तें बरोबर नाहीं. कारण, आपल्या अंतर्यामीं सदैव राहणारा सर्वसाक्षी भगवान नारायण आहे. तो सर्व जाणतो;-त्याला आपलीं सर्व पापकृत्यें समजतात. या नारायणाशीं तूं पातक करीत आहेस, हें तुला विदित नसावें काय? 'मी पातकें करितों तीं कोणासच ठाऊक नाहींत,' असें खुळा पापी समजतो! पण, राजा! देवांस व अंतर्यामीं साक्षित्वानें राहणाऱ्या नारायणास आपलीं सर्व कृष्णकारस्थानें समजत असतात! राजा, आदित्य, चंद्र, अग्नि, वायु, आकाश, भूमि, जल, आपलें हृदय, यम, दिवस, रात्र, प्रातःकाल व संध्याकाल आणि धर्म, या सर्व देवतांस, अमुक प्राणी काय करीत आहे, हें सर्व यथास्थित रीतीनें कळत असतें. सूर्याचा पुत्र यमधर्मराज हा त्याच पुरुषाचीं सर्व पातकें नाहींतशीं करितो, कीं ज्या पुरुषाचा कर्मसाक्षी म्हणजे आत्माराम हृदयांत वास करणारा क्षेत्रज्ञ संतुष्ट असतो. पण ज्याच्यावर-ज्या दुष्ट पुरुषावर-हा आत्मा प्रसन्न असत नाहीं, त्याची गोष्ट काय पुसावी? त्या पापकर्मी पुरुषाला यमाच्या दरबारांत अत्यंत क्लेश होतात. जो चांडाल आपल्या आत्म्याची आपण स्वतांच अवहेलना करितो, व आपल्या आत्म्यास भलतेंच स्वरूप देतो, त्याचें कल्याण त्याचा आत्मा तर करीत नाहींच, पण देवही त्याचें कल्याण करीत नाहींत. राजा! मी स्वतः तुझ्या घरीं चालून आलें म्हणून माझा असा अपमान करूं नको. तुझ्या घरीं चालत आलेली ही भार्यारूपी पूज्य लक्ष्मी-हिची तूं पूजा न करितां तिचा अपमान करितोस आँ! एखाद्या हलकट मनुष्याप्रमाणें तूं माझी उपेक्षा कां करितोस? राजा! इतका वेळ मीं अरण्यरुदन केलें काय? तूं ऐकत नाहींस का? बरें; तुझी मी इतकी मनोधारणा करीत असतांही तूं माझें जर ऐकणार नाहींस व आपलें वचन पूर्ण करणार नाहींस, तर, राजा! तुझें मस्तक शतधा विदीर्ण होऊन त्याचे तुकडे तुकडे होतील, ध्यानांत ठेव! राजा, इतकें तरी लक्षांत ठेव कीं, धर्मस्त्रीशीं रत होऊन गर्भधारणा झाली असतां पिताच पुत्ररूपानें स्त्रीच्या उदरीं जन्म घेतो म्हणून तर पुराणकवींनीं स्त्रीला 'जाया' हें नांव दिलें आहे. वेदोक्त कर्म करणाऱ्या पुरुषाला जें प्राप्त होतें, तें अपत्य म्हणजे पतनापासून संरक्षण करण्याचें साधन होय. हें अपत्य वंशविस्तार करून मृत पूर्वजांचें तारण करितें. पुत् नामक नरकापासून पितरांचें तारण करणारा तो पुत्र हें सुताला नांव प्रत्यक्ष स्वयंभूनें स्वतः दिलें आहे. 'पौत्र (नातू) ब्रह्मलोकास नेतो व आनंत्य देतो, आणि पणतू झाला म्हणजे मोक्ष मिळतो' असा आणखी श्लोक आहे. राजा! घरामध्यें दक्ष असते ती भार्या होय. जिला मुलें होतात, जिला पति हाच प्राण, आणि पति हेंच व्रत, ती खरी भार्या होय. भार्या हें मनुष्याचें अर्धांग आहे. भार्या हा मनुष्याचा उत्तमोत्तम मित्र आहे; भार्या ही धर्म, अर्थ व काम हे पुरुषार्थ साधण्याचें साधन मूळ, आणि मोक्ष मिळण्याचें आदिसाधनही भार्याच आहे. देव, पितृ, ऋषि इत्यादिकांच्या ऋणांतून भार्याच तारून नेते. भार्या असणाऱ्या गृहस्थालाच धार्मिक व नित्यनैमित्तिक कर्में करितां येतात; भार्या असणाऱ्या पुरुषाचाच संसार

होतो, व तोच आनंदी व लक्ष्मीवंत होतो. एकांतांत अगर संकटकाळीं भार्यारूप मित्र मात्र प्रिय व हितकर बोलतात; धर्मकार्यांमध्यें वडिलांप्रमाणें हितकर उपदेश करणाऱ्या, संकटकाळीं मातेप्रमाणें संरक्षण करणाऱ्या, व पांथस्थांस अरण्यामध्यें सुद्धां विश्रांति देणाऱ्या अशा ह्या भार्या असतात. ज्याला भार्या आहे, तो पुरुष विश्वसनीय होतो. म्हणून भार्या हा पुरुषाचा निदानींचा आधार आहे, असें म्हणतात. राजा! संसारांत असतां, मरण पावला असतां आणि एकटा जाऊन नरकामध्यें पडला असतांही त्या पुरुषाचा उद्धार करावा एतदर्थ पतिव्रता भार्या त्याची अनुयायी होते. भार्या जर प्रथम मेली, तर ती पतीची वाट पहात राहते, आणि पति प्रथम मेला, तर ती साध्वी त्याच्या मागोमाग तो असेल तेथें जाते. राजा! आपल्या शास्त्रांत पाणिग्रहणविधीचें माहात्म्य सांगितलें आहे, त्याचें रहस्यच हें कीं, पतीला भार्या हा इहलोकीं व परलोकीं उत्तम मित्र मिळतो. सर्व ठिकाणीं हातांत हात घालून हीं उभयतां यात्राकंठन करितात. आपल्यापासून उत्पन्न झालेला पुत्र हा आपलाच आत्मा असतो; तेव्हां आपल्या पुत्राच्या मातेला आपण स्वमातेप्रमाणे पूज्य मानिली पाहिजे. आरशांतील प्रतिबिंबित झालेल्या मुखाकडे किंवा भार्येपासून झालेल्या पुत्रमुखाकडे पाहून पित्याला आनंद होतो, तो पुण्यकर्मे करून झालेल्या स्वर्गप्राप्तीच्या आनंदाच्या तोडीचा असतो. मानसिक चिंतांनीं होरपळलेल्या व शारीरिक व्याधींनीं कासावीस झालेल्या पुरुषांस स्त्रियांपासून आनंदच होतो. 'तो कसा?' म्हणशील तर, ग्रीष्मऋतूंतल्या प्रतापी सूर्याच्या प्रखर किरणांनीं संतप्त झालेल्या पुरुषांस शीतल जलसेकानें आनंद होतो तद्वत् होय. राजा! सुख, प्रीति आणि धर्म हीं स्त्रियांच्या अधीन आहेत असें जाणून, रागावलेल्या पुरुषानें सुद्धां रम्य स्त्रियांचें अप्रिय करूं नये. महाराज! स्त्रिया हें सनातन आणि परम पवित्र असें जीवाचें जन्मस्थान आहे बरें! स्त्रियांव्यतिरिक्त प्रजा उत्पन्न करण्याचें सामर्थ्य प्रत्यक्ष ऋषींना सुद्धां नाहीं; मग तुझ्यासारख्यांची गोष्ट कशाला विचारावी? धूळीनें धूसर झालेला मुलगा येऊन जेव्हां पित्याला आलिंगन देतो, तेव्हां त्याला जो आनंद होतो त्याचें काय वर्णन करावें? असा हा तुझा मुलगा प्रेमपूर्वक स्वतः प्राप्त झाला असतां व तुझ्याकडे आतुर नेत्रांनीं बघत असतांही त्याचा तूं अवमान करितोस, त्या तुला काय म्हणावें! मुंग्या सुद्धां आपलीं अंडीं राखून ठेवितात,—फोडीत नाहींत, आणि तूं तर धर्मज्ञ आहेस; तेव्हां आपल्या पुत्राचें संरक्षण कसें करणार नाहींस? दंतावली प्रकट झाली नाहीं अशा स्वतांच्या सूनूचें—शिशूचें—आलिंगन घेऊन जें स्पर्शसुख होतें, तें सुख वस्त्रस्पर्शानें लाभत नाहीं, स्त्रियांचे आलिंगनानें मिळत नाहीं, किंवा पाण्याच्या स्पर्शानेंही प्राप्त होत नाहीं. द्विपादांमध्यें ब्राह्मण श्रेष्ठ, चतुष्पादांमध्यें गाय वरिष्ठ, पूज्यांमध्यें गुरु उत्तमोत्तम, आणि स्पर्शांमध्यें पुत्रस्पर्श अति मनोहर आहे. म्हणून, राजा! हा तुझा नेत्रमनोहर पुत्र तुला आलिंगन देऊं दे. पुत्रस्पर्शासारखी स्पर्शसुख देणारी दुसरी वस्तु या विश्वांत नाहीं रे! हे शत्रूंना मात्र ताप देणाऱ्या राजा! तीन वर्षेंपर्यंत याच्या गर्भाचें ओझें मीं बाळगल्यानंतर हा तुझा शोकविनाशक मुलगा जन्म पावला बरें! हा जन्म पावल्यावर थोडक्याच वेळानें आकाशवाणी झाली कीं, 'हा शंभर अश्वमेध करील!' अरे! सामान्य पुरुष सुद्धां गांवाहून बाहेर गेलेले परत आले म्हणजे आपल्या पुत्रांस मांडीवर घेऊन त्यांचें अवघ्राण करून आनंदित होतात ना! आणि तूं सर्वलोकनायक असून स्तब्ध बसतोस? राजा, जातकर्मविधीमध्यें ब्राह्मण लोक ज्या वेदमंत्रांचा सुद्धां उच्चार करितात, त्यांचा अर्थ

असाचना ? " माझ्या प्रत्येक अंगापासून तुझें अंग झालें आहे, व हृदयापासून तुझी वाढ आहे. तूं पुत्र माझा म्हणजे खरोखर आत्माच आहेस. तुझ्या स्वाधीन माझें जीवित आहे, आणि अक्षय वंशविस्तार करणें हें तुझेच स्वाधीन आहे. म्हणून, हे पुत्रा, तूं सौख्याचा अनुभव घेत घेत शंभर वर्षें जगावेंस; तुला 'शतंजीव' असा आशीर्वाद देतों." राजा, तुझ्यापासून हा दुसरा पुरुष उत्पन्न झाला आहे; तेव्हां स्वच्छ तळ्यामध्यें आपण आपलें प्रतिबिंब पाहतों, त्याचप्रमाणें हें तुझें प्रतिबिंब म्हणजे हा सुत पहा. गार्हपत्य अग्नींतून जसा आहवनीय नामक अग्नि नेतात, त्याचप्रमाणें तूं एकटाच असतां तुझीं हीं दोन स्वरूपें तुला प्राप्त झालीं. राजा असें कसें विसरतोस !

"एकदा मृगाच्या मागें लागून तूं मृगया करितां करितां श्रीकण्व मुनींच्या आश्रमांत आलास, तेव्हां तुझी माझी कुमारस्थितींत गांठ पडलीना ? राजा ! उर्वशी, पूर्वचित्ति, सहजन्या, मेनका, विश्वाची व घृताची या अप्सराश्रेष्ठ स्त्रियांमध्यें अतिश्रेष्ठ जी ब्रह्मकुमारी मेनका नामक अप्सरा, ती इंद्राज्ञेनें विश्वामित्राला मोह पाडण्यासाठीं कशी आली, तिला गर्भ कसा राहिला, मला हिमालय पर्वतावर सोडून ती कशी गेली, दुसऱ्याच्या पोराप्रमाणें त्या निर्दय मातेनें मला खालीं कसें ठेविलें, इत्यादि वृत्तांत त्याच वेळीं तुझें कौतुक शांत करण्याकरितां मीं सांगितला होताना ? हर हर ! काय मीं पूर्वजन्मीं पातक केलें होतें, कीं लहानपणांत मला माझ्या आईबापांनीं टाकून द्यावें, आणि तरुणपणांत माझ्या भर्त्यानें म्हणजे तूं माझा त्याग करावा ! राजा घाबरूं नको. तुला मी नको असलें तर मी कण्व बाबांच्या आश्रमांत जाऊन राहीन; पण हा तुझा बाळपुत्र, याला तरी निदान टाकून देऊं नको. तूं थोर आहेस ! तेव्हां याचा तरी स्वीकार कर."

दुष्यंताचें शकुंतलेला उत्तर.

राजा दुष्यंत म्हणाला:--शकुंतले ! तुझ्यापासून मला पुत्र झालेला आहे, असें मला मुळीच माहीत नाहीं. तुम्ही बायका म्हणजे नित्य खोटें बोलणाऱ्या ! तुमच्या जिव्हेवर कोणीं विश्वास ठेवावा ? बाई ! तुझ्याच बोलण्यावरून न्याय झाला कीं, तुझी आई (मेनका) म्हणजे सगळ्या विश्वाची बायको ! किती निर्दय ती, कीं जिनें तुला हिमालयाच्या शिखरावर निरुपयोगी निर्माल्याप्रमाणें टाकून दिलें ! आणि तुझा बाप म्हणजे सगळ्या मुलखाचा खट, कीं ज्यानें तुला इतक्या लहानपणींच निर्जन वनांत सोडून दिलें ! तो जातीचा क्षत्रिय, पण ब्राह्मण होण्याविषयीं त्याला कोण हव्यास ! शेवटीं कामाच्या तडाक्यांत सांपडावयाचा तो सांपडलाच ! आतां, मेनका अप्सरांमध्यें श्रेष्ठ आहे व विश्वामित्रही प्रमुख महर्षि आहेत हें खरें; पण त्यांच्यापासून तुझा जन्म झाला हें खरें कशावरून ? कारण, तुझें बोलणें तर एखाद्या पुंश्चलीप्रमाणें[1] आहे. मूर्खे ! असल्या लांब लांब खोट्या बाता मारतांना आणि विशेषतः माझ्या देखत असल्या विलक्षण बाता मारतांना तुला लाज नाहीं वाटत ? जा ! गोसवडे ! निघून चालती हो. तो श्रेष्ठ महर्षि कोणीकडे, व ती मेनका अप्सरा कोणीकडे, आणि तूं हा भिकारडा तापसी वेष धारण करून

१ पतिव्रता चैकपतौ द्वितीये कुलटा स्मृता ।
तृतीये धर्षणी ज्ञेया चतुर्थे पुंश्चलीत्यपि ॥
वेश्या च पंचमे षष्ठे पुंगी च सप्तऽमेष्टमे ।
ततऊर्ध्वं महावेश्या साऽस्पृश्या सर्व जातिषु ॥

अर्थ--जिला एकच पति आहे, ती पतिव्रता; दोन असतील तिला कुलटा म्हणावें; तीन असतील तिला धर्षणी समजावें; चार असतील तिला पुंश्चली; पांच किंवा सहा असणारी वेश्या; सात किंवा आठ पति असणारी पुंगी; आणि याहीपेक्षां जास्त पति करणारी महावेश्या समजावी;--ती कोणत्याही जातीमध्यें स्पर्श करण्यास योग्य नव्हे.

(यमसावित्रीसंवाद-देवीभागवत.)

हिंडणारी जारिणी कोणीकडे? म्हणे हा सहा वर्षांचा मुलगा आहे! सहा वर्षांच्या मुलाचें हें असलें धिप्पाड शरीर आणि इतकें हें बळ असें कोणी म्हणेल का? शालवृक्षासारखा उंच हा इतक्या थोडक्या काळांत कसाग झाला? या सगळया तुझ्या वेषावरून, भाषेवरून आणि तुझ्या व या कार्याच्या चर्येवरून स्पष्ट दिसतें कीं, तुझी जात फारच हलकी आणि दुष्टाचारी असावी. मेनकेचा धंदा पुरुषांस मोह घालण्याचा; तेव्हां तिनेंच एखाद्या नीच पुरुषाला भुरळ घालून गर्भधारण केलें, आणि पूढें तूं ही दिवटी निघालीस. असो; फार कशाला? तूं काय म्हणतेस यांतली एक गोष्ट सुद्धां मला माहीत नाहीं; तुझी माझी ओळखही नाहीं. समजलीस? तुला जिकडे वाट फुटेल तिकडे जा!

शकुंतला म्हणाली:—राजा! लोकांच्या मोहरी-एवढ्या बारीक क्षुद्र गोष्टी व कमीपणा तुला दिसतो, आणि आपले बेलफळाएवढाले दोष तुला दिसत नाहींत रे! मेनका देवलोकांतील आहे व देवच तिची आराधना करितात, हें ध्यानांत ठेव. राजा! तुझ्या जन्मकोटीपेक्षां माझी जमन्कोटी किती तरी श्रेष्ठ आहे रे! पृथ्वीवर चालणारीं तुम्ही माणसें आणि अंतरिक्षामध्यें संचार करणारा आमचा अप्सरागण! तुमच्या आमच्यामध्यें काहीं तरी साम्य! मोहरी आणि मेरु पर्वत यांमध्यें जें अंतर, तें तुझ्या व माझ्या जन्मक्षेत्रांत अंतर आहे. हे गर्विष्ठ राजा! मी म्हणेन तेव्हां इंद्र कुबेर, वरुण किंवा यम यांच्या लोकांत जाऊं शकेन. वाटेल तर माझें सामर्थ्य पहा. अहो पापधूत महाराज! आतां जे काय चार निश्यसिद्धांत सांगणार आहें, ते केवळ उदाहरणासाठीं म्हणून सांगणार आहें; द्वेषबुद्धीनें बोलत नाहीं, तथापि मला क्षमा करा बरें! राजा! एखाद्या विद्रूप पुरुषानें जोंपर्यंत आपला मुखडा आरशांत पाहिला नाहीं, तोंपर्यंत त्याला वाटत असतें कीं, आपल्यासारखा सुरूप प्राणी जगतांत नाहींच; तेंच आपलें वेडेविद्रें स्वरूप त्यानें एकदा आरशांत पाहिलें, म्हणजे इतरांच्या व आपल्या स्वरूपांत किती अंतर आहे हें त्याला समजतें. जो अत्यंत सुंदर आहे, तो कोणाचा केव्हांही अपमान करीत नाहीं. पण, राजा! जो निंदापूर्ण शब्दांनीं सारखी बडबड करितो, तो दुसऱ्याची निंदा करणारा व त्यांस ताप देणारा असा होतो. असल्या या भांडाचे निंदापूर्ण प्रलाप किंवा एखादे वेळचें चांगलें बोलणें ऐकिलें म्हणजे मूर्ख लोक काय कारितात? तर, सूकरांच्या उड्या पुरीषावर मात्र पडतात त्याप्रमाणें हे लोक परनिंदापर वाक्यें तेवढीं उराशीं बाळगून त्यांचें ध्यान करीत बसतात; आणि समंजस लोक या वाचाळांच्या भाषणांतून हंसासारखे क्षीररूपी सद्गुणी विधानांचा संग्रह करितात. दुसऱ्याची निंदा चालली असतां अथवा आपल्या हातून झाली असतां साधूला जितका संताप होतो, तितक्याच आनंदाच्या उकळ्या दुष्टाच्या हृदयांत फुटत असतात! ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध व वयोवृद्ध पुरुषांस नमस्कार करीत असतां सज्जनाला जितका आनंद व समाधान होत असतें, तो आनंद व तें समाधान सज्जनांस क्लेश दिले म्हणजे दुष्ट पुरुष अनुभवितात! दुसऱ्याचे दोष कळले नाहींत म्हणजे साधूला आनंद होतो, आणि दुसऱ्याचे दोष दृष्टीस पडले कीं मूर्खाला पुत्रजन्माप्रमाणें समाधान वाटतें! या मूर्खांना किंवा दुष्टांना जर सत्पुरुषांनीं कधीं काळीं त्यांचें दुष्टस्वरूप स्पष्ट करून दाखविण्याचा प्रयत्न केला, तर हे दुष्ट लोक उलटून सज्जनांची अब्रू घेण्याला कांहीं कमी करीत नाहींत. दुर्जनच जेव्हां स्वतांच सज्जनाला 'दुर्जन' या नांवानें हाका मारण्यास लागतो, तेव्हां असला हास्यकारक चमत्कार दुसरीकडे कोठें मिळेल का? म्हणून ईश्वरास सुद्धां प्रश्नच पडत असेल! असो; राजा, रागावलेल्या विषारी सर्पापासून जसे लोक पळून

जातात, त्याचप्रमाणें सत्यधर्मापासून भ्रष्ट झालेल्या पुरुषाच्या वाऱ्याला नास्तिक सुद्धां उभे राहत नाहींत, मग आस्तिकांची गोष्ट कशाला विचारावी? आपणच स्वतः आपणाप्रमाणें रूपगुणयुक्त पुत्राला जन्म देऊन त्याची व्यवस्था जो ठेवीत नाहीं, किंवा तो आपला 'पुत्र' असें म्हणत नाहीं, त्याला सर्वसाक्षी व सर्वसमर्थ देव संपत्ति व संपत्तीचें सुख येथें मिळूं देत नाहींत, व तो मेल्यावर त्याला स्वर्गातही येऊं देत नाहींत. 'पुत्र म्हणजे आपल्या कुलाची प्रतिष्ठा आहे' असें पितर म्हणतात; तऱ्हां पुत्राचें यथास्थित पालन करणें व त्याला सुसंस्कृत करणें हें सर्व-कर्तव्यांतील अत्यंत श्रेष्ठ कर्तव्य आहे. सारांश, पुत्राला टाकून देण्यासारखें महापातक नाहीं. आपल्या धर्मयुक्त स्वस्त्रीपासून झालेले, आपल्यास सांपडलेले, विकत घेतलेले, आपण वाढविलेले व उपनयनादि संस्कार आपण केल्यामुळें आपलेसे झालेले [शेवटचे चार हे अन्यजन्य होत.] हे पांचही 'पुत्र' होत असें मनु ऋषि म्हणतात. हे पुत्र जर धर्मसंग्रह करणारे, कीर्तिप्रवाह वाढविणारे व मनास आल्हाद देणारे असतील, तर हेच पुत्र पितरांस नरकापासून मार्गे ओढितात. सुपुत्र म्हणजे पितरांस भवसमुद्रांतून तारून नेणाऱ्या नावाच होत. म्हणून, हे राजा! आपलें हित करण्याविषयीं दक्ष असणाऱ्या आणि सत्य व धर्म या उभयतांचेंही पालनपोषण करणाऱ्या नृपवर्या! ह्या पुत्राला टाकून देणें हें तुला शोभत नाहीं. नरशार्दूला! आतां कपटवृत्ति धारण करून ह्या पुत्राचा त्याग करणें हें कृत्य तुला योग्य नव्हे! राजा, तुला विदितच आहे कीं, शंभर आड बांधण्यापेक्षां एक मोठी विहीर बांधणें हें श्रेष्ठ आहे; शंभर विहिरींपेक्षां एक यज्ञ करणें श्रेष्ठ, आणि शंभर यज्ञांपेक्षां एका पुत्राचें पालनपोषण करणें हें श्रेयस्कर आहे. ह्याचप्रमाणें, शंभर पुत्रसंवर्धनापेक्षांही सत्यव्रत अखंड ठेवणें

हेंच श्रेयस्कर आहे. ताजव्यांत हजार अश्वमेध एकीकडे ठेविले, व एक सत्य दुसऱ्या पारड्यांत घातलें, तर सत्याचेंच पारडें जास्त वजनदार होतें बरें! सर्व वेदांचें सांगोपांग अध्ययन व सर्व तीर्थांचें स्नान हीं सत्याच्या तोडीला उतरतील किंवा नाहीं उतरणार! सत्यासारखा धर्म नाहीं. सत्यापरतें श्रेष्ठ असें कांहीं नाहीं. अनृतासारखें तीव्र व सर्वनाशक पाप दुसरें कोणतेंच नाहीं. राजा, सत्य हेंच श्रेष्ठ ब्रह्म, सत्य हेंच श्रेष्ठ व्रत आहे. राजा! बेइमान होऊं नको. राजा, सत्याची व तुझी संगत अखंड असावी; व म्हणून माझ्याशीं केलेली संगति व मला दिलेलें वचन हीं तुला आदरणीय व्हावीं. असो; राजा! तुला जर असत्याचाच अवलंब करावयाचा असेल, व तुझ्या स्वतांच्याच बोलण्यावर तुला विश्वास ठेवणें नसेल, तर, हा दैवा! ही मी निघून जातें. तुझ्यासारख्या असत्पुरुषाशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं. राजा! सरतेशेवटीं मी बोलतें तें ध्यानांत ठेव: दुष्यंता! तुझ्या आश्रयाशिवाय आणि तुझें वैर संपादूनही माझा हा मुलगा यच्चावत् पृथ्वीचें–नगराज हिमालय हा जिचें कर्णभूषण आहे आणि समुद्र ही जिची चोहों बाजूंनीं मेखला आहे अशा पृथ्वीचें आक्रमण करील, व तिचें परिपालन हा माझा मुलगा करील!"

शकुंतलास्वीकार.

वैशंपायन सांगतातः—जनमेजया, याप्रमाणें बोलून शकुंतला देवीनें राजाकडे पाठ फिरविली, आणि ती चालती झाली. इतक्यांत ऋत्विज, पुरोहित, आचार्य व मंत्री यांच्या समक्ष प्रत्यक्ष आकाशवाणीनें दुष्यंतास बोध केला. तो असाः—"राजा! ज्याच्यापासून गर्भधारणा होते, तो पुरुषच पुत्राचा जनक असतो, व तो ज्या योग्यतेचा असेल, त्याच योग्यतेचा पुत्र होतो. आई ही केवळ एक भस्त्रा (चर्मकोश) असते. पुरुषाची जाति, कुळ, गोत्र हींच पुत्रास प्राप्त होतात. म्हणून

तुझ्यापासून उत्पन्न झालेल्या या पुत्राचें ग्रहण करून त्याचें पालन कर. शकुंतलेचा अपमान करूं नको. राजा, ज्यानें रेतसेचन केलें असतें तोच पुत्ररूपानें अवतीर्ण होऊन पितरांस यम-शासनांतून सोडविणारा (नरकापासून तारणारा) होतो. राजा, शकुंतला बोलली हें त्रिवार सत्य आहे. तूंच या बालकाचा जनक पिता आहेस. 'पुरुषच रेतरूपानें द्विधा होऊन स्त्रियेचे ठिकाणीं पुत्ररूपानें पुनः जन्मास येतो' हें शकुंतला देवी बोलली तें अगदीं यथार्थच आहे. म्हणून, शकुंतलापुत्राचें पालनपोषण तुलाच केलें पाहिजे. जिवंत पुत्राला टाकून देऊन जगणें यासारखें दुर्भाग्यच नाहीं. राजा, या शकुंतलापुत्राचें लालनपालन तुला केलेंच पाहिजे; कारण तो तुझा मुलगा आहे व आम्ही तुला तुझें कर्तव्य करण्यास–या मुलाचें भरण (पोषण) करण्यास सांगत आहों. म्हणून या मुलाचें—या महात्म्याचें भरत हें नांव आजपासून प्रकट होईल!"

याप्रमाणें आकाशांतील स्पष्ट देववाणी स्पष्टतः ऐकल्यावर राजास आनंद झाला, आणि तो पुरोहित व अमात्य यांस म्हणाला, "सर्वांनीं ही देवदूताची वाणी ऐकावी व ऐकलीच असेल. अमात्य-हो! या शकुंतला देवीनें सांगितल्याप्रमाणें हा माझाच मुलगा आहे, असें मला विदितच होतें; पण त्या सुंदरीच्या बोलण्याच्या आधारावरच जर या मुलाचें मीं ग्रहण केलें असतें, तर आपणा सर्वांसच साहाजिक शंका उत्पन्न झाली असती कीं, हा मुलगा 'शुद्ध' नाहीं. म्हणून मी इतका वेळ कपटनाटक केलें होतें, आतां निःपक्षपाती देवदूतांनींच सर्व प्रकार यथास्थित रीतीनें प्रकट केला आहे, म्हणून आपणांपैकीं कोणासही शंका घेण्याचें कारण नाहीं. मी या देवीचा व पुत्राचा आतां स्वीकार करितों."

असें म्हणून आनंदप्रदर्शक गजरांतच राजानें उल्हासित मनानें व प्रमोदानें त्या पुत्राचा अंगीकार केला, व पित्याला पुत्राचे जे अवश्य संस्कार करावे लागतात ते सर्व त्या प्रीतिप्रेरित. दुष्यंत राजानें मोठ्या हौसेनें व आनंदानें केले. राजानें प्रथम पुत्रशिराचें अवघ्राण करून त्यास मोठ्या प्रेमानें कडकडून आलिंगन दिलें. इकडे ब्राह्मणांनीं व बंदीजनांनीं राजाची व पुत्राची स्तुति करण्यास आरंभ केला. हा सर्व प्रकार पाहून व पुत्रालिंगनभाग्याचा अनुभव घेऊन दुष्यंत राजास अत्यंत आनंद झाला. पुत्राची भेट म्हणजे आनंदाची परमावधीच ती! तिला कशाची उपमा साजणार? असो; दुष्यंतानें शकुंतला देवीचाही धर्मपूर्वक आदर केला, आणि सन्मानपूर्वक पूजा करून तिचें सांत्वन करीत करीत राजा तिला म्हणाला, "देवि! लोकांच्या परोक्ष, एकांतामध्यें जें मीं तुझें पाणिग्रहण केलें, त्याची विशुद्धि करण्यासाठीं व देवसाक्ष तुझा माझा विवाहविधि झाला होता हें ठरविण्यासाठीं–सारांश, जनदृष्टीनें तुला शुद्ध ठरविण्यासाठीं मीं हें वेडेपणाचें सोंग घेतलें होतें. 'केवळ स्त्रीभावानें कोणत्याही विवाहपद्धतीचा अंगीकार न करितां मी तुझ्याशीं संगत झालों, व अशुद्ध पुत्राला राज्याभिषेक केला' असें लोक म्हणतील, म्हणून मी हें वेडाचें पांघरूण घेतलें होतें. आतां, तूं माझी विनवणी करीत असतांही अत्यंत क्रुद्ध होऊन माझ्या संबंधानें जें तूं अप्रिय बोललीस, तें तुझें करणें साहाजिकच होतें. म्हणून, हे प्रिये! हे विशालाक्षि! तुला मी मोठ्या आनंदानें क्षमा करितों!" असें बोलून राजानें त्या आपल्या प्रियेला पट्टराणी करून वस्त्र-पात्र, अन्नपान इत्यादिकांनीं तिला प्रसन्न केलें.

राजा जनमेजया! पुढें लवकरच शकुंतलापुत्राचें 'भरत' असें नामकरण करून राजानें त्याला यौवराज्याचा अभिषेक केला. त्या दिवसापासून त्या महात्म्या भरताचें दिव्य, तेजस्वी, अपराभूत आणि लोकांवर वर्चस्व बसविणारें रथचक्र अथवा आज्ञाचक्र प्रकट होऊन स्थापित झालें. त्यानें

अनेक राजांचा पराभव करून त्यांस मांडलिक केलें. राजा, भरत हा सदैव शिष्टधर्माप्रमाणें वागला व त्याला शुद्ध यशाची अत्यंत प्राप्ति झाली. तो प्रतापी चक्रवर्ती व सार्वभौम राजा देवपति इंद्राप्रमाणेंच पुष्कळसे यज्ञ करिता झाला. श्रीमान कण्व ऋषींनीही त्याच्याकडून 'गोवितस' नामक अश्वमेध यज्ञ यथाविधि करविला. या यज्ञांत विपुलच दक्षिणा द्यावी लागत असते. कण्वांनाच सहस्त्र कोटिशत दक्षिणा मिळाली! पौरव कुलांत उत्पन्न झालेल्या भरतापासून भारत कुळाची स्थापना झाली व भारत कुळाची भारती कीर्ति झाली. भरतानें आपल्या पूर्वजांस व वंशजांस आपलें नांव दिलें आहे. सारांश, भरताच्या नांवानेंच भरतपूर्वज व भरतवंशज ओळखिले जातात. भरतकुलामध्येंही देवतुल्य व महापराक्रमी असे पुष्कळ ब्रह्मदेवतुल्य राजसत्तम होऊन गेले. त्यांचीं नांवें व विस्तार तर अमर्याद व अनिर्वाच्यच आहे. म्हणून त्यांतील जे श्रेष्ठ श्रेष्ठ, त्यांचा मात्र विस्तार आतां तुला सांगतों.

अध्याय पंचाहत्तरावा.

—:०:—

दक्षवंश.

वैशंपायन सांगतातः—राजा, दक्ष प्रजापति, वैवस्वत मनु, भरत, कुरु, पूरु, अजमीढ, त्याचप्रमाणें यादव व कौरव यांचा वंश, आणि भरतांचा वंश ह्यांचें कथानक तुला आतां सांगतों. हीं सर्व कथानकें पुण्यदायक, मंगलकारक, आणि धन्यता, यश व आयुष्य देणारीं आहेत. हे निष्पाप राजा! आतां सावधान चित्तानें ऐक. प्राचीनबर्हि राजाला तेजःपूर्ण, महर्षितुल्य व पुण्यवंत असे दहा पुत्र झाले. यांच्या प्रभावानें उत्पन्न झालेल्या मुखाग्नींनें पूर्वीं सर्व वृक्षसृष्टि जाळून टाकिली होती. ह्यांच्यापासून प्राचेतस दक्ष झाला, व आतांच्या सर्व प्रजा दक्ष प्रजापतीपासून झाल्या आहेत. तो सर्वांचा आदिपितामह आहे. प्राचेतस दक्ष मुनीला वीरिणी नामक स्त्रीच्या उदरीं सहस्त्र पुत्र झाले. हे पुत्र बापासारखे निर्मळ आचरणाचे होते. या सहस्त्र पुत्रांस नारदानें सांख्यज्ञानाचा—उत्तम मोक्षसाधनाचा—उपदेश केला, व त्यांस साक्षात्कारही झाला. अर्थातच त्यांनीं स्त्रीपुत्रादि विषयभोगांचा त्याग केला! एवंच, प्रजोत्पादनाचे कामीं त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तदनंतर, त्या दक्ष मुनींस ज्या पन्नास कन्यका होत्या, त्या तरी अयोग्यकाळीं ज्ञानमार्गाकडे जाणार नाहींत अशी भावना धरून दक्ष प्रजापतींनीं त्या कन्यकांचे पुत्र (आपले दौहित्र) संतानवृद्धि करतील असें समजून त्यांसच पुत्रत्व दिलें. राजा! मागें सांगितलेंच आहे कीं, दक्ष मुनींनीं धर्मास दहा, कश्यपाला तेरा, व कालमापक जो चंद्र त्यास कालमानाच्या उपयोगीं पडणाऱ्या सत्तावीस कन्या दिल्या. कश्यप ऋषीस तेरा स्त्रिया होत्या, त्यांत दाक्षायणी (अदिति) ही श्रेष्ठ होती. हिच्यापासून त्या मारीच कश्यपाला इंद्रादि बारा वीर्यसंपन्न पुत्र झाले. विवस्वान् नामक कनिष्ठ कश्यपपुत्राला यम आणि मनु हे पुत्र झाले. थोरला मनु हा बुद्धिमान आणि धाकटा यम हा विश्वशासक असे हे दोन पुत्र होत. असो; बुद्धिमान आणि धर्मशील मनूच्या द्वारानें वंशस्थापना होऊन विस्तार झाला. ह्या विस्तारालाच 'मानव' (मनुसंतति) असें नांव मनूपासून मिळालें. ब्रह्मक्षत्रादि चारही वर्ण मनूपासूनच उत्पन्न झाले आहेत. या दिवसापासूनच ब्राह्मणक्षत्रियांची जोडी जमलेली आहे. मनुपुत्रांपैकीं जे ब्राह्मण होते, त्यांनीं सांग वेदांचा स्वीकार केला; आणि वेन, धृष्णु, नरिष्यंत, नाभाग, इक्ष्वाकु, कारूष, शर्याति, आठवी इळा, पृषध्र आणि दहावा नाभागारिष्ट, या सर्वांनीं क्षात्रधर्माचा अंगीकार केला. मनूला आणखीही पन्नास पुत्र होते, पण ते परस्परांशीं भांडले

म्हणून सर्वांचा नाश झाला असें सांगतात. इलेच्या उदरीं विद्वान पुरूरवा अवतरला. याच्याविषयीं असा चमत्कार सांगतात कीं, याचीं आईबापें म्हणजे इलाच होतीं! रेत व शोणित या उभयतांचेंही आधान इलेनेंच करून पुरूरवा पुत्राची उत्पत्ति केली. हा महायशस्वी पुरूरवा तेराही द्वीपांचा उपभोग घेणारा होता. हा मनुष्य असून याचें बल अमानुष होतें. हा राजा बाहुबलानें उन्मत्त झाला असल्यामुळें ब्राह्मणांशीं त्यानें वैर बांधिलें, व ते रडत ओरडत असतांही त्यांचीं सर्व रत्नें हिरावून घेतलीं! त्याला उपदेश करून ताळ्यावर आणण्यासाठीं म्हणून प्रत्यक्ष सनत्कुमार ब्रह्मलोकांतून खालीं आले; पण त्यांच्या श्रुति, युक्ति व अनुभव यांनीं पूर्ण असलेल्या उपदेशाचें कांहींएक त्वीज झालें नाहीं! तेव्हां क्रुद्ध होऊन महर्षींनीं त्याला शापून नष्ट करून टाकिलें. सारांस, लोभ आणि बलाचा गर्व यांच्यामुळें त्या राजाचा नाश झाला. असो; हा राजा उर्वशीसहवर्तमान असतां त्यानें गंधर्वलोकांत असणारे अग्नि आणिले. गार्हपत्य, दाक्षिणाग्नि व आवहनीय हे ते अग्नि यज्ञयागादि कर्मांत अवश्य असतात. ह्या राजाला उर्वशीपासून सहा पुत्र झाले होते. ते आयु, धीमान्, अमावसु, दृढायु, वनायु व शतायु हे होत. आयूला स्वर्भानवीच्या उदरीं नहुष, वृद्धशर्मा, रज, गय व अनेनस् हे पुत्र झाले. आयुपुत्र नहुष हा बुद्धिमान असून त्याचा पराक्रम कधींही फलशून्य झाला नाहीं. यानें धर्मदृष्टीनें पृथ्वीचें कांहीं दिवस राज्य केलें. या नहुषानें पितर, देव, ऋषि, विप्र, गंधर्व, उरग, राक्षस, ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांचें पालन केलें. पुढें पुढें शत्रुसमूहांचा पराभव करून व राज्यांतील अन्यायी लोक नाहींतसे करून त्यानें ऋषींपासून कर घेण्यास सुरुवात केली; इतकेंच नव्हे, तर त्यांस वेठीस धरून त्यांच्याकडून तो ओझें वाहवूं लागला. आपल्या तेजानें, तपानें, पराक्रमानें व बुद्धिवर्चस्वानें देवांचा पराभव करून नहुष राजा इंद्रपदही पावता झाला. असो.

ययातीचें संक्षिप्त चरित्र.

नहुषाला यति, ययाति, संयाति, आयाति, अयति आणि ध्रुव असे पुत्र झाले. त्यांपैकीं यति हा योगमार्गाचा अवलंब करून ब्रह्मरूप मुनि झाला. ययाति हा सार्वभौम राजा झाला. याचाही पराक्रम अप्रतिहत होता. यानें पृथ्वीचें पालनपोषण करून पुष्कळ यज्ञ केले. यानें भक्तिपूर्वक व मनोनिग्रहानें पितरांवर व देवांवर निष्ठा ठेविली. हा अप्रतिहत योद्धा—ययाति राजा—आपल्या प्रजेचें अनुग्रहपूर्वक पालन करून तीस सुख देत असे. त्याला सर्वगुणसंपन्न आणि महाधनुर्धारी असे पुत्र झाले, ते असेः देवयानीपासून यदु आणि तुर्वसु झाले, व शर्मिष्ठेपासून द्रुह्यु, अनु व पूरु हे झाले. त्यानें अनेक वर्षें धर्मानें राज्य केल्यानंतर कालनियमाप्रमाणें त्याला रूपविनाश करणारी महाघोर जरा प्राप्त झाली. ही जरा आलेली पाहून नहुषपुत्र ययाति राजानें आपले पुत्रांस जवळ बोलावून विचारलें, "हे पुत्रहो, मला अशी उत्कट इच्छा प्राप्त झाली आहे कीं, पुनः एकदा यौवनावस्था संपादन करून घेऊन तरुण युवतींसह सर्व विषयांचा यथास्थित व यथेच्छ उपभोग घ्यावा. पुत्रांनो! तुम्हीं मला या कामांत साह्य करून माझी मनःकामना पूर्ण होईल असें करावें."

हें ऐकून, देवयानीपासून झालेल्या ज्येष्ठ यदु नामक पुत्रानें विचारिलें:—महाराज! आमच्या यौवनानें आपलें इष्ट कार्य कसें होणार? आम्हीं काय करावें म्हणजे आपली मनोरथसिद्धि होईल?

राजा म्हणालाः—माझी वृद्धावस्था तूं घे आणि तुझें यौवन मला दे; म्हणजे तुजपासून प्राप्त झाल-

१ टीकाकार नीलकंठ चतुर्धर म्हणतातः—पुरूरव्याचा जनक बाप बुध होता. इलेनें त्याला राज्य दिलें म्हणून तिजकडे पितृत्वही दिलें.

त्या यौवनानें मी पुनः विषयांचा उपभोग घेऊं शकेन. बाळा ! दीर्घकाळ चालणारे अनेक यज्ञ मीं केले, तेव्हां मला व्रतस्थ राहावें लागलें; शिवाय शुक्र मुनींचा शापही मला होता, म्हणून विषयोपभोगाचें सुख मला मुळींच मिळालें नाहीं. हा कामपुरुषार्थ साध्य झाला नाहीं म्हणून मला भारी खेद होतो. याकरितां माझी वृद्ध तनु तुमच्यापैकीं कोणीं तरी एकानें घेऊन राज्यकारभार चालवावा, आणि मी त्याची तरुण व अभिनव तनु घेऊन विषयोपभोगाचें यथेच्छ सुख घेईन. समजलांत ? इतक्या पुत्रांपैकीं कोणीं तरी ही माझी इच्छा पूर्ण करावी. "

हें ऐकून त्या यदुप्रभृति मुलांपैकीं वडिलांची वृद्धावस्था घेण्याला कोणीही सिद्ध होईना. हें पाहून ' पूरु ' नामक सत्यपराक्रमी कनिष्ठ पुत्र पुढें सरसावून म्हणाला, " बाबा ! माझी ही तरुण व अभिनव तनु घेऊन आपण पुनः यौवनस्थिति प्राप्त करून घ्यावी, आणि यथेच्छ कामभोग घ्यावे. मी आपली वृद्धावस्था घेऊन आपल्या आज्ञेनुसार आपल्या शिरावर राज्यभार घेतों. "

याप्रमाणें पूरूचें भाषण ऐकून राजास आनंद झाला, आणि त्या राजर्षीनें आपल्या तपाच्या आणि वीर्याच्या सामर्थ्यानें आपल्या त्या उदार पुत्राचे शरीरामध्यें आपली वृद्धावस्था प्रविष्ट केली. असो; याप्रमाणें पूरूचें यौवन वय घेऊन ययाति तरुण झाला; आणि ययातीचें वृद्धपण घेऊन पूरु राज्याधिकारी झाला. नंतर एक हजार वर्षेंपर्यंत तो सिंहासारखा पराक्रमी व अप्रतिहत वीर यौवनावस्थेमध्यें असतांना आपल्या शर्मिष्ठा व देवयानी नामक भार्यांबरोबर विहार करून पुनः विश्वाची नामक अप्सरेसह चैत्ररथ वनांत रममाण होता झाला. पण त्या महाकीर्तिमंत राजाची कामतृप्ति कांहीं झाली नाहीं. हें पाहून त्या महायशस्वी राजाला वाईट वाटलें, आणि त्यानें गद्यात्मक श्लोक म्हटले. त्यांचा भावार्थ असा कीं, " कामाची तृप्ति कामाचा (विषयांचा) उपभोग घेऊन होत नाहीं; इतकेंच नव्हे, तर घृताच्या आहुति जसजशा अर्पण करीत जाव्या तसतसा अग्नि ज्याप्रमाणें अधिकच पेट घेतो, त्याप्रमाणें, उपभोगानें काम अधिकच वाढत जातो. ही सर्व रत्नखचित पृथ्वी, तेथील सुवर्ण, पशु आणि स्त्रिया हीं सर्व मिळवून सुद्धां एका पुरुषाची तृप्ति व्हावयाची नाहीं ! हें जाणून शहाण्या पुरुषानें उपभोगापासून निवृत्त व्हावें. आपल्या कर्मानें, वाणीनें अथवा मनानें आपण कोणत्याही भूताचें कसलें सुद्धां पाप करीत नाहीं, कोणाविरुद्धही आपण पापकर्माचें आचरण करीत नाहीं, तेव्हां आपल्यास ब्रह्मप्राप्ति होत. जेव्हां आपणास कोणापासूनही भीति बाळगण्याचें कारण नसतें, व आपणही कोणासच भीतीचें कारण होत नाहीं, जेव्हां आपली इच्छा व द्वेष लयास जातात, तेव्हां ब्रह्मप्राप्ति होते."

जनमेजया, असा विचार करून आणि कामाची व उपभोगाची व्यर्थता त्या महाबुद्धिमान राजाचे लक्षांत येऊन, त्यानें आपलें मन ज्ञानद्वारा विषयांपासून निवृत्त केलें. अर्थातच त्याला शांति प्राप्त झाली. मग त्यानें पूरूपासून आपली जरा परत घेतली, व त्याचें तारुण्य घेतलें होतें तें त्याला परत दिलें, आणि त्याबरोबरच त्याला राज्याभिषेक करून आपलें राज्यही त्याला समर्पण केलें. याप्रमाणें, कामोपभोग हे सर्व दुष्ट आहेत असें जरी राजास समजलें व त्यांपासून तो परावृत्त झाला, तरी ब्रह्मज्ञान झाल्यानंतर जी एक अभंग व अखंड अशी तृप्ति प्राप्त होत असते, ती त्याला लाभली नव्हती. ब्रह्मज्ञानाचें संपादन त्यास करावयाचें होतेंच.

असो; आपल्या पूरु नामक पुत्राला जवळ बोलावून तो म्हणाला:—बाळा ! माझा योग्य पुत्र तूंच आहेस. तुझ्या योगानें मात्र मी खरा पिता

झालों. आतां तुला आशीर्वाद देतों कीं, तूं मोठ्या प्रसिद्ध वंशाचा मूळ पुरुष होऊन तूंच माझा वंश पुढें चालविशील. तुझ्या वंशाचें नांव 'पौरव' असें प्रसिद्ध होऊन तुझे वंशज सर्व भुवनत्रयांत विख्यात होतील.

याप्रमाणें आशीर्वाद देऊन ययाति आपल्या भार्यासहवर्तमान भृगु नामक पर्वतावर तपश्चर्या करण्यास निघाला. त्यानें पूरूस राज्याभिषेक केला होताच. अशा प्रकारें राज्याची सर्व निरवानिरव करून तो तपश्चर्येस गेला, व निरशनरूपी—भोगशून्यरूपी—तपश्चर्या करीत असतां पुष्कळ वर्षें लोटल्यावर कालाच्या नियमाप्रमाणें त्यास व त्याच्या भार्यांस पंचत्व प्राप्त झालें, आणि लागलीच ते सर्वजण स्वर्गलोकास जाते झाले!

अध्याय शहात्तरावा.

—:०:—

ययातीचें आख्यान.

जनमेजय म्हणालाः—हे महर्षे! प्रजापतीपासून दहावा जो ययाति—आमचा पूर्वज—त्याला शुक्रकन्या कशी मिळाली? शुक्राची कन्या भार्यात्वानें मिळणें हें काम कांहीं सुलभ नव्हे. तेव्हां, भगवन्! विनंती अशी आहे कीं, हा सर्व वृत्तांत मला आपण विस्तारानें सांगावा. त्याचप्रमाणें, निरनिराळे जे वंशकर राजे झाले, त्यांचीही आनुपूर्वी मला सांगावी.

कचोपाख्यान.

वैशंपायन सांगतातः—राजा, पूर्वी ययाति नांवाचा राजा होता, हें तुला विदितच आहे. याचें तेज प्रत्यक्ष देवराज इंद्राप्रमाणें होतें. याचा, व दैत्यगुरु शुक्राचार्य द्विज, व दैत्यराजा वृषपर्वा क्षत्रिय, यांचा शरीरसंबंध कसा झाला, व त्याचप्रमाणें शुक्रकन्या देवयानी व नहुषपुत्र ययाति यांचा विवाहयोग कसा जुळून आला, हेंही तूं विचारलेंस म्हणून तुला सांगतों, ऐकः—या चराचर त्रैलोक्याचें आधिपत्य व ऐश्वर्य आपल्यास प्राप्त व्हावें म्हणून देवदानवांचें युद्ध परस्परांमध्यें चाललें होतें. तेव्हां या युद्धामध्यें आपल्यास जय प्राप्त व्हावा म्हणून देवांनीं जयप्रापक यज्ञाचें पुरोहितत्व अंगिरस मुनींला दिलें, व त्याच हेतूनें दैत्यांनीही आपलें पुरोहितत्व उशनाकवि [शुक्राचार्य] यास दिलें. अर्थातच परस्परविरोधी देवदैत्यांचें हे गुरु व शुक्र पुरोहितही एकमेकांचे नित्याचे प्रतिस्पर्धी झाले. तेव्हां रणामध्यें जे जे दैत्य देवांच्या हातून मारले जात, त्यांस आपल्या विद्येच्या बलानें शुक्राचार्य पुनः जिवंत करीत; आणि हे उठलेले राक्षस पुनः देवांशीं युद्ध करण्याला सिद्ध होत. पण समरामध्यें असुरांच्या हातून युद्धास ठाकलेले जे देव मारले जात, त्यांस जिवंत करण्याचें सामर्थ्य विशाल बुद्धीच्या बृहस्पतीलाही नव्हतें; कारण संजीवनी नामक विद्या पराक्रमी शुक्राचार्यांस येत असे ती बृहस्पतीला अवगत नव्हती. अर्थातच देवसैन्यांतील सर्व योद्धे अत्यंत खिन्न झाले. त्यांस शुक्राचार्यांची अत्यंत भीति वाटूं लागली, आणि ते अत्यंत उद्विग्न झाले. अशा संकटकालीं त्यांनीं बृहस्पतीचा ज्येष्ठ पुत्र जो कच, त्याची आराधना केली आणि ते त्यास म्हणाले, "हे गुरुपुत्रा! आम्ही तुझीं आर्जवें करणारे व समरांगणांत तुमच्या सर्वांकरितां लढणारे सर्व देव तुझी अशी प्रार्थना करितों कीं, तूंही देवांचें साहाय्य करून देवांचें एक उत्तम कार्य कर. गुरुपुत्रा! तें हें कीं, त्या अद्वितीय तेजोरूपी शुक्राचार्य द्विजाच्या हृदयांत जी संजीवनी विद्या वास करीत आहे, ती लवकरच अधिगत करून घेऊन ये. आम्हांला जो यज्ञामध्यें वांटा मिळतो, त्यांत तुलाही एक भाग देऊं. तसेंच, तुला जयाचाही वांटेकरी करूं. शुक्राचार्य वृषपर्वा नामक दैत्यराजाजवळ आहेत. तुला ते तेथेंच भेटतील. शुक्राचार्य आजकाल संजी-

वनी विद्येनें दानवांचें रक्षण करितात, देवांचें करीत नाहींत; म्हणून तुला जावयास आम्ही सांगत आहों. कारण तूं तरुण आहेस. तुझा स्वभावच असा गोड आहे कीं, तूं शुक्राचार्यांचें मन प्रसन्न करून घेशील. शिवाय, त्या आचार्यांस देवयानी म्हणून एक लाडकी मुलगी आहे. तिचेंही मन सुप्रसन्न करण्यास तुझें वय व तुझा स्वभाव हीं अति योग्य आहेत. तुझ्यासारखा दुसरा कोणी देवसमूहांत दिसत नाहीं. तुझें शील, तुझें सौंदर्य, तुझें माधुर्य, तुझा मनोनिग्रह आणि तुझें आचरण हीं सर्व देवयानीला प्रसन्न करण्याची प्रबळ साधनें तुजजवळच आहेत. ती प्रसन्न झाली कीं विद्याप्राप्तीला काय उशीर आहे? तेव्हां तूंच जाऊन ती विद्या घेऊन ये."

जनमेजया, देवांचें तें भाषण कचास मानवलें, आणि तो राक्षसनगरीकडे जाण्यास निघाला. त्या वेळीं देवांनीं त्याचें अभिपूजन करून 'विजयी होऊन ये' असा आशीर्वाद दिला. देवांची आज्ञा घेऊन कच त्वरेनें निघाला, तो थेट वृषपर्व्याच्या नगरींत गेला. त्या दानवराजधानींत शुक्राचार्यांची गांठ त्यानें घेतली, आणि चरणांवर मस्तक ठेऊन म्हटलें, "भगवन्! भगवान महर्षि अंगिरस् यांचा पुत्र बृहस्पति हा प्रत्यक्ष माझा पिता आहे. माझें नांव 'कच.' कृपा करून मला आपला 'शिष्य' करावें. मी विद्याध्ययनाकरितां आपल्या समीप आलों आहें. येथें आपल्या आश्रयाला मी ब्रह्मचर्यव्रत धारण करून आपल्याजवळ सहस्र परिवत्सरपर्यंत विद्याध्ययन करीन. मला आज्ञा व्हावी."

दैत्यगुरु शुक्राचार्य म्हणाले:—हे बृहस्पति पुत्रा कचा! तुझें स्वागत असो. तुझी प्रार्थना मान्य करून, तूं अतिथि आलास म्हणून व तूं गुरुपुत्र वंदनीय आहेस म्हणून तुझें आदरातिथ्य करितों. या माझ्या कृत्यानें बृहस्पति तुष्ट होवो. तुला आतां शिष्ययोग्य ब्रह्मचर्यव्रताची दीक्षा देतों.

वैशंपायन सांगतात:—जनमेजया, कचानेंही लागलीच कविपुत्र उशना-शुक्राचार्य-यांनीं स्वतः दिलेली दीक्षा घेतली; आणि कोणत्या वेळीं काय काय करावयाचें तें समजून घेऊन तो यथोक्त विधीनें व्रतसेवा करूं लागला. त्याचप्रमाणें तो कच, आचार्य व आचार्यकन्या देवयानी यांचीही सेवा एकनिष्ठेनें करूं लागला. तो तरुण कच, जिच्या तारुण्यदशेस नुकताच आरंभ झाला आहे अशा त्या देवयानीचें मनोरंजन करण्यासाठीं केव्हां केव्हां गाणें, वाद्यें वाजविणें व नाचणें हीं कृत्यें करीत असे. तसेंच पुष्पें, फळें आणून देऊन व तिनें सांगितलेलीं कामें करून, त्या तरुण पण निर्विकार कचानें आपले शीलासंबंधें देवयानीचें मत उत्तम करून घेतलें आणि तिला संतोषित केलें. देवयानीही, नियमानें व्रतस्थ राहणाऱ्या त्या विप्राची मनोधारणा करण्यासाठीं, कोणी दुसरें जवळ नसलें म्हणजे गात असे; आणि नानाप्रकारचे मनोहर खेळही खेळे. याप्रमाणें व्रतानुपालन करीत असतां पांचशें वर्षे लोटलीं. तेव्हां तेथील राक्षसांस, बृहस्पतिपुत्र कच आला आहे व आचार्यांपाशीं विद्या शिकत आहे असें कळलें. पुढें एके दिवशीं कच एकटाच अरण्यामध्यें गाई राखीत आहे असें त्यांनीं पाहिलें. आधींच ते रागावलेले, आणि त्यांत कच एकटा एकीकडे भेटला; तेव्हां बृहस्पतीविरुद्ध त्यांचा राग व संजीवनी विद्या जाईल ही भीति, हीं दोन्ही एकवट व प्रेरक होऊन त्यांनीं क्रोधावेशांत कचाला मारून त्याचे मोहरीएवढे तुकडे केले आणि ते लांडग्यांकडून खावविले. संध्याकाळीं गाई घरीं आल्या, पण त्यांचा राखणारा कच परत आला नाहीं हें पाहून देवयानी शुक्राचार्यांजवळ जाऊन ओरडली, "बाबा! आपलें संध्याकाळचें अग्निहोत्रव्रत संपलें, सूर्यही अस्ताला गेला, गाई सुद्धां घरीं आल्या, पण कच नाहीं हो परत आला! तेव्हां कोणीं

तरी दुष्टानें त्याला मारलें आहे, किंवा तो दुसऱ्या कशानें तरी मेला आहे, हें उघड आहे. बाबा ! त्याच्याशिवाय घटकाभर सुद्धां मी प्राण ठेवणार नाहीं. हें माझें बोलणें अगदीं सत्य आहे. बाबा ! त्याला आणाहो ! "

शुक्राचार्य म्हणाले, "देवयानि, 'अरे ! इकडे ये ' असें म्हणूनच मी मृताला संजीवित करीत असतों. तूं घाबरूं नको. " असें म्हणून त्यांनीं संजीवनी विद्येचा प्रयोग केला, आणि कचाला हांक मारली. तेव्हां त्या विद्येच्या प्रभावानें एका क्षणांतच लांडग्यांचीं शरिरें फाडफाडून कच हा 'ओ' देऊन बाहेर आला, व आनंदानें उभयतांच्या पुढें उभा राहिला. तेव्हां देवयानीनें विचारलें, 'उशीर रे कां केलास ? ' कचानें उत्तर दिलें, "हे कल्याणि ! समिधा, कुश व लांकडांची मोळी घेऊन मी आश्रमाच्या जवळच्या त्या वटवृक्षावर बसून खालीं वृक्षाच्या छायेंत बसलेल्या गाई राखीत होतों, तों तेथें राक्षस आले; आणि 'तूं कोण' म्हणून त्यांनीं मला विचारिलें. तेव्हां मी त्यांना आपलें खरें नांव व गोत्र सांगितलें. माझें बोलणें संपतें न संपतें तोंच त्यांनीं मला ठार करून तुकडे तुकडे केले, व ते लांडग्यांस खाऊं घालून ते दैत्य मोठ्या आनंदानें घरीं गेले. परंतु, हे देवि, आपल्या तेजस्वी वडिलांच्या विद्याप्रभावानें मात्र तुझ्याजवळ जिवंत उभें राहण्याचें माझें महद्भाग्य होतें म्हणून मी जिवंत झालों; नाहीं तर आज मी मेलोंच होतों ! " इतकें बोलून तो स्तब्ध झाला. पुनः देवयानीच्या सांगण्यावरून एकदा कच एका अरण्यांत अकस्मात गेला, तो राक्षसांच्या दृष्टीस पडला. पुनः त्याचे तुकडे करून त्यांनीं समुद्रामध्यें टाकून दिले व फार वेळ जाऊन झाला तरी कच परत आला नाहीं, असें पाहून कन्येनें पित्याची प्रार्थना केली व पुनः शुक्रानें त्यास जिवंत केलें, आणि पुनः त्यानें घडलेली सर्व हकीकत सांगितली. तिसऱ्या वेळीं राक्षसांनीं त्यास मारून व त्याचें पीठ करून तें जाळिलें, आणि सुरेच्या पेल्यांत ती राख मिसळून तोच पेला आचार्यांस पिण्याकरितां दिला. कच परत येत नाहीं, असें पाहून देवयानी घाबरली आणि आचार्यांस म्हणाली, "फुलें आणण्यासाठीं कचाला बाहेर पाठविलें आहे. तो अजून येत नाहीं, यावरून तो मेला हेंच खरें. त्याच्या व्यतिरिक्त माझे प्राण खरोखर राहणार नाहींत !"

शुक्र म्हणाले:-मुली ! हा बृहस्पतीचा मुलगा कच दोन वेळां मेला, तथापि मी त्याला आपल्या विद्यासामर्थ्यानें उठविलें. आतां, जिवंत केला तरी हा पुनः पुनः मरतो, त्याला आपण काय करावें बरें ! देवयानि, तूं अशी रडूं नको. तुझ्यासारख्या मुलीनें माणसांप्रमाणें रडूं नये. तूं वरच्या कोटींतील आहेस. प्रत्यक्ष वेद, सर्व ब्राह्मण, इंद्रासहित सर्व देव, अष्टवसु, अश्विनीकुमार, सुरद्वेष्टे राक्षस, फार तर काय ? सर्व जगतें तीन्ही संध्याकाळीं माझ्या प्रभावानें तुला नमस्कार करितात त्या तूं असें माणसांसारखें रडावेंस ? छेः ! असें करूं नको. बाळे ! या ब्रह्मपुत्राला जिवंत ठेवणें अशक्य झालें आहे. कारण, संजीवित केला तरी पुनः तो मारला जातोच आहे.

देवयानी म्हणाली:—बाबा ! अति वृद्ध अंगिरा हा ज्याचा आजोबा, तपोनिधि बृहस्पति हा ज्याचा बाप, त्या ऋषीच्या नातवासाठीं व पुत्रासाठीं (कचासाठीं) मला कसाहो शोक होणार नाहीं व रडायाला तरी कसें येणार नाहीं ? बाबा ! माझा कच महाब्रह्मचारी, खरा तपःसागर, सदा तत्पर आणि कामांत मोठा दक्ष असा आहे हो ! तो प्रियदर्शन आणि सुखरूप असा आहे ना ? महाराज ! मी आतां खातपीत नाहीं, आणि कच ज्या मार्गानें गेला त्याच मार्गाला जातें ! '

वैशंपायन सांगतातः—याप्रमाणें देवयानीचा आततायीपणा पाहून शुक्र मुनींस दुःख झालें, आणि त्यांनीं कावरेबावरेपणानें व रागानें असुरांस

बोलावून आणिलें, व कचासही हांक मारून ते म्हणाले, "माझ्या येथें विद्या शिकण्यासाठीं आले ल्या शिष्यांस त्रास देणारे व ठार मारणारे तुम्ही राक्षस माझा द्वेष करितां आणि माझा राग आपल्यावर ओढून घेतां व घ्याल. हे तामसी लोकहो, माझा आज्ञाभंग करून व माझ्या आश्रयास असलेल्या ब्राह्मणाची हत्या करून मला अब्राह्मण करूं पाहतां काय? अरे मूर्खांनो! तुमच्या पातकांचा घडा भरला; तुमचा येथल्या येथेंच अंत होईल, समजलांत? प्रत्यक्ष इंद्राचा घात करायाला ब्रह्महत्या चुकत नाहीं, मग तुमच्यासारख्या बाकीच्या लोकांची कथा काय? असो; कचा! बाळा! ये."

वैशंपायन सांगतात:—संजिवनी विद्येच्या सामर्थ्यानें आचार्यांच्या उदरांत जिवंत झालेला पण 'गुरूंचें कसें होईल?' या भीतीनें ग्रस्त झालेला कच उदरांतून बोलूं लागला. "अरे, माझ्या उदरांत तूं कसा आलास? तूं तर माझ्या उदरांत आहेस!" असें आचार्यांनीं विचारल्यावर कचानें उत्तर दिलें, "भगवन्! आपला अनुग्रह माझ्यावर मोठा, म्हणून माझी स्मरणशक्ति अद्यापिही कायम आहे. हा प्रसंग जसा घडून आला, तसाच्या तसा माझ्या स्मृतींत प्रत्यक्ष उभा राहिला आहे. असो; महाराज! मला बाहेर बोलावूं नका; कारण आपलें उदर फाडून मला बाहेर यावें लागेल; आणि तसें झाल्यास मला गुरुहत्येचें पातक लागून माझ्या तपाचा सर्वथा क्षय होईल. यापेक्षां मला येथें जीं दुःखें होत आहेत तीं मी सुखानें सहन करीन. महाराज! मला मारून, जाळून व राख करून दैत्यांनीं ती राख आपल्या दारूच्या पेल्यांत घालून तो पेला पिण्यास दिला व आपण तोच प्यालां. असो; भगवन्, आपल्यासमोर ब्राह्मी किंवा आसुरी मायेचा उपयोग करण्याचें कोणाचेंही सामर्थ्य नसल्यामुळें आपलें अतिक्रमण करून केवळ विद्येच्या जोरावर आपलें उदर विदारण करून बाहेर येणें मला कठिण वाटतें, आणि आपण जिवंत राहाल तर मलाही आपल्या बळावरच ब्राह्मी किंवा आसुरी मायेचें कसें तरी अतिक्रमण करितां येईल. मी बाहेर आलों तर आपण जिवंत राहणार नाहीं, आणि आपण गेलां तर माझें, आपलें, देवयानीचें व सर्व विश्वाचें अनहित होईल. म्हणून मला हा गर्भवासच असूं द्यावा!"

शुक्राचार्य म्हणतात:—देवयानि! आतां काय केलें म्हणजे तुझें समाधान होईल तें सांग. तुला कच हवा असेल तर माझा वधच झाला पाहिजे; कारण माझ्या उदराचा भेद झाल्यावांचून उदरगत कचाला बाहेर येणें शक्य नाहीं; आणि मी हवा असलों, तर कच बाहेर यावयाचा नाहीं!

देवयानी म्हणते:—बाबा! तुम्ही दोघेही मला प्रियच आहां. तेव्हां तुमच्यांतून एकाचाही विरह मला अग्नीप्रमाणेंच जाळूनच टाकणार. बाबा! कच नाहींसा झाला तर माझें जन्माचें सुख नष्ट होणार, आणि आपण मला सोडून गेलां तर माझे प्राण निघून जाणार!

हें ऐकून आचार्य म्हणाले:—हे गुरुपुत्रा कचा! माझी प्रिय कन्या देवयानी तुझ्या कल्याणासाठीं—तिची सेवा करणाऱ्यासाठीं इतकी काळजी घेत आहे, यावरून तूं योग्य पुरुष आहेस, व विद्यादानासही योग्य आहेस, हें उघड आहे. तूं जर इंद्र नसशील—तूं इंद्र असून कचरूपानें जर येथें आला नसशील, तर मी ही संजीवनी विद्या देतों ती घे. ब्राह्मणाव्यतिरिक्त माझ्या उदरांतून जिवंत असा कोणीही बाहेर पडणार नाहीं. तो तेथल्या तेथेंच नष्ट होईल. हा विद्यामंत्र सांगतों तो ग्रहण कर. तूं ब्राह्मण आहेस आणि ब्रह्मवध करणें माझें शील नाहीं. असो; ही विद्या घेऊन तूं माझें उदर फाड व बाहेर ये. माझ्या उदरांत राहिल्यामुळें तूं माझा पुत्रच झालास. बाहेर

हाच मंत्र म्हणून तूं मला उठीव; मला पुनर्जन्म दे. मीं तुला उठविलें आहे, हा उपकार तूं विसरणार नाहींसच ! गुरूपासून (माझ्यापासून) विद्या शिकून तूं तज्ज्ञ झाला आहेस, तेव्हां धर्मपूर्वक विचार पूर्णतः करून कृतज्ञताधर्मास योग्य तेंच कर.

वैशंपायन सांगतातः—याप्रमाणें गुरूपासून विद्या संपादन करून, कच हा शुक्र मुनींचें उदर फाडून बाहेर आला. सूर्याचा अस्त झाला असतां पौर्णिमेचा चंद्र जसा अति सुंदर दिसतो, त्याप्रमाणें कचाचें स्वरूप या वेळीं दिसलें. बाहेर येतांक्षणीं ते मरून पडलेले आपले वेदमूर्ति गुरूजी, त्यांस संजीवनी विद्येच्या सामर्थ्यानें कच पुनः जिवंत करिता झाला. याप्रमाणें विद्यासंपादन करून व ती सिद्ध झाली असें प्रत्यक्ष पाहून, कचानें गुरूजींस प्रीतिपूर्वक व भक्तिपूर्वक नमस्कार केला आणि तो म्हणाला, "भगवन्! आपण मला संजीवनीविद्यारूप अमृत पाजिलें; त्याचप्रमाणें मला येत नसलेली विद्या जो शिकवील, त्याला मी मातापितरांप्रमाणें मान देईन. हा मातापितरांस योग्य असणारा मान मी आपल्यासही देतों. कारण, आपण माझ्यावर अनंत उपकार केले आहेत. भगवन्, माझ्या गुरूशीं मी कधींही कृतघ्न होणार नाहीं, व त्यांचा द्वेषही करणार नाहीं, तर नेहमीं कृतज्ञच राहीन. सर्व निधींचा निधि म्हणजे सर्व विद्यापारंगत असणाऱ्या व उत्तमोत्तम सत्य असतें त्याचें दान करणाऱ्या पूज्य गुरूचा जे लब्धविद्य पंडित मान ठेवणार नाहींत, त्यांची विद्या निष्फळ होऊन ते कृतघ्न मूर्ख पापी लोकांस जातील; अर्थात् दुःखमय लोकांत दुःख सोशीत राहतील. महाराज! माझ्या कृतघ्नत्वाविषयीं आपल्यास मुळींच शंका नको!"

वैशंपायन सांगतातः—राजा सर्वज्ञ असला तरी सुरापानाच्या योगानें पुरुष कसा फसतो हें आपल्यावरूनच पाहून, व सुरापानानंतर कांहीं वेळपर्यंत तरी ज्ञाननाश होऊन केवढी भयंकर हानि होते हें पाहून, व तसेंच, सुरापान झाल्यामुळें तसल्या सुंदर कचाच्या सुद्धां रक्षेचें पान करीत असतांही आपणांस कांहीं समजलें नाहीं असें जाणून शुक्राचार्यांस भारी वाईट वाटलें, व सपाटून क्रोधही आला! शुक्राचार्य म्हणजे ब्राह्मणांचे मोठे हितैषी! तेव्हां आपलें व्यसन नष्ट व्हावें, व कोणाही ब्राह्मणास तें व्यसन लागूं नये, म्हणून सुरादेवीवर अत्यंत रागावलेले शुक्र मुनि रागाच्या सपाट्यांत उठले आणि शापवाणीनें बोलते झाले, "जो कोणी ब्राह्मण आजपासून पुढें व्यसनी लोकांच्या भिडेस पडून, मोहानें अथवा स्वतांच्या मूर्खपणानें सुरापान करील, तो धर्मभ्रष्ट होऊन ब्रह्महत्येचें पातक शिरीं घेईल; व या लोकांत त्याची अप्रतिष्ठा होऊन परलोकांतही त्याला अनंत कष्ट सोसावे लागतील. ही मर्यादा मीं आज स्थापन केली आहे. ही मर्यादा—विप्रांस योग्य असे जे धर्म सांगितले आहेत त्यांची सीमाच आहे. गुरूची आज्ञा उल्लंघन न करणारे जे साधुसज्जन, विप्र, देव व लोक, त्या सर्वांनीं ही मर्यादा लक्षांत ठेवावी."

याप्रमाणें मर्यादा स्थापन करून ते तपोनिधिश्रेष्ठ, अद्वितीय व महातेजस्वी शुक्राचार्य आपल्या जवळच असणाऱ्या व दैवदुर्विलासानें मूर्खत्व पावल्या त्या राक्षसांकडे वळून म्हणाले, "अहो बालिश दैत्यहो! तुमच्या मूर्खपणामुळें मात्र या माझ्या प्रिय शिष्य कचाला ही संजीवनी विद्या सिद्ध झाली! मूर्खांनो! विद्या प्राप्त झालेला हा कच ब्राह्मण साक्षात् वेदोनारायण आहे. याचें सामर्थ्यही आतां माझ्याप्रमाणेंच झालें आहे. हा महात्मा उदार आहे. हा आतां मजजवळ राहील; पण तुमच्या हातून याला यत्किंचितही पीडा होणार नाहीं." असें बोलून ते भार्गव मुनि स्तब्ध झाले; व ते खुळे राक्षसही, मूर्ख व तामसी शत्रूंनीं केलेले अपकार सज्जनांस उपकारच होतात याच्या आश्चर्यानें चकित होऊन

आपआपल्या घरीं गेले. तो कचही गुरूजवळ एकंदर एक हजार वर्षें राहिला. नंतर गुरूंची आज्ञा घेऊन देवलोकीं जाण्याचें त्यानें मनांत आणिलें !

अध्याय सत्याहत्तरावा.

—:०:—

कचदेवयानीसंवाद.

वैशंपायन सांगतातः—राजा, ज्या कार्यासाठीं आपण आलों, ती विद्या आपणास साध्य झाली, व्रतनियम संपूर्ण झाला, व गुरूंनींही आज्ञा दिली, हें पाहून कच महात्मा देवलोकास जाण्यासाठीं निघाला. त्या वेळीं त्याला देवयानी म्हणाली, "हे अंगिरसपौत्रा ! कुलशीलानें, स्वतांच्या सात्त्विक आचरणानें, आणि विद्या, तप व मनोनिग्रह यांच्या योगानें तूं कुलभूषण व जगद्रत्नच झाला आहेस. माझे बाबा अंगिरा ऋषींना मान देतात, त्याचप्रमाणें मला बृहस्पति मान्य व पूज्य आहेत, असें मी तुला सांगतें. आतां, हे तपोधना ! मी काय म्हणतें तें ऐक. तूं ब्रह्मचर्यव्रताच्या नियमानें चालत होतास त्या वेळींही तुझ्याशीं मी भक्तिपूर्वक वागलें आहें; आतां तुझी विद्या संपादित झाली आहे, म्हणून तुझें ब्रह्मचर्यव्रत संपलें आहे; तेव्हा तूंही आतां प्रीतिपूर्वक माझें पाणिग्रहण कर. अर्थातच हा विधि मंत्रपुरःसर व बाबांच्या अनुमतानें होईल. तूं सर्वगुणसंपन्न द्विज आहेस म्हणून मला अत्यंत प्रिय आहेस."

कचानें उत्तर दिलें:—देवयानि ! तुझे बाबा जसे तुला मान्य व पूज्य आहेत, तसेच मलाही आहेत. ते माझे वडिलच आहेत; आणि तूं तर मला अधिकच पूज्य आहेस. कारण तुझें वर्तन व तुझें स्वरूप हीं अत्यंत निर्मळ आहेत. शिवाय, महात्मे शुक्राचार्य तुझ्यावर प्राणांपेक्षांही अधिक प्रेम करितात. आणखी तिसरें कारण असें आहे कीं, धर्मदृष्टीनें पाहिलें असतां तूं माझी गुरुभगिनी होतेस. देवयानि ! ज्याप्रमाणें तुझे वडील व माझे गुरु श्रीशुक्राचार्य हे मला माझ्या वडिलांप्रमाणें पूज्य व सेव्य आहेत, त्याचप्रमाणें तूंही मला पूज्य व सेव्य आहेस. तेव्हां तूं माझ्याशीं बोलत आहेस तसें बोलणें तुला योग्य नाहीं. तूंही मला गुरुसमानच आहेस.

देवयानी म्हणाली:—कचा ! तूं अंगिरापुत्र जे बृहस्पति त्यांचा पुत्र आहेस. तूं माझ्या बाबांचा मुलगा नाहींस, म्हणून तूंही मला मान्य व पूज्य आहेस. हे ब्राह्मणश्रेष्ठा, भर्तृत्वासाठीं मी याचना करीत आहें ती याच कारणामुळें होय. अरे, अनेक वेळ राक्षसांनीं तुझा घात केला असतां तुला पुनः पुनः ज्या प्रीतिप्रेरणेनें उठविलें, ती माझी अनन्य प्रीति तुझ्या स्मरणांतून जाऊं देऊं नको. सुंदरा ! तुझ्याशीं जो मीं स्नेह केला, व तुझ्यावर जी प्रीति केली, त्यांवरून, माझी तुझ्यावर केवढी भक्ति आहे हें तुला समजलेंच आहे. तेव्हां, हे धर्मज्ञा ! तुझ्यावर भक्ति करणारी व शुद्ध आचरणाची जी मी, त्या माझा—मी तुझी प्रार्थना करीत असतां—त्याग करणें तुझ्यासारख्या दयाळू व गुणज्ञ पुरुषास योग्य नाहीं.

कच म्हणतो:—भगिनि देवयानि ! हे मंगलव्रतधारिणि ! जें कोणींही कधीं करूं नये, तें करायाला तूं मला कां बरें सांगतेस ? कृपा कर, माझ्यावर अनुग्रह कर; हे सुंदरी, तूं मला श्रीशुक्र मुनींपेक्षांही जास्त सन्माननीय आहेस. बाई ! जेथें तुझी गुरुमहाराजांच्या उदरांत वसति होऊन तूं उत्पन्न झालीस, त्याच उदरांत मी कांहीं वेळ राहिलों होतों, हें तूं विसरलीस काय ? धर्मदृष्टीनें तूं माझी बहीण होतेस, म्हणून असें धर्मकटु वचन बोलूं नको. हा दीन तुमच्या येथें मोठ्या सुखानें शिष्यवृत्ति धरून राहिला, आणि तुम्हीं उभयतांनीं मजवर पोटच्या पोराप्रमाणें प्रेम केलें हें माझें सौभाग्य होय. ताई ! तूं असें भलतेंच मनांत आणिलेंस याबद्दल मी रागावत नाहीं, पण माझ्या दुर्भाग्याला मात्र दोष

देतों. असो; येतों मी आतां. ताई ! मला चांगला आशीर्वाद दे; आणि कांहीं गोष्टीवरून माझें स्मरण तुला झालेंच, तर कृपा करून माझ्या सद्यःकालीन वर्तनाचा विचार धर्मदृष्टीनें कर, अशी तुला विनंती आहे. त्याचप्रमाणें, माझे गुरूजी व तुझे वडील श्रीशुक्राचार्य यांचें आराधन आणि सेवा तत्परतेनें व वेळच्या वेळीं करीत जा. तूं करशीलच; पण माझा धर्म म्हणून मी तुला विनंती करितों. परमेश्वर तुझें कल्याण करो !

कच व देवयानी यांचे परस्परांस शाप.

हें ऐकून देवयानी रागानें म्हणाली:—अरे कृतघ्ना कचा ! धर्म आणि काम हे पुरुषार्थ साध्य करण्यासाठीं मीं तुझी विनवणी केली असतांही तूं मला झिडकारून लाविलें आहेस म्हणून तुला मी असा शाप देतें कीं, तूं जी विद्या घेऊन माजोरीपणानें निघून जात आहेस, ती विद्या तुला केव्हांही फलद्रूप व्हावयाची नाहीं. जा, निघून चालता हो !

कच शांतपणें म्हणाला:—देवि ! तुजमध्यें कांहीं दोष आहे म्हणून मीं तुझा अंगीकार केला नाहीं असें नव्हे, तर तूं माझी गुरुभगिनी आहेस, म्हणून मला तुझें पाणिग्रहण करितां येत नाहीं. शिवाय, या कृत्याला गुरूजींचेंही अनुमोदन नाहीं. आतां, तूं मला शापिलें आहेस, खुशाल मला शाप दे. तूं गुरुभगिनी आहेस व मी सत्त्विक ब्राम्हण आहें, म्हणून तुला प्रतिशाप देत नाहीं. असो; ऋषिप्रणीत धर्मानें मी वागत असतांही मला शाप देण्याचा बुद्धि तुला झाली ! अस्तु; या कामविकारजन्य शापाला मी योग्य नाहीं. हा तुझा शाप अधर्मवृत्तीनें उत्पन्न झाला आहे. अर्थातच 'ब्राह्मणपुत्रानें आपल्याला वरावें ' हा जो तुझा काम (इच्छा) तो कधींही सफल होणार नाहीं. कोणताही ऋषिपुत्र तुझें पाणिग्रहण करणार नाहीं ! आतां, माझी विद्या ' मला फलद्रूप होणार नाहीं ' असा तुझा शाप आहे, असूं दे. ज्याला ज्याला मी ही संजीवनी विद्या शिकवीन, त्याला त्याला तर ती फलद्रूप होईल ? झालें माझें काम !

वैशंपायन सांगतातः—राजा, याप्रमाणें देवयानीस बोलून व तिचा निरोप घेऊन हा जगद्विजयी कच तेथून निघाला, आणि लवकरच इंद्रलोकास गेला. याप्रमाणें विद्या संपादन करून कच परत आला असें समजतांच इंद्रप्रमुख सर्व देवांनीं बृहस्पतीचा मोठा सत्कार केला, व त्याचा पुत्र जो कच त्यास जयजयकारून ते म्हणाले:—गुरुपुत्रा कचा ! आज जें हें आमचें तूं अलौकिक कल्याण केलें आहेस, त्याची—या तुझ्या अद्भुत पराक्रमाची—कीर्ति यावच्चंद्रदिवाकरौ राहील, आणि तुला यज्ञामध्यें आमच्याप्रमाणेंच भाग मिळेल !

अध्याय अठ्याहत्तरावा.

—:०:—

देवयानीशर्मिष्ठाकलह.

वैशंपायन सांगतातः—याप्रमाणें विद्यार्जन करून कच इंद्रलोकास गेला, तेव्हां देवांस मोठा आनंद झाला, व कचापासून त्या अमोघ विद्येचें ग्रहण करून ते कृतार्थ झाले. नंतर सर्व देवांनीं इंद्रास विनविलें कीं, "इंद्रा ! पराक्रम करण्याचा आतां समय आहे. चला, आपण शत्रूंचा समाचार घेऊन त्यांस नामशेष करावें." 'तथास्तु' असें म्हणून देवेंद्र भूलोकास आला, आणि पाहतो तों एका चैत्ररथतुल्य वनांत कांहीं कुमारी जलक्रीडा करीत आहेत. हें पाहून, गंमत करावी या हेतूनें वायुरूप होऊन खोडकर इंद्रानें त्या सगळ्यांची वस्त्रें एका ठिकाणीं घोंटाळून ठेविलीं. त्या कुमारींचीं वस्त्रें अस्ताव्यस्त केलीं असतां त्या दोन्ही कुमारिकांच्या द्वारें शुक्र व राक्षस यांमध्यें द्वेष उत्पन्न व्हावा, असा इंद्राचा मनोरथ होता. असो. जलक्रीडा संपल्यावर सगळ्याजणी एकदम-

च बाहेर आल्या; आणि त्या धांदलींत जिला जें वस्त्र सांपडलें तें ती चटकर नेसावयास लागली. ह्या गडबडींत वृषपर्वा राक्षसपति याची मुलगी शर्मिष्ठा ही चुकून देवयानीचें लुगडें नेसली. आपलें लुगडें शर्मिष्ठा नेसली असें पाहून देवयानी संतापली, व देवयानी संतापली असें पाहून शर्मिष्ठेला राग आला. अर्थातच लुगड्याच्या निमित्तानें उभयतांचें मोठें कडाक्याचें भांडण झालें.

देवयानी म्हणते:—दैत्यकन्ये, तूं माझी शिष्यीण असून माझें लुगडें काय म्हणून घेतेस? तुझें कधीं चांगलें होणार नाहीं!

शर्मिष्ठेनें उत्तर केलें:—अग, दाता, स्तुत्य आणि कोणापासून कधींही दान न घेणारा अशा राजश्रेष्ठाची मी कन्या असून, माझा पिता बसला अथवा निजला असतां त्याच्यापुढें नम्रपणानें उभा राहून तुझा बाप भाटाप्रमाणें त्याची स्तुति करीत असतो, तेव्हां तूंच स्तुति व याचना करून दान घेणाऱ्याची मुलगी आहेस. भिकारडे! तूं खुशाल रागाव, आदळआपट कर, भुईवर गडबडा लोळ, अथवा द्वेष धर; मी त्याची मुळींच परवा करीत नाहीं. अग भिकारणी, तूं अशी दीन असतां मजसारखीवर उगाच रागावतेस! पण मीही जशास तशीच आहें हें तुझ्या चांगलें अनुभवास येईल!

वैशंपायन सांगतात:—राजा, याप्रमाणें त्या दोघी एकमेकींस घालून पाडून बोलतां बोलतां द्वेषबुद्धि मनांत धरून देवयानी त्या लुगड्याची हिसकाहिसक करूं लागली; तेव्हां शर्मिष्ठेनें तिला तेथेंच विहिरींत ढकलून दिलें, आणि ती मेलीच अशी कल्पना करून ती दुष्ट बुद्धीची मुलगी फणफणत आपल्या नगरांत परत आली; आणि मागें तिचें काय झालें असेल याची परवाही न करितां खुशाल घरीं गेली!

इकडे, ज्या प्रदेशामध्यें देवयानी ही विहिरींत पडली होती, त्याच प्रदेशांत कर्मधर्मसंयोगानें नहुशपुत्र ययाति मृगाच्या मागें लागून आला! त्या वेळीं त्याच्या रथाचे आणि स्वारीचे अश्व अगदीं श्रांत झालेले असून तो स्वतःही फार तृषाक्रांत झालेला होता. तेव्हां उदकप्राशनार्थ तो त्या विहिरीच्या कांठीं गेला, आणि आंत डोकावून पाहतो तों ती अगदीं कोरडी ठणठणीत असून, अग्निज्वालेप्रमाणें तेजस्वी अशी एक कन्या मात्र आंत आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें!

राजा, त्या देवासारख्या तेजस्वी कन्येस पहातांच त्यानें विचारलें, "हे सुंदर स्त्रिये, तुझ्या कानांत रत्नखचित कुंडलें असून तुझीं नखें लाल आहेत, अशी तूं कोण? कोणाची कन्या? या लतातृणाच्छादित कूपांत तूं कशी पडलीस? तूं अशी शोक कां करीत आहेस? आणि तुझें मन कसल्या चिंतेनें व्याप्त झालें आहे? जें काय खरें असेल तें सांग."

देवयानी म्हणाली:—देवांनीं मारलेल्या दैत्यांना जो आपल्या मंत्रविद्येनें जिवंत करितो, त्या शुक्राचार्यांची मी कन्या असून माझी अशी स्थिति झाली आहे याची त्यांना वार्ताही नाहीं. राजा, आतां, ज्या बोटांचीं नखें लाल आहेत, तो माझा उजवा हात धरून तूं मला बाहेर काढ. तूं पराक्रमी, कीर्तिमान व सदसद्विचारी आहेस हें मी जाणत असून तूं सुशील असल्यामुळें मला मान्य आहेस. तर तूं मला या दुःखप्रद स्थितींतून मुक्त कर.

वैशंपायन म्हणाले:—राजा, असें तिनें सांगितल्यानंतर, ही ब्राह्मणकन्या आहे असें जाणून नहुषपुत्र ययाति राजानें तिचा उजवा हात धरून तिला झट्कन् बाहेर काढिलें, आणि त्या सुंदरीस विचारून तो आपल्या नगरास परत गेला. इकडे ती शोकसंतप्त देवयानी तेथेंच असतां तिच्या शोधाकरितां नगरांतून घूर्णिका नांवाची एक दासी आली. तेव्हां देवयानी तिला म्हणाली, "घूर्णिके, 'मी आतां वृषपर्व्याच्या नगरांत येत नाहीं' असें माझ्या पित्याला जाऊन सांग."

वैशंपायन सांगतात:—राजा, देवयानीचें हें भाषण ऐकून घूर्णिका घाईघाईनें नगरांत आली, आणि ज्ञानसंपन्न शुक्राचार्य वृषपर्व्याच्या घरीं आहेत असें कळल्यावर तिकडे जाऊन त्यांस म्हणाली, "हे महाभाग, देवयानीला वृषपर्व्याच्या शर्मिष्ठेनें रानांत मारिलें !"

आपल्या मुलीला शर्मिष्ठेनें मारिलें हें ऐकतांच दु:खाच्या वेगानें शुक्राचार्य तेथून उठून लागलीच वनामध्यें गेले; आणि तिची स्थिति पाहून प्रेमभरानें तिला कवटाळून दु:खित स्वरानें म्हणाले, "देवयानि, लोकांकडून आपल्याला जें दु:ख प्राप्त होतें, त्याला आपले स्वतांचे दोषच कारण होत; व तुझें पूर्वजन्मींचें कांहीं तरी पाप शिल्लक आहे, त्याबद्दल हें तुला प्रायश्चित्त मिळालें असावें असें मला वाटतें !"

देवयानी म्हणाली:—बाबा, मला प्रायश्चित्त मिळालेलें असो, अथवा काय वाटेल तें असो; पण वृषपर्व्याची शर्मिष्ठा जें मला बोलली तें तुम्ही नीट ऐकून घ्या. बाबा, मी तुम्हांला खरें सांगतें. ती वृषपर्व्याची गर्विष्ठ शर्मिष्ठा रागानें डोळे लाल करून माझ्या काळजाला घरें पाडण्यासारखे शब्द मला वरचेवर बोलली कीं, 'तूं नित्य स्तुति व याचना करून दान घेणाऱ्याची मुलगी असून तुझा बाप स्तुतिपाठक आहे, व मी स्तुत्य, दाता आणि दान देणारा अशाची मुलगी आहें.' बाबा, 'असें जर खरें असेल, तर मी तुझी क्षमा मागेन' असें मीं सखीला म्हटलें.

शुक्राचार्य म्हणाले:—देवयानि, स्तुति, याचना व प्रतिग्रह करणाऱ्याची तूं मुलगी नसून, जो इतरांची कधींही स्तुति करीत नाहीं–इतकेंच नव्हे. तर इतरच ज्याची स्तुति करितात अशाची तूं मुलगी आहेस. ज्याची कल्पनाही करितां येणार नाहीं असें जें माझें ब्रह्मरूप ईश्वरी बळ, ते वृषपर्वा, इंद्र व ययाति हेच पूर्णपणें जाणत आहेत. पृथ्वीवर, तसेंच स्वर्गांत जें जें वस्तुमात्र म्हणून कांहीं आहे, त्याचा नित्य अधिपति मी आहें, असें प्रत्यक्ष ब्रह्मदेवानें संतुष्ट होऊन मला सांगितलें आहे. प्रजेच्या हिताकरितां मीच जलवृष्टि करीत असून सर्व ओषधींचें पोषणही मीच करितों.

वैशंपायन म्हणाले:—राजा, याप्रमाणें, दु:खित होऊन क्रोधानें व्याप्त झालेल्या त्या देवयानीचें मधुर व प्रिय अशा शब्दांनीं पित्यानें सांत्वन केलें.

अध्याय एकुणऐशींवा.

—:०:—

शुक्र व देवयानी यांचा संवाद.

शुक्राचार्य म्हणाले:–देवयानि, दुसऱ्यानें केलेली निंदा जो पुरुष नेहमीं सहन करितो, त्यानें हें सर्व जिंकिलें असें तूं समज. नुसते रज्जु हातांत धरून न बसतां बिथरलेल्या घोड्यांना आवरून धरणाऱ्यालाच जसें सारथि म्हणतात, तसें, उत्पन्न झालेल्या क्रोधाला क्षमेच्या योगानें जो आवरून धरितो त्यासच ज्ञानी–निग्रही–म्हणतात, व त्यानेंच हें सर्व जिंकिलें ! ज्याप्रमाणें शरिरावर उत्पन्न झालेली कात युक्तीनें सर्प टाकून देतो, त्याप्रमाणें मनावर उत्पन्न झालेला क्रोध क्षमेच्या योगानें जो टाकून देतो, त्यालाच या लोकीं पुरुष सुज्ञ असें म्हणतात. तात्पर्य, जो दुसऱ्यानें केलेलीं मर्मभेदक भाषणें सहन करून क्रोधाचें आकलन करितो, व अतिशय त्रास झाला तरी जो रागास चढत नाहीं, तोच खरोखर पुरुषार्थाला पात्र आहे. आळस न करितां महिन्याचे महिन्यास याप्रमाणें शेंकडों वर्षें पितृयज्ञ करणारा आणि कोणावर कधींही न रागावणारा, या दोघांमध्यें अक्रोधी म्हणजे न रागावणारा याचीच योग्यता जास्त आहे. लहान मुलांमुलींना बऱ्या वाईटाचा विचार नसतो, म्हणून तीं अज्ञान मुलें जे तंटे करितात त्यांचें अनुकरण शहाण्यानें

करूं नये. अर्थात् अज्ञानामुळें शर्मिष्ठेनें जो अपराध केला, त्याची क्षमा करणेंच योग्य आहे!

देवयानी म्हणतेः—बाबा, मी जरी लहान आहें, तरी मला धर्मांतील भेद माहीत असून सहनशीलता आणि वितंडवाद यांमध्यें चांगलें कोणतें व वाईट कोणतें हेंही मला चांगलें समजतें. पण महत्त्वाकांक्षी पुरुषानें अमर्यादपणानें वागणाऱ्या शिष्याला क्षमा करणें बरें नव्हे. याकरितां, बाबा, ज्याच्या आचरणांत कोणताच ताळ व मेळ उरला नाहीं, अशाजवळ रहाणें मला निखालस बरें वाटत नाहीं. जे आपल्या आचरणाला आणि आपल्या कुलाला दूषण ठेवितात, अशा दुर्बुद्धि लोकांत, ज्याला आपल्या कल्याणाची इच्छा आहे अशा जिज्ञासूनें राहूं नये; आचरण व कुळ यांवरूनच जे आपणांस ओळखितात, अशा सज्जनांमध्येंच निरंतर रहात असावें. तेंच रहाणें उत्तम असें म्हटलें आहे. अग्नि उत्पन्न करणारा पुरुष ज्याप्रमाणें अरणी मंथन करितो, तद्वत् या वृषपर्व्याच्या मुलीचे ते फार भयंकर व मर्मभेदक शब्द माझ्या हृदयाचा भडका करीत आहेत! यापेक्षां अधिक दुःसह दुःख त्रिभुवनांत असेल असें मला वाटत नाहीं. शत्रूच्या डोळे दिपविणाऱ्या वैभवाची उपासना करणाऱ्या भाग्यहीन मनुष्याला मृत्यु आलेला फार उत्तम असें विद्वान म्हणतात!

अध्याय ऐशींवा.

—:०:—

देवयानीकोपसांत्वन.

वैशंपायन म्हणालेः—नंतर ते कोपायमान झालेले भृगुश्रेष्ठ शुक्राचार्य वृषपर्व्याकडे गेले आणि कांहींएक विचार न करितां ते त्याला म्हणालेः—राजा, धेनूला चारा घालतांच जशी तात्काळ फलप्राप्ति होते, त्याप्रमाणेंच जरी आपल्या हातून घडलेल्या अधर्माचें फल तात्काळ प्राप्त होत नाहीं, तरी पुढें केव्हांना केव्हां तरी तो अधर्म कर्त्याचीं पाळेंमुळें खणून काढितोच. कदाचित् स्वतः कर्त्यास तें फल भोगावें न लागलें तरी तें त्याचे पुत्र किंवा नातू यांस भोगावें लागतें. सारांश, पोटांत गेलेलें अन्न जसें आपला गुण केल्याशिवाय राहात नाहीं, तसें पातकही फल दिल्याशिवाय राहात नाहीं हें निश्चित होय. वृषपर्व राजा, ब्राह्मण असून धर्म जाणणाऱ्या, व गुरूची सेवा करण्याच्या इच्छेनें माझ्या घरीं आनंदानें राहिलेल्या त्या आंगिरसकुलोत्पन्न कचाचा कांहींएक अपराध नसतां तूं घात केलास, व माझ्या कन्येस दुःख दिलेंस, त्यापेक्षां हें खातरीनें समज कीं, मी तुझा व तुझ्या गणगोताचा त्याग करून निघून जाणार! राजा, तुझ्याजवळ—इतकेंच नव्हे, तर तुझ्या देशांतही मी राहूं इच्छीत नाहीं. अरे दैत्या! तूं जो आपल्या दोषाचें नियमन न करतां त्याची उपेक्षा करीत आहेस, त्या तुला मी खोटें बोलणारा असून माझें हें भाषण असत्य होईल असें वाटतें का?

वृषपर्वा म्हणालाः—हे भार्गव! आपल्या तोंडून अधर्मयुक्त किंवा असत्य भाषण कधींच ऐकलेलें मला माहीत नाहीं. आपण नेहमीं सत्य भाषण करीत असून तें धर्मयुक्तच असतें. यास्तव आपण मजवर प्रसन्न व्हावें. भगवन्! आमचा त्याग करून आपण येथून निघून गेल्यास आम्ही समुद्रांत देह विसर्जन करूं. कारण आम्हांस त्यावांचून अन्य गति नाहीं!

शुक्राचार्य म्हणालेः—असुरांनो! तुम्ही सागरांत प्रवेश करा, अथवा दहा दिशांस भटकत फिरा; मला त्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. माझी कन्या मला प्रिय असून तिला झालेलें दुःख मला खपावयाचें नाहीं. इंद्राच्या बृहस्पतीप्रमाणें मी तुमचें योगक्षेम चालवावें अशी तुमची इच्छा असेल, तर जिच्यावर माझा जीव कीं प्राण आहे, त्या देवयानीची समजूत करा.

वृषपर्वा म्हणालाः–भार्गवा, या त्रैलोक्यांत आम्हां असुरांची जी संपत्ति, हत्ती, गाई व घोडे विद्यमान आहेत, त्या सर्वांचा, फार काय? पण प्रत्यक्ष माझ्या जीविताचाही मालक तूंच आहेस. तेव्हां आम्ही तुझ्या आज्ञेबाहेर तिळमात्र नाहीं!

शुक्राचार्य म्हणालेः–असुरेश्वरा! जर तुम्ही देवयानीस प्रसन्न कराल, तरच तुमच्या द्रव्याचा मालक मी आहें हें तुझें बोलणें मी कबूल करीन.

वैशंपायन म्हणालेः–शुक्राचार्यांचें हें भाषण श्रवण करतांच वृषपर्व्यानें 'ठीक आहे' असें म्हणून त्यास अनुमोदन दिलें. तेव्हां शुक्राचार्यांनीं स्वतः देवयानीकडे जाऊन तीस सर्व वर्तमान निवेदन केलें. त्या वेळीं देवयानी म्हणाली, "हे तात, केवळ आपल्या सांगण्यानें माझें समाधान होत नाहीं. आपण जर राजाच्या सर्व संपत्तीचे मालक झालां असाल, तर ती गोष्ट खुद्द राजानें मला सांगितली पाहिजे." हे भरतश्रेष्ठा, देवयानीच्या या अभिप्रायाप्रमाणें वृषपर्वा तिच्या सन्निध जाऊन म्हणाला, "हे सुहास्यवदने देवयानि, तुला ज्याची इच्छा असेल, तें कितीही दुर्लभ असलें तरी मी देईन."

देवयानी म्हणालीः—राजा, तुझी कन्या शर्मिष्ठा आपल्या सहस्र दासींसहवर्तमान माझी बटीक झाली पाहिजे; व माझा पिता माझें ज्याच्याशीं लग्न करील, त्याकडे तिनें माझ्यामागून आलें पाहिजे, अशी माझी इच्छा आहे." हें ऐकून वृषपर्वा हा सन्निध असलेल्या शर्मिष्ठेच्या दाईस म्हणाला, "अग, ऊठ, जा लवकर शर्मिष्ठेला घेऊन ये. देवयानीला काय पाहिजे असेल तें तिला करूं द्या!"

वैशंपायन सांगतातः–राजाचें तें भाषण श्रवण करतांच दाई शर्मिष्ठेकडे गेली, व तीस म्हणाली, "हे कल्याणि, देवयानीच्या सांगण्यावरून गुरु शुक्राचार्य आपल्या शिष्यांचा–सर्व असुरांचा–त्याग करण्यास उद्युक्त झाला आहे. यास्तव, हे निष्पापे, त्या देवयानीची जी मनःकामना असेल, ती आज तूं पूर्ण केली पाहिजे" शर्मिष्ठा म्हणालीः—तिची जी इच्छा असेल ती मी आजच्या आज परिपूर्ण करीन. जर शुक्राचार्य देवयानीसाठीं मला या प्रकारें बोलावीत आहेत, तर केवळ माझ्या दोषामुळें शुक्राचार्य निघून जाऊं नयेत; व मजसाठीं ती देवयानीही जाऊं नये.

वैशंपायन म्हणतातः—नंतर, ती सहस्र कन्यांनीं परिवेष्टित अशी शर्मिष्ठा पित्याच्या आज्ञेनें शिबिकेंत बसून त्या उत्तम नगरींतून त्वरित बाहेर पडली, आणि देवयानीजवळ जाऊन तीस म्हणालीः—हे देवयानि, मी आपल्या या सहस्र दासींसहवर्तमान तुझी परिचारिका दासी आहें. तुझा पिता शुक्राचार्य तुला जेथें देईल, तेथें तुझ्या मागून मी येईन.

यावर देवयानी तीस म्हणालीः–शर्मिष्ठे, अग, तुझ्या स्तुतिपाठकाची मी मुलगी; माझा बाप तुजजवळ याचना करून प्रतिग्रह घेणारा; आणि तूं तर स्तुत्य वृषपर्व राजाची कन्या! असें असून तूं माझी दासी कशी होणार?

शर्मिष्ठेनें उत्तर दिलेंः—बाई, माझें दासीपण जर माझ्या हीनदीन झालेल्या जातिबांधवांस सुख देत आहे, तर मी सुखानें दास्य पतकरितें. जेथें तुझे वडील तुला देतील, तेथें मी तुझें दास्य करीत सुखानें दिवस कंठीन!

वैशंपायन सांगतातः—हे नरश्रेष्ठा, याप्रमाणें वृषपर्व्यानें आपली कन्या दासीभावानें देवयानीस ओपिल्यावर त्या चंडी देवयानीला संतोष झाला, आणि ती शुक्र मुनींस म्हणाली, "बाबा, आतां माझ्या मनासारखें झालें! आतां मी हौसेनें नगरींत प्रवेश करितें. खरेंच सांगतें बाबा, तुमचें ज्ञान आणि तुमचें विद्यासामर्थ्य हीं सार्थ आणि अलौकिक आहेत! तुमच्या कृपेनें मला हें ऐश्वर्य मिळालें व राजकन्येचा पराभव झाला!"

वैशंपायन सांगतातः—याप्रमाणें हृष्ट कन्येचें गोडसें भाषण ऐकून शुक्र मुनि कन्येसह असुर नगरींत प्रवेश करिते झाले. तेव्हां सर्व दानवांनीं त्यांचा जयजयकार करून सत्कार केला. याप्रकारें शुक्रराक्षसांचें भांडण मिटलें !

अध्याय एक्यायशींवा.

—:०:—

ययातिदेवयानीसंवाद.

वैशंपायन सांगतातः—पुढें पुष्कळ काळ लोटल्यानंतर एके दिवशीं शुक्रकन्या देवयानी आपल्या त्या सहस्र दासींसह व शर्मिष्ठेसह क्रीडा करण्यासाठीं त्या पूर्वींच्याच वनांत गेली व यथेष्ट क्रीडा करूं लागली. तेथेंही शर्मिष्ठेसह सकळ दासींचें काम म्हणजे देवयानीचें मनोरंजन करणें हेंच होतें. असो; त्या सर्व सख्या प्रेमांत येऊन खेळत आहेत, मधुमाधवीचें यथेच्छ पान करीत आहेत, अनेक प्रकारचीं खाद्यें खात आहेत, मधुर फळें चोखीत आहेत, आणि अशा प्रकारें जिकडे तिकडे आनंदाचा गजर चालला आहे, असा हा मनोहर देखावा, कर्मधर्मसंयोगानें, मृगया करण्यासाठीं रानांत हिंडणाऱ्या व श्रमानें थकून जाऊन तृष्णाकुलतेनें त्याच वनांत प्राप्त झालेल्या नहुषपुत्र ययातीच्या दृष्टीस पडला ! हा देखावा फारच रमणीय होता. सर्वांच्या मध्यभागीं दिव्य रूपवती व स्त्रीरत्नश्रेष्ठ अशी देवयानी बसली आहे, शर्मिष्ठेसारखी लावण्यवती व गर्भश्रीमंत स्त्री देवयानीचे पाय चुरीत आहे, इतर कन्याही अनेक प्रकारांनीं देवयानीची मनोधारणा करीत आहेत, व त्याच वेळेस या सर्व तरुण कुमारी हसत खेळत अनेक प्रकारचीं खाद्यें खात आहेत, आणि अनेक प्रकारचीं सौम्य मादक द्रव्यें प्याल्यामुळें त्यांच्या त्या सर्वांगविभूषित शरीरयष्टीला व त्यांच्या सुहास्य मुखाला अभिनव शोभा आली आहे, असा तो दिव्य व मनोहर देखावा पाहून राजा ययाति क्षणभर चित्रासारखा तटस्थ झाला ! नंतर तो पुढें होऊन म्हणला, " हे दिव्य कुमारींनो ! हजारों तरुण स्त्रियांच्या मध्यें आपल्या अलौकिक सौंदर्यानें सर्व वनाला विभूषित करणाऱ्या तुम्ही दोघीजणी कोण आहां बरें ? क्षमा करा, आणि कृपा करून तुमचीं गोत्रें व तुमचीं दोघींचीं नांवें मला सांगा. तुमचें हें स्वाभाविक व लीलामनोहर अंगसौष्ठव पाहून मी केवळ मुग्ध झालों आहें ! "

देवयानी म्हणालीः—राजन् ! मी सांगतें इकडे आपलें लक्ष असावें. राक्षसांचे कुलगुरु श्रीशुक्र महामुनि यांची कन्या मी देवयानी, आणि ही माझी सखी व दासी शर्मिष्ठा असुरराज वृषपर्वा याची कन्या आहे. जिकडे मी तिकडे ही माझी दासी शर्मिष्ठा जावयाची आहे !

हें ऐकून राजाचें कुतूहल अधिकच वाढून त्यानें विचारिलें, " सुंदरी, माझ्या या अधिक प्रसंगाची क्षमा कर. हे दिव्य कन्यके ! ही तुझी कुसुममनोहर सखी शर्मिष्ठा राक्षसराजाची कन्या म्हणतेस, आणि पुनः दासीपदाला प्राप्त झाली आहे, असेंही म्हणतेस, हें कसें तें मला समजत नाहीं. कृपा करून हा सर्व आश्चर्यकारी वृत्तांत मला सांग. मला मोठी उत्कंठा उत्पन्न झाली आहे."

देवयानी म्हणालीः—राजन्, हे सर्व त्या अवर्णनीय दैवदुर्विलासाचे अगाध खेळ आहेत ! दैवाची लीला विचित्र असते हें ध्यानांत आणून आपण येथील वस्तुस्थितीविषयीं आश्चर्य मानूं नये. महाराज ! आपला वेष व आपलें स्वरूप हीं राजकुलांतील दिसतात, आणि आपली वाणी तर सात्त्विक व सुसंस्कृत अशी वेदज्ञ ब्राह्मणासारखी आहे. हा चमत्कारच आहे. तेव्हां आपण कोण, आपलें नांव काय, आपले मातापितर

कोण, हें जाणण्याविषयीं आम्ही उत्सुक आहों. आपण आपलें इतिवृत्त आम्हांस सांगाल काय ?

ययाति म्हणालाः—सुंदरी ! ब्रह्मचर्याश्रमामध्यें विद्या शिकत असतां मीं सर्व वेदांचें पारायण केलें आहे. ययाति नांवाचा राजा तो मीच. मी राजपुत्र आहें. नहुषराज हे माझे वडील होत.

देवयानी विचारितेः—मग आपण इकडे कोणत्या उद्देशानें येणें केलें ? बहुधा मृगया करण्याच्या उद्देशानें अथवा जलचरांची पारध करण्याचे हेतूनें आपलें आगमन झालें असावें !

ययातीनें उत्तर दिलें:—हे भद्रे, मृगया करण्याच्या उद्देशानें मी बाहेर निघालों तो बहुत श्रांत झालों म्हणून पाणी पिण्याच्या हेतूनें येथें आलों आहें. आतां कृपा करून मला अनुज्ञा दे.

देवयानी म्हणतेः—महाराज ! हा दोन हजार दासींचा गण व ही माझी दासी शर्मिष्ठा या सर्वांसह मी आपलें तनमनधन आपल्या चरणीं अर्पण करीत आहें, माझा स्वीकार करून मला आपली सखी व भार्या करावी.

ययाति म्हणालाः—हे शुक्रकन्यके ! तुझें मंगल असो. सुंदरी ! मी तुझ्यायोग्य नाहीं. देवयानि ! तुझ्या पित्याला, सारांश ब्राह्मणांस, क्षत्रियांशीं विवाह करितां येत नाहीं, व त्यास ही गोष्ट संमतही नाहीं.

देवयानीनें उत्तर केलें:—राजन् ! असें कसें म्हणतां आपण ? क्षत्रियकुलांचा संहार झाला, तेव्हां ब्राह्मणवीर्यापासूनच त्यांची उत्पत्ति झाली ना ? लोपामुद्रादि क्षत्रियकुमारिकांचा ब्राह्मणांशीं विवाह होऊन ब्राह्मण निर्माण झाले आहेत हें आपण विसरलां काय ? एवंच, ब्राह्मण व क्षत्रिय हे एकमेकांत संमिश्र झालेले आहेत. राजन् ! आपली आनुपूर्वी पाहिली म्हणजे आपण ऋषि असून ऋषिपुत्रही आहां. तेव्हां मला वरण्याला आपल्यास कांहींएक अडचण नसावी.

ययाति म्हणालाः—पण, सुंदरी ! हें लक्षांत ठेव कीं, चारही वर्ण जरी एक विराट्स्वरूपापासूनच झालेले आहेत, तरी त्या चौघांचे धर्म निरनिराळे आहेत, व त्यांचे आचारही स्वतंत्र आहेत. शिवाय, ब्राह्मण सर्व वर्णांत श्रेष्ठ; याकरितां तुझें वचन मला आदरितां येत नाहीं.

देवयानी बोलली:—राजन् , पूर्वी कोणत्याही पुरुषानें न धरिलेला हा माझा पाणि (हात) आपण ग्रहण करून मला विहिरींतून बाहेर काढलें आहे. महाराज ! शुद्धाचरणी स्त्रियांच्या हाताला दुसऱ्या पुरुषाचा स्पर्श कसा होईल ? महाराज, आपला व माझा संबंध होणार होता म्हणूनच त्या वेळीं ऋषि किंवा ऋषिपुत्र जे आपण त्यांनीं माझें पाणिग्रहण केलें आहे. आतां फिरून फिरून संशय कां घेतां ?

ययाति राजा भीतीनें म्हणालाः—देवयानि, महाविषारी सर्प अथवा प्रज्वलित सर्वतोमुख अग्नि यांपेक्षांही विचारी पुरुषांस ब्राह्मणांची भीति व त्यांचे मनोधारणाची अशक्यता हीं अधिक वाटतात ! ' असें कां ? ' म्हणून विचारशील तर सांगतोंः सर्प फार तर एकास मारील, शस्त्र एकाचा वध करील, अग्नि एखादें घर किंवा गांव जाळील; पण ब्राह्मण जर का एकदा क्रुद्ध झाला, तर तो सर्व राष्ट्रासकट नगरेंच्या नगरें जाळून फस्त करील ! म्हणून, हे कल्याणि ! ब्राह्मणांची मला भारी भीति वाटते. हे शुक्रकन्यके ! तुझ्या पित्याचें अनुमोदन नाहीं व त्यानें मला तुझें दान केलें नाहीं, म्हणून मला तुझ्याशीं विवाह करितां येत नाहीं !

देवयानी म्हणालीः—ठीक आहे. मीं तर आपणाला वरिलेंच आहे. बाबांनीं दिल्यावर माझा अंगीकार करावा. आपण प्रथम मागणी केली नाहीं, व दिल्यानंतर मात्र माझा स्वीकार केला, म्हणजे आपल्याला कोणत्याही दोषाचें अथवा पापाचें भय नाहीं.

ययातिदेवयानीविवाह.

राजा जनमेजया, असें म्हणून देवयानीनें वडिलांस कळविण्यासाठीं धात्रीला पुढें पाठविलें, व तिनें शुक्र मुनींस घडलेला सर्व वृत्तांत सांगितला. इतक्यांत राजाही शुक्राश्रमाजवळ आला, आणि उभयतांचें दर्शन व स्वागतप्रकार झाले. नंतर ययाति राजा शुक्र मुनींस नमस्कार करून त्यांचे पुढें हात जोडून नम्रपणानें उभा राहिला. देवयानीनेंही वडिलांस नमस्कार केला, आणि ती म्हणाली, "बाबा! हाच तो नहुषपुत्र ययाति राजा! यानेंच मला संकटांतून तारिलें, व माझा हात धरून वर काढिलें. बाबा! याच्याशींच तुम्ही माझा विवाह करून द्या. मला इतर सर्व पुरुष तुमच्याप्रमाणेंच आहेत. बाबा! नमस्कार करितें; मला हाच वर द्या."

हें ऐकून मुनि म्हणाले:–हे शूर राजा! तुला माझ्या या लाडक्या कन्येनें पतित्वस्वरूपानें वरिलें आहे, म्हणून मीही तुला हिचें दान करितों. तूं ह्या कन्येचा स्वीकार कर, व हिला पट्टराणी कर. आतां, ह्या ब्राह्मणक्षत्रियांच्या विवाहापासून कांहीं वर्णसंकराचें घोर पातक तुला लागेल, असेंही मानण्याचें कारण नाहीं. या सद्यःकाळीं अप्रचलित झालेल्या विवाहापासून तुला कोणत्याही प्रकारचें पातक लागणार नाहीं, हें तुला अभय वचन देतों. या विवाहासंबंधानें खेद करण्याचें कांहीं कारण नाहीं. जर कांहीं अधर्म होतच असेल, तर मी त्याचें क्षालन करितों. तुला आणखी कांहीं वर मागावयाचा असेल तर माग. ही माझी सुंदर कन्या देवयानी–हिला धर्मपत्नी या नात्यानें वागीव. हिच्यावर उत्तम ममता कर, म्हणजे हिचेंही अतुल प्रेम तुला प्राप्त होईल. राजा! ही दुसरी वृषपर्व्याची कन्या शर्मिष्ठा आहे. हीही माझ्या मुलीबरोबरच तुझ्या घरीं येईल. ही दासी आहे, तथापि राजकुळांतील कन्यका आहे हें लक्षांत ठेऊन हिची योग्य व्यवस्था ठेव; पण केव्हांही हिला शयनीय कर्मासाठीं हांक मारूं नको.

वैशंपायन सांगतातः–हें ऐकून घेऊन राजानें शुक्राचार्यांस प्रदक्षिणा करून नमस्कार केला, आणि शास्त्रोक्त विधिपूर्वक देवयानीचें पाणिग्रहण केलें. शुक्र मुनींनींही राजास अपार संपत्ति दिली. ती घेऊन व देवयानी व तिच्या शर्मिष्ठेसहवर्तमान असणाऱ्या दोन हजार दासीकन्यका घेऊन राजा स्वपुरास जाण्यासाठीं निघाला, तेव्हां शुक्र मुनींनीं व दैत्यदानवांनीं त्याची यथायोग्य पाठवणी केली, व त्यांची अनुज्ञा घेऊन राजा मोठ्या आनंदानें परत फिरला आणि स्वनगराकडे चालता झाला.

अध्याय त्र्यायशींवा.

—:०:—

देवयानीला पुत्रप्राप्ति.

वैशंपायन सांगतातः–याप्रमाणें देवयानीशीं विवाह करून राजा ययाति मोठ्या समारंभानें स्वनगरीस आला. ही नगरी म्हणजे इंद्राची अमरावतीच होय. नगरींत येऊन स्वतांच्या राजवाड्यांत मंडळीसह राजा गेला; देवयानीस अंतःपुरस्वामिनी केली; आणि तिच्याच अनुमतीनें वृषपर्वकन्या शर्मिष्ठा इला तिच्या दासीगणासह अशोकवनिकेजवळच एक घर बांधून देऊन तेथें तिला राहण्यास सांगितलें. तेथें अन्नवस्त्रादिक अवश्य गोष्टी पुरवून राजानें शर्मिष्ठेची योग्य व्यवस्था ठेविली. इकडे ययातीला देवयानीनें पुष्कळ सुख दिलें. बरींच वर्षे सुखांत घालविल्यानंतर योग्य ऋतुकाळीं त्या सुंदर देवयानीनें गर्भ धारण केला, व पुढें लवकरच तिला एक उत्तम पुत्र झाला. याप्रमाणें हजार वर्षें लोटलीं. इकडे वृषपर्वकन्येला यौवनदशा प्राप्त झाली व ऋतुकालही प्राप्त झाला. 'आपल्यास अद्यापपर्यंत कोणीं अंगीकारिलें नाहीं, मूल होऊन देवयानी

वेलीप्रमाणें वाढूं लागली, आणि प्रसंग तर असा आला, आतां काय करावें? कसें करावें? कोणत्या प्रकारानें वागलें असतां आपले मनोगत सिद्ध होतील?' इत्यादि विचार तिच्या मनांत घोळूं लागले, व शेवटीं तिनें असा निश्चय केला कीं, 'ज्या-प्रमाणें देवयानीनें ययातीला वरिलें, त्याचप्रमाणें आपणही त्यास आपला पति करावा. राजापासूनच आपण पुत्रफलाचें दान मागून घ्यावें. देवयानीला संतति झाली आणि मला कांहीं नाहीं ना? हा तर माझा निश्चय ठरलाच कीं, राजाजवळ पुत्र-भिक्षा मागावयाची! देवा! राजा इकडे कधीं तरी लवकरच येईल काय? व तो एकटाच असेल काय?' देवाला करणें! बोलाफुलास गांठ पडली आणि राजा त्याच वेळीं नगरांतून एकटाच निघून त्या अशोकवनिकेमध्यें आला आणि तिला पाहून उभा राहिला! त्याला तसा एकटा पाहून ती चारुहासिनी शर्मिष्ठा मंदगतीनें त्याजवळ गेली, आणि हात जोडून मधुर स्वरानें त्याच्याशीं बोलूं लागली.

शर्मिष्ठाययातिसंवाद.

शर्मिष्ठा म्हणाली:—महाराज! सोम, इंद्र, वरुण, विष्णु, यम अथवा ययाति यांच्या घरांत असणाऱ्या आमच्यासारख्या तरुण स्त्रियांकडे नुसतें पाहण्याची कोणाची प्राज्ञा आहे? महाराज! मी पवित्र आहें, रूपवती आहें, कुलीन आहें, हें आपल्यास विदितच आहे. तेव्हां कृपा करून आपण प्रसन्न व्हा आणि मला धर्मविधीनें ऋतुदान द्या!

राजानें उत्तर दिलें:—हे अभिनवसुंदरी! तुझें शील उत्तम आहे, कुल वर्णनीय आहे, तूं पवित्र आहेस, हें मला विदित आहे. शिवाय, तुझे स्वरूपांत काडीइतका सुद्धां दोष नाहीं. पण तुला ठाऊक आहेच कीं, तुझ्याशीं केव्हांही रममाण होऊं नये अशी शुक्र मुनींची आज्ञा आहे. देवयानीचा स्वीकार केला तेव्हां ही शपथ मुनींनीं घातली, व 'तथास्तु' असें मीं म्हटलें आहे. मी आपला वचनभंग कसा बरें करूं?

शर्मिष्ठा म्हणते:—राजन्! थट्टेंत केलेलें अनृत भाषण किंवा गमन, योग्य स्त्रियांशीं, लग्नकाळीं, प्राणावर येऊन बेतली असतां व सर्व धन जाण्याचा प्रसंग आला असतां केलेलें खोटें भाषण बाधक होत नाहीं, असें शास्त्र आहे. तसेंच गाय, ब्राह्मण, स्त्री, दीन व अनाथ यांचे संरक्षणासाठीं दिलेली खोटी साक्ष मनुष्याला पतितत्व देते, खोटी साक्ष देणारा पातकी होतो, असें म्हणतात तें खोटें होय. परंतु एकच अर्थ व हेतु साध्य करण्यासाठीं प्राप्त झालेल्या दोन किंवा अनेक वस्तूंमधील एक वस्तु मात्र उपयोगी आहे, अन्य नाहीं किंवा नाहींत, असें म्हणणारा—असल्या प्रकारचें मिथ्या प्रतिपादन करणारा—पुरुष मात्र अनृताच्या पातकांत सांपडतो व नाश पावतो. राजन्! देवयानी व मी या दोघींसही एक वेळींच आपल्या पदरीं अर्पिलें असतां, देवयानी मात्र भार्या, आणि मी नव्हे, हें जें मिथ्या आचरण आहे, तेंच आपल्यास घातक होईल!

ययाति म्हणतो:—सुंदरी! राजा हा सर्वांस कित्ता घालून देणारा आहे. त्याच्या आचरणाचा प्रजाजन कित्ता आदरितात. तेव्हां तोच जर अनृत बोलेल, तर सर्वांस अनृताचें उदाहरण घालून दिल्याबद्दल त्याचा नाश होईल! सुंदरी, असें आहे म्हणून, माझें सर्वस्व संकटांत पडण्याचा संभव असला तरी मला खोटें काम करितां येत नाहीं. शर्मिष्ठेनें उत्तर दिलें, "महाराज! यांत खोटें तें काय? आपणांस माझ्या सखीनें माळ घातली, तेव्हांच मी आपल्याला मनानें वरिलें आहे. हे दोन्ही विवाह अर्थात् सारखेच आहेत. शिवाय, माझ्या सखीचा जो पति, तोच पति लोकदृष्ट्या अविवाहित जी मी त्या माझाही होय. कारण, दोघी कुमारिका सख्या असतील, व

दोघीही एकत्रच रहावयाच्या असतील, तर एकीचा विवाह झाला म्हणजे लोकदृष्ट्या तोच दुसरीचा विवाह होतो, अशी रूढीही आहे. एवंच आपण माझे पति आहां. मी ऋतुभिक्षा मागत आहें, ही उदार-बुद्धीनें मला घाला."

शर्मिष्ठेचा स्वीकार व तिला पुत्रप्राप्ति.

यावर तो कामुक राजा निरुत्तर झाला आणि म्हणाला:—कोणीं कांहीं मागितलें तरी त्यास तें द्यावें, असें माझें व्रत आहे. सुंदरी! तूं मजजवळ याचकवृत्तीनें आली आहेस; तर आतां मीं काय केलें म्हणजे तुझें हित होईल तें सांग.

शर्मिष्ठेनें अतिशय आनंदभरित होऊन उत्तर दिलें, "महाराज! माझें अधर्मापासून रक्षण करा व धर्माचरण करून मला धर्माच्या वाटेला लावा. आपल्यापासून मला अपत्य झालें म्हणजे मी जगांत उत्तम प्रकारचें धर्माचरण करीन. महाराज! भार्या, दास आणि मुलगा हीं जात्या स्वत्वहीन आहेत; हीं जें काय मिळवितील तें त्यांच्या त्यांच्या यजमानाचें धन होतें. आतां, मी तर देवयानीचें उच्छिष्ट खाणारी दासीच आहें; म्हणून मी सर्वथा देवयानीची झालें, आणि देवयानी सर्वथा व सर्वस्वानें आपल्या स्वाधीन झाली आहे. तेव्हां अर्थातच ती जशी उपयोग्य आहे, तशी मीही तिची दासी आहें म्हणून उपभोग्य झालें! तेव्हां माझा आपण स्वीकार करा.

वैशंपायन सांगतात:—असें बोलणें ऐकून तो विलासप्रिय राजा 'खरें आहे' असें म्हणाला. मग त्यानें तिची योग्य संभावना करून स्वतःच्या आचरणानें तिला धर्माचा मार्ग दाखविला. त्या ययाति राजानें शर्मिष्ठेचा गांधर्वविधीनें यथेच्छ उपभोग घेतला. नंतर उभयतांनीं एकमेकांची यथाविधि पूजा करून तीं दोघेंजण आपआपल्या स्थळीं गेलीं. तो समागम झाल्यानंतर त्या रमणीय सुंदरीला त्या श्रेष्ठ राजापासून गर्भ राहिला, व पुढें योग्य काळ लोटल्यावर ती प्रसूत झाली-तिला मुलगा झाला तो कमलाक्ष असून प्रत्यक्ष देवासारखा तेजस्वी होता!

अध्याय त्र्यायशींवा.

—:०:—

देवयानीशर्मिष्ठासंवाद.

वैशंपायन सांगतात:—हे भरतश्रेष्ठा, पुढें लवकरच देवयानीला कळलें कीं शर्मिष्ठेला पुत्र झाला आहे. तेव्हां शर्मिष्ठेनें कांहीं तरी अधर्माचरण केलें आहे असें समजून ती चिंताक्रांत झाली, व शर्मिष्ठेकडे जाऊन बोलूं लागली, "बाई! कामलोलुप होऊन हें केवढें पातक तूं केलेंस?" शर्मिष्ठेनें उत्तर दिलें, "सखे, माझ्या हातून असें कसें बरें होईल? सखे! कोणी एक धर्मात्मे, वेदवेत्ते आणि दुःखितांचे मनोरथ पूर्ण करणारे ऋषि आले होते, त्यांजवळ मीं धर्मोक्त विधीनें कामभिक्षा मागितली, व त्यांनींही धर्मतः मला दिली. अधर्म करण्याचें धाडस माझ्या हातून होईल तरी काय? खरेंच सांगतें, हा माझा मुलगा त्याच तपोधनापासून मला झाला!"

देवयानी शांत होऊन म्हणाली:—हें चांगलें झालें बाई! पण कोण तो ब्राह्मण? त्याचें नांव, त्याचें गोत्र, त्याचें कुळ काय हें तरी मला सांग.

शर्मिष्ठा म्हणाली:—सखे! त्याच्या त्या तपाच्या आणि रवितुल्य कांतीच्या तेजानें मी इतकी कांहीं दिपून गेलें होतें कीं, त्याला हें विचारण्याची मला बुद्धिच झाली नाहीं! मी तेव्हां शुद्धींतच नव्हतें.

देवयानी प्रेमानें म्हणाली:—असेंच जर असेल, तर माझें कांहीं म्हणणें नाहीं. सर्वश्रेष्ठ व सर्वज्येष्ठ द्विजापासून जर हें तुझें अपत्य असेल, तर मी कशाला बरें तुजवर रागावेन?

याप्रमाणें उभयतांचें खेळीमेळीनें कांहीं वेळ प्रेमाचें भाषण झालें; आणि शर्मिष्ठा तथ्यच बोलली असें समजून देवयानी स्वगृहाप्रत गेली. पुढें देवयानीला यदु व तुर्वसु या नांवांचे दोन तेजस्वी

पुत्र झाले. ते तर प्रत्यक्ष इंद्र व विष्णुच आहेत कीं काय असा भास होई. शर्मिष्ठेलाही द्रुह्यु, अनु व पूरु असे तीन पुत्र झाले. नंतर एके दिवशीं देवयानी राजासह सहज शर्मिष्ठेच्या त्या एकांतवनांत मौजेखातर गेली, तों तेथें हे दिव्य व अलौकिक स्वरूपाचे तीन मुलगे भीतिशून्यचित्तानें खेळतांना देवयानीच्या दृष्टीस पडले. तेव्हां तिला मोठें आश्चर्य वाटलें, आणि ती राजास म्हणाली, "महाराज! हीं देवासारखीं मंगलस्वरूपी मुलें कोणाचीं बरें ? मला तर बाई यांचें रूप व तेज अगदीं हुबेहूब आपल्यासारखें दिसत आहे. पण थांबा; मी ह्या सुकुमार कुमारांसच विचारितें म्हणजे सगळें समजेल. बाळांनो ! तुमचीं नांवें काय ? तुमचें कुल कोठील ? आणि तुमचा पिता कोण बरें ? खरेंच सांगा. मला भारी ऐकावेंसें वाटतें आहे. "

तेव्हां त्या बिचाऱ्या मुलांनीं राजाकडे बोट दाखविलें, व 'शर्मिष्ठा आमची आई !' असें बोलून लागलीच तीं मुलें लाडालाडानें राजाजवळ गेलीं; पण देवयानीच्या भीतीनें राजा कांहींएक बोलेना. म्हणून तीं रडत रडत आईकडे गेलीं !

देवयानीचा कोप.

त्या बालकांचें बोलणें व करणें, राजाची ती लज्जाकुल भेकड मुद्रा, आणि त्या मुलांचें राजावरील प्रेम हें सर्व पाहून त्या पट्टाभिषिक्त देवी देवयानीला खरें काय होतें तें समजलें. तिच्या हृदयांत उजेड पडला; आणि ती एकदम शर्मिष्ठेवर उसळली, " शर्मिष्ठे ! माझ्या स्वाधीन ना तुला माझ्या बाबांनीं व तुझ्या वडिलांनीं केली होती ? आणि असें हे ढंग करून माझा घात केलास का ? तूं आपल्या राक्षसी कुलावर शेवटीं गेलीसच ऑं? माझी भीति तुला कांहीं वाटली नाहीं?"

शर्मिष्ठा न भितां उत्तर देती झाली, " मीं ऋषींचा जो वृत्तांत सांगितला, तो खरा. आहे. न्यायानें व धर्मानें वागावयाला कांहीं कोणाची चोरी नाहीं कीं भीति नाहीं. ज्या वेळीं तूं महाराजांस वरिलेंस, त्याच वेळीं मींही त्यांस मनानें वरिलें होतें; आणि पुनः, आपल्या सखीचा जो भर्ता तो आपलाही भर्ता होतो, हा न्याय तूं विसरलीस वाटतें ? तूं ज्येष्ठ आहेस, ब्राह्मणकन्या आहेस म्हणून मला तूं पूज्य आहेस, व मान्यही आहेस; पण तुझ्यापेक्षां हे राजर्षि मला अधिक मान्य व पूज्य आहेत व असले पाहिजेत, इतकें तुला विदित नसावें ? " हें ऐकून देवयानीचा संताप मनांत मावेनासा होऊन ती तेथल्या तेथेंच राजास म्हणाली, " राजन् ! माझा घात व माझ्याशीं विश्वासघात आपण केला! आतां मी एक क्षणभर सुद्धां येथें राहावयाची नाहीं ! " असें म्हणून ती एकदम निघाली. ती सुंदरी अश्रुपूर्ण नयन झालेली तशीच्या तशीच शुक्र मुनींकडे तडक जाणार, हें पाहून राजास खेद झाला, व तिच्या मागोमाग तोही तिचें मन शांत करावें म्हणून गडबडीनें व भ्रांतचित्तानें निघाला. पण ती रागानें आरक्त नेत्र झालेली चंडी माघारी कोठची फिरणार ? राजाशीं एक शब्द देखील न बोलतां रडत रडतच ती शुक्र मुनींच्या जवळ गेली, आणि त्यांस नमस्कार करून स्तब्ध उभी राहिली. राजा ययाति हा तिच्या मागोमाग गेला, व त्यानें श्वशुराचे चरण वंदिले. नंतर देवयानी रडत व स्फुंदत म्हणाली, " बाबा ! अधर्मानें आज धर्माचा पराभव केला, आणि नीचाची अभिवृद्धि व उत्तमाचा ऱ्हास झाला हो ! या आपल्या थोर जामातांनीं वृषपर्व्याच्या ह्या शर्मिष्ठा दासीला तीन पुत्रदानें देऊन माझ्यावर तिची सरशी केली; आणि मी पट्टराणी ना? मला अभागीला काय ते अवघे दोनच मुलगे दिले ! बाबा ! हे महाराज मोठे प्रख्यात धर्मवेत्ते ना? शर्मिष्ठेशीं व्यवहार करणार नाहीं अशी यांनीं शपथ घेतली होती, आणि आतां असा हा माझा गळा कापून धर्माची अशी अमर्यादा यांनीं केली! "

ययातीला शुक्रशाप.

देवयानीचें हें भाषण ऐकून शुक्राचार्य म्हणाले, "राजाधिराज! तुला धर्माधर्मांचें तारतम्य ज्ञान असतांही ज्या अर्थी तूं अधर्मानें वागून मोठ्या आवडीनें महापातक जोडलेंस, त्या अर्थी तुझ्यावर लवकरच अनिवार जरेचा (म्हातारपणाचा) पगडा बसेल. तूं म्हातारा होशील!" ययाति म्हणाला:—भगवन्! मी अपराधी तर खराच; पण मी राक्षसकन्या ऋतुफळ मागूं लागली म्हणून मात्र मीं तिला धर्मविहित भोगदान दिलें. अन्य मनोवृत्तीनें अथवा कामुक वृत्तीनें मी वागलों नाहीं. मुनिराज! ऋतुदान मागण्यास आलेल्या धर्मभोग्य स्त्रीला जर तें दान केलें नाहीं, तर भ्रूणहत्येचें पातक लागतें असें धर्मशास्त्रवेत्ते ब्रह्मज्ञ म्हणतात, हें मीं का आपल्यास सांगावें? शास्त्रानें उपभोग्य म्हणून ठरविलेली कामुक स्त्री जर एकांतांत भोग मागेल, तर तो तिला दिला पाहिजे; नाहीं तर तो धर्मदृष्टीनें भ्रूणहत्या करणारा होतो असें समंजम नीतिवेत्तेही म्हणत आले आहेत. भगवन्! मी अधर्माला भिऊन वागणारा आहें, पण या आतांच सांगितलेल्या कारणामुळें मात्र मी तिच्याशीं रत झालों. महाराज! मला क्षमा करावी.

शुक्र मुनि रागाऊन बोलले, "मग त्या वेळीं मला कां नाहीं विचारलें? राजा! माझ्या स्वाधीन तूं आहेस व होतास ना? माझी अनुज्ञा न घेतां असा चोरटेपणानें कां वागलास? दांभिक लोकांचें सूक्ष्मधर्मासंबंधी आचरण चोरटेपणानेंच व्हावयाचें;—म्हणजे त्या लोकांस धर्मचौर्याचें पातक लागतें!"

शापनिरसनोपाय.

यांप्रमाणें संतप्त झालेल्या शुक्र मुनींच्या मुखांतून शापज्वाला निघाली, ती ययातीचें तारुण्य भस्म करून व त्याला वृद्धदशा देऊन चालती झाली! हें पाहून अति दुःखित झालेला ययाति विनयपूर्वक म्हणाला, "भगवन्! आपल्या कन्येच्या संबंधानें अद्यापि माझी विषयशांति झाली नाहीं; तेव्हां तिच्यावर तरी कृपा करून 'तुला आतांच जरा येणार नाहीं' असा माझ्यावर अनुग्रह करा!" शुक्र मुनींनीं अंमळ शांत होऊन उत्तर दिलें, "राजा! ऋषींची वाणी अमोघ व अभंग असते. ती कधींही वृथा होत नाहीं. आतां, जर तुझी इच्छाच असेल, तर ही जरा तुला दुसऱ्या कोणाला देतां येईल, इतकें सामर्थ्य मी तुला देतों."

हें ऐकून राजास समाधान वाटलें आणि तो म्हणाला:—भगवन्! माझ्या पुत्रांपैकीं जो मला आपलें तारुण्य देऊन माझी जरा घेईल, त्याला माझें सर्व राज्य, सर्व पुण्य व सर्व कीर्ति प्राप्त होईल; असें करण्याला आपली अनुज्ञा असावी.

शुक्राचार्य म्हणाले:—राजा! माझें भक्तिपुरःसर स्मरण कर, म्हणजे ज्याला वाटेल त्याला ही तुझी जरा तुला देतां येईल. यांत तुला कोणत्याही प्रकारचें पातक लागणार नाहीं. जो मुलगा तुला आपलें तारुण्य देईल, त्याला-मग तो ज्येष्ठ असो वा नसो—तूं आपलें राज्य खुशाल दे. तुला पातक शिवणार नाहीं. तो तारुण्याचा त्याग करणारा मुलगा दीर्घायुषी, कीर्तिवंत व अनेक अपत्यांचा पिता होईल. त्या पुत्राचा वंश प्रसिद्ध होईल. जा आतां परत!

अध्याय चौऱ्यायशींवा.

—:०:—

ययातीचा पुत्रांना शाप.

वैशंपायन सांगतात:—राजा, याप्रमाणें जरा घेऊन ययाति राजाची स्वारी स्वनगरीप्रत परत आली! नंतर राजानें ज्येष्ठ व वरिष्ठ जो यदु नांवाचा पुत्र त्यास बोलावून आणून व त्यास सर्व वृत्तांत सांगून विचारिलें, "बाळा? माझ्या

कर्मानें व शुक्रशापानें ही वृद्धावस्था, ह्या सुरकुत्या व हे दुष्ट पांढरे केश, हीं सर्व माझ्या अंगभर पसरलीं रे ? पण, बाळा ! यौवनयोग्य भोग्य विषयांसंबंधी माझी आशा तृप्त झाली नाहीं. म्हणून तुझी विनवणी करून मागतों, बाळा ! माझ्या वृद्धावस्थेसह ही माझी चित्तदुर्बलता घे, आणि तुझें तारुण्य मला दे; म्हणजे मी आपली विषयभोगतृष्णा शांत करीन. बाळा ! एक हजार वर्षें लोटलीं म्हणजे तुझें तारुण्य तुला परत देऊन माझी ही वृद्धावस्था व चित्तदुर्बलता परत घेईन."

यदु म्हणतोः—बाबा ! तुम्ही आणखी काय वाटेल तें सांगा, पण ही द्वाड जरा मला नको. कारण जरा आली की खाणें पिणें यांच्यासंबंधें भारी दोष उत्पन्न होतात; शारीरिक व मानसिक आधिव्याधि जडतात. पुनः ते पांढरे घाणेरडे केश, ती खिन्नता, सर्व अवयवांचें लुळें होणें, सर्वांगभर त्या सुरकुत्या, तें विद्रूप, अशक्त व रोडकें शरीर, कार्य करण्याची ती सामर्थ्यशून्यता, कान, डोळे इत्यादिकांनीं सोडलेली ती म्हातारपणची दुर्गंधी अवस्था, तरुणींनीं केलेला तो अपमान, चाकरमाणसांची ती अनास्था ! नको ! बाबा ! ही तुमची जरावस्था मला स्वप्नांत देखील नको. माझ्यापेक्षां आपल्याला आणखी पुष्कळ लाडके मुलगे आहेत, त्यांना विचारून हें आपलें म्हातारपणाचें बिऱ्हाड आपल्या आवडत्या मुलाला द्या. आपण धर्मज्ञ आहां. मी आणखी काय सांगू ?

ययाति रागावून म्हणतो, "अरे ! तूं माझ्या हाडामांसाचा असून तुला लहानाचा मोठा केला त्याचे हे उपकार फेडितोस काय ? तुझ्याकरितां इतकी खस्त मीं खाल्ली, आणि तूं मला एवढेंसें तारुण्य देत नाहींस ! ठीक आहे. तुझ्या पुत्रांस मी राज्याचा वांटाच देत नाहीं ! " असें म्हणून त्यानें दुसरा मुलगा तुर्वसु याला हांक मारून तोच प्रश्न विचारला. तेव्हां त्यानेंही कानांवर हात ठेवून उत्तर दिलें, "काम व भोग यांचा नाश करणारी, बळ आणि रूप नष्ट करणारी, व बुद्धि आणि प्राण यांचा अंत करणारी जरा आपल्याला नको ! " तेव्हां राजा अधिकच संतापून तुर्वसूला शाप देऊन म्हणाला, " चांडाळा ! माझा औरस पुत्र ना तूं ? ठीक आहे. मूढ पशो ! तुझ्या संततीचा नायनाट होईल, आणि ज्यांचा आचार व धर्म अत्यंत अव्यवस्थित आहे, आणि उच्च वर्णांतील स्त्रियांशीं जेथें नीच वर्णाचे पुरुष रमतात, अशा अभक्ष्यभक्ष्य करणाऱ्या अंत्यजांचा तूं राजा होशील. अरे कृतघ्ना ! गुरुदारेशीं रत होणारे, आणि पशूंसारखे ज्यांचे आहारविहार अशा पापी व नतद्रष्ट म्लेच्छ जातींमध्यें तुला रहावें लागेल ! चल, निघ येथून ! "

नंतर शर्मिष्ठेचा ज्येष्ठ सुत द्रुह्यु यालाही त्यानें तेंच मागणें मोठ्या कळवळ्यानें केलें. तेव्हां त्यानें उत्तर दिलें, "महाराज ! हत्ती, रथ, घोडे, स्त्रिया इत्यादि सर्व भोगविषयक वस्तूंचा भोग घेण्यास असमर्थ करणाऱ्या व तोंडाची बडबड आणि तीही बोबड्या तऱ्हेची करावयास लावणाऱ्या जरेची मला गरज नाहीं ! ती आपल्यासच लखलाभ असो ! " मग तर हा अकालीं म्हातारा झालेला राजा फारच खवळला, आणि शापवाणीनें बोलला, "हा नरकरंड्या ! तुझें कधींही कल्याण होणार नाहीं, व भोगाशा तृप्त होणार नाहींत. अरे राक्षसा ! जेथें उत्तम अश्वांची, रथांची, घोड्यांची, हत्तींची, पालख्यांची,[१] तरवतराव्यांची, मेण्यांची, आणि गाढवें, मेंढे, बैल इत्यादिकांची गति नाहीं, जेथील नित्य व्यवहार होड्यांतून व नावांतून करावा लागतो, तेथें तुला राहावें लागेल ! येथें सुद्धां तुला अगर तुझ्या वंशाला राज्यपद मिळणार नाहीं ! चल जा, काळें कर येथून ! "

---

१ हें पुरुषांस बसण्यास योग्य असें यानविशेष म्लेच्छांमध्यें प्रसिद्ध आहे.

नंतर अनु नामक शर्मिष्ठेच्या दुसऱ्या मुलास त्यानें तोच प्रश्न विचारला. तेव्हां अनु भीतभीतच त्यास बोलला, " अशुद्ध पुरुषाप्रमाणें पोरासारखे अकालीं अन्नपानादि व्यवहार करावयास लावणारी व सकाळसंध्याकाळीं अग्नीस आहुति न देवविणारी ती जरावस्था मला नको ! " ययाति ओरडला, " हा मूर्खा ! माझा ना कारटा तूं ? तुला नकोशी असणारी जरा आतांच तुझ्या डोक्यावर बसेल. तुझीं कारटीं भरज्वानींतच मरतील, आणि तुझ्या हातून श्रौत अथवा स्मार्त अग्नीची सेवा मुळींच न होतां तूं नास्तिक होशील ! चालता हो ! "

पूरुला ययातीचा वर.

शेवटीं, कनिष्ठ पुत्र पूरु हा बापाचा लाडका होता त्यास बोलावून त्याला त्यानें दीनवाणीनें सर्व वृत्तांत सांगितला, आणि तोच प्रश्न विचारिला. तेव्हां पूरूस गहिंवर येऊन तो मोठ्या नम्रतेनें म्हणाला, " महाराज ! आपण आज्ञा करितां ती मला शिरसा वंद्य आहे. आपली जरा व चित्तदुर्बलता हीं दोन्ही मी मोठ्या आनंदानें स्वीकारितों. आपण कांहीं खेद करूं नये. माझें तारुण्य आपण खुशाल घ्यावें, आणि इष्ट वाटेल तेथपर्यंत आपण मोठ्या आनंदानें विषयांचा उपभोग घ्यावा. ह्याला सहस्र वर्षांचीच मर्यादा हवी असें नाहीं. यावज्जीव आपण माझें तारुण्य घ्यावें. महाराज ! आपली जरा, आपलें रूप आणि आपलें वय घेऊन व त्यांचें धारण करून मीं हें आपल्यापासूनच मिळविलेलें तारुण्य आपल्यास परत देतों व आपण आज्ञा कराल त्याप्रमाणें वागतों. " हें ऐकून ययातीचा आनंद गगनीं मावेना. तो राजा हर्षभरानें पूरूस आशीर्वाद देता झाला कीं, " पूरो ! मी प्रसन्न झालों आहें. पुत्रा ! तुझीं मुलें व तुझी प्रजा या सर्वांचे इष्ट काम सफल होतील. माझें राज्य सर्वच्या सर्व तुझ्याच पितृभक्त पुत्रांस मिळेल. पुत्रा ! तूं त्रैलोक्यांत धन्य होशील ! " असा आशीर्वाद प्रसन्न मनानें देऊन त्या महातेजस्वी राजानें शुक्र मुनींचें स्मरण केलें, आणि त्या अत्युदार पूरु नामक पुत्राच्या शरिरांत आपल्या जरेचें संक्रमण करून त्याचें तारुण्य आपण घेतलें.

अध्याय पंचायशींवा.

—:०:—

पूरूला राज्याभिषेक.

वैशंपायन सांगतात:—राजा, याप्रमाणें पूरूचें वय व रूप घेऊन राजास अत्यंत आनंद झाला, व त्यानें अनेक प्रकारच्या आवडत्या विषयांचा उपभोग घेण्यास आरंभ केला. आपली आवड, आपला उत्साह, काळ व प्रसंग, आणि स्वसुख यांस अनुरूप व या सर्वांस पोषक असे धर्मविहित भोग त्यानें घेतले. त्या राजानें अनेक यज्ञ करून देवांची प्रसन्नता, श्राद्धें करून पितरांचें समाधान, अनुग्रह करून अनाथांचा धन्यवाद, आणि इष्ट देणग्या देऊन ब्राह्मणांचे आशीर्वाद संपादन केले. अन्नपानादि यथेच्छ देऊन त्यानें अतिथींस, उत्तम प्रकारें पालन करून वैश्यांस व प्रजाजनांस, दयेनें शूद्रांस आणि दंडादि साधनें योजून त्यानें चोरांस संतुष्ट केलें. ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार सत्ता धर्मतः स्थापित करून त्यानें सर्वांस अति उत्तम सुख दिलें. सर्वांस असें वाटलें कीं, हा दुसरा इंद्राचा अवतारच आहे कीं काय ? याप्रमाणें हा सिंहपराक्रमी राजा पुत्रतारुण्याच्या साहाय्यानें सर्व ऐहिक व दिव्य विषयांचा उपभोग धर्ममान्य रीतीनें घेऊन अलौकिक सुख पावता झाला. विश्वाची नामक अप्सरेसह दिव्य नंदनवनामध्यें व उत्तरस्थ मेरु पर्वतावरील अलका नामक कुबेरनगरींत अनेक प्रकारचें विलाससुख त्यानें उपभोगिलें. याप्रमाणें सात्त्विक इच्छा तृप्त करून सुखोपभोग घेत असतांनाच त्याला या विषय-

सुखाचा व सुखद विषयांचा वीट आला. तेव्हां, यौवन उसनें घेतल्यापासून त्यानें दिवसांचा हिशेब केला, तों कला, काष्ठा इत्यादि सावन पद्धतीनें गणित करून पाहतां सहस्त्र वर्षें भरत आलीं असें त्यास दिसलें. हें समजलें तेव्हां त्यानें दिव्य अप्सरांचा दिव्य स्थळीं आतांच सांगितल्याप्रमाणें उपभोग घेऊन पाहिला. हजार वर्षें भरलीं, आणि विषयसुखाची निःसारता त्या धर्मात्म्यास कळून आली. नंतर तो पूरूस म्हणाला, " वत्सा ! मनाप्रमाणें, हौसेप्रमाणें व सामर्थ्यानुसार मला जें जें सुख जितक्या दिवस हवेंसें वाटत होतें, तितक्या दिवस तें तें सुख तुझ्या अनुग्रहानें घेतलें. पण, बाळा ! या विषयसुखाची अशी कांहीं मजा आहे कीं, जों जों जास्त विषयसुख घ्यावें तों तों त्यासंबंधें विषयी पुरुषांची इच्छा घृतसेवित अग्नीप्रमाणें जास्तच वाढत जाते. ह्या तृष्णेची लहानशी खळगी इतकी कांहीं खोल आहे कीं, तिच्यामध्यें पृथ्वीवरील सर्व प्रकारचीं धान्यें, द्रव्य, पशु, स्त्रिया इत्यादि वाटेल तितकें टाका, ही एका पुरुषाची सुद्धां तृष्णादरी भरून निघावयाची नाहीं. ही तृष्णानदी सोडून अज्ञानी लोकांस दूर जाणें शक्यच नाहीं. ह्या देहानें सोडिलें तरी ही घातकी तृष्णा जास्तच लगटते ! तृष्णा धारण करणें हा प्राणविघातक रोग आहे. याला खाण्याला घालून हा शांत होत नाहीं; तर याला उपाशीं ठेविला तरच हा शांत होतो. ज्ञानी पुरुषानें आशेचा त्याग करावा हेंच शहाणपण आहे. या आशेला लुब्ध होऊन मीं आज एक हजार वर्षें तिची एकनिष्ठपणें सेवा केली, पण ही राक्षसी संतुष्ट म्हणून झाली नाहीं. आणखी हवें, आणखी हवें, ही हांव अद्यापिही सुटली नाहीं. बाळा, मी कंटाळलों, पण माझी आशा अद्यापि भरतारुण्यांत आहे ! असो; तेव्हां हिचा परित्याग करून ब्रह्मचिंतन करावें, द्वंद्वातीत व मायातीत होऊन वनमृगांसह राहिलेलें आयुष्य कंठावें असा मीं दृढनिश्चय केला आहे. माझ्याशिवाय दुसरें कांहीं आहे, असें ज्ञान झालें कीं त्या दुसऱ्याच्या प्राप्तीविषयीं वासना व स्वतांची ममता या दोन कैदाशिणी मानेवर बसल्याच ! तेव्हां द्वंद्वातीत व मायातीत जें निर्विकार निर्विकल्प ब्रह्म, त्याचें अनुचिंतन मी एकनिष्ठेनें करणार. पुत्रा ! तुझ्या यौवनदानमूलक स्वार्थत्यागानें मी प्रसन्न झालों. तुझें कल्याणच होईल. हें आपलें यौवन परत घे व हें सर्व राज्य व राज्यभारही घे. माझें प्रिय करणारा तूं एक कुलदीपक निघालास. बाळा ! सुखानें व धर्मवृत्तीनें हा राज्यभार पुष्कळ काळपर्यंत धारण कर."

जनमेजया, याप्रमाणें बोलून त्यानें आपली जरा घेतली, व पूरूनेंही आपलें यौवन परत घेतलें. पुढें, राजा ययाति हा पूरु नामक कनिष्ठ पुत्रास राज्य देणार व त्यालाच राज्याभिषेक करणार असें ब्राह्मणादि वर्णांस समजलें, तेव्हां सर्व वर्णांचे धार्मिक प्रतिनिधि ब्राह्मण हे ययातीला म्हणाले, "राजन्, शुक्र मुनींचा नातू आणि देवी देवयानीचा ज्येष्ठ मुलगा जो युवराज यदु त्याला वगळून आपण पूरूला कसे राज्याभिषेक करूं शकणार ? हा धर्म नव्हे व व्यवहारही नव्हे. बरें, हा आपला ज्येष्ठ पुत्र यदु कांहीं कारणामुळें अयोग्य असेल, तरी पण तुर्वसु आणि शर्मिष्ठेचे वडील पुत्र द्रुह्यु व अनु यांस कसें वगळितां येईल ? महाराज ! वयानें श्रेष्ठ भ्रात्यांस मागें टाकून कनिष्ठ भ्राता राज्याला वारस होऊं शकत नाहीं, हें आम्ही आपणांस कळवीत आहों. महाराजांनीं धर्माचा प्रतिपाल करून त्याच्या आज्ञेप्रमाणें चालावें."

ययाति उत्तर देतोः—अहो ब्राह्मणप्रमुख वर्णहो ! ज्येष्ठास मी कां राज्य देत नाहीं, व देऊंही नये, याचीं कारणें ऐका: यदूनें माझी आज्ञा ऐकिली नाहीं. हा माझा ज्येष्ठ मुलगा ना ? पण ह्यानें माझ्या आज्ञेचा व इच्छेचा भंग केला. तुम्हांस विदितच आहे कीं,

जो पित्याशीं विरुद्ध वागेल त्याला पुत्र म्हणूं नये, असें संतांचें म्हणणें आहे. मातापित्यांचें ऐकणारा त्यांनीं सांगितल्याप्रमाणें वागणारा, त्यांचें हित करणारा व त्यांच्या उपयोगीं पडणारा हाच खरा पुत्र होय. मातापितरांस नरकांतून तारणारा तोच खरा पुत्र, असेंच संत सांगतात ना? प्रजाजनहो! यदूनें जशी माझी अवज्ञा केली, तशीच तुर्वसु, द्रुह्यु व अनु यांनींही केली; पण एकट्या पूरूनें मात्र मीं सांगितलें तसें केलें. इतकेंच नव्हे, तर तें काम प्रीतिपुरःसर व पूज्यताबुद्धिपुरःसर केलें. त्यानें माझ्या जरेचा अंगीकार केला, म्हणून तो कनिष्ठ असला तरी माझा खरा अधिकारी आहे. माझ्या इच्छा एकट्या पूरूनें तृप्त केल्या, म्हणून तो माझा मित्रच होय. आणखी, शेवटीं श्रीशुक्र मुनींनींही स्वतः असाच वर मला दिला आहे कीं, 'जो तुझा पुत्र तुझी आज्ञा वंद्य मानील, व तुझ्या अनुमतानें चालेल, तोच राज्यपति म्हणजे पृथ्वीपति होईल.' म्हणून सर्वांनीं एकमतानें पूरूलाच राज्याभिषेक करावा असें तुम्हांस नम्रपणानें माझें सांगणें आहे!"

राजाचें हें न्यायभरित भाषण ऐकून सर्वांनीं माना डोलविल्या, आणि "गुणसंपन्न असून मातापितरांचें हित करणारा जो पुत्र असतो, तो धाकटा असला तरी त्याचेंच कल्याण व्हावें अशी त्याची योग्यता असते. म्हणून, आपले मनोरथ पूर्ण करणारा जो कनिष्ठ पुरू तोच राज्यपदाला योग्य आहे. शिवाय, शुक्र मुनींनीं वरदानच दिलें आहे. तेव्हां आतां प्रश्नच राहिला नाहीं. ही गोष्ट निरुत्तरच झाली आहे." याप्रमाणें बोलून आपलें अनुमत प्रकट केलें.

वैशंपायन पुढें सांगतातः—राजा, याप्रमाणें संतुष्ट नागरिकांची संमति मिळवून ययातीनें पूरूस राज्याभिषेक केला, आणि त्यावर सर्व राज्यभार सोंपवून व स्वतः वानप्रस्थाश्रमाची दीक्षा घेऊन तो तपस्वी ब्राह्मणांसह वनवासाला निघून गेला. हे कुरुकुलभूषणा जनमेजया, यदूचे यादव' तुर्वसूपासून यवन, द्रुह्युपुत्र भोज आणि अनूपासून म्लेच्छ, अशा जाती झाल्या. पूरूपासून पौरव झाले. ह्याच पौरव कुळांत तुझा जन्म झाला आहे, व या पौरव वंशानें अनेक सहस्र वर्षें मनोनिग्रहानें राज्य करावें अशी प्रभूची योजना आहे.

अध्याय शायशींवा.

—:०:—

ययातीचें तप व स्वर्गगमन.

वैशंपायन सांगतातः—राजश्रेष्ठा, याप्रमाणें त्या नहुषपुत्र ययाति राजानें आपल्या प्रियकर कनिष्ठ पुत्रास राज्य देऊन आनंदानें वानप्रस्थ मुनीचा आश्रम स्वीकारला. तेथें ब्राह्मणांसह मनोनिग्रहानें, शुद्ध व्रतानें व कीर्तिकारक वर्तनानें फळमूलांवर निर्वाह करून राजा ययाति स्वर्गलोकास गेला. स्वर्गसुखही त्यानें सुखांत व आनंदांत उपभोगिलें. पण थोडक्याच काळांत इंद्रानें त्यास खालीं ढकलून दिलें. परंतु खालीं येत असतां पृथ्वीवर येण्याचें राहून तो अंतरिक्षांत राहिला असें म्हणतात. त्याला वसुमान्, अष्टक, प्रतर्दन व शिबि यांची सभेंत गांठ पडून पुनः तो स्वर्गास गेला असेंही मीं ऐकिलें आहे.

जनमेजय राजा विचारतोः—हे द्विजश्रेष्ठा, तो स्वर्गांतून खालीं कां आला, व पुनः स्वर्गाला कोणत्या साधनसाहाय्यानें गेला, हें ऐकण्याची माझी व या विप्रर्षींची इच्छा आहे. शिवाय, राजा ययाति म्हणजे प्रत्यक्ष इंद्रासारखा; पुनः तो कुरुवंशाचा प्रस्थापक; त्याचें तेज म्हणजे प्रत्यक्ष अग्निप्रभाच होती. तेव्हां असल्या विस्तीर्ण यशोधन व सत्यकीर्ति राजाचें मंगलप्रद चरित्र ऐकण्याची आणि येथें व स्वर्गांत त्याला कोणते अनुभव आले, हें समजून घेण्याची आमची इच्छा आहे; तर, महाराज, आपण त्याचें तें वृत्त आम्हांस साद्यंत निवेदन करावें.

वैशंपायन म्हणाले:–राजश्रेष्ठा, ऐक. त्या ययातीची उत्तम, पुण्यद आणि पापविमोचक कथा मी तुला निवेदन करितों. पूरूला राज्यावर बसवून व इतर पुत्रांस बाहेरचीं राज्यें देऊन तो उल्हासित मनानें वनांत गेला, व तेथें फळें व मुळें यांच्यावर निर्वाह करून पुष्कळ दिवस संन्यासव्रतानें राहिला हें सांगितलेंच आहे. हा कीर्तिवर्धन राजा वनांत राहून क्रोधावर जय मिळविता झाला. वानप्रस्थाप्रमाणें पितर व देवता यांस तर्पणानें व अग्नीस आहुतिदानानें संतुष्ट करून हा ययाति मुनि अतिथींचें आदरातिथ्य वन्य पदार्थांनीं करी. कापणी केल्यावर शेतांत राहिलेलीं कणसें जमा करणें ही शिलवृत्ति आणि मळणी झाल्यावर जमिनीवर पडलेले दाणे टिपणें ही उंछवृत्ति, या दोहींनीं म्हणजे शिलोंछवृत्तीनें ययाति मुनि वन्य पदार्थ मिळवीत असे. अतिथींस देऊन अवशिष्ट राही त्यावर आपण आपला निर्वाह करी. याप्रमाणें त्यानें एक हजार वर्षें क्रम चालविला. नंतर वाणी व मन यांचा निग्रह करून त्यानें तीस वर्षें जलभक्षण केलें; मन एकनिष्ठ करून एक वर्षभर वायुभक्षण केलें; एक वर्षभर पंचाग्निसाधनरूपी तप केलें; सहा महिने एका पायावर उभें राहून वायुभक्षण केलें; आणि आपल्या कीर्तिदुंदुभीनें अंतरिक्ष व पृथ्वी हीं व्याप्त करून तो पुण्यकीर्ति राजा स्वर्गलोकास गेला !

अध्याय सत्यायशींवा.

—:०:—

इंद्रययातिसंवाद.

वैशंपायन सांगतात:–राजा ! स्वपुण्यानें स्वर्गास गेलेला तो ययाति राजा देवलोकीं राहूं लागला. तेव्हां सर्वांनीं त्याचा उत्तम प्रकारें सत्कार केला. देव, सिद्ध, साध्य, मरुत्, वसु इत्यादि सर्वांनीं त्याचा जयजयकार केला. हा पुण्यशील व मनोनिग्रही ययाति राजा देवलोकांत व ब्रह्मलोकांत संचार करीत होत्साता पुष्कळ कालपर्यंत तेथें राहिला असें म्हणतात. पुढें एकदा हा राजा शक्रसभेंत गेला. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर इंद्रानें सहज विचारल्यासारखें दाखवून ययातीस प्रश्न केला, “राजन् ! जेव्हां आपल्या पूरु पुत्रानें आपली जरा घेतली, व तो राज्य करीत पृथ्वीवर राहिला त्या वेळीं, आणि शेवटीं त्याच्यावर राज्यभार टाकिला त्या वेळीं, आपण त्यास काय बरें उपदेश केला ? आपण विद्वान आहां, म्हणून आम्हांस ऐकण्याची इच्छा आहे. जसा उपदेश केला असेल तसें सर्व सांगावें.”

जनमेजया, इंद्राचा पेंच लक्षांत न येऊन, स्वाभिमानानें पुष्ट झालेला ययाति सांगूं लागला: “पूरो ! गंगा व यमुना यांच्यामध्यें जो प्रदेश आहे, हा भारती पृथ्वीचा मध्य होय. या प्रदेशाचें राज्य तुझें आहे. तुझ्या राज्यापलीकडच्या प्रदेशावर तुझे बंधु राज्य करतील. बाळा ! तापट पुरुषापेक्षां शांत पुरुषाची योग्यता मोठी; तसेंच तामसी पुरुषापेक्षां सहनशील पुरुष श्रेष्ठ; मनुष्येतरांहून मनुष्य श्रेष्ठ; व अज्ञानी लोकांहून विद्वान अधिक सम्माननीय असतो. प्रिय पुत्रा, आपल्यावर कोणी रागावला अथवा कोणी आपली निंदा करूं लागला, तर आपण उलट ओरडूं नये, किंवा प्रतिनिंदाही करूं नये. कारण सहिष्णु पुरुषाचा आवरलेला क्रोध हाच निंदकाचें व ओरडणाऱ्याचें दहन करितो, आणि त्या निंदकाचें सर्व सुकृत मिळवितो. कोणास वर्मीं बाणेल असें वर्तन करूं नये, व कोणाचा हृदयभेद होईल असे कठोर वाग्बाणही कधीं सोडूं नये. तसेंच, मंत्रतंत्रादि अभिचार कर्में करून शत्रूला वश करण्याची युक्ति करूं नये. बाळा ! ज्या मर्मभेदी शब्दानें दुसऱ्याला खिन्नता प्राप्त होते, अशी कठोर, दाहक व पापात्मक वाणी मुखांतून केव्हांही काढूं नये. क्षताला झोंबून दुःख देणारी,

व दुसऱ्याला ताप देणारी कठोर वाणी म्हणजे इतरांस शब्दकंटकांनीं सतावून सोडणारी एक त्रासदायक कंटकवेलीच होय. असलें तीक्ष्ण भाषण करणारा पुरुष सदासर्वदा आपल्या मुखांत अवदशेला राहण्यास जागाच देतो. या पुरुषाचें दर्शन सुद्धां अमंगलसूचक असतें व म्हणून सर्व सुज्ञ लोक असल्या अभद्रभाषणी पुरुषाचा कंटाळा करितात. बाळा ! गांठ पडली असतां संत व सज्जन सत्कार करतील आणि आपल्या परोक्ष आपल्या वर्तनानें बोलत राहतील असें वर्तन ठेवावें. दुष्ट लोकांनीं दुर्भाषणानें आपला मानभंग केला तर तो आपण सहन करावा. साधुसंतांचें आचरण पाहून त्यांच्याप्रमाणें आपण वागण्याचा यत्न करावा. आपल्या मुखांतून निघालेले वाग्बाण दुसऱ्याच्या मर्मस्थानीं क्षतें करितात, आणि त्यामुळें तो रात्रंदिवस शोक करीत असतो. आपल्यास कोणी झोंबण्यासारखें बोललें असतां तें शल्य स्मरून आपण सर्वदा दुःखी असतों, तसेंच दुःख दुसऱ्यास होतें हें जाणावें, आणि हें जाणून दुसऱ्यास परुषवाणीनें कधींही ताडन करूं नये. पंडितांचें आचरण असेंच असतें. परमेश्वराला व जगाला वश करणारें ह्यासारखें दुसरें साधनच त्रैलोक्यांत नाहीं. भूतमात्रावर दया करणें, त्यांच्याशीं मैत्री करणें, यथाशक्ति दान देणें आणि मधुर भाषण करणें, ह्या अलौकिक वर्तनानें सर्व विश्व व विश्वपति आपल्यास वश होतील. म्हणून सदैव सांत्वन होईल असें बोलावें, कठोरवाणी केव्हांही उच्चारूं नये, माननीय असतील त्यांस मान द्यावा, यथाशक्ति दान करावें, कोणाजवळही याचना करूं नये, हाच सात्विक मार्ग होय, आणि या मार्गाचें अवलंबन तूं कर. हे देवेंद्र, असा चांगला उपदेश मीं आपल्या पुत्रास केला."

~~~~~~~~~~

अध्याय अठ्ठ्यायशींवा.

—:०:—

ययातीचें पतन.

इंद्र म्हणालाः—राजा, गृहस्थाश्रमसंबंधी सर्व कर्मे संपविल्यानंतर गृहत्याग करून तूं वनांत गेलास; तेव्हां, मी तुला असें विचारितों कीं, तपश्चर्येमध्यें तूं कोणाच्या बरोबरीचा आहेस?

ययाति म्हणालाः—हे देवराज, तपश्चर्येमध्यें माझी बरोबरी करील असा देवांमध्यें, मनुष्यांमध्यें, गंधर्वांमध्यें आणि महर्षींमध्यें मला कोणीही आढळत नाहीं.

इंद्र म्हणालाः—राजा ययाते, यावज्जीवमात्राची शक्ति काय आहे ह्याचें यथार्थ ज्ञान तुला नसून, आपल्यापेक्षां श्रेष्ठ आणि आपल्या बरोबरीचे जे लोक, ते आपल्यापेक्षां कमी आहेत अशा क्षुद्र बुद्धीनें तूं त्या सर्वांचा अपमान केलास, म्हणून आतां तुझ्या पुण्याचा क्षय होऊन तूं पतित झालास आणि स्वर्गांत राहण्याची तुझी मर्यादा संपली!

जनमेजया, इंद्राचें हें भाषण ऐकून ययातीला फार वाईट वाटलें, आणि तो त्याला म्हणाला, "देवराज, देवर्षि, गंधर्व आणि मनुष्यें ह्यांची अवहेलना केल्यामुळें मी स्वर्गलोकास तर आतां अंतरलोंच; पण, आतां, ज्या ठिकाणीं सज्जनांची वस्ती आहे त्या ठिकाणीं तरी मला ठेवावें, अशी माझी आपणांस प्रार्थना आहे."

इंद्र म्हणालाः—राजा, तुझ्या इच्छेप्रमाणें तुला साधुलोकच प्राप्त होईल, आणि तेथेंही पूर्वीप्रमाणें तुला प्रतिष्ठा मिळेल. परंतु येथें घडलेल्या गोष्टीचें चांगलें स्मरण ठेवून, आपल्या बरोबरीचे आणि आपल्यापेक्षां श्रेष्ठ असे जे असतील, त्यांची निंदा करीत जाऊं नको.

अष्टकाची ययातीला पृच्छा.

वैशंपायन म्हणालेः—राजा जनमेजया, ह्याप्रमाणें इंद्र आणि ययाति ह्यांच्यामध्यें संवाद झा-
~~~~~~~~~~

त्यानंतर, तो ययाति पवित्र अशा इंद्रलोकाला सोडून निघाला; तेव्हां तो खालीं येत असतां त्याला अष्टकानें पाहिलें. हा अष्टक, उत्तम धर्माचरण करणारा असून महर्षींमध्यें श्रेष्ठ होता. त्यानें ययातीला विचारिलें, "हे श्रेष्ठ पुरुषा, तूं तरुण दिसत असून, रूपानें इंद्रासारखा व तेजानें अग्नीप्रमाणें भासत आहेस; आणि सजल मेघांमुळें काळेभोर दिसणाऱ्या आकाशांतून, तेथें संचार करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ अशा सूर्याप्रमाणें तूं खालीं उतरत आहेस. तेव्हां तूं आहेस तरी कोण तें मला सांग. तुझ्याकडे आम्हां सर्वांचें लक्ष लागून राहिलें आहे. परंतु तूं अमुकच असावास अशी आम्हांस कल्पना करितां येईना. ज्या मार्गानें देव जात येत असतात, त्या मार्गांमध्यें तूं असून इंद्र, सूर्य आणि विष्णु ह्यांप्रमाणें तुझा प्रभाव दिसत आहे. यामुळें, तूं खरोखर कोण आहेस हें जाणण्याच्या इच्छेनें आम्ही तुला सामोरे आलों आहों. तूं आमच्याकडे येत असून आम्हांस कांहींच विचारीत नाहींस, तेव्हां तूं कोण आहेस असें विचारण्याचें आम्हांसही प्रथम धैर्य होईना; परंतु तुझें तेज व रूप पाहून तुला विचारिल्यावांचून आमच्यानें राहवेना. हे श्रेष्ठ पुरुषा, तूं इंद्राप्रमाणें पराक्रमी दिसत असून येथें सज्जनांच्या सन्निध आला आहेस. याकरितां, तुझ्या अंतःकरणाला जर कांहीं दुःख असेल, अथवा तुझ्या मनाचा जर कांहीं घोटाळा झाला असेल, किंवा तुला जर कांहीं भय वाटत असेल, तर तें सर्व तूं सोडून दे. येथें प्रत्यक्ष इंद्राच्यानें देखील तुझें काडीमात्र सुद्धां वांकडें होणार नाहीं. बाबा, सज्जनांची योग्यता फार मोठी असून ते अवघ्या चराचर सृष्टीचें नियमन करणारे असतात. तूंही इंद्राप्रमाणें असून येथें सज्जनांमध्यें आला आहेस. आतां, स्वर्ग हें सुखाचें स्थान खरें; परंतु त्याची प्राप्ति सज्जनांना न झाली तरी ते निराधार होत नाहींत. उलट स्वर्गांतील लोकांना सज्जनच आधारभूत होतात; आणि तूं तर आमच्या येथें आला आहेस; तेव्हां तूं आमचा अतिथि असून आम्हांला पूज्य आहेस. तापविणाऱ्या पदार्थांत जसा अग्नि श्रेष्ठ, संग्रह करणाऱ्या पदार्थांत जसी पृथ्वी श्रेष्ठ, प्रकाश पाडणाऱ्या पदार्थांत जसा सूर्य श्रेष्ठ, तसा सज्जनसमुदायांत अतिथि हा श्रेष्ठ होय.

अध्याय एकुणनव्वदावा.

—:०:—

अष्टकययातिसंवाद.

ययाति म्हणाला:—मी नहुष राजाचा पुत्र असून पूरु राजाचा पिता आहें. माझें नांव ययाति. सर्व प्राणिमात्राचा अपमान केल्यामुळें देव, सिद्ध आणि ऋषि ह्यांच्या लोकांतून मला घालवून दिलें. माझें पुण्य संपल्यामुळें मी पतित झालों आणि येथें आलों. तुम्हांपेक्षां मी वयानें मोठा असल्यामुळें तुम्हांस नमस्कार केला नाहीं. जो विद्येनें, तपश्चर्येनें आणि वयानें मोठा असतो, त्याला ब्राह्मण पूज्य मानितात.

अष्टक म्हणाला:—वयाच्या मोठेपणाबद्दल तूं सांगितलेंस, परंतु तेवढ्यानेंच श्रेष्ठत्व येतें असें मानीत नाहींत. तर ज्याची विद्या तप व हीं जास्त असतात, तोच ब्राह्मणांना पूज्य होतो.

ययाति म्हणाला:—ज्याच्या योगानें पुण्याचा नाश होतो तें पाप होय. ज्याच्या अंगीं नम्रता नसते, त्याच्याच ठिकाणीं हें पाप दिसून येतें. अर्थात् हें पाप म्हणजे गर्व होय. हा गर्व प्राणिमात्रास नरकांत नेणारा आहे, म्हणून सज्जन गर्वाचा अंगीकार करीत नाहींत. सर्व सज्जन पूर्वीपासून अशाच पद्धतीनें वागत आलेले आहेत. अष्टका! मजपाशीं किती तरी पुण्यरूपी धन होतें; परंतु ह्या गर्वामुळें तें सर्व नाहींसें झालें. आतां मी किती जरी धडपडलों, तरी मला तें परत मिळणार नाहीं. ज्याला आपलें हित